स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय संदर्भ
सं. क्र. 3400

राजसत्तेच्या फर्दींमधून

# पेशवेकालीन स्त्रिया

## नीलिमा भावे

REFBK-0026738



ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

8 NOV 1992

2 DEC 1992

30 DEC 1992

17 APR 1993

21 JUL 1993

28 JUL 1993

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

3400

संदर्भ
3400
२६७३८
२२।१०।९२

मराठी ग्रंथ संग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 3400
२६७३८
२२।१०।९२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

राज्यसत्तेच्या फटींमधून :

# पेशवेकालीन स्त्रिया

नीलिमा भावे

REFBK-0026738

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

राज्यसत्तेच्या फटींमधून :
पेशवेकालीन स्त्रिया
पॉप्युलर प्रकाशन
(म - ५८८)

Rajyasattechya Phatinmadhun
Peshwekalin Striya
(Marathi : Social History)
Neelima Bhave

© १९८९, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस

पहिली आवृत्ती : १९८९/१९११

**प्रकाशक**
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

**जुळणी**
कॉम्प्युशियस
७/८ मंजिरी, मकरंद सहनिवास
वीर सावरकर मार्ग
माहीम, मुंबई ४०० ०१६

**मुद्रक**
प्लासकोट इंडस्ट्रीज
२३, म्युनिसिपल इंड. इस्टेट
जेकब सर्कल, मुंबई ४०० ०११

अभ्यासमालिका

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

संपादिका : सुमा चिटणीस

निर्मिती : छाया दातार


१. संत कवयित्री,

– इंदुमती शेवडे

२. राज्यसत्तेच्या फटींमधून : पेशवेकालीन स्त्रिया

– नीलिमा भावे

३. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीप्रश्नांची चर्चा

– प्रतिभा रानडे

४. स्त्रीमुक्तीच्या तीन वाटा : एकोणिसावे शतक

– मृणालिनी जोगळेकर

५. वारसा

– विनया खडपेकर

निबंध ३५००/२६७३८/२२।१०।९२

# राज्यसत्तेच्या फटींमधून : पेशवेकालीन स्त्रिया

# अनुक्रमणिका

अभ्यासमालिका परिचय :
स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा सात
सुमा चिटणीस

१. अभ्यासाची पार्श्वभूमी, स्वरूप व साधने १

२. अठराव्या शतकातील महाराष्ट्र :
काळ आणि जीवन यांचे काही पैलू ७

३. काही कर्तृत्वसंपन्न स्त्रिया २२

प्रास्ताविक : 'अ' गट
ताराबाई
शाहूच्या राण्या : विरूबाई, सकवारबाई, सगुणाबाई
जिजाबाई
दर्याबाई भोसले
उमाबाई दाभाडे
दर्याबाई निंबाळकर
लक्ष्मीबाई आंग्रे
लक्ष्मीबाई शिंदे

प्रास्ताविक : 'ब' गट
राधाबाई
अनुबाई
गोपिकाबाई
आनंदीबाई
सगुणाबाई
गंगाबाई

४. उपसंहार ८२

संदर्भग्रंथ सूची ८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3500
२६७३८
ग्रं. शाखा

अभ्यासमालिका परिचय

# स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

'स्व'च्या शोधासाठी चाललेल्या स्त्रीचा आजचा झगडा समजून घेताना इतिहासात शक्यतो पाठी जाऊन शोध घ्यावा लागेल. त्या काळात हे झगडे स्त्रीमुक्तीच्या नावाने ओळखले गेले नसतील. तरीही आज आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीची मुळे त्यात सापडतील. या संशोधन प्रकल्पाने आम्ही या प्रकारच्या झगड्यांचा ऐतिहासिक शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हे झगडे विविध प्रकारचे आहेत. ते आम्ही पाच अभ्यासखंडामध्ये विभागले आहेत. अर्थात इतिहासामध्ये डोकावणाऱ्या या प्रयत्नाला काही मर्यादा राहतातच. तरीही जिथपर्यंत पुरावे मिळतात – मग ते लिखित स्वरूपात असो किंवा मौखिक वा बोली परंपरेतील असोत – त्या काळापर्यंत पोहोचण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

या अभ्यासमालिकेतील पाच खंडांपैकी चार खंड चरित्रात्मक आहेत. या व्यक्तिचित्रांची अभिव्यक्ती वेगवेगळया तऱ्हेने झालेली दिसते. पहिल्या खंडात सतराव्या शतकापर्यंतच्या पाच संत कवयित्रींची निवड केली आहे. महादाइसा (शके ११६० ते १२३०), मुक्ताबाई (शके १२०१ ते १२१९), जनाबाई, बहिणाबाई (शके १५५० ते १६२२) आणि वेणाबाई (शके १५४९ ते १६००). या संत स्त्रियांनी भक्तिमार्गाचा अवलंब करून आध्यात्मिक मोक्ष मिळविण्याची धडपड केली. परंपरेने कनिष्ट जातींप्रमाणेच सर्व स्त्रियांनाही मोक्ष नाकारला होता. या संत कवयित्रींचे काव्य मराठी वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. परंतु या पहिल्या खंडातील अभ्यासातील वाङ्मयीन आस्वादासाठी केलेला नाही. या अभ्यासाचा उद्देश्य या संत कवयित्रींनी काळाच्या मर्यादा कशा ओलांडल्या ते तपासायचा आहे. या स्त्रियाचे सर्वप्रथम जाणवणारे वैशिष्ट्य हे की ज्या काळात स्त्रीला धार्मिक व्यवहारात जवळजवळ वगळण्यात आले होते, त्या काळात ह्या स्त्रियांनी स्वतःचे असे धर्मांतर्गत उच्च स्थान मिळविले. दुसरे म्हणजे, त्या काळात स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नसतानाही त्या सर्वांनी उत्तम प्रतीच्या काव्याची निर्मिती केली. त्यांचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे, त्या सर्वजणी जातीधर्माच्या पलीकडे जाऊ शकल्या. पारंपारिक रूढिग्रस्त धर्मनियमांनी घालून दिलेला मार्ग सोडून त्यांनी भक्तिमार्ग चोखाळल्यामुळेच हे शक्य झाले. त्यांना मिळालेले गुरू हे बव्हंशी कनिष्ठ जातीचे होते हेही लक्षात घेण्याजोगे आहे. चौथे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांचे व्यक्तिगत जीवनसुद्धा इतर सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा वेगळे होते. निव्वळ एखाद्याची बायको वा विधवा

किंवा कोणाची मुलगी, सून किंवा बहीण या नात्याने त्या जगात वावरल्या नाहीत.

पहिला अभ्यासखंड हा सतराव्या शतकातील वेणाबाईपाशी थांबतो. तर दुसऱ्या खंडामध्ये कालदृष्ट्या एक मोठी झेप घेऊन पेशवाईच्या काळातील स्त्रियांची चरित्रे तपासण्याचा प्रयत्न सुरू होतो. या कालखंडामध्ये अगदी वेगळ्या प्रकारच्या स्त्रिया समोर उभ्या राहतात. पेशव्यांच्या ब्राह्मण स्त्रिया आणि त्याच काळातील सत्ताधारी राजे व सरदार यांच्या मराठा स्त्रिया. त्यांचे वैशिष्ट्य त्यांच्या अंगातील अनेक गुणांनी उठून दिसते. समंजसपणा, चिकाटी, मुत्सद्देगिरी, धैर्य या गुणांबरोबरच त्यांच्याकडे स्वतःला नाही तरी आपल्या नवऱ्याला किंवा मुलाला राजकीय सत्ता मिळावी यासाठी खटपट करण्याचे कसबही होते. पारंपारिक इतिहासाने या स्त्रियांची दखल घेतलेली आढळत नाही. किंबहुना, काही इतिहासकारांनी पेशवे आणि मराठे यांच्या राज्यकारभारात कारस्थाने रचणाऱ्या स्त्रिया एवढ्यावरच त्यांची बोळवण केलेली आहे. त्यांच्या कार्याची योग्य ती मीमांसा झालेली नाही. परंतु या अभ्यासखंडातील स्त्रियांच्या चरित्रांवरून असे दिसते की या स्त्रिया आपल्या कृतींनी जबाबदारी ओळखणाऱ्या होत्या. राजकारणी पुरुषांची पत्नी किंवा माता म्हणून जबाबदारी पार पाडत असताना आपल्या राजकीय उद्दिष्टांसाठी त्यांनी धैर्य दाखविले, शिक्षा भोगल्या, अगदी कारावासही सहन केला. इतकेच नव्हे तर ज्या राजकीय संरचनेतून त्यांना बहुतांशी वगळण्यात आले होते त्याच संरचनेत जिथे जिथे त्यांना फट दिसली किंवा संधी सापडली तिचा त्यांनी कुशलपणे वापर केला.

या मालिकेतील तिसरा व चौथा खंड आपल्याला एकोणिसाव्या शतकाकडे आणतात. पेशवाई संपता संपता हा काळ सुरू होतो. याच काळात ब्रिटिशांनी पेशव्यांकडून महाराष्ट्र जिंकून घेतला. भारताच्या इतिहासात या शतकाच्या पहिल्या काही दशकांमध्ये हिंदूंचे आचार आणि विचार हे ख्रिश्चन धर्म, मिशनऱ्यांची कामे आणि युरोपमधील उदारमतवाद यांनी जोरदारपणे प्रभावित झालेले दिसतात. या परिणामांची सगळ्यात महत्त्वाची अभिव्यक्ती झाली सुधारकांच्या चळवळीमधून. हिंदू समाजाची नीतिमूल्ये आणि विशेषतः स्त्रियांच्या जीवनाशी निगडित विधिनिषेध यांचा मूलगामी पुनर्विचार स्त्रियांच्यावतीने सुधारकांनी केला. आपल्या पत्नीला, लेकींना शिक्षण देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. बंगाल व महाराष्ट्र हे दोन प्रांत यात आघाडीवर होते. तिसऱ्या खंडामध्ये अशा शिक्षणाची संधी लाभल्यामुळे वेगवेगळ्या दिशांनी जाणाऱ्या तीन स्त्रियांची चरित्रे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एकोणिसाव्या शतकातील सुधारकांच्या चळवळीची पार्श्वभूमी या तिन्ही स्त्रियांना लाभली. पंडिता रमाबाई कुशाग्र बुद्धिच्या विद्वान होत्या. सत्याचा शोध हा त्यांचा ध्यास होता. रमाबाई रानडे या हाडाच्या सामाजिक कार्यकर्त्या होत्या. ताराबाई शिंदे या सडेतोड लिहिणाऱ्या लेखिका होत्या. या तिघींचे व्यक्तिगत जीवन वेगळे होते; त्यांचे दृष्टिकोणही वेगळ्या प्रकारचे होते. एकोणिसाव्या शतकातील शिक्षित उच्चवर्णीय महाराष्ट्रीय स्त्रिया स्वतंत्रपणे आपापला मार्ग कसा धुंडाळतात याचे दर्शन या अभ्यासखंडामध्ये होते.

चौथ्या खंडामध्ये काहीसे वेगळे वळण घेतलेले आहे. यात व्यक्तिचित्रणाची पद्धत सोडून एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थिती आणि स्त्रीविषयक प्रश्न यांचा वेध

घेण्याचा प्रयत्न आहे. या काळातील कादंबरी, लघुकथा, नाटके, वृत्तपत्रे आणि इतर लिखित साधनसामुग्री या माध्यमांतून सती, हुंडा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण अशा बऱ्याच विषयांवर झालेल्या चर्चा, संवाद, वैचारिक मांडणी, भावनिक प्रतिक्रिया यांचा मागोवा घेण्यात आला आहे.

पाचव्या खंडामध्ये आज हयात असलेल्या पण विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकामध्ये ज्यांनी लेखन केले अशा नावाजलेल्या चार महाराष्ट्रीय स्त्रियांच्या मुलाखती आणि त्यांचे स्त्रीप्रश्नांवरील विचार एकत्र स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. गीता साने, मालतीबाई बेडेकर, कृष्णाबाई मोटे आणि शकुंतला परांजपे या लेखिकांच्या जीवनाचा व स्त्री-पुरुष संबंधविषयक तत्त्वज्ञानाचा हा परिचय आहे. या चौघींनीही वयाची ऐंशी वर्षे ओलांडली आहेत आणि त्या उच्चवर्णीय व्यावसायिक कुटुंबातील आहेत. त्या सुविख्यात लेखिका आहेत आणि त्यांनी सार्वजनिक जीवनात भाग घेऊन आपला ठसा त्यां त्या क्षेत्रात उमटविला आहे. तरीही मध्यम किंवा उच्चवर्णिय अशा सुशिक्षित महाराष्ट्रीय स्त्रिया व्यक्तिगत जीवनात स्वायत्तता किंवा स्वातंत्र्य मिळविण्यासाठी या शतकाच्या पूर्वार्धात वेगवेगळ्या मार्गांनी कशी धडपड करत होत्या यांचे प्रातिनिधिक स्वरूप इथे पाहावयास मिळेल.

या पाच खंडामधून केलेल्या चित्रणाला सात शतकांची व्याप्ती आहे आणि या अभ्यासाला एक ऐतिहासिक परिमाण आहे. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी आज चालू असलेल्या आंदोलनासाठी आणि स्त्रीविषयक प्रश्नांसंबंधीचा विचार आणि संशोधन यांना ऐतिहासिक पाया देण्यासाठी ही चरित्रे तपासण्यात आली आहेत. सामाजिक संरचना, जडणघडण, चळवळी, प्रतिकार, परिवर्तन या सर्वांचा ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास व्हायला हवा हे आज सर्वमान्य आहे. परंतु या विशिष्ट अभ्यासमालिकेचा उगम हा कोणत्या उर्मीतून, उत्कट भावनेतून झाला हे वाचकांना समजणे आवश्यक आहे. त्यामुळे ह्या अभ्यासमालिकेतील संशोधनाला आलेला आकार समजून घेणे शक्य होईल.

१९७४ सालची गोष्ट आहे. आंतरराष्ट्रीय समाजविज्ञान मंडळाची जागतिक परिषद टोरॅन्टो येथे भरली होती. तेथे 'लिंगाधिष्ठित सामाजिक स्थान' (Sex-Role) या विषयावरील सत्राला मी उपस्थित होते. त्या वेळी पहिल्या प्रथमच स्त्रीमुक्ती संकल्पनेवरील अतिशय प्रभावी भाष्य मला ऐकायला मिळाले. एका मागोमाग एक व्यक्ती आपले मुद्दे मांडत होत्या. त्या जहाल विधानांमध्ये मी पूर्ण भिजून जात होते. त्यातील तर्कशुद्धता वादातीत होती आणि खिळवून टाकत होती. असे असूनही मला त्यांच्याइतका उद्वेग येऊ शकत नव्हता किंवा त्यांच्या भावनांशी उत्कटपणे मी समरस होऊ शकत नव्हते. आधी मला स्वतःच्या या द्विधा मनःस्थितीचे आश्चर्य वाटले. नंतर माझ्या लक्षात आले की स्त्रीमुक्तीचा प्रश्न येथे ज्या तऱ्हेने मांडला गेला होता तो पाश्चात्य संस्कृतीच्या व तेथील जीवनाच्या संदर्भात मांडला गेला होता. आणि भारतीय संस्कृतीपेक्षा तो थोडाफार वेगळा होता. स्त्रियांवरील अन्याय आणि जुलूम हे दोन्ही संस्कृतीमध्ये घडत आलेले आहेत. तरीसुद्धा त्यांच्या स्वरूपांमध्ये फरक आहेत. छोटी छोटी वळणे आहेत. एक भारतीय स्त्री म्हणून येथील स्त्रीमुक्तीवादामधील विधाने, मुद्दे मला माझ्या वैयक्तिक, सांस्कृतिक संदर्भात तपासून घ्यावे लागतील. आणि ज्या व्यापक

संस्कृतितून मी आलेली आहे तिच्याही घडणीचा ऐतिहासिक शोध घ्यावा लागेल, असे मला वाटले.

त्यानंतर १९७५ साली स्त्रीदशक जाहीर झाल्यावर स्त्रीवादाच्या विचारांची व भावनांची शक्तीशाली लाट सर्व जगभर पसरत गेली. भारतामध्ये तिचा परिणाम बराच खोलवर झाला. भारतातील स्त्रियांचा स्वतःचा असा खास स्त्रीमुक्तीवाद प्रसृत झाला. भारतीय स्त्रियांनी आर्थिक शोषणाच्या विरोधात संघटित व्हायला सुरवात केली. घटनेमध्ये दिलेले अधिकार प्रत्यक्षात यावे म्हणून दबाव सुरू झाला. आत्मचिंतनाला सुरवात झाली. सामाजिक, राजकीय आणि वैयक्तिक क्षेत्रांमध्ये आजपर्यंत ज्या व्याख्या स्वीकारल्या होत्या, ज्या भूमिका व जी कर्तव्ये मान्य केली होती ती सर्वच तपासून पाहाण्यास सुरवात झाली. आजपर्यंतच्या इतिहासातून त्यांना वगळण्यात आले होते. त्यांच्या राजकीय व आर्थिक व्यवहारांच्या नोंदी झाल्या नव्हत्या. शिरगणतीमध्ये 'स्त्री'च्या कामाची नोंद अजूनही होत नव्हती. स्त्रीविषयक अभ्यासातून अनेक प्रकारची माहिती जमा करण्यात आली. आंकडेवारी गोळा झाली आणि आजपर्यंतच्या आपल्या व्याख्या, त्या आधारे केलेल्या नोंदी ह्या किती लिंगसापेक्ष आहेत हे लक्षात आणून दिले. एका बाजूने स्त्रीवरील अन्यायाची तीव्रता दाखवून दिली गेली. स्त्रियांना सतत मुख्य प्रवाहातून बाजूला कसे ढकलण्यात आले, जीवनाच्या अनेक अंगांमध्ये प्रवेश कसा नाकारण्यात आला हे सिद्ध केले गेले. समाजाने कोणतीही मूल्यव्यवस्था मानली आणि कोणतीही सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक विचारप्रणाली स्वीकारली तरी स्त्रीला खऱ्या अर्थाने समान संधी मिळू शकत नाही. त्याचप्रमाणे स्त्रिया कोणत्याही वर्गाच्या, धर्माच्या व जातीच्या असल्या तरी त्यांची कोंडी सुटत नाही. याच अभ्यासातून दुसऱ्या बाजूने स्त्रीची काही बलस्थाने स्पष्ट होताना दिसतात. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण वैशिष्ट्यपूर्ण दिसतो. स्वतःभोवतालची परिस्थिती आपल्याला हवी तशी थोडीफार वाकविण्याचे कसब त्यांना लाभलेले दिसते. मूकपणाने सोसणे हे त्यांनी मान्य केलेले दिसते. पण त्यातून त्यांच्यामध्ये एकप्रकारचा हळुवारपणा, मृदुता आलेली आढळते. त्यांच्यावर जुलूम होऊनही कडवटपणा येऊ न देता त्यांना आपली माणुसकी टिकवून धरल्याचे दिसते.

काही अभ्यासांतून असे दिसत गेले की विशिष्ट ऐतिहासिक कालखंडांमध्ये स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य होते, हाती सत्ता होती. परंतु सामाजिक व राजकीय बदलांमुळे ही परिस्थिती बदललेली आढळते. तसेच, वरवर अगदी जुलूमी समजल्या गेलेल्या कालखंडांतसुद्धा असे काही क्षण, अशा घटना आढळतात की स्त्रियांनी आपला अधिकार चालविला होता. याच कालखंडामध्ये सामान्य स्त्रीचे जीवन अतिशय कोंडलेले, दबलेले असले तरी अशा काही तुरळक असामान्य स्त्रिया आढळतात की ज्यांनी काळाच्या मर्यादांचे उल्लंघन करून त्या आत्मसन्मानाने राहिलेल्या आहेत.

स्त्रीमुक्ती चळवळींचे साखळीसंबंध तयार केल्यामुळे वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये स्त्रीविषयक विचार, भावना व कार्य यांचे संदर्भ तपासणे शक्य झाले. स्त्रीवर जगभर होणारा अन्याय आणि जुलूम यांत साम्यस्थळे असली तरी त्यांना वेगवेगळ्या संदर्भात आणि संस्कृतित मिळणारे प्रतिसाद आणि भावनांची अभिव्यक्ती यात खूप वैविध्य आढळले.

तसेच एकाच समाजाच्या सांस्कृतिक संदर्भातसुद्धा कालमानाप्रमाणे विविधता दिसून आली. ही दोन्ही परिमाणे लक्षात घेतली तर असे दिसते की स्त्रियांच्या प्रतिसादाची व्याप्ती मोठी आहे. एका टोकाला स्त्रिया आपल्या सद्यःस्थितीतील मूक स्वीकृती देतात. आपली परिस्थिती ही निसर्गतः स्त्रीजन्माशी, कर्मभोगाशी आणि आपल्या कर्तव्याशी निगडित आहे असा त्यांचा समज असतो. दुसऱ्या बाजूने खुला विरोध दिसून येतो किंवा आपल्या सांस्कृतिक संदर्भात उपलब्ध असलेल्या अरुंद वाटा चोखाळत चलाखपणे धार्मिक चालीरीती, रिवाज यांमधून मिळणाऱ्या संधींचा उपयोग करून घेत इंचाइंचाने स्वातंत्र्याकडे, सत्तेकडे व स्वायत्ततेकडे जाण्याचे प्रयोगही केलेले आढळतात. हळूहळू अशा प्रकारच्या आंतरसांस्कृतिक अभ्यासांचे महत्त्व मान्यता पावत आहे. त्याचप्रमाणे एकाच समाजातील विविध कालखंडातील स्त्रियाही आपल्या भोवतालच्या बंधनांना कशा प्रकारे सामोऱ्या गेल्या हेही पाहण्याचे महत्त्व लक्षात आले आहे.

१९७४ साली टोरोन्टो येथे जी एक वैयक्तिक गरज म्हणून स्त्रीमुक्तीची संकल्पना जन्माला आली. तिचा भारतीय संदर्भात महाराष्ट्राच्या इतिहासात तपास करावासा वाटू लागला होता, तिला अधिक समग्र असा आकार येऊ लागला होता. याचे कारण स्त्रीविषयक अभ्यासामध्ये माझे लक्ष अधिकाधिक स्थिरावत होते. मागे वळून बघताना लक्षात येतेय की आणखी एका घटनेने या प्रक्रियेला मदत झाली. 'भारतीय स्त्रीची अस्मिता' या नावाने एक परिसंवाद, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, फोर्ड फाऊंडेशन व टाटा समाजविज्ञान संस्था यांनी केला होता. दिल्लीजवळ बतखल सरोवराच्या किनारी १९७५ मध्ये हा परिसंवाद झाला. २५ भारतीय स्त्रिया याला हजर होत्या. त्या वेगवेगळया व्यावसायाशी संबंधित होत्या. कल्पना अशी होती की सर्वसामान्य स्त्रीपेक्षा वेगळी पावले टाकण्याचा त्यांचा अनुभव – त्यांची देवाणघेवाण व्हावी. त्यांच्या भावना, त्यांच्या वृत्ती, त्यांचे वास्तव या सर्वांचा त्यांच्या 'वेगळया वाटचालीशी' संबंध असणार. या सर्वांची पद्धतशीर अभिव्यक्ती करण्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले होते.

या परिसंवादाची फलश्रुती अर्थपूर्ण होती. सर्वजणी शिकलेल्या, किमान पदवीधर, उच्चवर्णीय, हिंदू, मध्यम किंवा उच्चमध्यम आर्थिक थरातील, आणि व्यावसायिक कौटुंबिक पार्श्वभूमी असणाऱ्या होत्या. वय वर्षे २५ ते ५० असा हा वयोगट होता. त्या वेगवेगळया प्रांतांतून आल्या होत्या. दोघीतिघींनी आपल्या सुशिक्षित आईचा खास उल्लेख केला. त्या स्वतः महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या होत्या आणि मुलींनी शिकलेच पाहिजे या विचारसरणीतून त्यांनी मुलींना वाढविले होते. बहुतेकांच्या आया जेमतेम शाळा शिकलेल्या होत्या. किंबहुना काही तर अतिशय कर्मठ कुटुंबातून आल्या होत्या. काहींची कुटुंबे मात्र आधुनिक होती.

अशी विविध पार्श्वभूमी असूनही जेव्हा त्यांचे जीवनपट उलगडत गेले तेव्हा त्यांच्या वृत्तींमध्ये खूपच साधर्म्य आढळले. पारंपारिक वैवाहिक जीवन, मातृत्वाच्या जबाबदाऱ्या यांतून बाहेर पडून वेगळया वाटा चोखाळण्याचे प्रयत्न करताना अपरिहार्यपणे काही समान भूमिका बाळगावी लागते असे दिसले. दुसरे लक्षात आले की पाश्चात्य स्त्रियांसंबंधी मी जे

वाचले होते, निरीक्षले होते त्यापासून आम्हा स्त्रियांची भूमिका भिन्न होती. उदाहरणार्थ, आई व मुलगी या नातेसंबंधाचा विचार केला तर आपल्या स्त्रियांमध्ये आईबद्दलचा राग किंवा धिक्कार दिसून आला नाही. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पाश्चात्य साहित्यामधून मुलीला आईबद्दल वाटणारा संताप खदखदत असलेला मला ठळकपणे चाणवलेला होता. आईची भूमिका ही आपल्याकडे एकत्र कुटुंबामध्ये अनेक स्त्रिया पार पाडीत असतात. घरात आजी असते, विधवा आत्या किंवा अविवाहित बहीण अशा कोणी ना कोणी असतातच. त्यामुळे आई-मुलीच्या नात्यातील तणाव आणि असंतुष्टपणा यांची विभागणी होत असेल का? हिंदू धर्मात आणि संस्कृतीत मातेला अतिशय महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. याचा तर हा परिणाम नसेल? पाश्चात्य अनुभवामध्ये आढळणाऱ्या आक्रमक पुरुषाच्या तुलनेमध्ये प्रेमळ वडील, आधारस्तंभासारखा भाऊ किंवा अविचल साथ देणारा, उत्तेजन देणारा नवरा अशा नातेसंबंधांतील पुरुष आपल्या स्त्रियांच्या कथनातून दृष्टीस पडत होते. किंबहुना, पुष्कळदा या स्त्रियांना आपली वाटचाल सुरू करताना चालना देण्यासाठी आणि महत्त्वाकांक्षी बनविण्यात, यशाची उर्मी पैदा करण्यात अशाच पुरुषांची मदत झालेली दिसली. हा एकोणिसाव्या शतकातील सुधारकांच्या चळवळीचा परिणाम तर नसेल? तरीसुद्धा बतखल येथे जमलेल्या स्त्रिया आणि पाश्चिमात्य स्त्रिया यांच्यातील सर्वात महत्त्वाचा फरक जाणवला जेव्हा सर्व सहभागी स्त्रिया 'तडजोडी'संबंधी बोलू लागल्या तेव्हा.

घर सांभाळणे, मुलांची जोपासना करणे व पत्नीची भूमिका निभावणे आणि त्याच वेळी व्यावसायिक आव्हानं पेलणे यांची सांगड घालत असताना सर्वांनाच तडजोड करण्याची गरज भासली. एका बाजूने त्यांची वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कल्पनेशी बांधिलकी आहे. स्वायत्तता, स्वतंत्रता ह्या महत्त्वाच्या वाटतात. तर दुसऱ्या बाजूने आदर्श मुलगी किंवा कर्तव्यतत्पर माता वा पत्नी म्हणून त्यांची भूमिका असते. या दोन्हीचा समतोल राखणे त्यांना गरजेचे वाटले. मात्र या द्विधा परिस्थितीबद्दल बोलताना त्यांच्यात कटुता नव्हती. एक प्रकारची समाधन आणि विजयाची भावना होती. या कबुलीजबाबाचे वैशिष्ट्य असे की ही तडजोड सहजी घडणारी नव्हती, ती कष्टदायक होती आणि तरीही परस्परविरोधी मागण्यांची विविध प्रकारे सांगड घालून केलेल्या ह्या तडजोडीतून शांतीची भावना व्यक्त होत होती. आमच्या सोबत असलेल्या तीन अमेरिकन स्त्रियांच्या प्रवृत्तींच्या तुलनेत ही प्रवृत्ती अगदी विरोधी टोकाची आहे असे जाणवत होते. त्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांचे म्हणणे होते की, अशा प्रकारची तडजोडची व स्वतःला मुरड घालण्याची प्रवृत्ती ही आम्ही 'स्व'च्या विरोधात असलेली किंवा 'स्व'ला नाकारण्याची प्रवृत्ती मानतो. अशा वागण्यामुळे आम्ही फार अस्वस्थ होऊ. तडजोड केली गेली तरी राग धुमसत राहील.

ह्या दोन प्रवृत्तींमधील फरकाचे मूळ कोठे आहे? कदाचित ते भारतीय स्त्रीच्या स्वभावात असू शकेल. भारतीय स्त्री, तुलनेने मुक्त असलेली, स्वतंत्र वृत्तीची भारतीय स्त्रीसुद्धा विरोधी परिस्थितीत निर्माण झाली तर तिला बाजूने वळसा घालून पुढे जाते. विरोध अंगावर न घेता हळूहळू अडचणी दूर सारत मार्ग काढते. विरोधाला सामावून घेते. उघड निषेध तिला फारसा आवडत नाही असे असू शकेल का? की हे वैशिष्ट्य भारतीय मानसिकतेचा, हिंदू तत्त्वज्ञानाचा

आणि जीवनपद्धतीचा भाग असू शकेल. हे जर खरे असेल तर स्त्रियांचे हक्क मिळविण्यासाठी आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी जे मार्ग धुंडाळावे लागतील ते भारतीय संस्कृतीच्या चोकटीतच अधिक यशस्वी होण्याची शक्यता आहे का? त्यामध्ये समोरासमोर रोकड्या संघर्षाला स्थान नसेल. संस्कृतीच्या संदर्भातील फटी, जागा व संधी यांचा फायदा घेऊन पारंपारिक लक्ष्मणरेषा हळूहळू पुढे ढकलत आणि अधिकाधिक स्त्रीस्वातंत्र्य मिळवत ह्या चळवळीला जावे लागेल. समाजाला स्त्रीची भूमिका कितपत पटेल, कितपत रुचेल याचा अंदाज घेत जावे लागेल, असे माझ्या मनात आले.

'बदखल परिसंवादा'ला जवळ जवळ आज दहा वर्षे होऊन गेली. आज जेव्हा मी स्त्रियांना स्वतःच्या अनुभवांची चर्चा करताना ऐकते, तेव्हा मला वेगळे सूर ऐकू येतात. आज तडजोड करण्याची तयारी फारशी दिसत नाही. किंबहुना स्त्रीनेच तडजोड करावी, समंजसपणा दाखवावा याबद्दल एकप्रकारची चीड व्यक्त होताना आढळते. स्त्रियांच्या स्वायत्ततेच्या, व्यक्तिस्वातंत्र्यांच्या कल्पना तर बदलल्या नसतील? दहा वर्षांपूर्वीपेक्षा आज स्त्रीच्या जीवनाकडून अपेक्षा तर वाढल्या नाहीत? किंवा जी पिढी पहिल्यांदा वेगळ्या वाटेने जाण्यास तयार झाली तिची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना आणि त्यानंतरच्या पिढ्यांची स्वातंत्र्याची कल्पना यामध्ये तर खूप फरक पडला नसावा? किंवा एकाच पिढीतील स्त्रियासुद्धा हळूहळू स्वातंत्र्य व हक्क यांचे मोजमाप करता करता धीट बनल्या तशा त्यांच्या अपेक्षा तर उंचावत नसतील? की असे तर नव्हे की पहिल्या कालखंडामधील ज्या स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळाले त्या स्त्रिया 'सुधारक', 'पुरोगामी' कुटुंबातील होत्या. त्यामुळे त्यांना तडजोड करणे सोपे गेले. स्त्रीमुक्तीची चळवळ जशी वाढत गेली तशी इतर कुटुंबातील स्त्रियाही मुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागल्या, त्यांना कुटुंबाकडून विरोध होणे स्वाभाविक होते.

हे प्रश्न फार गुंतागुंतीचे आहेत. या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यास एका बाजूने तत्वज्ञानाच्या क्षेत्रात खोलवर शिरावे लागेल. दुसऱ्या बाजूने भारतीय व पाश्चात्य मूल्यव्यवस्थेमधील फरक समजावून घेणे अनिवार्य ठरेल. परंतु स्त्रीवादी संशोधनाने हे आव्हान झेलले पाहिजे. स्त्रीवाद हे एक अर्थाने राजकीय आंदोलन आहे. या आंदोलनाने स्त्रीचं शोषण, अन्याय, छळ यांबद्दलची जाणीव अधिक तीव्र करण्याचा प्रयत्न केला आहे. याच प्रयत्नातून त्यांना संघटित होऊन स्वतःच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा झगडा समर्थपणे उभा राहण्यासाठी स्फूर्ती देणे हे त्याचे काम आहे. आज जगभर समानतेसाठी, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी लोक झगडत आहेत. स्त्रीमुक्तीवाद हादेखील प्रामाणिकपणे याच ध्येयाच्या परिपूर्तीसाठी आहे. यातच त्याचे समर्थन आहे. या चळवळीशी ज्यांची बांधिलकी आहे त्यांना तडजोड पसंत नाही. ही फारतर एक तात्पुरती उपाययोजना वाटते, हे समजण्यासारखे आहे. आजच्या राजकारणात संघर्षाशिवाय यश मिळत नाही असे त्यांना वाटते. परंतु, स्त्रीवादाला वैयक्तिक झगड्याचीही बाजू आहे. संघटित चळवळीला स्त्री-पुरुष समानतेला नकार देणाऱ्या सर्व सामाजिक संस्थांची मोडतोच करून त्यांच्या जागी पर्यायी संस्था उभ्या करण्यासाठी समर्थपणे लढा द्यावा लागतो हे खरे. परंतु वैयक्तिक पातळीवर झगडताना स्त्रियांना भोवंडून टाकणाऱ्या हिंसक अनुभवातून न जाता जर सहजपणे स्थित्यंतर करण्यासाठी ज्या मूल्यव्यवस्थेत हे संक्रमण शांततापूर्णरीत्या

झालेले आहे अशा मूल्यव्यवस्थेतच मार्गदर्शन सूत्रे सापडतील.

अशी मूल्यव्यवस्था ही समानता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांशी कितपत सुसंगत आहे याची आपल्याला स्पष्टपणे दखल घेतली पाहिजे. कदाचित ही संगती सापडणारही नाही. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेतही धोके आहेत. माणसांचे 'अणुकरण' वाढणे, त्याचा एकाकीपणा वाढणे आणि तदनुषांगिक प्रश्न यांचा व्यक्तिस्वातंत्र्याच्या आदर्शाशी बांधल्या गेलेल्या आपल्यासारख्यांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. महात्मा गांधी सारख्यांनी पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतिंची सांगड घालून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. तो काही अंशी अपुरा राहीला आहे आणि तो पुढे नेण्याची गरज आहे. या अभ्यासमालिकेतून विचारविरोध पद्धतीने (Dialectic) हा शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

परंतु निव्वळ आपल्या भारतातच एका टोकापासून दूसऱ्या टोकापर्यंत, एका स्तरापासून दुसऱ्या स्तरापर्यंत प्रचंड विविधता आहे. केवळ स्त्रियांच्या परिस्थितीचा विचार केला तरी लक्षात येते की स्त्रियांचा होणारा छळ हा देशव्यापी असला तरी विभिन्न प्रांतातून आणि समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या स्त्रियांमध्ये याबाबत पुन्हा विविधता दिसून येते. या स्त्रिया दक्षिणेकडील की उत्तरेकडील, त्या ब्राम्हण की ब्राम्हणेतर, उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय की आदिवासी वा हरिजन यानुसार त्यांना पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या, त्याबद्दल त्यांना मिळणारा मोबदला, त्यांना मिळणारे स्वातंत्र्य यात बदल दिसून येतो. या वैविध्यामध्येही एक निश्चित असा आकृतिबंध दिसून येतो. उदाहरणार्थ, महाराष्ट्र आणि दक्षिणेकडील केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश व कर्नाटक ही राज्ये हा एक गट होऊ शकतो. राजस्थान, पंजाब, हरयाना, उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश यांचा दुसरा गट होतो. गुजरात, बंगाल व ओरिसा यांचा गट यांमध्ये बसविता येतो. उत्तर व दक्षिण भारतातील वेगळेपणाला उत्तर भारतातील सामर्थ्यवान मुसलमानी सत्तेचा जमाना तर कारणीभूत नसेल? की दक्षिण भारतावरील सातत्याने झालेला द्रवीड संस्कृतीचा प्रभाव अधिक प्राचीन आणि म्हणून मूलभूत स्वरूपाचा असू शकेल. यात ब्रिटिश राजवटीचा परिणाम कितपत असू शकेल? बंगाल, मद्रास व मुंबई हे इलाखे ही ब्रिटिश उदारमतवादाची एकोणिसाव्या शतकातील केंद्रे होती. सामाजिक व धार्मिक सुधारणांचा अत्युच्च बिंदू तिथे साधला गेला होता. त्याचा तर येथील स्त्रीजीवनावर परिणाम झाला नसेल.

या सर्व विचारांच्या आधाराने मी माझ्या महाराष्ट्रीय पाश्वभूमीचा शोध घेण्याचे ठरविले. त्याद्वारे मला माझ्यातील भारतीयत्वाचा शोध घ्यावयाचा होता. विंसाव्या शतकापासून मागे मागे जात विसाव्या व एकोणिसाव्या शतकांच्या स्त्रीजीवनाशी निगडित लघुकथा, कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे, स्वातंत्र्य चळवळीसंबधीचे आणि या दोन शतकांतील सामाजिक सुधारणांबाबतचे वृत्तपत्रीय लेखन तपासून पाहण्याचा निर्णय झाला. अठराव्या शतकाच्या संदर्भात बखरीतील पत्रव्यवहार व आधुनिक ऐतिहासिक लेखन यांचा संदर्भ मदतीला घेण्याचे ठरविले. भक्तिकाव्याच्या बाबतींत चौदाव्या शतकापर्यंत मागे जाण्याचा निर्णय घेतला. हे सर्व संदर्भ लिखाण हे एका जातीचे नाही. वेगवेगळे तुकडे, निरनिराळे स्वरूप अशी विविधता, गोंधळ त्यामध्ये आहे. परंतु संशोधनाच्या दृष्टीने मात्र ते विपुल आहे.

त्याच वेळी असे लक्षात आले की एकट्या संशोधकाचे हे काम नाही. एवढेच नव्हे तर या कामासाठी वेगवेगळ्या संवेदनक्षमता असलेली माणसे मिळाली तर अधिक बरे. इतिहास, राजकारण, साहित्य, भक्तिकाव्य या विविध प्रकारांविषयी संवेदनक्षमता असलेल्या माणसाची गरज होती. त्याचबरोबर महाराष्ट्रीय संस्कृतीबद्दलची सहानुभूती, उत्कटता असणे महत्त्वाचे होते. या सर्व सामुग्रीतून चिकाटीने वाट काढणे शक्य होते. त्याचबरोबर संशोधनाची शिस्त पाळणेही आवश्यक होते. ह्या सर्व गोष्टी एकत्रित आणण्याची संधी मिळाली जेव्हा फोर्ड फाऊंडेशनने टाटा समाजविज्ञान संस्थेला स्त्रीविषयक अभ्यास केंद्राची विचारणा केली. लिंकन चान, इलेनॉर बार्बर, कॅरोलिन इलिएट या फोर्ड फाऊंडेशनच्या कार्यकारी मंडळींशी चर्चा झाली. आणि त्यांना मूळ कल्पना – महाराष्ट्रीय स्त्रीच्या अस्मितेचा ऐतिहासिक शोध – आवडली. भारतीय स्त्रीच्या इतिहासाचा आणि अस्मितेची उमज येण्यासाठी हे पहिले पाऊल होते. त्यांना असे वाटले की आकडेवारीवर आधारित प्रचलित प्रश्नांचा अभ्यास करणारे संशोधन इतर अनेक संस्था करत आहेत. या ठिकाणी महाराष्ट्रीय स्त्रीचे चित्रण ऐतिहासिक संदर्भात तसेच प्रचलित समाजातील वैयक्तिक चित्रणांच्या स्वरूपात झाले तर ते अधिक उपयोगी पडेल. विशेषतः हे व्यक्तिअभ्यास करायचे झाले तर त्यातील काही स्त्रिया अजूनही हयात आहेत तोवरच ते केले गेले पाहिजेत. ही मालिका या निर्णयाचे फळ आहे.

टाटा समाजविज्ञान संस्थेच्या स्त्रीअभ्यास केंद्राने घेतलेल्या इतर प्रकल्पांपैकी काही असे आहेत. हे प्रकल्प, 'वेगळया वाटेने' या व्यापक विषयाचा भाग आहेत. वासंती रामन या नक्षलबारी चळवळीतील आदिवासी स्त्रियांबद्दल लिहीत आहेत. मॅक्झिन बर्नस्टीन यांनी एका दलित स्त्रीच्या जीवनाची, तिच्या विचारप्रक्रियांची नोंद करण्याचे काम हाती घेतले असून त्याला 'स्वचा विकास' असे नाव दिले आहे.

या सर्व संशोधनाची पद्धती काय होती हे सांगणे सयुक्तिक ठरेल. ज्या वेळी आम्ही या कामासाठी लागणारी मूळ साधने पाहायला लागलो त्या वेळी असे लक्षात आले की खूप साहित्य उपलब्ध आहे. आणि अनेक अंगांनी इतिहासाचा वेध घेता येणे शक्य आहे. खऱ्या अर्थाने इतिहासाला न्याय द्यायचा असेल तर खरे म्हणजे एखादा पैलू घेऊन त्यावर मोठ्या संशोधन प्रकल्पाची आखणी करणे आवश्यक आहे. आमच्याकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ व आर्थिक साधने यांचा विचार करता एवढा मोठा प्रकल्प शक्य झाला नसता. आणि तरी देखील असे वाटत होते की तो काळ, त्या वेळचे स्त्रियांचे प्रश्न हे एका व्यापक पातळीवर साकार करणे आवश्यक आहे. हे काम लवकरात लवकर झाले पाहिजे. यामुळे अधिक सखोल पद्धतीच्या तपशीलवार संशोधनाला चालना मिळू शकेल. माझा या साहित्य साधनांशी जो काही थोडाफार परिचय झाला होता त्यावरून माझ्या असे लक्षात आले की प्रचलित काळापासून मागे जात, आजच्या काळातील प्रश्नांची जुळणी मागील कोणत्या कालखंडाशी झालेली आहे याचा शोध घेत जायचे ठरविले तर १९ व १८ वे शतक नजरेसमोर येते. या कालखंडाबद्दल पुरेसे ऐतिहासिक साहित्य उपलब्ध आहे. या पूर्वीच्या काळात अन्य स्वरूपाची ऐतिहासिक साधने उपलब्ध नसल्यामुळे संत कवयित्रींच्या चरित्रांचा अभ्यास करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण अगदी १२ व्या शतकातील महादाइसेच्या चरित्राबद्दल

मजकूर सापडू शकत होता.

यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न होता, संशोधनाचे आयोजन. वर उल्लेखिल्याप्रमाणे या कामाला अनेक प्रकारची संवेदनक्षमता आवश्यक होती. महाराष्ट्राय संस्कृतीबद्दलची आत्मीयता आवश्यक होती. एका व्यापक पातळीवर काही प्रश्नांना पुढे ठेवून स्पष्टीकरण शोधत जाण्याच्या या प्रयत्नामध्ये हा दृष्टिकोन महत्त्वाचा होता. सर्जनशील पद्धतीने लिहिणाऱ्या अनेक लेखिका महाराष्ट्रात आहेत याची मला जाणीव होती. यांपैकी काही स्त्रियांच्या प्रश्नावर सातत्याने लेखन करीत आहेत. स्त्रीअभ्यास केंद्र सुरू झाल्यावर अनेक नामवंत लेखिकांनी या केंद्राच्या सहकार्याने काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली. या केंद्राने समाजविज्ञानाची जोड द्यावी, त्या दृष्टिकोनातून त्या लेखनाची समीक्षा व्हावी, पारखून घेण्यास मदत करावी एवढीच त्यांची मागणी होती. याच लेखिकांमधून मी गट तयार करायचे ठरविले. आणि त्यांच्याकडे या व्यापक कामांपैकी एकेक विभाग सोपवत गेले. स्वतःकडे मी समाजशास्त्रज्ञाची भूमिका घेतली. आणि अतिशय प्रखर संशोधन शिस्त पाळली जाण्यासाठी आवश्यक समीक्षा करण्याचे धोरण स्वीकारले. कारण सर्व संशोधन व लेखन यांच्या एकसूत्रीकरणाची संपादकीय जबाबदारी माझ्याकडे होती. एकूण पाच सभासद या गटामध्ये आहेत. मुख्य म्हणजे प्रत्येक सभासदाला हवा तो कालखंड निवडण्याची मुभा होती. तसेच त्या विषयाचा आवाका, विषयाची उलग कशा पद्धतीने करायची, कोणती साहित्यसाधने वापरायची याचे निर्णय प्रत्येकजण आपापले घेत होती. त्यासंबंधी सतत चर्चा होत असत.

सर्जनशील लेखक व समाजशास्त्रज्ञ यांच्यातील सहकार्य क्वचित पाहायला मिळते. म्हणूनच ही प्रक्रिया कशी साध्य झाली हे सांगणे महत्त्वाचे आहे. त्या त्या अभ्यासखंडाचा ऐतिहासिक संदर्भ, त्याचा नेमकेपणा याची प्रथम त्या त्या लेखिकेबरोबर चर्चा केली. या मालिकेमधून नेमके काय साध्य करायचे याबद्दल मतभिन्नता होती. चर्चेतून एक दृष्टिकोन स्थिर होण्यास, एकमत होण्यास बराच वेळ लागला. या चर्चेतून लक्षात आले की सर्जनशील साहित्य व समाजशास्त्रज्ञ यांच्या दृष्टिकोनामध्ये फरक पडतो. ह्या चर्चेची आवश्यकता होती कारण मालिकेतील पाचही पुस्तकांतून एक सुसूत्रता, वाङ्मेळ साध्य होणे आवश्यक होते. म्हणूनच संशोधनाचे काम सुरू करण्यापूर्वी प्रत्येकीला तिच्या कामाची ओळख करून देणारे प्राथमिक लेखन करायला सांगितले. त्यानंतर सातत्याने त्यांचे काम चालू असताना त्यांच्या बरोबर भेटी, आतापर्यंत पाहिलेल्या साहित्य साधनांबाबत चर्चा, त्यावर आधारित निष्कर्षांची चर्चा हे सातत्याने करीत गेले. आमच्या सहकार्याचा हा भाग अतिशय रसपूर्ण व फलदायी ठरला असे वाटते. या सर्जनशील लेखिका एखाद्या स्त्रीप्रश्नावर जी स्पष्टीकरणे देण्याचा प्रयत्न करीत ती कल्पक असत, नवनवीन शक्यता दर्शविणारी असत. परंतु समाजशास्त्रज्ञाचें समाधान करणारी नसत. ती स्पष्टीकरणे व निष्कर्ष सिद्ध करण्यासाठी लागणारे अधिक पुरावे गोळा करण्याची गरज असे. पुष्कळदा ही विधाने सरधोपट असत. माझ्याशी झालेल्या सततच्या संवादामुळे त्यांना पुराव्यांचे महत्त्व पटत गेले. लेखिकांनी प्रामाणिकपणे पुरावा गोळा करून लेखन अधिक कसदार करण्याचा प्रयत्न केला. मात्र माझ्या लक्षात येत होते की काही वेळा त्यांच्या लेखनातील उत्स्फूर्तता आणि रसरशीतपणा निघून

जात होता. लेखिकांना कल्पनाविलासात मुक्तपणे रमण्याची, आपली मते, आपल्या भावना, आपले निष्कर्ष अधिकारीपणे व्यक्त करण्याची सवय झाली होती. पुष्कळदा हे निष्कर्ष बरोबरही असत. परंतु संशोधनाच्या शिस्तीनुसार त्यांची पुरेशी परीक्षा झाल्याशिवाय ते समोर मांडणे चुकीचे ठरले असते. ते काम सूत्रधार म्हणून मी करत असे. आणि तेच निष्कर्ष तर्कशुद्ध पद्धतीने सिद्ध करण्याची गरज त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करत होते.

लेखनाची भाषा हा आणखी एक मोठा प्रश्न उभा राहिला. सर्जनशील लेखक असल्यामुळे मराठी भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व आहे. परंतु समाजशास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनातून ह्या भाषेमध्ये विशेषणांची रेलचेल असे. त्यामुळे 'मूड' तयार व्हायला जरूर मदत होई. वातावरण निर्मिती होई. परंतु अशा लेखनात भावनांना आवाहन करण्याचे उद्दिष्ट असून चालत नाही, तर तर्कशुद्धतेला महत्त्व असावे लागते. साहित्यक्षेत्रात मान्यता पावलेल्या लेखिकांकडून असे लिहवून घेणे हे समाजशास्त्रज्ञ म्हणून मला अवघडल्यासारखे वाटे. तसेच पुष्कळदा शब्दांच्या जंजाळात हरविण्याची शक्यता असते. तोच तोचपणा, शब्दबंबाळपणा येऊ शकतो. शास्त्रीय लेखनाला सडेतोडपणा आणि नेमकेपणा असणे आवश्यक असते. हे सर्व टाळण्यासाठी पुन्हा पुन्हा सूचना देणे, करवून घेणे आवश्यक होते. शब्दांचा कीस पाडला जात होता. आम्ही सर्वजणी एकच संकल्पना वापरत आहोत ना याची खात्री करून घेण्यामध्ये वेळ मोडत असे. काही वेळा निराशाही येत असे. आजच्या परिश्रमांकडे बघताना असे वाटते की कदाचित हे लेखन धड सर्जनशील म्हणूनही गणले जाणार नाही आणि दुसऱ्या बाजूला चांगले संशोधित लेखन म्हणूनही त्याला किंमत लाभणार नाही. या लेखनामुळे या कालखंडावर अधिक चिंतन करण्यास इतर अनेकजण पुढे येतील. त्यांना उत्सुक करण्याचे काम ही मालिका करेल. या व्यापक संशोधनामुळे इतिहासात स्त्रियांना भोगावा लागणारा छळ, त्यांचे आनंदाचे क्षण, त्यांनी 'वेगळ्या वाटा' चोखाळण्यासाठी केलेले संघर्ष, स्वायत्तता, अधिकार, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वापरलेल्या संधी या सर्वांचा आलेख उभा केला जाईल अशी अपेक्षा आहे. परंतु आमच्या गटातील सर्वच सभासदांनी आवश्यक चिकाटी, संयम आणि संवेदक्षमता दाखविली आहे असे म्हणायला हवे. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून आता ही मालिका तयार होत आहे आणि वाचकांच्या हाती सुपूर्द करताना संपादक म्हणून मला आनंद वाटतोय.

### ह्या अभ्यासखंडाबद्दल

भारतीय स्त्रीच्या मुक्तीची चळवळ साधारणपणे एकोणिसाव्या शतकातील दुसऱ्या किंवा तिसऱ्या दशकापासून सुरू झाली असे मानण्यात येते. ब्रिटिश व ख्रिश्चन संस्कृतीतील उदारमतवादी प्रवाहाचा परिणाम येथील हिंदू उच्चवर्णीयांवर झाला आणि त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन होऊ लागले. यापूर्वी मनुस्मृतीच्या काळापासून व विशेषतः बाराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यन्तचा कालखंड हा स्त्रियांसाठी अंधारमय कालखंड समजला जातो. मनुस्मृतीच्याही आधी वैदिक कालखंड मात्र स्त्रियांसाठी वैयक्तिक स्वातंत्र्याचे तत्त्व मानणारा होता असे अभिमानाने सांगितले जाते. सर्वसाधारणपणे दुसऱ्या शतकापासून पुढे स्त्रियांचे सर्व हक्क काढून घेण्यात आले, त्यांचे समाजातील स्थान कनिष्ठ होत गेले. स्वायत्तता हरविली गेली, सार्वजनिक जीवनात भागीदारी करण्याचा अधिकार

नाकारण्यात आला, असे सांगण्यात येते. असेही मानण्यात येते की स्त्रियांना भक्तिमार्गामध्ये स्थान मिळाले. परन्तु धर्माच्या बाहेरील जगात त्यांना स्थान नव्हते. अहिल्याबाई होळकरांसारखी एखादी स्त्री जेव्हा स्वतःचे सैन्य घेऊन लढण्यास जाते आणि शौर्याने शत्रूचा पराभव करून आपले राज्य टिकविते तेव्हा अंधारात चमकणारी ती वीज होती असे म्हणून सर्वसाधारण स्त्रियांमध्ये काही कर्तृत्व होते, गुण होते हे नाकारले जाते. परंतु अभ्यासानंतर असे दिसते की या स्त्रियांची कामगिरी क्षुल्लक नव्हती. मनात असा विचार येतो की अहिल्याबाईसारखी बाई इतिहासात चमकते आणि हे सहज शक्य आहे, हे सिद्ध करायचे असेल तर त्या काळात राजघराण्यात व सरदार घराण्यातील स्त्रियांना राजनीती व युद्धकौशल्याचे शिक्षण दिले जात असावे असे गृहीत धरले पाहिजे. ते कुठे, कसे मिळत होते याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्या काळी सत्ताधारी वर्गातील स्त्रिया कशा वागत होत्या, शस्त्रांचे, लढण्याचे प्रशिक्षण कशा घेत होत्या हे शोधून काढणे, त्यांचा परिसर जिवंत करणे महत्त्वाचे ठरते. नाहीतर स्त्रिया या इतिहासात नेहमीच अदृश्य राहतील आणि त्यांची नोंद होणार नाही.

असे आजपर्यन्त घडत आले आहे कारण स्त्रिया ज्या पद्धतीने आपले कार्य करत होत्या त्याचा इतिहास लिहिणे, नोंद ठेवणे, बखर ठेवणे हे महत्त्वाचे मानले जात नव्हते, म्हणूनच आम्ही या महाराष्ट्रीय स्त्रियांचा इतिहासाचा वेध घेण्याचे ठरविले. एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रीमुक्तीच्या चळवळीला सुरवात झाली असे मानले जाते. तेव्हा त्याच्याबरोबर आधी - अठराव्या शतकात काय घडत होते याकडे बारकाईने बघायचे आम्ही ठरविले. सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनाला अनेक पैलू असतील, परन्तु आम्हांला इतर पैलूंबद्दल फारशी माहिती मिळाली नाही. म्हणून राजकीय सहभागाबद्दल माहिती जमविण्याचे आम्ही ठरविले. तेथेही फक्त राजघराण्यातील स्त्रियांबद्दल माहिती मिळू शकली तीही त्रोटक होती. ऐतिहासिक नोंदी व त्यातील पत्रव्यवहार हे महत्त्वाचे साधन आम्ही निवडले. अर्थात त्यातून मिळणारी माहितीही नेमकी नसतेच. स्त्रियांबद्दल जी माहिती मिळाली तीही सत्ताधारी पेशवे व मराठा यांच्या घराण्यातील स्त्रियांची माहिती आहे. स्त्रिया प्रामुख्याने माता किंवा पत्नी या दोनच भूमिकांमध्ये आढळतात. हा अभ्यासखंड या अभ्यासाची फलश्रुती आहे.

नीलिमा भावे हीने या अभ्यासाची जबाबदारी उचलली. तिने कौटुंबिक व सरकारी पत्रव्यवहार तपासला व त्या आधारे माहिती जमविली. तिच्या प्रस्तावनेत त्या सर्व साहित्य साधनांची माहिती तिने दिली आहे. हा खंड बारकासा दिसतो परन्तु त्याच्यामागे बरेच परिश्रम उभे आहेत. चिकाटी, कल्पकता, शास्त्रशुद्ध संशोधन हे सर्व ही माहिती एकत्रित करण्यासाठी उपयोगात आणले आहे. तिने जी माहिती पुढे आणली ती स्तिमित करणारी आहे. तिने जो छोटा कालखंड निवडला आहे त्यातील दोन स्त्रिया ताराबाई व सकवारबाई यांनी कमालीची धूर्तता व कार्यक्षमता दाखविली असे दिसते - पत्नी व त्याहीपेक्षा माता म्हणून त्यांनी स्वतःच्या भूमिका गरजेप्रमाणे जास्तीत जास्त विस्तारल्या व नवऱ्याला किंवा मुलाला राजकीय स्थान व स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांना गुंतागुंतीच्या राजकीय हालचाली कराव्या लागल्या. बराच धोका पत्करावा लागला. त्या सहजपणे या धोक्यांना

सामोऱ्या गेल्या. चिवटपणे, धूर्तपणे त्यांनी राजकीय सत्तेमधील फटी वापरल्या व आपले ईप्सित हस्तगत केले. या राजकीय क्षेत्रात त्यांना प्रवेश नव्हता. सत्ताधारी राजे व युवराज यांच्या पत्नी व माता म्हणून ज्या ज्या सवलती त्यांना उपलब्ध होत्या त्यांचा त्यांनी जास्तीत जास्त वापर करून घेतला.

या अभ्यासातील दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष आहे की जात ही महत्त्वाची संकल्पना स्त्रियांच्या सामाजिक व्यवहारांबाबत, विशेषतः सत्तेपर्यन्त पोचण्यासाठी - महत्त्वाचा परिणाम साधताना दिसते. जेव्हा अभ्यासाचा प्रकल्प आयोजित तेव्हा 'जात' या संकल्पनेकडे खास बघण्याचे ठरविले नव्हते. पेशवे व मराठा ह्या दोन घराण्यांकडे पाहण्याचे ठरले होते कारण ती सत्ताधारी घराणी होती आणि अभ्यासासाठी याच वास्तवाची निवड केली होती. पण जेव्हा साहित्य हाती येऊ लागले तेव्हा दोन्ही घराण्यातील स्त्रियांच्या अधिकाराच्या व्याप्तीमध्ये चांगला फरक आढळून येऊ लागला. पेशव्यांच्या घराण्यातील स्त्रियांना त्यांचे पुरुष जपत होते. कोडकौतुक करत होते. पत्रव्यवहारातून पेशवे पुरुष स्त्रियांना कुटुंबातर्गत मानाचे स्थान देताना दिसतात. त्यांच्या हातात बराच अधिकार दिसतो. पुरुषही कौटुंबिक जिव्हाळ्याने घरात वावरतात. परन्तु याच पत्रव्यवहारात हेही दृष्टीस पडते की घर आणि चूल येथेच त्यांचा अधिकार संपतो. याउलट मराठा स्त्रिया मात्र गादीच्या वारसाच्या राजकारणात हिरीरीने भाग घेताना दिसतात. दोन जातींमधील हा मूलभूत फरक मानायचा का? हे फरक किती खोलवर रुजलेले आहेत? याची मूळे कशात आहेत? हे प्रश्न या अभ्यासखंडात उपस्थित होतात. यातून पुढील स्त्रीवादी संशोधनाला चालना मिळावी.

या चरित्रांतून पेशवा व मराठा स्त्रियांना व्यवस्थित लिहिता-वाचता येताना दिसते आणि आश्चर्य वाटते. राज्यकारभाराची समजही चांगल्यापैकी दिसून येते. त्यांना हे शिक्षण कसे मिळाले? मुद्दाम दिले गेले की त्यांनी आपणहून हे ज्ञान मिळविले? की भोवतालच्या वातावरणाचा हा परिणाम होता? त्यांच्या शिक्षणाचे विषय काय होते? गाभा काय होता? त्याची आखणी कोणी केली? कोण त्यांना शिकवीत असे? शिक्षणास योग्य कोण हे कोण ठरवीत असे? हे सर्व समजून घेणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रीय स्त्रीच्या शिक्षणासाठी योग्य वातावरण तयार करायचे असेल, तर या स्त्रीच्या श्रद्धा काय होत्या, समज काय होते, परंपरा काय होत्या याचा अभ्यास करावा लागेल. या इतिहासाची त्यासाठी मदत होईल.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट या छोट्याशा कालखंडाच्या अभ्यासानंतर लक्षात येते की आजपर्यन्त ज्या स्त्रियांविषयी ऐतिहासिक कथा कादंबऱ्यातून लिहिले गेले, ज्यांचा उदो उदो झाला, ज्यांना अमरत्व प्राप्त झाले त्या स्त्रियांची प्रत्यक्षात राजकीय जीवनामध्ये कामगिरी आढळत नाही. उदाहरणार्थ बाजीराव पेशव्यांची प्रेयसी 'मस्तानी' किंवा माधवराव पेशव्यांची पतिव्रता पत्नी रमाबाई. आजपर्यन्त निर्माण झालेला समज यामुळेच पक्का होतो की इतिहासकार आणि साहित्यकार दोघांनीही स्त्रियांची राजकारणात काय भूमिका वठविली याचा शोध घ्यावासा वाटलेला नाही. स्त्रियांकडे त्यांचे लक्ष केवळ जाता जाता वळलेले दिसते. किंवा काही वेळेला केवळ जेव्हा या स्त्रियांसंबंधी सनसनाटी बातम्या निर्माण झाल्याचे दिसले तेव्हाच त्यांचे लक्ष तिकडे आकर्षित झालेले दिसते. या अभ्यासानंतर

अधिक पद्धतशीर ऐतिहासिक अभ्यासाला चालना मिळेल अशी आशा वाटते. त्यातूनच स्त्रियांचा राज्यकारभारातील सहभाग राजकारणातील सहभाग, यासंबंधी अधिक माहिती उपलब्ध होऊ शकेल.

(मूळ इंग्रजीतून अनुवादित)

डॉ. सुमा चिटणीस

स्त्रीअभ्यास केंद्र
टाटा समाजविज्ञान संस्था
मुंबई

प्रकरण १ ले

**

# अभ्यासाची पार्श्वभूमी, स्वरूप व साधने

पाश्चात्त्य विचारांच्या परिचयामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात झालेल्या समाजमंथनाबद्दल मराठीत बराच अभ्यास झालेला आहे.

नव्या सामाजिक मूल्यांचा आधार घेऊन एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात समाजसुधारणेचे जे विचार आणि कार्यक्रम सुरू झाले त्यांतला बराच मोठा भाग स्त्रीजीवनविषयक प्रश्नांना वाहिलेला होता. बालविवाहाला विरोध, सतीच्या प्रथेला विरोध, विधवांच्या केशवपनास विरोध, प्रौढ विवाहाचा पुरस्कार, विधवाविवाहाचा पुरस्कार, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार अशी कामे घेऊन वैयक्तिक आणि संस्थात्मक पातळयांवर चळवळी सुरू झाल्या होत्या. अनेक प्रकारच्या प्रतिगामी दबावातून मार्ग काढीत हळूहळू पण निश्चितपणे समाजाच्या वैचारिक धारणा आणि व्यावहारिक आचरण बदलण्याचे काम त्यातून होत होते.

या समाज प्रबोधनाच्या चळवळीचे नेतृत्व जरी पुरुषांनी केले असले, तरी त्यांच्या सक्रीय प्रोत्साहनाचा परिणाम म्हणून यांपैकी बऱ्याच पुरुषांच्या बरोबरीने त्यांच्या पत्नींनीही या कार्याला वाहून घेतले. याची काही ठळक उदाहरणे, न्यायमूर्ति रानड्यांच्या पत्नी रमाबाई रानडे, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या पत्नी बाया कर्वे ह्या होत.

एकोणिसाव्या शतकात समाजात पुढे आलेल्या स्त्रिया या प्रामुख्याने सामाजिक कार्याशी संबंधित असलेल्या दिसतात. पण ऐतिहासिक क्रमाने कालखंडांचा संदर्भ घेऊन महाराष्ट्रीय स्त्रियांच्या कर्तृत्वाचा आलेख काढायचा झाला, तर वेगवेगळया कालखंडात हे कर्तृत्व वेगवेगळया क्षेत्रांत काम करताना दिसते.

महाराष्ट्राच्या इतिहासाची – म्हणजे महाराष्ट्राच्या स्वतंत्र अशा अस्तित्वाची – सुरुवात बाराव्या शतकाच्या सुरुवातीपासून, म्हणजे यादवकाळापासून झाली असल्याचे मानण्यात येते. यादवकाळ, शिवपूर्वकाळ, शिवकाळ, पेशवाई, अव्वल इंग्रजी अंमल, प्रबोधनकाळ, स्वातंत्र्य चळवळीचा काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ – असा मुख्यत्वे राजकीय स्वरूपाचेच ठळक टप्पे असलेला साधारण ९०० वर्षांचा इतिहास आहे. मात्र यापैकी यादवकाळापासून ते शिवकाळापर्यंतच्या सुमारे ६०० वर्षांतल्या महाराष्ट्रातल्या समाजजीवनाबद्दल फारच थोडी

माहिती उपलब्ध आहे.

मराठी भाषेचा पाया यादवकाळात घातला गेला, मराठी साहित्याची गंगोत्री महानुभावी पंथाच्या गद्यपद्य रचनेच्या रूपाने याच काळात सुरू झाली, आणि काही मराठी घराण्यांना या काळात समाजात महत्त्व आले, अशा काही ठळक गोष्टी सोडल्या, तर या काळातल्या रीतिरिवाजांसंबंधी, जनतेच्या सुख-दुःखांसंबंधी, रहाणीसंबंधी अशा काही तत्कालीन समाजाचे चित्र उभी करणारी माहिती प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध नाही. या काळातले जे काही ग्रंथ उपलब्ध आहेत, ते मुख्यत्वे धार्मिक-आध्यात्मिक स्वरूपाचे आहेत. त्यांतून अप्रत्यक्षपणे मिळणारी समाजविषयक माहिती ही फारशी तपशीलवार, किंवा सम्यक स्वरूपाची नाही.

चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याच्या मलिक काफूर या सरदाराने यादवांचा पराभव केला व त्यानंतर महाराष्ट्रावर मुसलमानी सत्तेचा अंमल सुरू झाला. हा अंमल सुमारे साडेतीनशे वर्षे, म्हणजे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात शिवाजीने स्वराज्याचे निशाण उभारले तोपर्यंत चालू होता. महाराष्ट्रातले शूर आणि कर्तबगार पुरुष मुसलमान राजांच्या पदरी राहून त्यांच्यासाठी लढाया करीत होते, आणि त्यांनी वतनादाखल नेमून दिलेल्या गावांकडून वसून घेऊन आपला चरितार्थ चालवीत होते. खुद्द शिवाजीचा पिता शहाजी भोसले हा विजापूरच्या आदिलशहाच्या पदरी नोकरीला होता. लढवय्या मराठा सरदारांना राज्यकर्त्यांनी वंशपरंपरेने जहागिरी देण्याची ही पद्धत, एक शिवाजी वगळता, त्यापुढच्या मराठेशाहीच्या कारभारातही कायम ठेवली गेली. मराठ्यांच्या राज्याच्या जडणघडणीबरोबरच नंतरच्या विघटनाच्या प्रक्रियेवरही त्याचा परिणाम झाला.

शिवाजी १६८० साली मृत्यू पावला. त्यानंतर सुमारे २७ वर्षांनी १७०७ मध्ये त्याचा नातू शाहू सातारचा छत्रपती होईपर्यंतचा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने अस्थिरतेचा होता. विशेषतः १६८९ साली संभाजीचा वध झाल्यानंतर राज्य फार विस्कळीत झाले. त्याचा मुलगा शाहू व पत्नी येसूबाई यांना औरंगजेबाने कैदेत टाकले (बखर). शिवाजीचा धाकटा मुलगा राजाराम आणि त्याची पत्नी ताराबाई यांनी या १८ वर्षांच्या काळात अजोड मनोधैर्य दाखवून, शौर्य गाजवून मराठ्यांचे राज्य सांभाळले.

पुढे शाहू गादीवर आल्यानंतर ५/६ वर्षांतच त्याने मराठ्यांच्या राज्याचे पेशवेपद कारभाराच्या सर्व अधिकारासकट बाळाजी विश्वनाथ भट या कोकणातून देशावर आलेल्या उदयोन्मुख कर्तबगार पुरुषाकडे सोपवले.

त्यानंतरचे संपूर्ण अठरावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवाई म्हणून ओळखले जाते. १७१३ साली शाहूने बाळाजी विश्वनाथ भट यांच्याकडे वंशपरंपरेने पेशवेपदाचे अधिकार सोपवले. त्यानंतर १०० हून काही अधिक वर्षांनी १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत इंग्रजांनी पेशवेपद खालसा केले. या शंभर वर्षांच्या कालखंडात काही वेगवेगळ्या स्वरूपाचे बदल महाराष्ट्राच्या समाजजीवनात घडून आलेले दिसतात. एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या प्रबोधनाच्या आधीचा हा कालखंड आहे.

एकोणिसाव्या शतकाला जर प्रबोधनकाळ म्हटले, तर अठरावे शतक हे त्या प्रबोधनाची वाट पहात असलेले, किंवा त्या प्रबोधनाची आवश्यकता पटवणारे, असे असणार, हे गृहीत

धरले जाते. तर हे अठरावे शतक होते तरी कसे, याविषयी जरा अधिक तपशीलवार विचार प्रस्तुतच्या अभ्यासात करायचा आहे. आणि हा तपशील मुख्यतः तत्कालीन स्त्रीजीवनाबद्दलचा असणार आहे.

याची दोन-तीन कारणे आहेत. प्रस्तुत अभ्यासाचे आयोजन, हे 'स्त्रीविषयक अभ्यास' या योजनेचा भाग म्हणून झाले आहे, हे याचे प्राथमिक कारण. शिवाय आधी पाहिल्याप्रमाणे एकोणिसाव्या शतकातले विचारमंथन हे पुष्कळसे स्त्रीजीवनविषयक प्रश्नांसंबंधीचे होते. त्यामुळे अठराव्या शतकातल्या स्त्रीजीवनासंबंधी मिळवलेली माहिती ही त्या प्रबोधनाची पार्श्वभूमी समजायला उपयोगी पडेल. या पार्श्वभूमीचाच एक भाग म्हणून त्या काळातले एकूण सामाजिक वातावरण, त्याचबरोबर त्या काळातल्या पुरुषवर्गाचे जीवन आणि कर्तृत्व यांचा संदर्भ घेणे आवश्यक ठरते. कारण या संदर्भामुळेच तत्कालीन स्त्रियांच्या कर्तृत्वाला उपलब्ध असलेली क्षेत्रे आणि त्या कर्तृत्वाला पडलेल्या मर्यादा यांच्याविषयी काही वस्तुनिष्ठ निरीक्षणे नोंदणे शक्य होते; त्यांची कारणे शोधण्याच्या दृष्टीनेही विचार करता येतो.

या अभ्यासासाठी उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या संदर्भ साधनांमधून मुख्यतः एकाच प्रकारच्या साधनांचा उपयोग या अभ्यासासाठी केला आहे. त्यांचीही काही कारणे आहेत.

या काळाविषयी माहिती देणारे ऐतिहासिक दस्तावेज भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. तत्कालीन राजघराण्यांतील आणि सरदार घराण्यांतील पिढ्यान-पिढ्या साठत आलेली लष्करी आणि मुलकी कामकाजविषयक कागदपत्रे, त्यांचा घरगुती व दरबारी पत्रव्यवहार, त्यांनी लिहून ठेवलेल्या रोजनिश्या-रोजकीर्द अशी प्रथम दर्जाची साधने आहेत. याच्या जोडीने तत्कालीन बखर वाङ्मय, धार्मिक वाङ्मय, शाहिरी वाङ्मय, लोक वाङ्मय अशा दुय्यम दर्जाच्या साधनांमधून देखील तत्कालीन सामाजिक परिस्थितीची कल्पना देणारे धागे-दोरे सापडतात.

या साधनांपैकी प्रथम दर्जाची जी साधने आहेत ती रियासतकार सरदेसाई, वासुदेवशास्त्री खरे, वि. का. राजवाडे, चि. गं. वाड, द. रा. पारसनीस इत्यादि इतिहासप्रेमी संशोधकांनी अतिशय चिकाटीने आणि परिश्रमपूर्वक गोळा करून संपादित केली आहेत. या साधनांच्या विपुलतेसंबंधी रियासतकार सरदेसाई आपल्या 'ऐतिहासिक पत्रबोध' या निवडक ऐतिहासिक पत्रांच्या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात – "मराठीत ऐतिहासिक साधनांचे ग्रंथ पाच-चारशे तरी आहेत. त्यांपैकी पत्रेच तेवढी देणारे मुख्य ग्रंथ म्हटले तर, राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेले खंड २५; खरे यांनी ऐतिहासिक लेखसंग्रह या नावाखाली प्रसिद्ध केलेले खंड १५; पारसनीस यांनी प्रसिद्ध केलेले इतिहास संग्रहातील भाग; पुरंदरे दप्तरातील कागदांचे भाग; आणि अलीकडे पेशवे दप्तरातील सरकार मार्फत प्रसिद्ध झालेले निवडक कागद, हे होत."

वरीलपैकी पेशवे दप्तरातील निवडक कागद हे स्वतः रियासतकार सरदेसायांनीच संपादित केले आहेत. या पेशवे दप्तराच्या पहिल्या खंडासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेत सर जदुनाथ सरकार यांनी नमूद केले आहे की या दप्तरात प्रत्येकी साधारण १००० ते २००० कागद असलेले असे एकूण १३,००० रुमाल होते. या कागदपत्रांमध्ये १७२९ ते १८१७ या

कालखंडातला महाराष्ट्राचा इतिहास नोंदलेला सापडतो. मात्र १७५७ ते १७६३ या काळासंबंधीचे कागदपत्र यांत सापडत नाहीत. निजामाने १७६३ मध्ये पुण्यावर केलेल्या स्वारीच्या वेळी बहुधा ते नष्ट झाले असावेत.

प्रस्तुत अभ्यासाच्या संदर्भात या साधनसंग्रहांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे, ती म्हणजे हे कागदपत्र संपादित करताना संपादकांची भूमिका इतिहास संशोधकाची होती. अठराव्या शतकातल्या महाराष्ट्राचा अभ्यास हा मुख्यतः इतिहासकारांनी केलेला आहे. त्यामुळे राजकीय दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या घडामोडींचा तपशीलवार ऊहापोह त्यात आढळतो. सत्ताधारी, आणि सत्ताधाऱ्यांशी संबंधित असणारी घराणी, आणि या घराण्यांतल्या राजकारणात महत्त्व असलेल्या व्यक्ती; सत्ताधाऱ्यांचे परस्पर संबंध; लष्करी मोहिमा, डावपेच आणि लढाया; जय-पराजय, तह, तहांची कलमे आणि त्यांचे पुढील घटनांवर परिणाम, दरबारी कट आणि कारस्थाने; राजकीय बेबनाव अशा गोष्टींचे तपशील या साधनांमध्ये भरपूर प्रमाणात सापडतात.

परंतु एक सुदैवी योगायोग असा, की वर उल्लेखिलेल्या इतिहास संशोधकांपैकी काहींना एक सामाजिक दृष्टीदेखील होती, असे त्यांनी निवडलेल्या बऱ्याच कागदपत्रांवरून दिसते. रियासतकार सरदेसाई यांनी तर मराठेशाहीतल्या एकूण पत्रांमधून निवड करून, तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर, तसेच काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांवर आणि परस्परसंबंधांवर प्रकाश टाकणारी पत्रे 'ऐतिहासिक पत्रबोध' या नावाने स्वतंत्रपणे प्रसिद्ध केली आहेत. या पुस्तकाला रियासतकारांनी लिहिलेली प्रस्तावना त्यांचा समाजाकडे पाहाण्याचा आधुनिक व प्रगल्भ दृष्टिकोण व्यक्त करते. त्याचप्रमाणे वासुदेवशास्त्री खरे यांनी संपादित केलेल्या पटवर्धन घराण्याच्या पत्रांपैकी काही पत्रांमधल्या मजकुरावर त्यांनी केलेली संपादकीय मल्लिनाथी त्यांच्याही सामाजिक जाणिवेची चुणूक दाखवते. या दप्तराची सामाजिक महत्त्वाचा दस्तावेज म्हणून प्रशंसा जदुनाथ सरकारांनीही केली आहे. पुरंदरे दप्तरातल्या पत्रांमधूनही त्या काळातल्या नानासाहेब पेशवे, सदाशिवराव भाऊ, रघुनाथराव आणि खुद्द पुरंदरे घराण्यातले पुरुष इत्यादि इतिहासप्रसिद्ध मंडळींचे माणसे म्हणून हृद्य स्वभावदर्शन होते. शिवाय तत्कालीन रीतिरिवाजांचेही दर्शन होते. सदाशिवराव भाऊ, रघुनाथराव यांची पत्रे मुळातूनच वाचायला हवीत. आपल्या अभ्यासाच्या विषयाशी त्यांचा जवळून संबंध नसल्याने त्यांचा उपयोग यात केलेला नाही. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे, की त्या कालखंडाच्या केंद्रस्थानी पुण्याचे पेशवे होते. त्यामुळे पटवर्धन किंवा पुरंदरे या घराण्यातल्या कागदपत्रांमधूनही बरीच पत्रे पेशव्यांविषयीच असलेली दिसतात. खुद्द पटवर्धन किंवा पुरंदरे घराण्यातल्या व्यक्तींची त्यातून कळणारी माहिती जुजबी व अपुरी असल्याचे आढळते. हीच गोष्ट इतर प्रसिद्ध घराण्यांविषयीही सत्य आहे. कदाचित हा संपादकांच्या निवडीचाही परिणाम असेल.

इतकी साधने उपलब्ध असूनदेखील अठराव्या शतकातल्या महाराष्ट्राच्या समाजजीवनासंबंधीची तपशीलवार माहिती संकलित करून तिच्या आधारे लिहिलेला फक्त एकच ग्रंथ मराठीत उपलब्ध आहे. कै. वा. कृ. भावे यांनी १९३६ साली लिहिलेला

'पेशवेकालीन महाराष्ट्र' हा या काळातल्या समाजजीवनाचा समग्र आढावा घेणारा आजतागायतचा एकमेव प्रमाणग्रंथ आहे. याव्यतिरिक्त पेशवे घराण्यातील व्यक्ती आणि घटना यांची सांगोपांग माहिती पुरवणारा 'पेशवे घराण्याचा इतिहास' हा श्री. प्र. ग. ओक यांनी लिहिलेला साक्षेपी ग्रंथ या काळाचा अभ्यास करण्यासाठी उपयोगी आहे.

या काळातल्या समाजजीवनाचे चित्र लेखांच्या स्वरूपात काही संपादित ग्रंथांमध्ये काढण्यात आले आहे. या ग्रंथांमध्ये महाराष्ट्र परिचय – अर्थात् संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश – संपा. कर्वे, जोगळेकर, जोशी; महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगति व समस्या – संपा. गं. बा. सरदार; मराठेकालीन संस्था व विचार – लेखकमंडळ थोरात, गायकवाड, हनमाने – यांचा समावेश होतो.

सुरुवातीला एके ठिकाणी लिहिल्याप्रमाणे प्रस्तुत अभ्यासाचे कल्पिलेले स्वरूप, आणि उपलब्ध साधन सामुग्रीचा प्रचंड विस्तार यांमधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. समाजजीवनाचा संपूर्ण अभ्यास करणे, हे तसे एकट्यादुकट्याचे काम नाही, ते काम समूहाने करण्याचे व अनेक वर्षे घेणारे आहे. त्या पातळीवरचे काम हाती घेणे, हा या अभ्यासामागचा उद्देश नव्हता, तर तशा सामाजिक परिशोधनाचा प्राथमिक प्रयत्न हे या अभ्यासाचे स्वरूप आहे.

त्या दृष्टीने विचार करताना तत्कालीन पत्रव्यवहार हेच प्रमुख संदर्भसाधन घ्यावे, असे ठरवले. अस्सलपणाच्या निकषानुसार पत्रव्यवहार हे प्रथम दर्जाचे संदर्भसाधन ठरते, हे या निर्णयाचे प्रमुख कारण. शिवाय पत्रामधून ते पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीचे मानस कळत नकळत प्रकट होत असते. त्यातून त्या काळाला मानवी उबेचा, जिवंतपणाचा स्पर्श होतो. पत्रातले विचार, भावना, प्रतिक्रिया यांना प्रत्यक्षाचा संदर्भ असतो. तो संदर्भ तत्कालीन सामाजिक जीवनाची निदान पुसटशी तरी कल्पना द्यायला उपयोगी पडतो.

त्या काळामध्ये वर उल्लेख केलेल्या घराण्यांचा दांडगा पत्रव्यवहार होता. जवळ जवळ रोज, तर कधी कधी रोज दोनदादेखील लष्करी, मुलकी, घरगुती घडामोडींबद्दलचे खलिते एकमेकांना लिहिले जात असत, असे त्या खलित्यांच्या तारखांवरून दिसते. ही पत्रे कुणी कुणाला लिहिलेली आहेत हे पाहाताना असे दिसून आले की त्यांतली बहुसंख्य पत्रे ही लष्करी मोहिमेवर गेलेल्या पुरुषांनी आपल्या घरच्या मंडळींना किंवा घरच्या मंडळींनी मोहिमेवर गेलेल्यांना लिहिलेली आहेत. तसेच, बरीच पत्रे ही साताराच्या दरबारातून पुण्याला किंवा पुण्याहून साताऱ्याला पाठवलेली आहेत. लिहिणाऱ्यांमध्ये पुरुष आहेत, तशाच काही स्त्रियादेखील आहेत. काही पत्रे पुरुषांनी स्त्रियांना, तर काही स्त्रियांनी पुरुषांना लिहिलेली आहे. या स्त्री-पुरुषांचे एकमेकांशी नाते आई-मुलाचे किंवा तत्सम आहे, उदा. आजी-नातू, वहिनी-दीर, तर काही पत्रे स्त्रियांनी स्त्रियांना लिहिलेली आहेत, ती घरगुती स्वरूपाची आहेत. या पत्रव्यवहारात काही स्त्रियांची नावे वरचेवर येताना दिसतात. यावरून या स्त्रियांचे तत्कालीन राजकीय, सामाजिक किंवा कौटुंबिक जीवनात विशेष महत्त्वाचे स्थान होते, हे कळून येते.

प्रस्तुत अभ्यासाची सुरुवात करताना नजरेखालून घातलेल्या पत्रांमधून या वरचेवर उल्लेख

येणाऱ्या स्त्रियांशी संबंधित अशी जी माहिती पाहायला मिळाली, ती प्रथम एकत्र केली. त्यातून काही स्त्रियांची चित्रे अधिक ठळक होत गेली, तर काही माहिती ही त्या काळातल्या एकूण स्त्रीजीवनाचे चित्र उभे करायला उपयोगी पडू शकेल असे दिसले. काही स्त्रियांचे उल्लेख काही घटनांच्या संदर्भातच फक्त वाचावयास मिळाले. त्यांच्या जीवनाबद्दल अधिक माहिती मिळू शकली नाही. परंतु जी माहिती मिळाली, ती महत्त्वाची वाटल्यामुळे एका मर्यादित संदर्भात का होईना, पण या स्त्रियांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक वाटले.

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. या अभ्यासासाठी निवड केलेल्या स्त्रियांची जी माहिती गोळा केली आहे, त्यात प्रयत्नाने अधिक भर घालता येणे शक्य आहे. निवड केलेल्या स्त्रियांविषयी अधिक माहिती मिळू शकेल, त्याचप्रमाणे इतर काही अधिक स्त्रियांविषयीही इतर कागदपत्रांतून माहिती मिळणे शक्य आहे. परंतु या सर्वांमुळे उपलब्ध माहितीला आणि तिच्या मदतीने केलेल्या व्यक्तींच्या आणि समाजाच्या चित्रणाला बाधा येऊ नये, याची दक्षता निष्कर्ष काढताना घेतली आहे.

अठराव्या शतकातल्या महाराष्ट्राच्या राजकारणात, आणि सामाजिक-कौटुंबिक जीवनात ज्या स्त्रिया ठळकपणे वावरलेल्या तत्कालीन पत्रव्यवहारातून दिसल्या त्यांच्याविषयी अधिक पूरक माहिती मिळवण्यासाठी इतरही ग्रंथांची मदत घेतली आहे. रियासतकारांनी लिहिलेले नानासाहेब पेशवे यांचे चरित्र व त्याला शेजवलकरांनी लिहिलेल्या प्रस्तावना; वासुदेवशास्त्री खरे यांनी लिहिलेले नाना फडणीस यांचे चरित्र आणि इचलकरंजीकर घोरपडे घराण्याचा इतिहास; स. मा. गर्गे यांनी संपादित केलेली करवीर रियासत; मल्हारराव रामराव चिटणीस विरचित थोरले शाहू महाराज, धाकटे रामराजे आणि धाकटे शाहू महाराज यांची चरित्रे; तसेच दा. गो. ढब्बू यांनी लिहिलेला कुलाबकर आंग्रे घराण्याचा इतिहास; मा. रा. परांडेकर यांनी लिहिलेला दाभाडे घराण्याचा इतिहास या ग्रंथांमधली ऐतिहासिक पुरावे असलेली माहिती ही पूरक संदर्भ म्हणून घेतली आहे.

या सर्वांतून त्या काळातल्या सर्वसाधारण स्त्रीजीवनाचे आणि त्यात लक्षणीय ठरलेल्या स्त्रियांचे जे चित्र समोर उभे राहते, ते सर्व तपशीलांनी युक्त नसले, तरी पुरेसे स्पष्ट दिसते.

प्रकरण २ रे

**

# अठराव्या शतकातला महाराष्ट्र : काळ आणि जीवन

अठराव्या शतकाच्या सुरुवातीला मोगलांनी शाहूला आपल्या कैदेतून सोडले व दक्षिणेत परत जाऊन आपले राज्य ताब्यात घेण्यास सांगितले. त्यात त्यांचा उद्देश मराठ्यांमध्ये दुफळी निर्माण व्हावी, असा होता. त्या वेळेस शाहूची चुलती, म्हणजे शिवाजी महाराजांचा धाकटा मुलगा राजाराम याची पत्नी ताराबाई ही आपल्या अल्पवयीन मुलाच्यावतीने कोल्हापूरहून मराठ्यांच्या राज्याचा कारभार सांभाळत होती. तिने शाहूच्या हाती सत्ता सोपवण्यास नकार दिला. त्यामुळे शाहूने आपली राजधानी सातारा येथे प्रस्थापित केली आणि स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. शाहूचा हा राज्याभिषेक १७०८ साली झाला. ताराबाईच्या बाजूस असलेले बहुतेक जुने सरदार व अष्टप्रधान शाहूला येऊन मिळाले. त्यांचे अधिकार व सरंजाम शाहूने त्यांना वंशपरंपरेने बहाल केले. मात्र पंतप्रधान बहिरोपंत पिंगळे यांच्या कामगिरीबद्दल शाहू संतुष्ट नव्हता. त्यामुळे प्रधानपदाची ऊर्फ पेशवाईची वस्त्रे शाहूने अंबाजी पुरंदरे यांच्या सांगण्यावरून बाळाजी विश्वनाथ भट या उदयोन्मुख कर्तबगार पुरुषाला वंशपरंपरेने दिली. पेशवाईची वस्त्रे देण्यापूर्वी बाळाजी विश्वनाथांचे धाडस व मुत्सद्देगिरी निरनिराळ्या प्रसंगांतून शाहूच्या परिचयाची झाली होती.

शाहूने बाळाजी विश्वनाथांना केवळ पेशवाईची वस्त्रे दिली असे नसून कारभाराची सर्व सूत्रेदेखील त्याने त्यांच्या हाती सोपवली. मराठ्यांच्या गादीचे सेवक म्हणून पेशव्यांनी अनेक लष्करी मोहिमा आखल्या व फत्ते केल्या. पण मराठ्यांच्या गादीचे छत्रपति असूनही शाहूने कधीच हातात शस्त्र धरले नाही. आपल्या वयाची पहिली संवेदनाक्षम अशी ७ ते २५ ही सुमारे अठरा वर्षे त्याने मोगल दरबारच्या विलासी वातावरणात व निष्क्रियतेत घालविली होती. त्याला लढाईचा अनुभव नव्हता, व वृत्तीही लढाऊ नसावी. राज्याची काळजी पेशव्यांवर सोपवून तो आपल्या राण्यांसह साताऱ्याला रहात असे. याचे परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर, तसेच समाजजीवनावरही झालेले दिसतात.

मराठी राज्याची गादी जरी साताऱ्याला असली, तरी पेशवे जिथे रहात असत त्या पुण्याला सत्तेचे नवे केंद्र निर्माण झाले. शिवाजीच्या काळापासून चालत आलेल्या जुन्या सरदारांच्या व्यतिरिक्त पेशव्यांनी काही नवीन सरदारक्याही दिल्या. हे नवे सरदारही शूर आणि स्वामीनिष्ठ होते, पण त्यांचे इमान पेशव्यांनी बांधले गेले. उत्तर पेशवाईत, विशेषतः थोरल्या

माधवरावांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्याचे स्वामी आणि पेशवे दोघेही जेव्हा कमकुवत झाले, तेव्हा राज्याच्या सीमेवरच्या सरदारांनी स्वतंत्र झेंडे उभारले. सत्तेचे राजकारण मराठा सरदार खेळत होते, पण राज्यकारभार ब्राह्मणांच्या हातात आला होता. अठराव्या शतकातल्या महाराष्ट्रात पेशव्यांच्या पुढाकाराने ब्राह्मणांना आणि ब्राह्मणी संस्कृतीला प्राधान्य मिळाले. कृष्णा-गोदावरीच्या तीरावर नवी देवळे बांधली गेली, आणि तीर्थक्षेत्रे निर्माण झाली. कर्मकांड, व्रते-वैकल्ये, दान-दक्षिणा, मुहूर्त-ग्रहशांती यांचे प्रस्थ माजले. जातिभेदाची तीव्रता वाढली.

पेशव्यांकडे स्वतःची फौज नव्हती. त्यांच्या सरदारांकडेही खडी फौज नसे. मोहीम आखली की सरदारांना निरोप जात, आणि ते माणसे गोळा करून मोहिमेत सामील होत. वाटेतले मुलूख लुटून फौजेचे पोट भरत असे. एरव्ही चरितार्थाची साधने म्हणजे हंगामी शेती, गावठी उद्योग, बलुतेदारी, किरकोळ व्यापार, श्रीमंतांच्या पदरी चाकर रहाणे अशी असत. लोकांचे शिक्षण फक्त व्यवहारापुरते असे. ज्याचे जसे काम, तसे त्याचे शिक्षण होई. एकूण समाजात गरिबीच होती, आणि पेशवेही नेहमी पैशाच्या अडचणीत असत. प्रजेच्या सोयीसाठी म्हणून रस्ते, दळणवळण इ. काहीही व्यवस्था राज्यकर्त्यांनी केलेली नव्हती (पु. द. १, २-७८, १०३, २१३). पेशव्यांनी कर्नाटकापासून अटकेपर्यंतच्या मुलखात लष्करी मोहिमा काढल्या व यशस्वी केल्या, पण राज्याला शोभा देणाऱ्या आणि राज्यकर्त्यांचे ऐश्वर्य दाखवणाऱ्या कोणत्याच सांस्कृतिक महत्त्वाच्या गोष्टी राजाश्रयाने वाढल्या नाहीत (उदा. कला-कौशल्य, विद्वत्व, बांधकाम इ.) – (शेजवलकरांच्या प्रस्तावना).

मात्र या कालखंडाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य लक्षात येते ते असे की एखाद्या लहानशा कामापासून सुरुवात करून पुढे मोठ्या पदाला पोचलेल्या पुरुषांची उदाहरणे या काळात विशेष आढळून येतात. खुद्द बाळाजी विश्वनाथ भट हे पेशवे होण्यापूर्वी सेनापति धनाजी जाधवांकडे वसुलीचे काम पाहात असत. पेशव्यांचे व्याही इचलकरंजीकर घोरपडे हे सुरुवातीला संताजी घोरपड्यांच्या पागेत कामाला होते. सरदार गोविंद हरि पटवर्धनांचे वडील हरिभट बाबा हे उपाध्ये होते. पेशव्यांचे प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री हे लहानपणी शागीर्दीचे काम करीत असत. पुढे पेशव्यांचा उजवा हात बनलेले सरदार राणोजी शिंदे हे आधी पेशव्यांचे जोडे सांभाळण्याच्या कामावर होते. सरदार गायकवाड हे सरदार दाभाड्यांच्या पदरी नोकर होते, सरदार होळकर धनगर कुटुंबातले होते. व्यक्तिगत गुण आणि कर्तबगारी यांच्या जोरावर त्या काळात सामाजिक दर्जा बदलला जाऊ शकत होता असे दिसते. ही उदाहरणे पेशवाईच्या पूर्वकाळात, पानिपतच्या लढाईच्या आधीच्या काळात सापडतात. या काळापर्यंत महाराष्ट्रीय समाज बराच लवचिक होता, असे अनुमान यावरून काढल्यास ते चुकीचे ठरणार नाही. नानासाहेब पेशव्यांनी देशस्थ मुलीशी (दुसरे) लग्न केले, हे देखील याचेच उदाहरण मानावे लागेल. मात्र याच काळात पेशवे, फडणीस, पुरंदरे, पटवर्धन ही घराणी पिढ्यानपिढ्या एकमेकांबरोबर काम करीत होती. घोरपडे, पेठे, रास्ते, नाईक हे पेशव्यांचे व्याही होते. असा हा ब्राह्मण उच्चपदस्थ वर्ग घट्ट विणीचा दिसतो. पेशवाईचा पूर्वकाळ हा मराठी राज्याच्या, तसेच मराठी समाजाच्याही घडणीचा काळ होता, असे दिसते. घडणीच्या प्रक्रियेत

अपरिहार्यपणे अंतर्भूत असलेल्या अस्थिरतेची बरी आणि वाईट अशी दोन्ही प्रकारची वैशिष्ट्ये त्यामुळे या काळातल्या समाजजीवनात आढळून येतात.

प्रस्तुत अभ्यासाची व्याप्ती मर्यादित स्वरूपाची असल्यामुळे समाजजीवनाचा संपूर्ण तपशील यात विचारात घेतलेला नाही. परंतु स्त्रियांच्या जीवनसंबंधीचे जे काही तपशील पाहाण्यात आले, त्यांचा विचार वरील काही मुद्यांच्या पार्श्वभूमीवर केला असता, ते या निरीक्षणाला आधार देतात असे दिसते. अठराव्या शतकातल्या महाराष्ट्रातला समाज हा घडणीच्या अवस्थेत होता, लवचिक होता, असे दिसते.

सर्वसाधारणपणे स्त्रियांच्या आयुष्याचा दर्जा हा सर्वच बाबतीत पुरुषांच्या आयुष्यापेक्षा निकृष्ट असतो, असे समजले जाते. त्या दृष्टीने पाहाता काही विशिष्ट बाबतीतल्या स्त्रीजीवनाच्या पैलूंचा इथे विचार केला आहे. स्त्रीजीवनाचा सर्वांगीण विचार केलेला नाही. स्त्रियांचे समाजातले स्थान व दर्जा (Status) ज्यांतून सूचित होईल, असे काही ठळक पैलू विचारात घेतले आहेत. पुढच्या प्रकरणात ज्या काही निवडक स्त्रियांचा विचार केला आहे, त्यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी, या पार्श्वभूमीचा उपयोग होऊ शकेल. स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, वैवाहिक जीवन, त्यांचे कुटुंबातले स्थान, त्यांचा सामाजिक जीवनातला सहभाग, त्यांचे मालमत्ताविषयक हक्क असे हे काही पैलू आहेत. याखेरीज केशवपन, सती इत्यादींसारख्या प्रथांबद्दल जे तपशील मिळू शकले ते नोंदले आहेत. त्यांची संख्या आणि स्वरूप पाहाताना, त्यांना प्रातिनिधिक म्हणता येईल किंवा न येईल, पण ते तपशील लक्षणीय आहेत, हे निश्चित.

**आरोग्य** : स्त्रियांची सर्वसाधारण आयुर्मर्यादा किती होती, त्याची माहिती मिळू शकली नाही. परंतु घरातल्या स्त्रियांच्या तब्येतीची व्यवस्थित काळजी घेतली जात असे, असे दर्शविणाऱ्या नोंदी पहायला मिळाल्या. (ही उदाहरणे वरच्या घराण्यातल्या स्त्रियांची आहेत.)

गोपिकाबाईच्या तब्येतीची नानासाहेब पेशवे काळजी घेत असत, त्याची माहिती संबंधित प्रकरणात दिली आहे. गोपिकाबाईना प्रसूतीनंतर ज्वर येत होता. तब्येतीच्या या नाजूक अवस्थेत नेहमीचा वैद्य नको, चांगला निष्णात वैद्य हवा, म्हणून तो सातारच्या दरबारातून बोलावला होता. घरातल्या इतर स्त्रियांच्या तब्येतीबद्दलही नानासाहेब तितकेच जागरूक असत. आई काशीबाई, आत्या भिऊबाई, धाकटी भावजय उमाबाई या साऱ्यांच्या प्रकृतीकडे त्यांचे लक्ष असे. माधवराव पेशवेही आई गोपिकाबाईच्या तब्येतीची काळजी घेत असत (ऐ. ले. सं. १).

एक पत्र वाचायला मिळाले, ते पुरंदरे घराण्यातल्या व्यक्तीने मोहिमेच्या तयारीसंबंधी लिहिले आहे. त्यात असाही मजकूर आहे – "वहिनीस बरे वाटत नाही म्हणून वर्तमान ऐकिले परंतु आपण काहीच लिहिले नाही ते वृत्त लिहिणे ही विनंति", (पु. द. भा. १, वे.१०९), सदाशिवरावाची तीन पत्रे, (पु. द. १.१७६, १७७, १७८). बायको गरोदर होती, तिच्या तब्येतीची, मनःस्थितीची काळजी वाहणारी पत्रे वाचायला मिळाली.

आनंदीबाई कोपरगावला नाना फडणीसांच्या कैदेत रहात होती. तिच्याजवळ तिचे मुलगे, सुना वगैरे परिवारही होता. तिची सून भागिर्थीबाई हिला बारीक ताप येऊ लागला, तो बरा

होईना म्हणून तिने ब्राह्मण भोजनाचा नवस केला होता. तरी बरे वाटेना तेव्हा भगत बोलावला होता. त्या काळच्या समजुतीप्रमाणे हा तिच्या तापावरचा उपचारच होता. अशीच आणखी एक नोंद (पु. द. भा. ४) वाचायला मिळाली – "स्वामी म्हणतील की जेजुरीस जावयाचे कारण काये तरी सौ.उमाबाईच्या मातोश्रींनी उमाबाईस व मुलास बरे वाटत नव्हते तेव्हा नवस केला होता यास्तव श्रीजेजुरीवरून त्यास घेऊन येणे", (पे. द. १८ नं. १०१). यात एक सासू व दुसरी आई आहे. दोघींची कळकळ सारखी आहे.

हे गोपिकाबाईबद्दल सदाशिवरावाचे त्रिंबकरांचे मामा पेठ्यांना पत्र – "वहिनीचे पायास थोडीसी सूज आली आहे, हैराण थोडीसी आहे. जवळच वेळ आहे. आठाचौ दिवशी प्रसूत होतील", (पु. द. १.१९६).

शाहूच्या राणीविषयी ही नोंद आहे – "येथील वर्तमान सांप्रत धाकटीबाईस बहुत बरे वाटत नाही. याजकरिता राजश्री बहुत कष्टी आहेत कारभार विचार नाही", (पे. द. १८.११३).

भोसले पुण्यावर चालून येणार म्हणून बायका मंडळींनी किल्यावर जावे असे ठरले, त्याप्रमाणे घरातल्या इतर बायका गेल्या, पण आनंदीबाईला बरे नसल्याने तिला उशीरा जाण्याची सवलत देण्यात आली – "बायका सौ. पार्वतीबाई व रमाबाई किल्यावर सायंकाळची गेली..... श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई मात्र सरकारचे वाड्यात होती ती जाईनात. तिसरा महिना डोहाळे लागले आहेत. भोसले फारच जवळ आला तरी मग गडावरी जाणार", (ऐ. ले. सं. ३.७९१).

गोपाळराव पटवर्धनांना दाखवायला आणलेल्या मुलीस देवी आल्या होत्या.त्याबद्दल वडील गोविंद हरि यांचे पत्र – "वधू मुलीच्या फोड्या उतारास लागल्या. खपल्या पडो लागल्या", (ऐ. ले. सं. ३.२९४).

आणखी एक नोंद – "सौ. योगमायेचा हात दुखत होता तो बरा आहे."

प्रकृतीचे वर्तमान कळवणारी आणखी एक नोंद – "रमाबाईस गोवर आला होता", (-२३५).

दुसऱ्या बाजीरावाच्या बायकोला देवी काढल्या होत्या – "इंग्रजाकडील वैद्याकडून घरात श्रीदेवी काहाडवल्या. कृपा करून आरोग्य जाहाले", (पे. द. ११.१.१०७, २३.२७३).

स्त्रियांच्या मनःस्थितीचीही काळजी घेतली जात असे, असे दर्शविणाऱ्या काही नोंदी वाचायला मिळाल्या – "मातुश्रीताई (काशीबाई) मामांमुळे कष्टी असतील. तुम्ही तिला जाऊन शांतवन करीत जाणे", असे सदाशिवरावाने त्रिंबकराव पेठ्यांना पत्राने (पु. द. १.१५२) कळवले आहे. काशीबाई या पहिल्या.बाजीरावाची पत्नी व सदाशिवरावाची काकू. त्यांचे बंधू निवर्तल्याचा या पत्रात संदर्भ आहे. पानिपतात सदाशिवराव बेपत्ता झाल्यावर, पार्वतीबाईची मनःस्थिती जाणून घेणारी नानासाहेबाची पत्रे आहेत (पु. द. २).

गोपाळराव पटवर्धनाची बायको लष्करात असताना वारली. हे वृत्त कळल्यावर, ती परमुलखात वारल्याने तिच्याजवळ शेवटच्या वेळी कुटुंबातले कोणी नव्हते, याबद्दलची हळहळ सासरे गोविंदराव पटवर्धनांनी पत्रातून व्यक्त केली आहे. शिवाय त्यांचीं मुलगी चि. सौ. कुशी हिला काय वाटले असेल, याची चिंता केली आहे, (ऐ. ले. सं. ३.१७७).

गोपिकाबाईंनी त्यांची बालविधवा जाऊ सगुणाबाई काशीयात्रेवर असताना, तिला तिच्या माहेरच्या माणसांची खुशाली आवर्जून कळवली आहे – "लक्ष्मीस त्रिंबकारू पाठवले हे काहीच लिहिले नाही, ते लिहिणे", (पु. द. १.१०९).

"चि. सौ. सखूबाईबद्दल बरेच दिवसात कळले नाही", (रो. ले. २). यातूनही स्त्रियांबद्दलची काळजी व्यक्त होते.

सुनेच्या माहेरच्या माणसांनी तिला माहेरी अधिक दिवस ठेवून घेण्याचा आग्रह केला तर तो मानला जात असे, असे या पत्रातून दिसते. हे पत्र नानासाहेब पेशव्यांना त्यांची आजी राधाबाई हिने लिहिले आहे – "चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस पुणियास लोहगडाहून आणणे म्हणून पूर्वी पत्र लिहिले होते त्यास राजश्री महादजीपंत (उमाबाईचे वडील) याणी आम्हास पत्र पाठवले की बहुत दिवशीं आली आहेत दोन महिने मूळ न पाठवावे त्याजवरून आणिली नाही", (पे. द. १८.९८).

घरातल्या स्त्रियांच्या माहेरच्या माणसांना कारणपरत्वे सन्मानार्थ वस्त्रे किंवा पैसे दिल्याच्या नोंदी वाचण्यात आल्या, (बाजीरावाची रोजकीर्द).

**शिक्षण** : स्त्रियांना शिक्षण कोणते दिले जात असे, ते कोणत्या पद्धतीने दिले जात असे, त्याची माहिती मिळू शकली नाही. परंतु पेशवे घराण्यातल्या स्त्रियांना लिहिता-वाचता येत होते. बाळाजी विश्वनाथांची पत्नी राधाबाई हिच्या हातचे लेख पेशव्यांच्या नाशिकच्या क्षेत्रोपाध्यांकडे आहेत. गोपिकाबाई, आनंदीबाई या लिहीत-वाचीत असत. सगुणाबाईंचा स्वतःचा ग्रंथसंग्रह होता. पटवर्धन घराण्यातल्या गोविंद हरींच्या पत्नी सत्यभामाबाई यांना लिहिता-वाचता येत असे. त्रिंबकराव पेठ्यांच्या बायकोलाही येत असे. एकूण ब्राह्मण घरातल्या स्त्रिया साक्षर, शिक्षित होत्या असे दिसते.

यावर प्रश्न असा पडतो, की त्या काळी मुलगी ५ वर्षांची झाल्यावर तिचे लग्न केले जात असे. दुसरेपणावर दिली तर ती ८ वर्षांची असे. तर मग हे शिक्षण तिला सासरच्या घरी दिले जात असे का? ते कोण देत असे, व कोणत्या कारणासाठी?

महाराष्ट्रामध्ये मुलींचे शिक्षण १९ व्या शतकाच्या दुसऱ्या भागात व समाजाच्या विरोधाला तोंड देत सुरू झाले, असे इतिहास सांगतो. त्यातही सासरी गेल्यावर मुलीने हातात पेन्सिल किंवा पुस्तक धरणे हा सासरच्यांचा अपमान आहे असे समजले जात असे, (संदर्भ– रमाबाई रानडे).

तर मग अठराव्या शतकातल्या शिक्षित स्त्रियांची परंपरा केव्हा आणि कशी खंडित झाली?

मराठा व बहुजन समाजातल्या स्त्रिया साक्षर होत्या की नाही याची माहिती कळली नाही. महाराणी येसूबाई, ताराबाई, जिजाबाई यांच्या नावांची पत्रे बहुधा कारकून लिहित असावेत, येसूबाईच्या एका पत्रात तसा उल्लेख आहे, (मराठी रियासत २.२८८). चिंचवडच्या देवांना पाठवलेले पत्र.

**स्त्रियांचे मालमत्ताविषयक हक्क** : स्त्रीच्या नावावर स्थावर-जंगम मालमत्ता असे

का? तिला आपल्या मर्जीप्रमाणे खर्च करता येत असे का? तिच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी पति किंवा पुत्र घेण्यासारखे नसतील, तर तिची काय व्यवस्था असे? अशा काही प्रश्नांच्या उत्तरादाखल काही माहिती मिळाली, ती अशी –

हे पत्र नानासाहेब पेशवे यांनी त्यांचे सातारच्या दरबारातले कारभारी नाना पुरंदरे यांना लिहिलेले आहे. नानासाहेबांची आत्या भिऊबाई हिचा विवाह बारामतीकर नाईक यांच्या धाकट्या मुलाशी झाला होता. भिऊबाईचा दीर बाबूजी नाईक हा नानासाहेबांचा प्रतिस्पर्धी होता. सातारच्या गादीचे पेशवेपद आपल्याला मिळावे अशी त्याची इच्छा होती. भिऊबाई वारल्यानंतर त्याने शाहूच्या थोरल्या राणीला पत्र पाठवले की भिऊबाईची १०/१५ लाखांची चीजवस्त नानासाहेबाने बळकावली आहे, त्याचे पारिपत्य व्हावे. हे वृत्त साताऱ्याहून नाना पुरंदरे यांनी नानासाहेबांना कळवले, त्याचे हे उत्तर आहे–

"ऐसियास त्याचे वस्तवानीसी आम्हास दरकार काय जे सौ. भिवबाईचे होते ते तिणे जिवंत असता कूळ आपले लेहून काढले आणि फलाणे धर्म करा फलाणे क्रियेस वेचा याप्रमाणे यादी लेहून देऊन जिवंत असताच कितेक धर्म आगावरिल वस्ता आदिकरून केल्या व दाने गज्यादिक केली काही राहिले ते मृत्यू पावलियावरी केले धा कैचे पंधरा कैचे ते काय लिहितात त्यात त्याचे काय होते हा विचार सर्व कळतच आहे", (पु. द. १.१९१).

स्त्रियांच्या अंगावरील दागिन्यांवर पूर्ण हक्क त्यांचाच असे, हे दर्शवणाऱ्या आणखीही काही नोंदी सापडल्या.

रमाबाईने सती जाताना आपले सर्व अलंकार दान केले होते (पे. घ. इ.).

पुरंदरे घराण्यातल्या श्रीमंत मातुश्री बबीसाहेब यांच्या मृत्यूचे वर्तमान कळवणारे हे पत्र या दृष्टीने वाचण्यासारखे आहे – "का मंगळवारी साहींकाळी सर्वांस टाकून गेली दोनी वाड्यास वडील होती रुसावयासी जागा होती ईश्वर फार विशकलित केले मंत्र अग्न येथायुक्तत होऊन दोन प्रहर रात्री माघारे आले तदनंतर भोजने जाली सारांश अंतकाळ सोयीचा जाला नाही दान धर्म मातुश्रीच्या हाते काही एका पयेसाचा जाला नाही असो क़ळावे पत्र वाचून फाडावे येक पयेसा अथवा येक डागिना कोणास दिल्हे नाही हे विज्ञापना", (पु. द. १.२११).

मृत्यू जवळ आल्यावर आपल्या अंगावरचे दागिने स्त्रिया दान करीत; पण जिवंतपणी देखील हौसेने खर्च करण्यासाठी पैसा त्यांच्याजवळ असे दिसते. सौ. गोपिकाबाईने कोल्हापूर महालक्ष्मीला २४ तोळ्यांचे सोन्याचे चुडे करवले अशी नोंद (पे. द. २१.१५९) सापडते. त्याप्रमाणे काशीबाईने आपल्या माहेरच्या गावी नदीला घाट बांधला व काठावर देवळे बांधली. त्यासाठी बराच पैसा खर्च केला, अशीही नोंद सापडते (पे. द. इ.). (त्यास पुरुषांचा विरोध झाला किंवा काय ते कळू शकले नाही.)

विधवा स्त्रियांना **चरितार्था** साठी उत्पन्नाची गावे इनाम दिली जात असत. त्याबद्दलच्या काही नोंदी अशा –

"२४ रमजान. निंबगाव वाघा, पाट पारनेर हे अंताजी माणकेश्वर याची स्त्री आऊबाई इजला इनाम दिले आहे. तरी तिला उपसर्ग लागू न देणे बाबत पत्र कमाविसदारास," (पे. द.

२२.२२६).

"मातुश्री गोपिंकाबाई हिच्या खासगत खर्चासाठी तीन गावे देण्यात आली," (पे. द. २२.२३१).

"आनंदीबाई कोपरगावला कैदेत असताना तिच्या खर्चासाठी दर सहामाहीला रु. १२००० ची नेमणूक होती," (पे. द. इ.).

"जिऊबाई भानू (नाना फडणीसांची पत्नी) यास दरसाल १२००० रु. खर्चास द्यावयाची नेमणूक आहे," (पे. द. २१.२६४).

"महादजी सिद्यांची कन्या बाळाबाई सितोळे हिला साडीचोळीबद्दल रु. १००० उत्पन्नाचा गाव देण्यात आला," (पे. द. २२.२३४).

"चौघे सावंत बंधू पानिपतावर पडले. त्यांच्या बायकांना बालपरवेशी सालिना रु. २००," (पे. द. २२.६६५).

"दिनकर दादाजी नेने यांनी रत्नागिरीचे स्वारीस किल्ल्यास माळ लावली व सरकार कामास आले त्याबद्दल बालपरवेशीची नेमणूक झाली. ती मधे बंद झाली ती पुन्हा सुरू करणे."

"जयाप्पाची बायको सखुबाई शिंदे हिच्याकडे तिचे जहागीर गाव पूर्ववतपणे निर्वेध चालावेत अशी पेशव्याने आज्ञा केली," (पे. द. २१.१६७).

ठेवलेल्या बायकांच्या ठेवणाऱ्यांचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या योगक्षेमाचीही व्यवस्था केली जात असे, हे दर्शविणाऱ्या काही नोंदी सापडल्या –"तीर्थरूपांच्या नाटकशाळेला रोजमर्रा खर्चासाठी रु. ७०० दिले," (दुसऱ्या बाजीरावाची रोजकीर्द – पे. द. २१.२५९).

पटवर्धन सरदारांपैकी पांडुरंग गोविंद यांनी आपल्या मृत्यूनंतर आपल्या मुलाने कशा प्रकारे वागावे, काय कर्तव्ये करावी याची कलमे घालून यादी केली होती. त्यात "गुलाब नायकीण व रमा व पन्हा व विनी व शेली इत्यादी नृत्यांगनांचे कल्याण करावे," असे कलम घातले होते. या त्याच्या रखेल्या होत्या, (संस्थानिक पटवर्धन पांडुरंग गोविंदच्या घराण्याचा इतिहास – गो. वि. आपटे).

वरील उदाहरणे उच्चपदस्थ घराण्यातल्या स्त्रियांसंबंधी आहेत. यातच महाराणी ताराबाई आणि शाहूच्या राण्या यांचाही समावेश होतो. या वतनांची गावे विकीत किंवा त्यावर कर्ज काढीत. यांची अधिक माहिती पुढच्या प्रकरणात दिली आहे.

सर्वसामान्य समाजातल्या स्त्रियांच्या मालमत्ताविषयक हक्कांसंबंधीही काही नोंदी आढळल्या, त्या याप्रमाणे –

गिरिमाबाई कोम कृष्णाजी हरि देशपांडे यांच्या वंशात ४/५ पिढ्या वंशवृद्धी नव्हती. त्यामुळे चाल अशी की विधवेने दत्तक घ्यावा व दत्तक पुत्र व दत्तक आई यांनी जोडीने वतनाची सर्व व्यवस्था पाहावी. नवरा वारस पण सासू जिवंत असल्यास सासू व दत्तक मुलगा या दोघांच्या नावे कारभार पाहिला जाई. गिरिमाबाईची सासू सखूबाई वारल्यावर तिचे नाव दत्तक पुत्र भगवंतरावाने कागदोपत्री घातले नाही व नंतर भगवंतराव वारल्यावर त्याचा दत्तक पुत्र अमृतराव यानेही घातले नाही. त्यामुळे वतनावरचे गुमास्तेदार आपल्याला मान देत नाहीत

तेव्हा अमृतरावाचे जोडीने आपलेही नाव कागदोपत्री दाखल व्हावे, असा अर्ज गिरिजाबाईने दिला तो मान्य झाला. त्यानंतर गिरिमाबाईने जुने गुमास्ते काढून नवे नेमले व वतनाच्या कागदाच्या जोरावर कर्जे काढणे वगैरे प्रकार केले. त्यामुळे नातू अमृतरावाने सरकारात अर्ज केला. तेव्हा गिरिमाबाईचे नाव कागदोपत्री चालवावे व तिला अन्नवस्त्र मिळावे; पण तिने कारभार करू नये, असा सरकारातून हुकूम दिला गेला. (Selections from the Satara & Peshwa Dairies, Vol. II - G.C. Wad).

"काळी जाधवीण मौजे साष्ट पिंपळगाव परगणे आंबड हिने हुजूर विदित केले की, तिच्या दोन मुलांनी तिचा ऐवज घेऊन तिला घराबाहेर काढले. अन्नवस्त्र देत नाहीत व ऐवजही परत करीत नाहीत याची चौकशी करून ऐवज माघारी देववणे. अन्नवस्त्राची बेगमी करवणे. त्या दोघांपासून गुन्हेगारी घेणे व पुन्हा अंशी तक्रार येऊ न देणे – अशी विरेश्वर हरि यांस आज्ञा," (Same as above).

घानतराम अजरामरदास वस्ती किहे डबई हा वारला. त्याला मूलबाळ नव्हते म्हणून त्याच्या घरावर सरकारातून जप्ती आली. त्यानंतर त्याची आई व दोन बायका यांचेतर्फे विनंती आली त्यावरून जप्ती मोकळी केली व जप्तीतल्या वस्तूंचा व पैशाचा हिशोब लावून लोकांचे कर्ज वजा करून बायकांचा हिस्सा त्यांना देण्यात आला. यासंबंधीही सनद तयार केली व तीन पत्रे संबंधित लोकांना पाठवली. किल्ल्याचे कारकून व हवालदार शिवाजीराव सुर्वे, परगण्याचे कमाविसदार व घानतरामच्या दोन्ही बायकांना अभय पत्र. (Same as above)

बटकी, कलावंतिणी यांच्या हक्कांचेही संरक्षण होत असे, असे काही नोंदींवरून दिसून आले.

बिरजकुंवर कलावंतीण गाव सोडून गेली म्हणून शिवनेरच्या अंमलदाराने तिची चीजवस्तू घेतली व तिला दंड केला. तिने या अंमलदाराविरुद्ध तक्रार केली. तिची दाद लागून चीजवस्तू परत मिळाली, (पे. द. २२.६४७).

वादी कुणबिणीने अर्ज केला की आपणास सोड पाहिजे तेव्हा तिला कुठेही जाऊन रहा म्हणून सोडचिठ्ठी दिली, (७४२).

दोन सिद्दी कुणबिणी दारूखान्याचे काम करीत होत्या. त्यांनी काम जास्त पडते म्हणून अर्ज केला त्यांना मजुरी वाढवून दिली, (७४७).

आनंदगीर गोसावी याने एका कलावंतिणीस बळजबरीने आपल्या घरात ठेवली म्हणून त्यास रु. १५०० दंड करण्यात आला, (२०२).

विवाहामुळे मिळालेल्या हक्काची बजावणी जर दुसऱ्या पक्षाने केली नाही, तर त्याविरुद्ध दाद मागितल्याची उदाहरणेही पाहायला मिळाली.

"राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी पौष्य मैरालजी जिवाजी सा. नमस्कार विनंति उपरि कृष्णंभट हिरवेकर याची कन्या निंबाजी बडवा नेवासेकर याचे चिरंजीवास दिली आहे त्यास त्या बाईची वर्तणूक आनन्वित तिलप्राये नसता दुसरी स्त्री केली ते समयी मोगलकडील कदितानी लिहून घेतले आहे की वडिले स्त्रीशी घराश्रम करून अन्नवस्त्र देऊ न देऊ तरी शफत लिहून घेतली ते पत्रक व जिन्नस आपण पाहिल्यानंतर

ध्यानात येईल. असे असता पहिले बायकोस अन्नवस्त्र देत नाही. कृष्णंभट समक्ष विनंति करतील तो अर्थ ध्यानात आणून यांचे कन्येचा संसार यथाचित होय असा बंदोबस्त करून ठेविला पाहिजे राजश्री रामशास्त्री बाबा याजकडून एक पत्र आमचे नावे निक्षून देवावे व आपण आपले पत्र आम्हास द्यावे की निंबाजी बडव्याने लिहून दिल्याप्रमाणे वर्तणूक करीत नाही तरी त्याचे वतन जप्त सरकारात करून त्यास हुजूर पाठवणे किंवा लिहिल्याप्रमाणे वहिवाट करण्याचा जामीन घेणे याप्रमाणे पत्र यास द्यावे. ब्राह्मण गरीब आहे, (पे. द. २३.१२१). (पत्राचे माथ्यावर शेरा-सदरहू पत्राचे उत्तर शास्त्रीबाबाचे नावाचे दिल्हे. ताकीद पत्र दिल्हे).

एका कुणबी मुलीला नवऱ्याने सोडली व उपाशी मरू लागली म्हणून एकाचे घर निघाली. तिला मुलेही झाली. माहेरचे लोक जात-येत होते व तिच्या 'नवऱ्या'कडून भेटवस्तू घेत होते. नंतर मधेच त्यांनी 'नवऱ्या'विरुद्ध फिर्याद केली पण मुलीने स्वतः घरून निघाल्याचे सांगितले म्हणून 'नवऱ्या'ला 'बायको' परत मिळाली (Selections Vol. II. 613).

हरि राघोपंत शिंदे याची बायको साल्प्याहून पळून बेफंदी करून सासवडजवळील कोढीत गावच्या जगन्नाथ शामराज कुळकर्णी यांच्याबरोबर गेली. तिचा नवरा तिला न्यायला आला. पण ती जायला तयार झाली नाही. तेव्हा पंचांसमोर करार करून नवऱ्याने तिचे ७५ रु. घेतले व तिच्यावरील आपला हक्क सोडून दिला, (पे. द. १.१४५).

स्त्रियांवर वाकडी नजर ठेवणाऱ्यांना शिक्षा होत असे, अशा नोंदी आढळल्या.

मिठाराम सोनार याच्या घरच्या लग्नात इतर सोनार कुटुंबे आली होती. तेव्हा सोनाराच्या घरी चांगल्या मुली आल्या आहेत. त्यांना पहावयास आणावे असे धर्माजी गोपाळ मुजुमदारास कुणीतरी सागितल्यावरून त्याने ढालाईत मुली आणायला पाठवले व मुली न पाठवल्यामुळे ७०० दंड घेतला. याविरुद्ध तक्रार केल्यावरून सोनाराचे ७०० रु. परत देणे व धर्माजीला ७०० रु. दंड करणे, (Selections 655).

बाळाराम वळिराम याने ब्राह्मण स्त्रीवर बदनजर ठेवली यास्तव १००० रु. दंड करण्यात आला तो वसूल करण्यासाठी त्याचे घरदार विकून मालमत्ता जप्त करण्यात आली, (पे. द. २२-२२४).

ब्राह्मण बायकांना शिक्षा झाल्याचीही उदाहरणे सापडली – ब्राह्मण बायकांनी दारू पिऊन बदकर्म केले; शूद्रांशी व ब्राह्मणांशी व्यभिचार केला; ब्राह्मण बाईने मुलीचे दोन वेळा लग्न लावले; ब्राह्मण विधवा केशवपन झाल्यावर गोळकाचे घर निघाली, केस ठेवले, बांगड्या घातल्या, तिला मुलगा झाला – या साऱ्या गुन्ह्यांबद्दल या स्त्रियांना किल्लावर अटकेत ठेवले गेले, (Selections 614-617).

एखाद्या वतनदाराने वा चाकराने गुन्हा केला वा पळून गेला, तर त्याच्या बायकामुलांनाअटक करून ओलीस ठेवण्याची पद्धत होती. त्यात म्हातारी आई, तान्ही मुले यांचाही समावेश असे एक उदाहरण (पे. द. १) मध्ये सापडते.

इतर काही हक्कांचा न्यायनिवाडा करून सांगितल्याची उदाहरणे –

शिराळ शेट घालण्याच्या हक्कावरून वाद होऊन आपण हक्क मागण्याकरता रखमाजी रास्ते व मानाहि पाटलीण आल्या, (पे. द. २२-२९५).

परमाजी पाटील कचाऊ मौजे दुलंगे तर्फ बारागाव परगणे बाळापूर प्रांत वऱ्हाड याची बायको तोलाहि, हिने हुजूर येऊन विदित केले – हणमंतराव आटोळे यांनी कारण नसताना तिच्या गावावर स्वारी केली, दोन दीर मारले, माणसे कैदेत टाकली, नवरा, मुलगा, सून यांना कैदेत ठेवून मारतात व आपल्या दोघी मुलींना अटकेत ठेवले आहे - तिला बरोबर जासूद देऊन तक्रारीचे निवारण करण्यास पाठवले, (Selections 662).

हा सर्व उदाहरणे फुटकळ स्वरुपाची असली, तरी त्यांचा एकत्रित विचार करताना असे लक्षात येते की त्या काळातल्या कारभारी मंडळींची स्त्रीविषयक भूमिका मानाची, न्यायाची बूज राखणारी होती. आणखी एक लक्षात येणारी गोष्ट म्हणजे स्वतःवरच्या अन्यायाची दाद मागण्यात बहुजन समाजाच्या स्त्रिया संख्येने अधिक दिसतात, आणि त्यांनी धीटपणे स्वतः पुढे येऊन ही दाद मागितली आहे. या सर्व स्त्रिया वतनदार कुटुंबातल्या आहेत.

**दांपत्यजीवन** – तत्कालीन दांपत्यजीवनाचे चित्रे तसे अंदाजानेच रेखाटावे लागते. मराठा समाजामधे बहुपत्नीकत्वाची प्रथा पूर्वीपासूनच होती. इतर लहान लहान जाती जमातींचे विवाहविषयक नीतीनियम त्यांच्या परंपरेनुसार वेगवगळे होते. ब्राह्मणांत मात्र पहिली पत्नी वारल्यानंतरच दुसरे लग्न केले जाई. पुरुषाला एका वेळी एकच पत्नी असे. परंतु पेशव्यांनी हे बंधन तोडले असे दिसते. बाजीरावाने काशीबाई हयात असताना मस्तानीला पत्नीप्रमाणे वागवले, नानासाहेबांनी उतार वयात दुसरे लग्न केले, सखारामबापूंनीही एकाहून अधिक लग्ने केली आणि नाना फडणीसांनी नऊ बायका होत्या, दुसऱ्या बाजीरावाच्या बायकांची मोजदादच ठेवावी लागत असे.

या व्यतिरिक्त बाळाजी विश्‍वनाथांपासून प्रत्येक पेशव्याच्या नाटक शाळा, रखेल्या व अनौरस संतति होती. याला अपवाद चिमाजी अप्पा, सदाशिवराव व थोरले माधवराव यांचा. यांपैकी चिमाजी अप्पा व माधवराव यांच्या बायका त्यांच्याबरोबर सती गेल्या. सदाशिवरावांची बायको पार्वतीबाई हिने पतीचा मृत्यू झाल्याने नाकारले व शेवटपर्यंत सौभाग्यालंकार वापरले. हे या तिघांच्या दांपत्यजीवनाच्या ऐक्याचे प्रतीक मानायला हरकत नाही.

सदाशिवरावाने धोंडिबा पुरंदरे यांना लिहिलेल्या काही घरगुती पत्रांत आपली (पहिली) पत्नी उमाबाई हिच्याबद्दल अतिशय नाजुक आणि हळव्या भावना व्यक्त केल्या आहेत. नानासाहेब व गोपिकाबाई यांचे दांपत्य जीवनही सुखाचे असावे अशा आशयाची पत्रे वाचायला मिळाली. रखेल्या, नाटकशाळा त्यांच्यां आड आलेल्या दिसत नाहीत. कदाचित तो कथाभाग उशीरा सुरू झाला असावा. याबद्दल माहिती कळली नाही. बहुतेक सर्व पेशवे – (वर दिलेल तीन वगळता) रसिक व रंगेलही होते. रघुनाथरावाची तर त्याबद्दल विशेष ख्याती आहे. नाचणाऱ्या गाणाऱ्या मुली इतर प्रदेशातून मागवाव्या, व इथेही शोधून तयार कराव्या असे शाहूचे आदेश होते (पे. द. १०.६३,६४,६५). तमाशाही त्यातूनच जन्माला आला.

**काही रीतिरिवाज** - विधवांचे **केशवपन** करण्याचा रिवाज होता. पण या रिवाजाला देखील एक-दोन अपवाद असलेले खुद्द पेशव्यांच्या घरात आढळतात. नारायणरावाचा वध झाला त्यावेळी त्यांची पत्नी गंगाबाई गरोदर होत्या. त्यावेळेस त्यांचे केशवपन झाले नाही.

त्यानंतर सुमारे चार वर्षांनी त्या वारल्या तेव्हा त्या सकेशाच होत्या अशी माहिती मिळते (पे. द. इ.).

पानिपतावर सदाशिवरावभाऊ कामास आले, पण त्यांचा मृतदेह कोणी पाहिला नव्हता. त्यामुळे त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांनी सौभाग्य चिन्ह काढण्यास नकार दिला. त्यात त्यांचे केशवपन करण्याविषयी असा उल्लेख वाचायला मिळाला –

"मुख्य कारभारी व धनी जेष्ठइतक्यांचेमनात होते तो विधि उरकावा परंतु कनिष्ठांचे मनात नव्हते तेव्हा पुण्यात येऊन वचने काढून सिंहस्थापावेतो राहविले त्यास (पार्वतीबाईस) विचारून करावे असा मनसबा होता," (काव्येतिहास संग्रह पु. २,अंक ४). पुढे पार्वतीबाईंनी विधवा होण्याचे नाकारले व घरातल्या मंडळींनी त्यांच्या भावनेचा आदर केला.

विधवा गंगाबाईंचे पुरंदर किल्लावर रीतसर डोहाळजेवण केले गेले त्यासाठी सुवासिनींनी हळदकुंकूही नेले होते असा उल्लेख सापडतो. या परिस्थितीत हा संस्कार करावा की नाही असा प्रश्न उपस्थित झाला होता. तो करण्याचा पुढाकार पार्वतीबाईंनी घेतला, हे लक्षात घेण्यासारखे आहे. पण पुरंदरे घराण्यातल्या ज्येष्ठतेचा मान असलेल्या आबईदेखील सामील झाल्या होत्या. या आबई बाजीराव पेशव्यांच्या पिढीच्या, म्हणजे गंगाबाईच्या आजे-सासू शोभतील अशा होत्या. या विषयीची नोंद मूळातून अशी – "सेवेसी विज्ञापना श्रीमंत मातुश्री गंगाबाई यासी डोव्हाळे जेवण करावयाविसी आज्ञा झाली होती तेव्हा राजश्री बापूस पुसिले त्यांणी उत्तर केले हा विध कोणीचं येथे केला नाही त्यानंतरी पार्वतीबाईनी घरीच विध केला त्यासमई बापूची धाकटी स्त्री येथे किल्ल्यास आहे त्यानी हळदकुंकू वस्त्रे नेली हे कळल्यावरही आज ५-६ सफरी राजश्री मोरोपंत पाठविले त्यानी बापूस पुसिले त्यानी वाड्यातील शागीर्द बोलाविले निरोप पाठविला पार्वतीबाईनी उत्तर केले बहुत उत्तम त्यांच्या घरचा आबईच्या हातचा यावा यापेक्षा विशेष काये यैसे सांगितले," (पु. द. १.११४). स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाशी संबंधित अशा महत्त्वाच्या रूढीसंबंधांचे निर्णय तत्कालीन परंपरेच्या विरोधात जाऊनदेखील घेणाऱ्या या स्त्रिया होत्या. त्या समाजातल्या उच्च स्तरात वावरत होत्या व म्हणून त्यांचे वागणे निभावले गेले, हे खरे. पण रूढीविरुद्ध जाण्याचा विचार त्यांनी केला व आपल्या विचारानुसार आचरण करण्याचे धाडस दाखविले, याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल.

एखाद्या रूढीला कुणाचा जोरदार विरोध असेल, तर तो सामोपचारानें सांभाळला जात असे (मस्तानी प्रकरणातही अखेर तिचा स्वीकार केला गेला) असे दिसते. समाजातले रूढींचे निर्बंध अजून जाचक झाले नव्हते असे दिसते.

**मुलगा आणि मुलगी यांच्यामधला फरक** – कुटुंबातील कोणी गरोदर स्त्री प्रसूत झाली की ते वृत्त सर्व संबंधितांना पत्राने कळवले जात असे, त्यात मुलगा झाला, आणि मुलगी झाली या कळवण्यात थोडा फरक असे. उदा.:

"दसऱ्याचे दिवशी संध्याकाळच्या प्रहर दिवसास श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई प्रसूत जाहली. कन्या जाहली," (ऐ. ले. सं. ३.८१३).

"चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई प्रसूत झाली.पुत्र झाला. संतोषाचे वर्तमान कळावे," (२८५).

"चिरंजीव सौभाग्यवती मथुराबाइ वघ चतुर्दशी बारा घटिकानंतर प्रसूत झाली. पुत्र झाला.

संतोषाचे वर्तमान कळावे. सदाशिवपंत काळे यांची सून सासवडी प्रसूत झाली कन्या झाली," (२०८).

या पार्श्वभूमीवर हे एक पत्र वाचण्यासारखे आहे. हे पत्र नारायणराव पेशवे यांनी महिपतराव त्रिंबक (पुरंदरे) यांना लिहिले आहे – "तुम्हास कन्यारत्न जाहले म्हणून परस्परे आइकिले परंतु तुम्ही काही लिहिले त्यावरून फारच अपूर्व वाटले पुत्रोछाह जाहला म्हणजे पत्र व शर्करा पाठवावी आणि कन्या जाहाली म्हणजे पाठऊ नये ऐसे काही तुम्हास कोणी सांगितले आसे अथवा शास्त्रातील वचन सापडले असेल म्हणून पत्र न पाठविलेसे वाटते परंतु बहुधा ऐसे वचनही नसेल. तथापि तुमचे आढळात असे असल्यास येथे पत्र न पाठवायचा गुता नाही तर येविसीचे सविस्तर लिहिणे", (पु. द.९.९७).

मुलगा झाल्याचा आनंद होत असे पण म्हणून मुलगी झाल्याचे दुःख होत असे, किंवा मुलगी नकोशी असे, असा उल्लेख आढळत नाही.

**सतीची प्रथा** – तत्कालीन कागदपत्रातल्या नोंदीमधे अधूनमधून सतीचे उल्लेख वाचण्यात आले. हे उल्लेख एकत्र केल्यावर त्यासंबंधी सर्वसाधारणपणे काही गोष्टी दिसून आल्या, त्या अशा –

सती जाणे ऐच्छिक होते. नवरा मेल्यावर प्रत्येक बाई सती जात नसे. मृत पुरुषाला एकाहून अधिक बायका असल्या तर सगळ्याच सती असत असे नव्हते.

उदा. – "जेस्ट स्त्रीने अग्निप्रवेश केला," (पे. द.२२.३२३).

सती जाण्यासाठी परवानगी मागावी लागत असे. ही परवानगी काही वेळा नाकारलीही जात असे.

उदा. १) Selections for Satara Diaries Vol. II. 764.
 २) ऐ. ले. सं. ३.६०२७.
 ३) पटवर्धन घराण्याचा इतिहास – गो. वि. आपटे.

मृत पुरुषाच्या पत्नीखेरीज त्याच्या रखेल्या, नाटकशाळा, दासी, कुणाबिणी इत्यादीही कधीकधी सती जात असत.

उदा. १) पे. द. ३.७८.
 २) कुलाबकर आंग्रे सरखेल यांच्या सर्व स्त्रिया सती गेल्या होत्या.(संभाजी आंग्रे – दा. गो. ढबू)

पत्नी सती न जाता रखेली सती गेल्याचेही उदाहरण आढळते – नानासाहेब पेशव्यांची रखेली येसू सती गेली पण बायको सती गेली नाही (पे. घ. इ.).

पत्नीने सती जावे अशी इच्छा पति कधी कधी व्यक्त करीत असे - उदा. माधवरावाची पत्नी रमाबाई हिला माधवरावाने सती जायला सांगितले, (पे. घ. इ.).

पत्नीने सती जाऊ नये अशीही इच्छा पतीने व्यक्त केल्याचे उदाहरण आढळले (करवीर रियासत). आपल्या बायकांनी सती जाऊ नये, असे संभाजीने सांगितले (कोल्हापूरकर संभाजी व जिजाबाई).

नवरा मेल्यानंतर त्याच्या बायकोवर नैतिक दडपण आणून तिला बळजबरीने सती जायला भाग पाडण्याचे फक्त एक उदाहरण आढळले, ते शाहूची राणी सकवारबाई हिचे. तिला सती घालवण्याची कारणे सर्वस्वी राजकीय होती.

एकूण असे दिसते की नवरा मेल्यावर सती जाणे हे पराकोटीच्या पतिनिष्ठेचे लक्षण समजले जात असे. सतीमधे ब्राह्मण स्त्रियांची उदाहरणे कमी आढळली. मराठा घराण्यातल्या स्त्रियांची उदाहरणे अधिक प्रमाणात आढळली. कदाचित सतीची प्रथा हे राजपुतांच्या जोहारचे बदललेले रुप असावे. पतिप्रेमाचा रंग त्यात नंतर मिसळला असावा.

**मुलांवर संस्कार** – घरातल्या मुलांना वळण लावण्याचे काम घरातले कर्ते पुरुष करीत असत असे दिसते. लष्करी मोहिमेवर गेलेले असताना सुद्धा त्यांचे घराकडे लक्ष असे. नाना पुरंदरे यांनी पानिपत मोहिमेवरून हे एक पत्र आपला मुलगा बजाबा याला लिहिले आहे त्यात "घोडी फेरावयास जाणे" वगैरे आदेश आहेत, तसेच "आबई रागे भरणार नाही लाडके व्हाल कामाचे नाही" असा इशाराही दिला आहे. नंतर एकदा त्याने बजाबासाठी कसे वागावे, कसे वागू नये वगैरे सांगणारा २० कलमी उपदेशही लिहून पाठवला आहे, (पु. द. २).

पांडुरंग गोविंद पटवर्धन यांनीदेखील आपल्या मुलाने कसे वागावे याविषयी कलमे घालून उपदेश लिहिला आहे, (पु. घ. इ.).

नानासाहेब पेशव्यांचे तर घरगुती बाबतीत फारच बारकाईने लक्ष असे. रघुनाथरावाने कसे वागावे, कसा अभ्यास करावा वगैरे संबंधी तपशीलवार माहिती त्याने एका पत्रात कळवली आहे. माधवराव व नारायणराव हे गोपिकाबाईच्या देखरेखीखाली वाढले पण तिची व नानासाहेबांची वळण लावण्याची पद्धत एकच होती, हे तिने नंतर सवाई माधवरावासाठी लिहिलेल्या १३ कलमी उपदेशावरून कळते.

कोपरगावच्या कैदेत दुसरा बाजीराव आनंदीबाईजवळ होता, पण त्याला वळण लावण्याचे काम कारभाऱ्याचे आहे, व कारभारी लक्ष देत नसल्यामुळे तो बिघडतो आहे, असे तिचे म्हणणे होते (पे. द. ४).

घरातल्या मुलांवर कर्त्या पुरुषांचा वचक असे, तसेच घरातल्या स्त्रियांनाही कर्त्या पुरुषाचा धाक असे, असे दिसते. या **बाबतीत** नानासाहेब पेशव्यांबद्दलची अधिक माहिती राधाबाई प्रकरणात दिली आहे. पुरंदरे दप्तरामधले हे पत्र आबईच्या संबंधात आहे. हे नाना पुरंदरे याने लिहिले आहे.

"सांप्रतच्या प्रकारात आबा, सखारामपंत आम्हासी कसे आहेत घरी मातुश्रीस काये म्हणतात या गोष्टी फार वाईट अमच्या कानावर येतात त्यास ते सुखरूप बोलोत परंतु मातुश्री त्याच्या बायका आपल्या घरास आणितात अपल्या त्याच्या घरात पाठवितात अपण घरास जातात हे काये असे करू नये मातुश्रीवर आमची विनंति सांगोत अथःपर त्यांच्या घरास मातुश्रीनी जाऊ नये व बायकोस पाठऊ नये याप्रमाणे करणे त्याचे घरास हळदकुंकू वगैरे सिस्टाचार करावयाचे राहिले नाही, करू नये इतके सखाराम याणे केले आहे," (पु. द. ३.७७).

सखारामबापू बोकील नाना पुरंदरे यांच्याशी फार वाईट वागले असल्याने त्यांच्या घरच्या

बायकामंडळींशीही आपल्या घरच्या बायकामंडळींनी संबंध ठेवू नये, असे नाना पुरंदरे याने सांगितले आहे. दोन्ही कुटुंबे सासवडचीच रहाणारी होती.

घरातल्या स्त्रियांना आचारस्वातंत्र्य कोणत्या बाबतीत द्यायचे आणि कोणत्या नाही, यासंबंधी तत्कालीन ब्राह्मणवर्गात काही आडाखे असावेत. असे दिसते की स्त्रियांच्या व्यक्तिगत भावना जपण्याइतके स्वातंत्र्य त्यांना होते–दिले जात असावे. सामाजिक बाबतीत तेवढे नसावे.

मुलांचे लग्न आई ठरवित असे, असे दर्शवणारी काही उदाहरणे वाचावयास मिळाली.

निजाम पुण्याजवळ येऊन ठेपला असताना, व रघुनाथराव आणि माधवराव दोघेही मोहिमेवर असताना, लढाईच्या धामधुमीत गोपिकाबाईने नारायणरावाचे लग्न सिंहगडावर उरकून घेतले आहे.

अशाच आणखी एका मोहिमेच्या धामधुमीत गोपाळराव पटवर्धन यांचे लग्न उरकून घेण्याचा घाट त्यांची आई सत्यभामाबाई हिने घातला आहे. गोपाळरावासाठी नेमस्त केलेली मुलगी त्याला पसंत नव्हती. हे कळल्यावर सत्यभामाबाईने त्याला पुढीलप्रमाणे पत्र लिहिले आहे. आईच्या अधिकारवाणीबरोबरच त्यातून हेही दिसून येते की त्याकाळी वधू पक्षाचा योग्य तो मान राखला जात असे. आपल्या सरदारकीचा मोठेपणा पटवर्धनांनी या मामल्यात दाखवलेला नाही –

"आता चिरंजीवांचे पत्र आले की 'नवरी वाईट. आम्हास परिछिन्न करणे नाही' म्हणून पत्र आले, यावरून अपूर्व वाटले महिना एक जाहला आता तर त्या ब्राह्मणास जा म्हणून सांगितले तर तूर्त आम्हावर ब्रह्मद्वेष येणार तशातच 'ही पाटणकर मामानी नवरी वाईट आणिली' म्हणून लिहिले तर तशी त्यास आणावयास गरज काय ? काही पैसा तुमचे लग्नात पाटणकर मिळवीत नाहीत इतकेही करून वाईट असती तर आम्ही काय सर्व वेडी होतो की काय ? आणि तुम्ही मात्र शहाणपणे लिहिता दहापाच मुलीत नवरी चांगली आहे दहापाच हजारात चांगली ती तुम्ही करणार तशी कोण मिळणार ? एक पुण्यात मिळणार ते पुणे दारोदार भटकावयास लागले आणि तुम्हीही तसेच तर अतःपर ऐशा गोष्टी लिहिल्याने परिणाम नाही नाहक आम्हावर ब्रह्मद्वेष पाडाल आम्ही पहिली माणसे दहापाच हजारात चांगली नवरी निवडून आणावी इतकी परीक्षा आम्हास नाही तुम्हापाशी कोण परीक्षावंत असेल त्यास सत्वर पाठवून देणे अधिकोत्तर काय लिहावे?" (रो. ले. सं. २.२८०).

सोयरीक ठरवण्याच्या संबंधातले एक पत्र महादजी अंबाजी पुरंदरे यांनी आपला पुतण्या नाना पुरंदरे यास लिहिले आहे. त्यात ते लिहितात –

"मातुश्री आबईच्या व तुमच्या विचारे काय तो विचार लिहून पाठवणे त्यासारखे त्यास सांगितले पाहिजे," (पु. द. १.१६१).

मराठा घराण्यातल्या सोयरिकी कशा ठरत असत ते कळू शकले नाही.

त्या काळात स्त्रियांना प्रवासही बराच घडत असे, असे दिसते. पटवर्धनांच्या दप्तरात याचे बरेच उल्लेख सापडतात. नेहमीचे सासर-माहेरचे जाणे-येणे असे. सणाच्या निमित्ताने वा

बाळंतपणासाठीही जात असत. शिवाय वरिष्ठ घराण्यातल्या स्त्रिया आपापल्या पतीबरोबर लष्करी मोहिमेतही जात असत. पेशवे घराण्यातल्या सर्व स्त्रिया मोहिमेवर गेलेल्या आहेत. पटवर्धनांबरोबर गोपाळरावांची बायको गेली असावी. नाना फडणीसाची आई व बायको या दोघी पानिपतच्या मोहिमेबरोबर गेल्या होत्या. याशिवाय पेशवे, पटवर्धन या घराण्यातल्या स्त्रियांनी वैधव्यानंतर काशीयात्रा केल्या होत्या. पेशवे घराण्यातल्या म्हणून उत्तरेकडचे नबाब वगैरे मंडळी त्यांची सर्व व्यवस्था पहात असत. त्यांचा सर्व खर्च व्यवस्थितपणे केला जात असे. या स्त्रिया यात्रेला निघाल्या की आयती व्यवस्था व सोबत होणार म्हणून गावागावातून इतरही बायका-पुरुष यात्रेत सामील होत असत. पेशवे स्त्रियांनी इतरही क्षेत्रांच्या यात्रा केल्याचे उल्लेख आहेत. कुटुंबातल्या स्त्रियांचे जाणे-येणे मोहिमेवर गेलेल्या पुरुषांना कळवले जात असे. लढाईवर गेल्यामुळे घराशी, कुटुंबाशी संपर्क तुटला, असे घडत नसे. वाचण्यात आलेला बहुतेक सर्व पत्रव्यवहार हा पत्र लिहिणारा किंवा वाचणारा मोहिमेवर असताना केलेला आहे.

त्या काळी पत्रे-खलिते जासूदजोडीबरोबर पाठवले जात असत, असे उल्लेखांवरून दिसते. त्यामुळे सत्ताधारी व उच्चपदस्थ घरातली माणसे पत्रव्यवहार ठेवू शकत असावीत. सर्वसाधारण समाजातल्या लोकांना ती सोय उपलब्ध वा परवडणारी नसावी. म्हणूनच कदाचित समाजाच्या त्या थरांमधला पत्रव्यवहार वाचायला मिळाला नाही. साधारण समाजातली मंडळी बाहेरगावी गेल्यावर त्यांच्या कुटुंबाशी व एकमेकांशी संपर्क कसा व किती प्रमाणात रहात असे, ते त्यामुळे कळू शकले नाही.

पण जी काही उदाहरणे आपण वर पाहिली, त्यातून त्या काळातल्या समाजाचे जे चित्र समोर उभे केले जाऊ शकते, त्यात हा समाज त्या काळी तरी बराच लवचिक असलेला दिसतो. पुरुष मंडळी लहान कामांवरून मोठ्या हुद्यांवर पोचलेली दिसतात; बहुजन समाजातले कर्तबगार लोक उच्चपदस्थ झालेले दिसतात; साधारण कुटुंबातल्या मुली मोठ्या घरी पडलेल्या दिसतात; मुलींचे विवाह बाळपणी होतात, पण त्यांना जरुरीपुरते शिक्षण मिळालेले असते; त्यांच्या आरोग्याची, चरितार्थाची काळजी घेतली जाते; रूढी असतात, पण त्यांची बंधने सैल केली जाऊ शकतात; अन्यायाची दाद घेतली जाते, त्यांचे निवारण केले जाते; स्त्रियांचे जगणे तसे असह्य नसते; काही वेळा तर ते आनंदाचे, सुखाचेही असते.

यांपैकी काही बाबतीतल्या नोंदी फक्त उच्चपदस्थांच्या असल्या, तरी यथा राजा तथा प्रजा या न्यायाने सर्वसाधारण समाजाबद्दलही त्यातून अंदाज व्यक्त करणे, चुकीचे ठरू नये; पण याचा अधिक तपशीलवार अभ्यास होणे आवश्यक आहे.

प्रकरण ३ रे

**

# काही कर्तृत्वसंपन्न स्त्रिया

अठराव्या शतकातल्या, नजरेखालून घातलेल्या पत्रव्यवहारामध्ये ज्या स्त्रियांची नावे बरेच वेळा किंवा काही महत्त्वाच्या घटनांच्या वा परिस्थितीच्या संदर्भात वाचायला मिळाली त्या स्त्रियांचे दोन मुख्य गट पाडता येतील. ही गट विभागणी या स्त्रियांचे ज्या पद्धतीचे कर्तृत्व दिसून आले त्यास अनुसरून केली आहे. पण या विशिष्ट कर्तृत्वामुळेच ही विभागणी सामाजिक स्वरूपाची झाली आहे, असे आपल्या लक्षात येते. या संबंधीचे अधिक विवेचन उपसंहारामध्ये करणे अधिक योग्य ठरेल. ऐतिहासिक कालक्रमाचा विचार केला तर सातारच्या गादीची स्थापना व बाळाजी विश्वनाथांना पेशवे पद इथून सुरुवात करून ते साधारणपणे सातारच्या गादीचे महत्त्व व कारभाराची सूत्रे पेशव्यांकडून फडणीसांकडे गेली असा हा सुमारे शंभर वर्षांचा कालखंड आहे.

## प्रास्ताविक : 'अ' गट

पहिल्या 'अ' गटामध्ये मराठा राजघराण्यातल्या आणि सरदार घराण्यातल्या किंवा वतनदार घराण्यातल्या स्त्रिया आहेत. या स्त्रियांच्या कर्तृत्वामध्ये त्यांच्या नेतृत्वगुणांचा, विशेषतः लष्करी नेतृत्वाचा बराच मोठा भाग आहे. यातल्या बऱ्याच स्त्रियांचे कर्तृत्व पतिनिधनानंतर दिसून आले आहे. या अभ्यासात ज्यांचा समावेश केलेला नाही अशा आणखीही स्त्रिया आहेत. त्यांपैकी काहींचा थोडा परिचय करून घेणे योग्य ठरेल.

अंगी नेतृत्वाचे गुण असलेल्या मराठा स्त्रियांच्या परंपरेत अहिल्याबाई होळकर हिचे नाव अग्रगण्य आहे. अहिल्याबाईसारखी एकाच वेळी धैर्यशाली, न्यायप्रिय आणि धर्मपरायण असलेली राज्यकर्ती इतिहासात क्वचितच आढळते. अहिल्याबाईचे कर्तृत्व मध्य प्रदेशात फुला-फळास आले; पण तिच्या धर्मपरायणतेच्या खुणा उत्तरेत काशीविश्वेश्वरापासून दक्षिणेत धृष्णेश्वरापर्यंत पसरल्या आहेत.

संभाजीची पत्नी महाराणी येसूबाईमधे धैर्य आणि समयसूचकता हे गुण होते. राज्याच्या कल्याणाची कळकळही तिला होती. औरंगजेबाच्या कैदेतून तिचा गोसाव्याचा वेष घेतलेल्या हेरांकरवी राजारामाशी पत्रव्यवहार होता. चिंचवडच्या देवांना तिने आपली दैन्यावस्था कळवणारे पत्र लिहिले आहे, त्यावरून तिची प्रयत्नशीलताही दिसते. पण ती स्वभावाने महत्त्वाकांक्षी व लढाऊ वृत्तीची नसावी. संभाजीच्या मृत्यूनंतर शाहूच्या वतीने स्वतः कारभार न

पहाता, तिने तो राजारामाच्या हाती सोपवला, यावरून हेच दिसते. अहिल्याबाई व येसूबाई या दोघीजणी 'अ' गटात समाविष्ट असणाऱ्या आक्रमक व महत्त्वाकांक्षी वृत्तीच्या स्त्रिया अपवादात्मक अशा आहेत.

इंग्रजांनी १८१८ साली पेशवाई खालसा केली. पुढे १८३९ साली मराठ्यांचे होते नव्हते ते राज्यही खालसा झाले.

या अभ्यासासाठी निवडलेल्या स्त्रियांपैकी सगळ्यांत पहिली ताराबाई हिने १७०० साली आपल्या कारभाराला सुरुवात केली, तर लक्ष्मीबाई शिंदे यांचे बंड हे १७९८ सालचे म्हणजे या शतकाच्या शेवटच्या चरणातले आहे.

मात्र या स्त्रियांचा अनुक्रम कालानुसार न लावता, त्यांची दोन गटांत झालेली विभागणी कायम ठेवली आहे; गटांतर्गत क्रम मात्र कालाप्रमाणे आहे.

## 'अ' गट

### १ – ताराबाई

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांच्या आतच, १६८९ मध्ये शिवाजीचा मोठा मुलगा आणि वारस संभाजी याला औरंगजेबाने पकडले व त्याचा निर्घृण वध केला. त्यावेळी संभाजीची राणी येसूबाई आणि मुलगा शाहू हे रायगडावर होते, मोगलांच्या फौजांनी रायगडाला वेढा घातला, व येसूबाईला शाहूसकट औरंगजेबाच्या स्वाधीन होण्यास भाग पाडले. यावेळी शाहू ९/१० वर्षांचा होता. मोगलांनी शाहूला आपल्या कैदेतून १७०७ साली सोडले.

शाहूची कैद आणि सुटका या दरम्यानच्या १८ वर्षांच्या काळात मराठ्यांच्या राज्याचा सांभाळ शिवाजीचा धाकटा मुलगा राजाराम याने, व त्याचा १७०० साली मृत्यू झाल्यानंतर त्याच्या अल्पवयीन मुलाच्या नावे राजारामाची पत्नी ताराबाई हिने केला. मराठी राज्याच्या कठीण काळात राज्य राजारामाने राखले, म्हणून राजारामाचा वंश हा गादीचा खरा वारस आहे, असा ताराबाईचा आग्रह होता. या तिच्या आग्रहामुळे मराठी राज्याची दोन केंद्रे प्रस्थापित झाली. यापैकी साताऱ्याची गादी ही संभाजीच्या वारसांनी चालवली, तर कोल्हापूरची गादी ही राजारामाच्या वारसांनी चालवली. राजारामाची पत्नी ताराबाई ही या कोल्हापूर गादीची स्थापना करणारी होय.

ताराबाईचा जन्म १६७५ सालातला, आणि मृत्यू १७६१ सालातला. ८६ वर्षांचे भरपूर आयुष्य ती जगली. या तिच्या आयुष्याचे तीन प्रमुख टप्पे आहेत.

ताराबाई ही शिवाजीचे सेनापति हंबीरराव मोहिते यांची मुलगी. तिचे राजारामाशी लग्न १६८३ साली झाले. हे लग्न संभाजीने लावून दिले. या वेळेस ताराबाई ८ वर्षांची आणि राजाराम १३ वर्षांचा होता. तो संभाजीच्या कैदेत होता.

संभाजीच्या वधानंतर राजाराम व ताराबाई पन्हाळगडावर गेले. शाहू औरंगजेबाच्या स्वाधीन झाल्यानंतर राजाराम पन्हाळगडावरून जिंजीला गेला, ताराबाई पन्हाळगडावर राहिली. ती १६९४ पर्यंत पन्हाळगडावर होती. राज्याचा कारभार पन्हाळगडावरून पाहिला जात होता. शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळातर्फे रामचंद्रपंत अमात्य हे कारभारी होते. परंतु ताराबाई देखील

कारभारात लक्ष घालीत असावी, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे (क. रि.,गर्गे).

राजाराम १७०० साली वारला. यानंतर आपला अल्पवयीन मुलगा शिवाजी यास गादीवर बसवले जावे, व त्यासाठी त्याची मुंज करावी, असा प्रस्ताव ताराबाईने अमात्यांसमोर मांडला. अमात्यांनी त्याला विरोध दर्शविला, व शाहूची मुंजही अजून व्हायची आहे, असे सांगितले. यावर ताराबाई नाराज झाली. "ते धनी, हे चोर, असा अर्थ नाही" असे म्हणाली. पुढे इतर दरबारी मंडळींनी रदबदली केली, आणि मुलाला गादीवर बसवून ताराबाई कारभार करू लागली. राजारामाचा धाकटा मुलगा संभाजी व त्याची आई राजसबाई यांना तिने कैदेत टाकले. यावेळी ताराबाईचे वय २५ वर्षांचे होते. कारभारामध्ये तिच्या मदतीला शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाचे सभासद होते. परशुरामपंत प्रतिनिधी, रामचंद्रपंत अमात्य, खंडो बल्लाळ चिटणीस, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, कान्होजी आंग्रे या सर्वांकडून तिने इमानप्रमाण म्हणून दूधभाताच्या शपथा घेववल्या होत्या. संताजी आणि धनाजी यांच्या नेतृत्वाखाली मराठ्याच्या फौजा मोगलांच्या दक्षिणेतल्या सेनेला आपल्या गनिमी काव्याने सळो की पळो करून सोडीत होत्या.

१७०७ साली औरंगजेब वारला. मराठ्यांचा पराभव करून दक्षिण जिंकण्याचे आपले स्वप्न तो पुरे करू शकला नाही. संभाजीच्या वधानंतरही मराठ्यांचे नीतिधैर्य राजाराम आणि ताराबाई यांनी कायम ठेवले. तेव्हा आता मराठ्यांमध्ये दुफळी माजली तरच त्यांचे बळ कमी होईल. या हिशोबाने मोगलांनी शाहूला कैदेतून सोडले, आणि दक्षिणेत जाऊन आपले राज्य परत घेण्यास सांगितले. ताराबाई शाहूला राज्य परत देईल, हे शक्यच नव्हते. पण तरी शाहू येतो असे कळल्यावर ती अस्वस्थ झाली. शाहू हा शिवाजीच्या थोरल्या मुलाचा मुलगा होता म्हणून अष्टप्रधान व सरदारांपैकी बरेचजण त्याला अनुकूल झाले. तेव्हा ताराबाईने आपल्या विश्वासातल्या काही जुन्या सरदारांना शाहू खरा की तोतया याची शहानिशा करायला पाठवले. त्यांनी शाहू खरा असल्याचा निर्वाळा दिला. तरीही ताराबाईने गादी सोडली नाही. दरम्यान शाहू जुन्या मंडळींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होता. या संदर्भात ताराबाईने आपल्या वतनदारांना पाठवलेले हे पत्र तिच्या जरबेची कल्पना देते – "स्वति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वचित्सं. अश्विन शु तृतीया सौम्य वासरे क्षत्रियकुलवतंसश्री राजा शिवछत्रपति यांणी सोमनाईक देसाई व देशकुलकर्णी ता सौतवडे यांसी आज्ञा केली ऐसीजे राजश्री शाहू राजे ताम्रांचे निर्बंधातून निघाले आहेत म्हणून हुजूर वर्तमान आले ऐशास हे राज्य थोरल्या कै स्वामीनी बहुता श्रमे मेळऊन सर्वार्थे संपूर्ण केले होते ते राजश्री संभाजीराजे काका याणी विध्वंसून कैलासवासी स्वामी (राजाराम) राज्याधिकारी झाले त्यांणी स्वपराक्रमे नूतनच राज्य संपादिले स्वामींनी त्याच संरक्षण करून ताम्रांचा पराभव केला राज्याची अभिवृद्धिं होत चालली दुसरी गोष्टी हे राज्य थोरल्या कै. स्वामींनी तीर्थस्व कै. स्वामींस (राजाराम) द्यावेसे केले होते ऐसे असता त्यास (शाहू) या राज्यासी संबंध नाही त्या डोहणियात जे मिळाले आहेत व मिळतील त्यास नतीजा पाववयाची आज्ञा करून रा. जयसिंग जाधवराव सेनापति व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनिशी पाठवले आहेत रा. परशराम पंडित प्रतिनिधि यासही रवाना केले आहे त्यांचे अनुसंधान त्याकडे लागले असेल त्यांचा हे

मुलाहिजा होणार नाही शासन करितील तुम्ही वतनदार एकनिष्ठ आहा तुम्हापासून अनसारखी वर्तणूक होणार नाही परंतु शाहू राजे याजकडील कागदपत्र तुम्हास आले असता काही वर्तमान हुजूर लिहिले नाही म्हणजे काय त्याकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते ते गोष्ट न केली यामधे बरे काय विचारिले आहे याउपरी ऐसे करीत न जाणे त्याकडील कागदपत्र घेऊन माणूस येईल ते कैद करून हुजूर पाठवीत जाणे कदाचित कोण्ही त्याकडे अनुसंधान लावील राबता राखेल तरी त्याचा उबार रहाणार नाही तुम्ही अनसारखा प्रसंग मनात आणाल कागदपत्र येईल तो पन्हाळ कराल तरी तुमचे बरे होणार नाही वतनापासून दूर व्हाल हे जाणोन स्वामींच्या पायाशी निष्ठा धरोन राहोन लिहिलेप्रमाणे वर्तणूक करणे मर्यादेयं विराजते लेखन सीमा सुरूसूद बार", (करवीर रियासत– गर्गे).

ताराबाईच्या आणि शाहूच्या फौजांचा सामना १७०७ सालच्या ऑगस्ट महिन्यात भीमा नदीच्या तीरावर झाला. त्या आधी तिचा सेनापति धनाजी जाधव यांच्याशी खंडो बल्लाळ चिटणीस आणि बाळाजी विश्वनाथ भट यांनी काही बोलणी करून ठेवली होती. या वेळी बाळाजी विश्वनाथ हे धनाजी जाधवांच्या पदरी-वसुलीच्या कामावर होते, आणि त्यांनी त्यांची मर्जी संपादलेली होती. धनाजी जाधव हे शिवाजीच्या मातुल घराण्यातले होते. या तिघांच्या आपापसातल्या बोलण्याचा परिणाम म्हणून शाहूविरुद्धच्या लढाईत धनाजी जाधवांनी मनापासून भाग घेतला नाही. त्यामुळे ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला. पण तरीही तिने गादी सोडली नाही.

शेवटी शाहूने १७०८ साली स्वतःला सातारा येथे वेगळा राज्याभिषेक करून घेतला. ताराबाई आपल्या मुलाच्या नावाने पन्हाळगडाहून कारभार करीत राहिली.

परंतु या नंतरच्या काळातही तिच्या चित्ताला स्वस्थता नसावी. अष्टप्रधानांपैकी आणि जुन्या सरदारांपैकी बरेच जण शाहूच्या पक्षाला मिळाले होते. शाहूने त्यांना वंशपरंपरेने अधिकार आणि वतने-सरंजाम देऊन त्यांच्या इमानदारीचे बक्षीस दिले होते. या सुमाराला शाहूशी संधान बांधल्याच्या संशयावरून तिने रामचंद्रपंत अमात्यांच्या पायात बेड्या ठोकून त्यांना काही दिवस वसंतगडावर कैदेत ठेवले होते.

१७१४ मध्ये ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांना राजारामाची दुसरी बायको रासजबाई हिने कैदेत टाकले, व स्वतःचा मुलगा संभाजी याला गादीवर बसवले. राजसबाई घाटगे घराण्यातली होती. या प्रसंगापूर्वीच्या काळात कुठल्याच घडामोडीत राजसबाईचे नाव आढळत नाही, त्याअर्थी या कटामध्ये रामचंद्रपंत अमात्यांचा हात असावा, असा इतिहासकारांचा अंदाज आहे. ताराबाई आणि रामचंद्रपंत यांच्यामधले संबंध पूर्वीपासूनच सर्वस्वी विश्वासाचे नव्हते, हे मागे पाहिलेच.

१७१४ ते १७३० पर्यंत ताराबाई संभाजीच्या कैदेत होती. दरम्यान १७२६ मध्ये तिचा मुलगा शिवाजी कैदेतच वारला. त्याची बायको त्या वेळी गरोदर होती. त्यानंतर तिला मुलगा झाला. या मुलास संभाजीकडून धोका होऊ नये म्हणून तिने रामचंद्रपंत अमात्यांच्या मदतीने त्याला एका लांबच्या गावात सांभाळावयास लपवून ठेवले.

१७३० साली संभाजी आणि शाहू यांची वारणेच्या तीरावर लढाई झाली. त्यात संभाजीचा

पराभव झाला आणि त्याच्या बाजूची माणसे शाहूने कैद केली. त्यात ताराबाई होती. पुढे पेशव्यांच्या मध्यस्थीने माणसे सोडवली जाऊन तह झाला आणि कोल्हापूर आणि सातारा या राज्यांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. या तहाच्या वेळी ताराबाईने शाहूजवळ रहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. ती मान्य केली जाऊन ताराबाई कोल्हापूरहून साताऱ्याला रहायला आली. या वेळेस ती ५५ वर्षांची होती.

यानंतर जवळ जवळ अठरा वर्षांपर्यंत ताराबाईचे नाव इतिहासात वाचायला मिळत नाही. संभाजीच्या कैदेत काढलेली १६ वर्षे आणि शाहूच्या आश्रयाने काढलेली १८ वर्षे हा ३५/३५ वर्षांचा काळ ताराबाईसारख्या महत्त्वाकांक्षी, हिंमतवान आणि सत्तापिपासू स्त्रीने कसा काढला, याची इतिहासात फारशी माहिती मिळत नाही. ही पस्तीस वर्षे तिच्या वयाच्या दृष्टीने देखील उमेदीची होती. तिच्या वयाचा ३९ वर्षे ते ७४ वर्षे हा काळ तिने अज्ञातवासात काढला आहे.

१७४९ मध्ये शाहूची तब्येत ढासळली, आणि शाहू निपुत्रिक असल्यामुळे दत्तकाचा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा परत एकदा ताराबाईचे नाव इतिहासाच्या पटावर उमटलेले पहायला मिळते. या अज्ञातवासाच्या काळात जणू काही ती आपल्या सामर्थ्याला आणि शक्तीला धार लावीत बसली असावी, अशा प्रकारचा झपाटा तिने तिच्या नंतरच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीत दाखवला आहे.

शाहूने कोणाला दत्तक घ्यावे याबद्दल त्याच्या दोन राण्यांची दोन मते होती. त्यांत आणखी एक प्रस्ताव ताराबाईने पुढे मांडला. आपला नातू आपण लपवून ठेवला आहे, त्याला बोलावून शाहूने त्याला दत्तक घ्यावे, असे तिने सुचवले. तिचा नातू म्हणजे तो शिवाजी महाराजांचा पणतूच होता. तेव्हा ही सूचना शाहूने मान्य केली. पण त्याची थोरली राणी सकवारबाई हिला हा दत्तक पसंत नव्हता. म्हणून शाहूच्या हयातीत दत्तक विधान झाले नाही. शाहूच्या मृत्यूनंतर दरबारातल्या मंडळींनी ताराबाईच्या सल्ल्याने सकवारबाईवर दडपण आणून तिला सती जायला भाग पाडले. यानंतर ताराबाईचा नातू शाहूने मृत्यूपूर्वी मान्य केला होता, म्हणून पेशव्यांनी फौजा पाठवून त्याला त्याच्या गावाहून सन्मानपूर्वक साताऱ्याला आणले, व त्याची ताराबाईशी विधिपूर्वक भेट घडवली.

तरीदेखील जुनी सरदार मंडळी, दरबारी मंडळी, आप्तस्वकीय आणि जातिबांधव यांनी ताराबाईला म्हटले की हाच तुमचा नातू याबद्दल तुमच्या शब्दाखेरीज दुसरा पुरावा काहीच नाही. म्हणून तुम्ही यासंबंधी श्रीकृष्णेच्या उदकावर हात ठेवून शपथ घ्यावी व नातवाबरोबर एका ताटात भोजन करावे. त्याप्रमाणे सर्व होऊन ताराबाईचा नातू रामराजा गादीवर बसला. प्रतिनिधीपदाची वस्त्रे कोणाला द्यावीत, हे ताराबाईनेच ठरवले. विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे शाहू हयात असताना जो मुलगा त्याला प्रतिनिधी म्हणून मान्य नव्हता त्यालाच पुन्हा बोलावून ताराबाईने त्याला प्रतिनिधीपदाची वस्त्रे देववली.

आपला नातू आपल्या कृपेने गादीवर आला आहे, तर कारभार आपणच करणार, असे ताराबाईने गृहीत धरले होते असे दिसते. या वेळी तिचे वय ७५ वर्षांचे होते. तरुणपणी तिने आपल्या अल्पवयीन मुलाच्या वतीने राज्य चालवले होतेच. पण रामराजा अल्पवयी नव्हता.

त्याचे वय २२/२३ वर्षांचे होते. शिवाय आता राज्याचे पंतप्रधान नानासाहेब पेशवे खमक्या स्वभावाचे होते. त्यामुळे ताराबाई आपला बेत सहजासहजी अंमलात आणू शकली नाही.

यासंबंधीचा अधिक तपशील सांगण्यापूर्वी पुढे घडलेल्या एका गोष्टीचा इथे उल्लेख करावासा वाटतो. त्यातून ताराबाईच्या व्यक्तिमत्त्वाची स्पष्ट कल्पना येते.

रामराजा आपले ऐकत नाही, असे जेव्हा ताराबाईने पाहिले, तेव्हा तिने त्याला गादीवरून दूर करण्याचे ठरवले, आणि हा आपला नातू 'अस्सल' नाही, असे जाहीर केले. ताराबाईची सत्ताभिलाषा सर्व प्रकारची मानमर्यादा ओलांडून पुढे गेली होती, असे यावरून दिसते. याविषयीचा अधिक तपशील पुरंदरे दप्तरातल्या १९१ व १९२ या पत्रांमधून मिळतो. क्र. १९२ मध्ये असे वाक्य आहे "पहिले राज्यलोभे आई जेवली." ताराबाईला राज्याचा लोभ असल्यामुळे रामराजा अस्सल नाही हे आधीपासून माहीत असूनही लोकांनी त्याला गादीचा वारस म्हणून स्वीकारावा यासाठी मातुश्री ताराबाई त्याच्याबरोबर एका ताटात जेवली.

पत्र क्र. १९१ हे सदाशिवरावभाऊंचे नाना पुरंदऱ्यांच्या पत्राला पाठवलेले उत्तर आहे. नाना पुरंदरे हे नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत पेशव्यांचे सातारच्या दरबारातले प्रतिनिधी होते. त्यांना ताराबाईने रामराजा अस्सल नसल्याचे सांगितले. त्यामुळे आपण आता काय करावे, असे नाना पुरंदऱ्यांनी विचारल्यावरून सदाशिवरावभाऊने हे पत्र लिहिले आहे–

"आसिर्वाद. आईसाहेबी येकाती सांगून पाठविले राजा खोटा हे खरेच आहे नारूजी तानाजी सावंत याणी नासले त्याचे पारपत्य करावे तरी राजा शर्मींदा यास्तव कोणे प्रकारचा डौल धरून करावे हे ल्याहावे म्हणून लिहिले ते कळले ऐसीयास राजा या प्रकारचा आहे हे कळलेच आहे परंतु आता आईसाहेबी म्हटले तरी आम्हास व मातुश्रीस लोक फजीत करितील यात जीव नाही वरकड नेहमी आईसाहेब मुडदार करावी तरी राजे या प्रकारचे... खाली आलियावरही राजे मुडदारच करावे उचित नाही यास्तव लगानम मात्र राखून व जबरदस्तीने खाली आणावी आईसाहेब केवळ निराळी होती तसी न राहावी त्यासच पुसून करावे..."

याचा अर्थ रामराजा अस्सल नव्हे हे माहीत असूनही ताराबाईने त्याला गादीचा अस्सलपणाबद्दल सर्वांसमक्ष खोट्या शपथा घेतल्या. नंतर तो तिच्या म्हणण्याप्रमाणे वागेना म्हणून तो अस्सल नाही असे सांगून टाकले. यात स्वतःची बेअब्रू होते आहे याचेही भान तिला राहिले नाही, किंवा त्याची पर्वा वाटली नाही, इतकी ती सत्तांध झाली होती. रामराजा स्वतः कर्तृत्वशून्य होता, त्यामुळे पेशव्यांना ताराबाईच्या बाबतीत हात चोळत गप्प बसावे लागले. मराठ्यांचा राज्याचा धनी अस्सल नाही, म्हणजेच त्याचा गादीवर कसलाही हक्क नाही हे जाहीर होण्यात ताराबाईला नामुष्की वाटत नसली, तरी पेशव्यांवर तो अवघड प्रसंग होता.

यानंतर मग ताराबाईने कोल्हापूरच्या संभाजीशी संपर्क साधला. संभाजीने साताऱ्याच्या गादीवर यावे अशी तिची सूचना होती. पण संभाजीची बायको जिजाबाई ही ताराबाईला ओळखून होती. कोल्हापूर आणि सातारा दोन्ही गाद्या स्वतःच बळकावयाचा तिचा हेतू आहे, हे ती समजली व त्याप्रमाणे साताऱ्याला जाऊ नये असा सल्ला तिने संभाजीला दिला.

यासंबंधात एक पत्र नानासाहेब पेशव्यांना लिहिले ते असे – "आईसाहेबी राजश्री संभाजीराजे याजसी सूत्र लाविले त्यास इतबार न ये म्हणोन पुन्हा इतबाराच्या गोष्टी सांगून

पाठवल्याचा मजकूर विस्तारे लिहिला तो कळला असो. आईसाहेब आपली धावत आहे तेथवरी करितीलच सरदारास व मोगलास पत्रे पाठवली याचे वर्तमान ते कळले सारांश संभाजीराजे यास आईसाहेबाचा इतबार प्रत्यक्षच नाही ते येणार नाही व त्यानी न यावे येविसी लिहिणे व तुम्ही तिकडून विसाजी नारायेण यांस लिहिणे म्हणजे ते त्यांस सांगतील, रविबखर हे आसीर्वाद ६२३," (पु. द. १. ३१९)

खरे म्हणजे सातारच्या गादीशी ताराबाईचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. पण तिच्या बऱ्या-वाईटाची चाड न बाळगणाऱ्या वृत्तीपुढे नमून म्हणा, किंवा शेवटी ती भोसले असल्यामुळे याही गादीशी तिचे मालकी हक्काचे नाते आहे, या जाणिवेने म्हणा, पण नानासाहेबाने अखेरीस ताराबाईसमोर पूर्णपणे नमते घेतले.

पण ही जरा पुढची गोष्ट झाली. त्या आधीच्या काळामध्ये यासंबंधात बऱ्याच नाट्यपूर्ण घडामोडी झालेल्या दिसतात. यासंबंधीचे तपशील मल्हार रामराव चिटणीस विरचित धाकटे रामराजे यांच्या चरित्रात सापडतात, त्याचप्रमाणे पेशवे दप्तर आणि पुरंदरे दप्तर यांच्यामधल्या पत्रांतूनही सापडतात.

रामराजाला गादीवर आणल्यानंतर कारभार आपण पहाणार, असे ताराबाई धरून चालली होती. परंतु नानासाहेब पेशव्यांना ते मान्य नव्हते. त्यांचे म्हणणे – "बायकोचा कारभार, व्यवस्था रहाणार नाही. पूर्वीपासून कारभारी आहेत त्याणी महाराजास माहीत करावे मातबर मनसबा अथवा वडीलपणे कानावरि घालणे तितके आईसाहेबांचे कानावरि घालून त्यांचे संमते होणे तितके घेऊन चालावे. हिंदुस्थान कर्नाटक परराज्यात लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाही." (असे समजणाऱ्या नानासाहेब पेशव्यांचा जन्मही झाला नव्हता. त्या काळात ताराबाईच्या फौजेने मोगलांना सळो की पळो करून सोडले होते, हा मराठेशाहीच्या इतिहासातला कथाभाग त्यांच्या ध्यानात आला नसावा.) हे ताराबाईच्या लक्षात आल्यावर ती नाराज झाली, आणि राजाराम महाराज सिंहगडावर वारले होते, त्यांच्या समाधीजवळ जाऊन राहिली. तेही नानासाहेबाला योग्य वाटेना. म्हणून त्याने रामराजाला साताऱ्याहून आणि ताराबाईला सिंहगडावरून असे पुण्याला बोलावले, आणि त्यांची दिलजमाई करून दिली. नंतर ताराबाई साताऱ्याला परत गेली. इकडे गोविंदराव चिटणीस आणि रामचंद्रपंत अमात्य यांनी रामराजाला कारभाराची पद्धत समजावून सांगितली. हे ताराबाईला कळल्यावर ताराबाई किल्ल्यावर गेली. किल्ल्यावरचे हवालदार, सुभेदार, गडकरी, कारकून वगैरेंना बक्षिसे, पालख्या, सरंजाम वगैरे देऊन आपल्याकडे वळवून घेतले, आणि त्यांच्याकडून इमानाच्या शपथा घेतल्या. रामराजा सातारला आल्यावर त्यास हे वृत्त कळले तेव्हा त्याने स्वतः किल्ल्यावर जाऊन ताराबाईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ताराबाईचे म्हणणे होते की रामराजाने पेशवे, कारभारी इत्यादि मंडळींना धाकात ठेवून स्वतः कारभार करावा. आपल्या बाजूचे सरदार फौजेनिशी आपल्या मदतीला बोलवावे. हे रामराजाने मानले नाही, व तो खाली आला.

यानंतर एक दिवस ताराबाईने रामराजाला षष्ठीच्या पारण्यासाठी किल्ल्यावर यावे असा निरोप पाठवला. त्याने जाऊ नये, ताराबाईची बुद्धी ठीक दिसत नाही. असा मल्ला दरबारी

मंडळींनी त्याला दिला. पण आपले मन स्वच्छ आहे, आपल्याला तिचा संशय नाही असे तिला पटवून देण्यासाठी रामराजा एकटाच किल्यावर गेला. पारण्याची जेवणे झाली व राजा खाली यायला निघाला. तेव्हा ताराबाईने त्याला गडावरच रहायचा आग्रह केला. रामराजाने ते मान्य केला नाही. तो जाऊ लागला तेव्हा गडकऱ्यांनी त्याला अडवले. "गडकरी बोलले आईसाहेबांचा हुकूम नाही आम्ही जाऊ देणार नाही", (पे. द. ६.१२५). हवालदार, कारखानीस इत्यादि मंडळींनी दिंड्या, दरवाजे बंद करून घेतले. "महाराजांस हिंमत अथवा धैर्य व मनसबा, चातुर्य किंवा माहितगारी विशेष नाही. याज़मुळे बुधीत खंबीरता कमी पडले", (मल्हारराव चिटणीस विरचित. चरित्र).

रामराजा वरच राहिला. त्याच्या बायकाही बरोबर होत्या. त्यांच्यावर ताराबाईने चौक्या बसवल्या. त्याच्या मदतीसाठी गेलेल्या लोकांना कडेलोट करण्याची धमकी देऊन परत पाठवले.

मराठ्यांच्या गादीसंबंधात घरात असे तंटे सुरू झाल्याची संधी साधून सलबतजंग पुण्यावर चालून आला. त्याचे पारिपत्य करण्यात नानासाहेब गुंतला असल्याचे पाहून ताराबाईने गायकवाड व दाभाडे यांच्याशी संधान बांधले. ते दोघे १५ हजार फौजेनिशी साताऱ्यानजीक येऊन पोचले. "शहरास धीर न निघे मातबर मातबर लोक व सावकार याणी मुले माणसे काढली – आईसाहेबी सरकारी कारखाने सर्व लोक पाठवून किल्ल्यावर नेले आणि शहरास चौक्या बसवल्या गायकवाड वेण्यातीरी मुक्काम करून किल्ल्यावर जाऊन आईसाहेब यांचे दर्शन घेऊन फौजेत येऊन राहिले", (म. रा. वि. चरित्र).

या सर्व परिस्थितीला सातारचे कारभारी नाना पुरंदरे तोंड देत होते. ताराबाईचे पारिपत्य कसे करावे याबद्दल त्यांचा नानासाहेब व सदाशिवरावभाऊंशी पत्रांतून विचारविनिमय चालला होता. नाना पुरंदरे यांचे म्हणणे होते की गडावर फौज पाठवून जबरदस्तीने ताराबाई व राजा यांना खाली आणावे. या बेताला नानासाहेब व सदाशिवराव दोघांचाही विरोध होता. ही सर्व पत्रे पुरंदरे दप्तर भाग १ मधली आहेत. पहिली तीन्ही पत्रे नानासाहेब पेशव्यांनी लिहिलेली आहेत –

"आईसाहेबानी बहुत आम्हाविसी वाईट मानिले. तुम्ही आईसाहेबासी बोलणे की खावंदानी इतकी इतराजी करावी ऐसे नाही व्यर्थ लौकिक दिलीपावेतो वाईट होतो जेजे मर्जी असेल ते आज्ञा करावी त्याप्रमाणे वर्तणूक करू दुराभिमान करणार नाही या अन्वये बोलणे आणि आंतरभावास तोड पाडणे सोहलतीखाली घालावे आईसाहेबाचा वसवस दूर करून संतोषे आपले मर्जीनुरूप कार्यभाग करीत ते करावे..."

"सर्व प्रकारे मातुश्री आईसाहेबाचेच मर्जीप्रमाणे तुम्ही वर्तणूक करणे आईसाहेबाचे कारभारी पुराणिक व गोपाळराव यांचे विद्यमाने बोलणे की न जाणो जाणोन नेणोन मागे मातुश्रीचे मर्जीसिवाये वर्तणूक जाली आसली जर असो सर्व प्रकारे आम्हास आईसाहेबाचीच मर्जी दरकार आहे आज्ञा करितील त्याप्रमाणे वर्तणूक करून म्हणोन बोलोन आपले जागा बहुत सावध राहाणे ... राजश्रीस सांगून पाठवणे की आम्हास चवकी ठेविता येत नाही महाराजानी आईसाहेबाचे विचारे असून जेणेकरून आईसाहेब संतोषे होत ऐसे करावे येणेकरूनच क्षेम आहे ऐसे मात्र भेट

न घेता सांगून पाठवणे."

"तुम्ही तेथे न जुझणे जुझल्यास लौकिक वाईट होतो मर्दुमी करावयाची जागा नाही बाहेर मोगलासी जुझावे घरी खावंदासी जुझावे इकडे दाभाडियासी जुझावे हा मनसबा योग्य नव्हे येकासी बिघाड रगडून करावा ते कार्य जाहाल्यावर दुसरे आरभावे हे युक्त मसलत जाणून लिहिले असे."

याच संबंधात सदाशिवरावाने लिहिले आहे की फौज मोगलाशी लढायला हवी आहे. त्यामुळे ताराबाईशी गोडीगुलाबीने रहावे. चौकीसाठी ठेवलेल्या २/३ हजार फौजेने तिच्याशी लढता येणार नाही, व वाईटही दिसेल – "लगाम राखून सैल सोडलिया राजा वाचेल सभाजी आणणार नाही विशेष कजियाचा लौकिक होणार नाही... आमी याउपरी कजिया करीत नाही चितास येईल ते करावे परंतु केले चालवावे यात लौकिक उत्तम आमी निराळे नाही आसे गोडच बोलून मोकळेच परिछित्र सोडावे."

एकूण ताराबाईने रामराजाला कैद केले व आपली बाजू बळकट करण्यासाठी फौज जमवली, हा युद्धसदृशच प्रसंग होता. गडावर चढाई करावी, की नुसता वेढा घालून रसद बंद करावी, की आपल्या जागी सावध राहून काय होते ते पहावे, असे पर्याय पेशव्यांजवळ होते, अखेरीस असे ठरले की सलबतजंगाला ठिकाणी लावेपर्यंत नाना पुरंदरे यांनी स्वतः सावध राहून, गडावर येणाऱ्या-जाणाऱ्यांची बातमी ठेवून ताराबाईची मर्जी सांभाळावी, नंतर नानासाहेब येऊन काय ते करतील. या बाबतीत नानासाहेबांचे मन किती अस्वस्थ होते ते त्याच्या आणखी काही पत्रांमधून व्यक्त झाले आहे –

"हे राज्य रामेश्वरापासून दिलीपर्येंत आहे गडावरी बसौन आईसाहेब हुकूम हकीम चालऊन राज्य नांदवीत म्हणतील तर कसे नांदेल?"

पण दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत ज्या नानासाहेबाचे युद्धनैपुण्य आणि मुत्सद्देगिरी यांचा वचक होता, त्याचे या चमत्कारिक परिस्थितीपुढे काही चालेना. "आम्ही सेवक तीन पिढ्या निष्ठेने सेवा केली... तुम्ही कोणती गोस्टी तटी न लावणे... जितकी गोस्ट तुम्ही तटी लावाल तीच त्यास संकट वाटोन न करावी ते राजकारणे करितील अयोग्यास दाती धरितील देणे ते देतील हे गोष्ट आपण त्यास सुचऊन दिल्हीसे होते तुम्ही पीळ सोडिलासे त्याचे दृष्टीस पडलियावरी तिही साहस करणे सोडितील यास्तव गोड बोलावे..."

नानासाहेबाची मुख्य अडचण (२४४) ही होती की राजा आणि ताराबाई दोघेही गडावर असल्याने गडाला वेढा घातल्यास पेशव्यांनी राजे धरून बसवले असा हिंदुस्थानभर बदलौकिक झाला असता. तेव्हा गोष्टी गोडीगुलाबीने झालेल्या बऱ्या. "सिळेखाली गुतला हात सोहलतीनेच काढून घेतला पाहिजे." याच पत्रात नानासाहेबांनी नाना पुरंदऱ्यांना कळवले की त्यांनी आपल्या बायकोला सासवडला पाठवून द्यावे व आपण राऊतांनिशी सावध रहावे.

पण नानासाहेबाने सामोपचाराचे धोरण स्वीकारले, तरी ताराबाईला सोक्षमोक्ष हवा होता. तेव्हा पेशव्यांनी आपली फौज गायकवाड-दाभाड्यांच्या फौजेशी लढायला पाठवली. त्यात पेशव्यांच्या फौजेचा पराभव झाला. तोवर नानासाहेब मोगलांचा पराभव करून साताऱ्याकडे आले व त्यांनी गायकवाडाचा पराभव केला. नानासाहेबाला वाटले होते की सलाबतजंगाला

परतवून लावण्यात आपण यशस्वी झालो की "त्या तेजानेच सर्व हतप्रभ होऊन आमचे विचारात येतील", (पु. द. १.३०८). पण तसे काही झाले नाही. पराभव होऊनही ताराबाई बधली नाही. अखेर नानासाहेब पुण्याला परत गेले. इकडे ताराबाईने मनमानी सुरू केली, (पु. द. १.२५६).

"आईसाहेब हात चालेल येथे मामल अथवा गाव माहाल विल्हेस लावावा, दरमहाचे नेमणुकी ऐवजावर वराता कराव्यात.... लहान माणसे कारभारं ठेवून कारकुनाकडून चिटणीसी करवून काम चालवू लागली.... सर्व खजिना जवाहिर मोडून लोकास द्यावे, जवळ काही नसावे ऐसे केले."

किल्लेदार आनंदराव जाधव यांना प्रधानमंडळींनी समजावले की राजा कैदैत असणे योग्य नव्हे. त्यास सोडून खाली आणावा. याचा सुगावा ताराबाईला लागल्यावर तिने आनंदरावाचा शिरछेद करवला. या काळात नानासाहेबांनी ताराबाईस लिहिलेले हे पत्र ताराबाईची राजकारणी महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित करते. "साहेबी प्रथम मजला वचन दिले की सर्व प्रकारे तुमचा विश्वास तुम्ही नातवापेक्षा साहेबास अधिक असे असता साहेबी गायकवाडास हुजूर आणले. रामदासपंतास कागदपत्र लिहिले. बाबूजी नाईकास नेले. यमाजीपंताचे पारिपत्य योजिले. रात्रंदिवस सेवकास विरोध घडे ऐसी राजकारणे होतात. मोगल केवळ हिंदु राज्याचा शत्रु त्यासदेखील अनुसंधाने होत असता सेवकच वाकडे वर्ततात हा दोष साहेबा आज्ञापत्री लिहून सर्वांशी बोलतात", (नानासाहेबांचे चरित्र, सरदेसाई).

ताराबाईचा एकूण रागरंग पाहून गोष्टी तिच्या कलाने घेतल्या तरच पार पडतील, असे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे दोन-तीन वर्षांच्या या रस्सीखेचीनंतर नानासाहेब अधूनमधून तिच्या दर्शनाला जाऊ लागले. मसलतीवर जायच्या आधी तिची आज्ञा घेऊ लागले, आल्यावर त्याबद्दल कळवू लागले. राज्याची स्वामी ताराबाई व सेवक पेशवे हे नाते प्रस्थापित झाले. याबद्दल नानासाहेब एके ठिकाणी म्हणतात, "स्वारीहून आल्यावर साहेबाचे पाय पहावे हा हेतू होता. आम्ही देवधनी येक साहेबास जाणतो साहेबाखेरीज दुसरा अर्थ जाणत नाही. मनसब्याचे पेच उलगड्यावर दर्शन घ्यावे हेच इच्छा सेवकाची आहे", (पे. द. २१.२०४).

रघूजी भोसले वारल्यानंतर त्याचा सेनासाहेब सुभा पदाचा बहुमान त्याच्या कोणत्या मुलाला द्यावा, याविषयी नानासाहेबांनी ताराबाईचा सल्ला घेतला होता. तर तुळोजी आंग्रे याने विशालगडावर गडबड केल्याचे ऐकून ताराबाईने त्याला पत्र लिहिले – "...तरी यैसी अमर्यादा तुम्हास करांवयास प्रयोजन काय ? किल्ले महाराजांचे त्यासी तुम्ही सहसा कटकट न करणे. याउपरी देखत आज्ञापत्र आपण जमाव किले मजकूराच्या घेरियाहून काढून आपल्या स्थलास जाणे", (पे. द. भा. २४.८५). किल्ले महाराजांचे आणि महाराजांचे अधिकार आपल्या हाती, याची पूर्ण जाणीव आणि जरब ताराबाईच्या ठिकाणी होती, हे चित्र त्यातून स्पष्ट होते. सुरुवातीला उद्धृत केलेल्या, सैतवडेकर देसाईंना लिहिलेल्या पत्रातून दिसणारी, नुकती तिशी उलटलेली ताराबाई, आणि या पत्रांतून दिसणारी ऐंशीच्या घरातली ताराबाई यांच्या जबरदस्तपणात वयामुळे किंवा कालमानामुळे काहीही फरक झालेला दिसत नाही.

नानासाहेब व ताराबाई यांच्यातील संबंध सुधारल्यानंतरचे हे पत्र वाचण्यासारखे आहे –

"श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांनी स्वामीकारणे मुरंबा आंब्याचा घागरी सुमार ३तीन व आवळ्याचा घागर १येक येकून च्यार घागरी बहुत उत्तम चांगला आपण सेवावा यैसा हेतु धरून तयार करून हुजरियाबरोबर पाठवला आहे व इस्साल आंबे डाल्या ७सात येकून तीनसे आंबे उत्तम म्हणून पाठवले आहेत येतद्विपई श्रीमंत महाराज मातुश्रीसाहेबांचेही पत्र स्वामीस आहे त्यावरून विदित होईल..." स्वामी आणि सेवक या नात्याचे आई आणि मुलगा या सदृश नात्यात झालेले हे राजकारणी रूपांतर मनोरंजक आहे.

नानासाहेब आपल्याविरुद्ध कारवाई करीत नाही हे पाहिल्यावर ताराबाईनेही संघर्षाचा मार्ग सोडला. मात्र राजा तिच्या कैदैतच होता.

१७६१ सालच्या जानेवारी महिन्यात पानिपतावर झालेल्या लढाईत मराठ्यांचा धुव्वा उडाला. याचा नानासाहेबांच्या मनावर फार परिणाम झाला. त्याच्या मनाने आणखी एक घेतले की दिल्लीच्या बादशहाने मदतीला बोलावल्यावर आपण तिकडे फौजा पाठवल्या पण मराठ्यांचा राजा इतकी वर्षे कैदैत आहे, त्याच्याकरता आपण काहीच करू शकलो नाही, त्याचीच ही शिक्षा असावी.

पानिपतच्या पराभवानंतर नानासाहेब आजारी पडले व काही महिन्यांनी वारले. त्यांच्यानंतर काही महिन्यांनी ताराबाईही वारली. त्यावेळी तिचे वय ८६ वर्षांचे होते. माधवरावाला पेशवाईची वस्त्रे देण्यापुरते तिने रामराजाला बाहेर काढले होते. तिच्या मृत्यूनंतर माधवरावाने त्याला किल्ल्यावरून खाली आणले व त्याचे अधिकार त्यास परत दिले.

मराठ्यांच्या राज्याचे स्वामीत्व आपल्याकडे आहे, या भावनेतून राजारामाच्या मृत्यूनंतर मराठेशाहीच्या डळमळत्या काळात ताराबाईने पुढाकार घेऊन राज्य सांभाळले. याच भावनेतून तिने नंतर शाहू परत आल्यावर, राज्याची दोन शकलेही होऊ देण्यास मागेपुढे पाहिले नाही. पुढे वारा वाहेल तशी त्याला पाठ देत देत शाहूच्या मृतूनंतर तिने पुन्हा राज्याचे स्वामीत्व हिसकावून आपल्या हातात घेतले. पहिल्या कथाभागातला नामधारी राजा तिचा मुलगा होता, तर नंतरच्या कथाभागातला राजा तिचा नातू होता. पण त्या दोघांनाही तिने आपल्या मुठीत ठेवले होते व प्रत्यक्ष हुकूम तिचाच चालत होता. असा हुकूम चालवण्याचा तिचा हक्क दरबारी मंडळींनाही मान्य होता, त्या अर्थी राजघराण्यातल्या, वतनदार घराण्यातल्या स्त्रियांना असा हक्क परंपरेने दिलेला होता, असे दिसते. खुद्द पतीच्या हयातीतही अशा घराण्यातल्या स्त्रिया हा हक्क गाजवीत असत, असे पुढल्या प्रकरणांमधून दिसून येते.

## २ – शाहूच्या राण्या

### विरुबाई

### सकवारबाई

### सगुणाबाई

शाहूचे पहिले लग्न तो औरंगजेबाच्या कैदैत असताना औरंगजेबाने आपल्या मुलीच्या आग्रहाखातर लावून दिले. त्यावेळेस शाहू अठरा वर्षांचा होता. त्याचे दोन मुलींशी एकदम

लग्न लावण्यात आले. (ही मराठा राजघराण्यातली रीत होती किंवा काय ते समजले नाही.) त्यातली एक मुलगी जाधव घराण्यातली असून तिचे नाव अंबिका असे होते. दुसरी मुलगी शिंदे घराण्यातली होती. तिचे नाव सावित्री होते.

या दोन बायका वारल्यानंतर शाहूची पुन्हा दोन लग्ने झाली. या दोन बायकांपैकी थोरली सकवारबाई ही शिर्के घराण्यातली होती आणि धाकटी सगुणाबाई ही मोहिते घराण्यातली होती. तत्कालीन कागदपत्रांतून या दोन राण्यांचे उल्लेख बरेच वेळा थोरला किंवा 'पहिला वाडा' आणि 'दुसरा वाडा' असे करण्यात आले आहेत. शाहूच्या एकूण कारभारात त्याच्या राण्यांचे बरेच महत्त्व होते, असे उल्लेखांवरून दिसते. राण्यांचा शाहूवर असलेल्या वजनाचा उपयोग पेशव्यांनीही काही वेळा करून घेतलेला दिसतो.

सकवारबाई आणि सगुणाबाई यांची माहिती करून घेण्याआधी ही विरुबाई कोण होती, हे पहाणे मनोरंजक ठरेल. विरुबाईचा इतिहास शाहूच्या पहिल्या लग्नापर्यंत पोचतो.

औरंगजेबाने शाहूचे लग्न लावून दिल्यानंतर शाहूच्या नवरीस पहाण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. शाहू औरंगजेबाला नातवासारखा होता खरा, पण राजघराण्यातल्या नववधूचे परक्या व्यक्तीसमोर प्रदर्शन करणे शाहूची आई येसूबाई हिला योग्य वाटले नाही. परंतु औरंगजेबाला 'नाही' म्हणणेही शक्य नव्हते. तेव्हा येसूबाईने एक युक्ती केली. शाहूची एक बायको शिद्यांकडची होती. तिच्याबरोबर तिच्या माहेरहून एक दासीही पाठवली होती. या दासीला येसूबाईने नवरीसारखे सजवले आणि शाहूबरोबर त्याची नवरी म्हणून औरंगजेबाकडे दाखवायला पाठवले. येसूबाईने या दासीची निवड करताना तिचे काही गुण पाहिले असावे – हुशारी, चतुराई, विश्वासूपणा, रूपही. औरंगजेबाने या नव्या जोडप्याला आशीर्वाद देऊन परत पाठवले. या सर्व कार्यक्रमात शाहूचा या दासीशी जो सहवास घडला त्यामुळे त्याचे मन तिच्यावर बसले आणि त्याने तिला आपली रखेल म्हणून ठेवून घेतले. तीच ही विरुबाई! येसूबाईने पारखलेल्या तिच्या गुणांचा तिने व्यवस्थित उपयोग करून घेतला, असे दिसते. त्या सहवासाच्या अर्ध्या तासाचा परिणाम इतिहासानेच नोंदला आहे.

विरुबाई जरी शाहूची लग्नाची बायको नव्हती, तरी शाहूचे तिच्यावरील प्रेम ओळखून, सर्व दरबारी मंडळी तिला राणीसारखाच मान देत असत. ज्या राणीबरोबर विरुबाई शाहूच्या घरात आली ती नंतर वारली. पुढे शाहूची आणखी दोन लग्ने झाली. पण त्यामुळे विरुबाईच्या स्थानाला धक्का पोचलेला दिसत नाही. या संबंधीचे काही उल्लेख सापडले, ते असे – बाजीराव पेशवे मोहिमेवर असताना त्यांचा थोरला मुलगा नानासाहेब सातारच्या दरबारात असे व दरबारातल्या घडमोडींचा अहवाल बाजीरावाला लिहून पाठवित असे. त्यातले एक पत्र असे – "आम्ही राजश्री स्वामीस नजर पाच मोहरा केल्या व सतका रुपये पाच केले राजश्री स्वामींनी जरीचादर आम्हास दिल्ही येथून वाडियात गेले सौभाग्यदिसंपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री विरुबाईसाहेब यांची भेटी घेतली नजर दोन मोहोरा केल्या त्यांनी विडे देऊन आज्ञा दिल्ही", (पे. द. १८.३३).

खुद्द विरुबाई पेशव्यांना आपल्या अधिकारात आदेशवजा पत्र पाठवित असे. असे एक पत्र सातारच्या महालातला मुदपाकखाना दुरुस्त करण्याविषयी तिने लिहिले आहे. त्यात –

"दिवसगतीवर न घालणे अविलंबे तयार करविले पाहिजे" असा किंचित जरबेचा सूर आहे, (पे. द. १८.६).

विरुबाईचे शाहूवर असलेले वजन आणखीही एका पत्रातून दृष्टीस पडते, हे पत्र कोल्हापूर गादीचा राजा संभाजी याने विरुबाईला लिहिले आहे. संभाजी ह्या शाहूचा चुलत भाऊ होता. कोल्हापूर आणि सातारा या मराठ्यांच्या दोन गाद्यांचे आपापसात वितुष्ट होते. हे वितुष्ट संपवावे असे संभाजीच्या मनात होते. त्यासाठी शाहूची व आपली सामोपचाराची भेट घडवून आणण्यात विरुबाईने पुढाकार घ्यावा, अशी इच्छा संभाजीने त्या पत्रात व्यक्त केली आहे. पत्र असे – "सौभाग्यवती विरुबाई वोहिनी यासी प्रति राजश्री संभाजी राजे उपरि कितेक वृत्त प्रत्येक पत्री लेखन केले आहे त्यावरून अवगत होईल सारांश तीर्थरूपाचे व आमचे दर्शन होऊन विवेक व्हावा हा प्रसंग साधारण आहे ऐसे नाही या प्रयोजनी तुम्ही मध्यस्त होऊन उभयपक्षी संदेह निवृति करता तरीच परिणाम लागतो तदनुसार येतद्विषई तुमची पूर्ण साभिमानता राजश्री नीलकंठरायानी सांगितली त्या तुमच्या भरोसियावरीच हा अंगिकार केला आहे तदनुसार तुम्ही स्वतः येऊन आमची निशा करावी हा आमचा हेतू तो अर्थ सविस्तर मशारनुहलेस सांगितला आहे हे सांगतील ते आमची वचने ऐसे जाणोन तीर्थरूपास विनंती करावयाची तैसी करोन अगत्यरूप आले पाहिजे अनमान सहसा न कीजे समागमे प्रमुखासही घेऊन आले पाहिजे जाणिते बहुत काय लिहिणे", (करवीर रियासत, गर्गे).

शाहू आणि विरुबाई यांना एक मुलगीही होती. तिचे नाव राजसबाई. ही औरस असल्याप्रमाणे हिच्या संबंधीचे रीतिरिवाज पाळले जात असत. याबद्दलची एक नोंद पहाण्यात आली, ती अशी – "सौ. राजसबाई प्रसूत जाली कन्यारत्न जाले २३ मोहरमी इंदुवारी बारसे जाले अवघ्या सरकार कुळाच्या बाइकांनी जाऊन सिस्टाचार विध संपादले विदित जाले पाहिजे", (पे. द. १८.२).

विरुबाई १७४० साली वारली. इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की विरुबाई हयात असेपर्यंत शाहूच्या दोघी राण्या सकवारबाई व सगुणाबाई यांच्या वागण्यावर तिचा अंकुश होता. ती जुनी व शाहूच्या मर्जीतली हे त्याचे कारण असावे. तिच्या मृत्यूनंतर मात्र या दोघी राण्या मनमानेल तसे वागू लागल्या. त्यामुळे शाहूला बराच मनस्ताप होऊ लागला. शाहूची तब्येत ढासळण्याचे हेही एक कारण होते, असे शाहूचे चरित्रकार सांगतात (मल्हारराव चिटणीस व चिं. ग. गोगटे).

शाहूच्या मनावर आपल्या राण्यांचा प्रभाव होता. या राण्या दरबारी कामकाजातही हस्तक्षेप करीत असत, असे उल्लेख सापडतात (पे. द. २४.१६,२१). प्रसंगी त्या, विशेषतः थोरली राणी सकवारबाई त्याचा अधिक्षेपही करीत असे, असे काही उल्लेखांवरून दिसते (पे. द. २४.१४५).

सकवारबाई आणि सगुणाबाई यांच्यापैकी सगुणाबाई मानाने लहान आणि स्वभावाने सौम्य होती. आपले म्हणणे शाहूपर्यंत पोचवण्यासाठी नानासाहेब पेशवे बरेच वेळा सगुणाबाईमार्फत आपले काम करवून घेत असे, असे काही पत्रांवरून दिसते. हे एक नानासाहेब पेशव्यांनी साताराच्या दरबारातील त्यांचे प्रतिनिधी नाना पुरंदरे यांना लिहिलेले पत्र – "या उपरि इकडे

काही गुता आहे यैसे नाही हे वर्तमान तुम्हास कळावे म्हणून लिहिले आहे असे तर समयोचित राजश्री स्वामीचे कानावरि घालणे राजश्रीच्या कानावरि मर्जीमुळे घालावयास न बने तरी सौभाग्यादिसंपत्र मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा यास विनंति करणे म्हणजे राजश्री स्वामीस अवगत होईल," (पु. द. १).

१७४० च्या एप्रिल-मेमध्ये लिहिलेल्या ४/५ पत्रांमधून (१६४-१६९) असे दिसते, की माणिकगडचा किल्ला घेणे व त्याच्या बदल्यात कर्ज फेडणे या वाटाघाटीत शाहूच्या बरोबरीने धाकट्या राणीचाही भाग होता. ही कामगिरी पार पाडल्याचे कळवताना नानासाहेब लिहितात – "राजश्री समजले आहेत की ज्याप्रमाणे मी (शाहूने) आण वाहिली त्याप्रमाणेच हे करून आले आहेत आसे आहे त्यात मात्र आमची रदबदली आहे असे धाकटी बाईकडून राजश्रीस कळवावे."

आणखी एक पत्र नानासाहेबांचे नाना पुरंदऱ्यांना – "आसीर्वाद उपरि धाकटे बाईची मर्जी नीट जाहलि यावरी भाऊबाईकडील कचे वर्तमान बाईजवळ सांगून राजश्रीचे कानावर पडे ते करणे," (पु. द. १.१९३).

आपल्या आका भिऊबाई हिची चीजवस्त नानासाहेब बळकावून बसला आहे अशी तक्रार भिऊबाईचा दीर बाबूजी नाईक याने शाहूकडे केली होती. हा खोटा आळ असल्याचे शाहूला धाकट्या राणीमार्फत कळवावे, असे हे पत्र आहे. नानासाहेबाचे पेशवेपद टिकून रहाण्यासाठी शाहूचे मन त्याच्याविषयी स्वच्छ असणे आवश्यक होते. ही नाजुक आणि महत्त्वाची कामगिरी धाकट्या राणीच्या वशिल्याने करून घेण्याची ही खटपट या राणीचे शाहूवर असलेले वजन दर्शविते.

सगुणाबाई सौम्य स्वभावाची असली, तरी महत्त्वाकांक्षा तिलाही होतीच. तिलाही आपल्या पसंतीचा दत्तक हवा होता. तिच्या माहेरच्या नात्यातले रघूजी भोसले यांच्यावर तिच्या पसंतीचे शिक्कामोर्तब होत होते. पण सकवारबाईचा त्यास विरोध होता (पु. द. १). आर्थिक उलाढालींमध्ये थोरल्या राणीच्या बरोबरीने तिचाही वाटा होता. यामुळे शाहूला फार मनस्ताप होत असे. नानासाहेब पेशव्यांच्या चरित्रात रियासतकार सरदेसाईंनी लिहिले आहे की या दोघी राण्या बाहेरगावची वतने विकत घेऊन तिकडे सावकारीचा व्यवसाय करीत, आपल्या नोकरांमार्फत शहरातल्या फिर्यादींच्या कामात ढवळाढवळ करीत.

या संबंधात साताऱ्याहून महादबा पुरंदरे नानासाहेबांना लिहितात – "राण्यांचे खर्च अनिवार", "उभयता महालांचे अतिप्राबल्य झाले आहे." "दोनही वाडियातील नित्य एक दुसरा कजिया ठेवलेलाच आहे कजिया असा जालियास घाबरे होतात की गर्भगळित. देव मरण लौकर देईल, तर उतम असे म्हणतात... राजश्री स्वामी दोन्ही महालच्या कज्ज्यामुळे व खर्चाच्या तगाद्यामुळे दिक आहेत आपला खाजगी ऐवज तरता बुडता पहात असतात," (क. रि., गर्गे). "महालाकडील कजिये म्हणजे वामानाची पदे" "येक बाई खुशाल तर येक बाई रागे, राजे तर सर्वत्र मलमलित", (पु. द. २.२१३).

सगुणाबाई १७४८ साली वारली. त्यानंतर सकवारबाईला दत्तकाच्या कारवाया करायला आणखी जोर चढला. सकवारबाई मुळात उग्र स्वभावाची होती आणि शाहूच्या हयातीत ती सरकारी मामल्यात शाहूच्या बरोबरीने भाग घेत असे. वतनदारांची कागदपत्रे, सरंजामाची

ताकीद पत्रे, एकाद्याला गुन्ह्याबद्दल अटक करणे, वा पेशव्यांनी अटक केली असता त्यातून सोडवणे यात तिचाही सहभाग असे, (पे. द. २३ क्र. १६,२१,२६,२९). नानासाहेब आणि शाहू यांच्यामधे काही काळ झालेल्या बेबनावाशीही तिचा संबंध होता. पंढरपुरच्या बडव्यांच्या संबंधात काही प्रकरण उपस्थित झाले असता – "राजश्रीसी बहुत बाई अतिशय करून बोलली. राजश्रीनी पेशव्यांची बाजू घेतली पण तेव्हा बाईनी बसोन गोष्ट सांगितली की हे काम प्रधान पंतांचे इतल्याखेरीज जाले नाही..."

या बेबनावाचा उल्लेख राधाबाईने नानासाहेबाला पाठवलेल्या एका पत्रातही आहे – "वरकड थोरले वडियातील कजिये बहुतेक वारले? भेट जाहली म्हणोन लिहिले तरी युक्तीने कारभार विल्हेस लावून लौकर येणे होय ते करावे," (पे. द. २४.१५६).

शाहूला सकवारबाईचा इतका धाक होता, गोपिकाबाईचा इलाज करण्यासाठी सातारच्या दरबारातले वैद्य पाठवण्यासाठी नानासाहेबांचा निरोप घेऊन कारभारी शाहूकडे गेले, तेव्हा "वाड्यांत पुसोन मग सांगू" असे शाहूने म्हटले (पे. द. १८.१५०).

शाहूची नानासाहेबावर गैरमर्जी झाल्यावर नानासाहेबाच्या कारभाराची चौकशी करायला शाहूने पुण्याला माणसे पाठवली, हे वृत्त नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांना साताऱ्याहून नाना पुरंदरे यांनी कळवले. या पत्रात ते त्यांना लिहितात – "आपण यासी (चौकशी करणाऱ्यांशी) समाधान राखावे म्हणजे हे उभयेता मग येथे राजश्रीजवळ बाईजवळ येथास्थित वर्तमान सांगतील म्हणजे राजश्रीस बाईस खरे वाटेल नाना प्रकारच्या चर्चा ऐकत होतो त्या लटक्या होतील," (पु. द. १).

शाहूच्या बरोबरीनेच सकवारबाईचाही संशय दूर होणे आवश्यक होते, असे यावरून दिसते. तुळोजी आंगरे यांनी सकवारबाईविरुद्ध पेशव्यांकडे तक्रार केली होती की अंजनवेल येथे शिर्क्यांनी आंग्र्यांविरुद्ध गडबड केली त्याला सकवारबाईचा (ही माहेरची शिर्के होती) पाठिंबा आहे. परंतु एकंदरीने सकवारबाईशी सामोपचाराचे संबंध असणे तुळोजीला हितावह वाटले, असे दिसते. याबद्दलची ही नोंद – "तुळोजी आंग्रे सरखेल थोरल्या वाडियात मजुरियास गेले. देवढीवर बसले सर खेलीनी बाईसाहेबास अर्ज सांगोन पाठवला की मी रूबरू पायावर डोकी ठेवीन त्यावरून बाईस परम संतोष जाहला सांप्रत तुळोजी आंग्रे याजवर परमभक्ति बाईची आहे बहुत ममता पुरासर भाषण बाईचे जाहले..." (पे. द. २.१५).

सकवारबाईच्या एकूण रागरंगाविषयीची चुणूक नाना पुरंदरे यांना त्यांचे चुलते महादजी अंबाजी पुरंदरे यांनी लिहिलेल्या पत्रातून कळते. पेशव्ये व शाहू यांच्या बेबनावात आपली पंचाईत होते आहे अशा अर्थाच्या नाना पुरंदरे यांच्या पत्राचे हे उत्तर आहे – "अ.सीर्वाद उपरि थोरले बाईचा कारभार अववस्थ आहे राजश्री गोविंदराऊ (चिटणीस) यासी सिरसेदापर्येत बे आबरूच्या गोस्टी बोलिली तुमच्या व गोविंदराऊच्या पायात बेड्या घालाव्या म्हणूनही चर्चा करिताती म्हणून विस्तारे तुम्ही लिहिल्यावरून कळले यैसियासी थोरले बाईस काही विचार राहिला आहे यैसे नाही कोणे समयी काये करितील हाही भरवसा येत नाही बोलावयाची तो बाकी राहिलीच नाही असो त्याचे रागाचे उलहाण काही शांत होईल तदूतर राजश्री गोविंदराऊ याणी राजश्री स्वामीपासी येकाती विनति कराची की पेशवेही महाराजाचे मातबर चाकर व

बाईसाहेब तो धनीच परस्पर त्याच्या पेचात आम्हास खावंद लोकाकडील बे आबरू व्हावे तर वडिलापासून जिवाभ्य श्रम करून इजती मेळविल्या त्या काही पेशव्याची मध्यस्ती करून गमावावयासाठी मेळवल्या नाहीत ....." वगैरे. एकूण पत्रातला मजकूर असा की शाहूची व सकवारबाईची मर्जी परत मिळवण्यासाठी त्यांच्या पायावर डोके ठेवावे व आपण पेशव्यांच्या बाजूचे नाही असे त्यांना खात्रीपूर्वक सांगून त्यांचा राग शांत करावा – "तदुतर राजश्रीची व बाईची मर्जी कसी होती ते लिहिणे. २६ रजब हे आसीर्वाद," (पु. द. १).

पेशव्यांचा व पुरंदऱ्यांचा तीन पिढ्यांचा संबंध होता, तो शाहू गादीवर येण्याच्या आधीपासूनचा होता. पण पेशवे आणि शाहू यांच्यात निवड करायची वेळ आल्यावर पुरंदऱ्यांनी पेशव्यांना सोडून शाहूकडे रहाण्याचे ठरवले. या निर्णयात सकवारबाई केव्हाही काहीही करू शकते या धास्तीचाही भाग असावा.

या सर्व उल्लेखांवरून सकवारबाई किती जबरदस्त व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती, ते कळून येते. शाहू निपुत्रिक असल्यामुळे गादीचा वारस दत्तक घ्यायचा तो आपल्या मुठीत रहाणारा घ्यावा, व आपण कारभार करावा अशी तिची इच्छा होती. तिला पेशवे कारभारी नको होते. पेशव्यांच्या विरुद्ध असणारे रघूजी भोसले, बाबूजी नाईक दमाजी प्रतिनिधी इत्यादि मंडळींशी तिचे संधान होते. दरम्यान ताराबाईने आपला नातू व शिवाजीचा पणतू अस्तित्वात असल्याची बातमी जाहीर केली, व तोच वारस गादीला घ्यावा असे शाहूलाही वाटू लागले. हे पाहून सकवारबाई बिथरली. वृद्ध, आजारी, थकलेल्या शाहूभोवती तिने पहारा बसवला, व विरोधी पक्षाचा काटा काढायचा घाट घातला. या सर्व परिस्थितीमुळे शाहू वैतागला. दत्तकाबद्दल काहीही निर्णय न घेता मृत्यूपूर्वी नानासाहेबांच्या हाती त्याने सर्व कारभार रीतसर सोपवला.

तरीही शाहूच्या मागे सकवारबाई काय करील याची कोणाला शाश्वती नव्हती. या बाबतीत ताराबाईने असे म्हटल्याचे नमूद आहे की – "सकवार राहिल्यास राज्याच्या डोहाला करील राज्य बुडवील कोणाचे पाय भुईस लागू देणार नाही या करिता बरोबर राहील तर फार चांगले सहगमनाचा विचार कळेल तसा तिने करावा..."

याप्रमाणे विचार सुरू झाल्यानंतर सर्व लहान थोर दरबारी मंडळींचा – "एक विचारे मनसोबा ठरला की सकवारबाईसाहेबास सती घालवावी, न जातील तर बळे न्यावी महाराजांमागे दुलौकिक बखेडा करितील मग विचारी पडावे नीट नाही आताच शेवट केला पाहिजे." (करवीर रियासत– गर्गे).

अशा प्रकारे सकवारबाईवर नैतिक दडपण आणून "आपण सती जाणार नाही" असे म्हणणे तिला कठीण केले व तिला सती जायला भाग पाडले.

सकवारबाई राजकारणाच्या पटावरून दूर झाली की गादीचा प्रश्न सुटेल असे नानासाहेबाला वाटले होते. पण तो प्रश्न न सुटता ताराबाईच्या रूपाने तो आणखी चिघळला, आणि नानासाहेबाला जन्मभर पुरून उरला.

मराठा सत्ताधारी घराण्यातल्या या काळातल्या सर्व स्त्रियांची उदाहरणे ही पतिनिधनानंतर कर्तृत्व गाजवणाऱ्या स्त्रियांची आहेत. याला पूर्ण अपवाद शाहूच्या या तिन्ही राण्यांचा आहे. विरुबाई, सकवारबाई, सगुणाबाई या तिघींनीही शाहूच्या हयातीतच त्याच्या बरोबरीने सत्ता

उपभोगली, कारभारात भाग घेतला. ह्याला शाहूच्या व्यक्तिमत्त्वातला कमकुवतपणाही कारणीभूत असावा. परंतु सकवारबाईने इतरांच्या दडपणाला बळी पडून सती जायला तयार व्हावे, हीदेखील एक आश्चर्याचीच गोष्ट होती.

कारभाराचा अनुभव असून, आणि स्वभाव महत्त्वाकांक्षी व आक्रमक असूनही समाजाच्या नैतिक दडपणाचा प्रतिकार करणे तिला कठीण गेले, असे दिसते. सती जाणे, ही गोष्ट ऐच्छिक होती. पण सकवारबाईच्या बाबतीत आजूबाजूला लोकांनी तो प्रश्न तिच्या प्रतिष्ठेचा केला. सकवारबाई सती गेली नसती, तर कदाचित मराठेशाहीच्या इतिहासाला काही वेगळी कलाटणी मिळाली असती. निदान तशी शक्यता तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यात दिसून येते.

## ३ – जिजाबाई

ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांना तिची सवत राजसबाई हिने १७१४ साली कैदेत टाकले, व स्वतःचा मुलगा संभाजी याला गादीवर बसवले. जिजाबाई ही या संभाजीची पत्नी होय. संभाजीला एकूण सात बायका होत्या. त्यातली जिजाबाई ही चौथ्या क्रमाकांची बायको होती. तिचे माहेर तोरगळकर शिंदे घराण्यातले होते. हिचे संभाजीशी लग्न १७२६ साली झाले. त्यावेळी तो गादीवर आलेला होता.

१७४० च्या सुमारास संभाजीचे मन राज्यकारभारातून उडाले व त्याने कारभाराची सूत्रे जिजाबाईकडे सोपवली, असे इतिहास सांगतो (त्याचे कारण कळू शकले नाही). यासंबंधी त्याने सदाशिवरावभाऊला एका पत्रात लिहिले आहे – "वरकड कित्येक राणीवास चौथा वाडा माजपाशी जे सांगणे ते सांगितले आहे. सविस्तर पत्रे त्या लिहीतील त्याजवरून कळेल."

यानुसार जिजाबाईने इतरांना व इतरांनी जिजाबाईला लिहिलेली कारभारविषयक बरीच पत्रे उपलब्ध आहेत. संभाजी हयात असल्यापासूनच जिजाबाईच्या हाती कोल्हापूर राज्याचा कारभार होता, असे यावरून दिसून येते.

जिजाबाईच्या हाती कोल्हापूरचा कारभार आला, त्याचसुमाराला साताऱ्याच्या गादीचे पेशवेपद नानासाहेबाला मिळाले होते. सातारा आणि कोल्हापूर या दोन्ही राज्यांच्या सीमा १७३० सालच्या वारणेच्या तहाने निश्चित झाल्या होत्या. परंतु त्या सीमा एकमेकांना लागून असल्यामुळे दोन्ही राज्यांचे एकमेकांच्या कारभारावर लक्ष असे. प्रसंगानुरूप जिजाबाई आणि पेशवे यांचा पत्रव्यवहारही होत असे.

नानासाहेब पेशव्यांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचे जिजाबाईचे धोरण होते. एका पत्रात ती त्यांना लिहिते – "आपल्यापाशी पडदा स्वप्नीही नाही. आपण बंधूच आहोत." परंतु नानासाहेबाचा स्वभावही ती समजून होती. तिला त्यांच्याबद्दल विश्वास नव्हता. दुसऱ्यांना लिहिलेल्या एका पत्रात तिने – "त्याजकडून काही ममतेचा लेश दिसोन येत नाही," असे म्हटले आहे.

नानासाहेबांना पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर त्यांचे संभाजीशी सातारा आणि कोल्हापूर या गाद्यांच्या एकीकरणाविषयी काही बोलणे झाले होते. पुढे काही वर्षांनी शाहूची प्रकृती

बिघडल्यानंतर दत्तकाचा विचार सुरू झाला तेव्हा जिजाबाईने नानासाहेबांना त्यांच्या जुन्या बोलण्याची आठवण देऊन पुढील पत्र लिहिले आहे –

"पूर्व संदर्भाच्या अन्वयानुरूप तुमच्याकडे श्रोत्रियांना पाठवले आहे. त्याप्रमाणे चित्ती संभवून पूर्वसंकल्प सिद्धीस नेऊन प्रामाणिक वचन निदर्शनास यावे तदोत्तर दुजूर संतुष्टता प्राप्त होऊन साहेबी मध्यस्ती केली त्या गोष्टीचा फलादेश घडावा म्हणून गतवर्षापासून लागोपाठ रवाना केले पण अद्याप साहेबांच्या प्रत्ययाला गोष्ट येत नाही यानंतर तरी पूर्व संदर्भाच्या विचाराअनुसार स्वराज्य कर्तव्यार्थ पहली बोली केली आहे आणि करार लिहून दिला आहे त्याप्रमाणे साहेबाचे निदर्शनास यावे हुजूर विनंति केली ती सत्यता होऊन राज्य उपयोगी मनसवा घडेल ते करावे या गोष्टी तुम्हास अगाध कोणते तुमची दृष्टि दृढतर आहे हा साहेबास संपूर्ण भरवसा ही गोष्ट साहेबी चित्तास आणून संस्थानाची ताकीद पत्रे घेऊन पाठविले आहेत स्वराज्यासाठी तुमच्या मांडीचे उसे केले आहे काही अर्थ तुमच्या ध्यानात आहे मुख्य म्हणजे गोष्ट म्हणजे पूर्व संदर्भाप्रमाणे हुजूर निदर्शनास आणून द्यावे ...."

शाहूशी सख्य करावे असे संभाजीला त्याची पत्नी जिजाबाई हिने सांगितले असा उल्लेख मल्हार रामराव विरचित थोरले शाहूमहाराज यांच्या चरित्रातही सापडतो (पृ. ८५).

पुढे ताराबाईने आपला लपवलेला नातू रामराजा याला बाहेर काढून त्याला गादीवर बसवावे असा प्रस्ताव मांडला. त्यामुळे संभाजीशी सख्य करण्याचे मागे पडले. त्यामुळे संभाजी नाराज झाला. यासंबंधात त्याने जिजाबाईवर दोष ठेवला, तो का, ते पुढील नोंदीतून दिसून येते – "जिजाबाईस म्हणतात जे तुमच्या विद्यमानचे पेशव्यांकडील राजकारण फळास आले. तुम्हासी शपथपूर्वक बोलोन विश्वास तुम्ही त्याचे ठायी ठेवोन भेट आम्ही न लगे म्हणत असता सिरोळास आम्हास नेऊन पेशव्यासी भेटून याचे हाती आमचा हात देऊन आम्हास भरवसा देऊन मातुश्री ताराबाई कडील संबंध घडणार तोही तुमच्या भरवशावर तोडोन सेवटी सर्व गोस्टीने आम्हास दोन्हीकडे हलके पाडून भ्रस्ट केले या उपरि राजकारणास ठाव नाहीसा झाला," (करवीर रियासत– गर्गे).

संभाजीला सातारची गादी मिळावी यासाठी जिजाबाईने नानासाहेब पेशव्यांना मध्यस्त घालून बरीच खटपट केली, असे यावरून दिसते. पण ते घडले नाही.

पुढे रामराजा ताराबाईच्या कह्यात रहाण्याचे मान्य करीना तेव्हा ताराबाईने रामराजा हा अस्सल बीजाचा नव्हे असे जाहीर केले आणि सातारचे राज्य सांभाळण्याविषयी कोल्हापूरला संभाजीला निरोप पाठवला. परंतु यावेळी जिजाबाई या प्रस्तावाला बधली नाही. या संबंधात कोल्हापूरहून नानासाहेबाला पाठवलेल्या पत्रात आनंदराव गिरिधर यांनी लिहिले आहे की ताराबाईने रामराजाला कैदेत टाकले आहे, तशीच ती उद्या त्यालाही कैदेत टाकेल, आणि सातारा आणि कोल्हापूर अशी दोन्ही राज्ये बळकावून बसेल (पे. द. ६.१३९), असे जिजाबाई संभाजीस समजावले.

एकूण यानंतर जिजाबाईने सातारच्या गादीचा नाद सोडला आणि ती कोल्हापूरच्या आपल्या राज्याची व्यवस्था पाहू लागली. तरी पूर्वीच्या अप्रिय अनुभवामुळे ती अधूनमधून नानासाहेबाला आपला हिसका दाखवित असे. याचे उदाहरण कृष्णराव भगवंत अमात्य यांनी

ताराबाई, नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांना पत्रे पाठवून जिजाबाईबद्दल तक्रार केली आहे, त्यावरून दिसते. या एकूण तीन पत्रांत (पे.द.२४.१२३,१२४,१२८) मिळून माहिती अशी की – "वर घाटे सौभाग्यदि संपन्न मातुश्री बाईसाहेब याणी नाना प्रकारे पेच आरभून आमच्या खेडी सरंजामास इस्कील केली... मौजे सागरुलाविसी राजश्री स्वामीस व सौभाग्यदि संपन्न मातुश्री बाईसाहेब यांसी आपण पत्रे पाठवली होती ते आपणाकडील जासुदाबरोबर येऊन पनालियासी धनियाकडे पाठवले त्यास जासूदास गडावर न घेता दरवाजियासी ठेवून पत्रोत्तर न देता निरोप दिल्हा."

नानासाहेबाची पत्रे घेऊन येणारा माणूस म्हणजे एक प्रकारे त्यांचा प्रतिनिधिच होय. त्याला तिने ज्या प्रकारची वागणूक दिली त्यावरून जिजाबाईची नानासाहेबाबद्दलची नाराजी प्रकट झाली आहे. ही पत्रे १७५५ सालातली आहेत. परंतु त्याआधी देखील १७४८ सालच्या १/२ पत्रांमधे जिजाबाईचा अधिकारीपणाचा स्वर प्रकट झाला आहे. यातले एक पत्र खुद्द नानासाहेब पेशव्यांना लिहिलेले आहे, तर दुसरे कारभारी महादजी पुरंदरे यांना लिहिलेले आहे, (पे. द. ६.१,२).

१७६० साली संभाजी वारला. तो निपुत्रिक होता. हे निमित्त करून नानासाहेबाने कोल्हापूरची गादी जप्त करण्याचा घाट घातला. जिजाबाईला हे कळल्यावर तिने कोल्हापूर गादीचे सरदार इचलकरंजीकर घोरपडे यांच्या मातोश्री अनुबाई घोरपडे यांच्यामार्फत्त नानासाहेबांशी रदबदली करण्याचा प्रयत्न केला. अनुबाई या नानासाहेबांच्या आत्या लागत होत्या, त्यामुळे त्यांच्यामार्फत्त आपले काम होईल, असे जिजाबाईला वाटले असावे. परंतु अनुबाईंनी या मामल्यातून आपले अंग काढून घेतले. पेशवे त्यावेळी पानिपतासाठी कुमक घेऊन उत्तरेकडे निघाले होते. तेव्हा – "पेशव्यांची स्वारी बुऱ्हाणपुरापलीकडे गेली आहे त्यांची उत्तरे येईपर्यंत जप्ती थांबणे कठिण दिसते," असे उत्तर देऊन अनुबाईने हे काम झटकून टाकले.

या संबंधात जिजाबाईने आपले सरदार अनुबाईंचे पुत्र नारायण व्यंकटेश घोरपडे यांनाही पत्र लिहिले. संभाजीच्या मृत्यूनंतर नानासाहेबांनी सांत्वनाचे पत्र तर पाठवले नाहीच, उलट जप्तीकरता फौज पाठवली, आणि घोरपडे यांनीही याबाबतीत काही विचारपूस केली नाही, याची नाराजी तिने या पत्रात व्यक्त केली आहे.

"राजमान्य राजश्री नारायणराव व्यंकटेश यासी श्रीमंत महाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यांनी आज्ञा केली ऐसीजे... राजश्री पंतप्रधानांनी परामर्षाचे पत्रही न पाठविता इकडील बंदोबस्तास राजश्री हरिराम व विसाजी नारायण या समागमे फौज पाठवून दिल्हे तेव्हा साहेबांच्या व प्रधानपंताच्या ऋणानुबंधास सीमा आहे राजश्री स्वामी जागृत (जिवंत) असता प्रधानपंतानी संधान रक्षून आणशपथ घेऊन साहेबांशी अंतर करू नये याप्रमाणे वचनासी गुंतले असता याप्रमाणे मजकूर घडून आला. चिरंजीव कुसाबाई (सातवी राणी) गरोदर आहेत असे असता याप्रकारे लौकिक केला बरे उत्तम सुखेनैव जे होणे ते हो तुम्ही पुरातन सेवक तुम्ही येऊन परामर्ष करावा हे उचित होते."

१७४० सालापासून जिजाबाई राज्यकारभारात लक्ष घालीत होती. तरीदेखील संभाजीच्या मृत्यूनंतर नानासाहेबानी तिची पत्रास ठेवली नाही, एवढेच नव्हे तर खुद्द कोल्हापूर गादीचे

सरदार घोरपडे यांनीही तिची बूज राखली नाही, हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. शाहू जिवंत असताना सकवारबाईशी सांभाळून वागणाऱ्या नानासाहेबाने शाहू वारल्यावर तिचीही पत्रास ठेवली नव्हती. तिला सती घालवण्याच्या बेतात तोही सामील होता.

पण जिजाबाईचे पाणी वेगळेच होते. पेशव्यांची फौज जप्तीसाठी येऊन ठेपल्यावर जिजाबाईचे मनोधैर्य, मुत्सद्देगिरी आणि धाडसी हे गुण उत्तम तऱ्हेने प्रत्ययाला आले. आपण आज उद्या स्वतः ठाणी तुमच्या हवाली करतो, अशी आश्वासाने देऊन जिजाबाईने पेशव्यांच्या फौजेला काही दिवस झुलवत ठेवले आणि हळूहळू फौजेची सावधगिरी कमी झाल्यावर फौजेवर स्वतःच हल्ला करून तिला परतवून लावले.

ही १७६० ची अखेर होती. १७६१ सालाची सुरुवात पानिपतच्या अपयशाने झाली. त्या धक्क्याने नानासाहेब खचून गेले. काही महिन्यांनंतर दुःखातच त्यांचा मृत्यू झाला.

नानसाहेबांनंतर थोरले माधवराव पेशवे झाले. पानिपतच्या पराभवामुळे मनोधैर्य खचले होते. इतरही अडचणी होत्या. त्यामुळे जिजाबाईंनी आपण दत्तक घेऊ इच्छितो असा प्रस्ताव माधवरावांसमोर मांडला, तो त्यांनी मान्य केला. दत्तक विधानाच्यावेळी जिजाबाईने आपल्या सरदारांकडून पुढील आशयाची इमान पत्रे लिहून घेतली – "महाराज मातोश्री आईसाहेबांचे पायापासी अंतर न करावे तेच धनी मानावे इतर कल्पना करू नये जे जे समई साहेब आज्ञापत्र पाठवतील ते क्षणी दहा हजार पाच हजार फौजेनिसी साहेबाचे सेवेशी हजर राहू."

जिजाबाईने घेतलेला दत्तक हा अल्पवयीन होता. जिजाबाईने त्याच्या नावाने जवळजवळ बारा वर्षे – स्वतःच्या मृत्यूपर्यंत – राज्याचा सर्व कारभार स्वतः पाहिला.

जिजाबाईची आपल्या कारभारावरची पकड, आणि स्वतःच्या अधिकाराबद्दलचा आत्मविश्वास दाखवणारी काही पत्रे पहायला मिळाली. यापैकी २/३ पत्रे ऐतिहासिक लेखसंग्रह या वासुदेवशास्त्री खरे यांनी संपादित केलेल्या पटवर्धन घराण्याच्या कागदपत्रांतली आहेत. यात उल्लेख असलेली घटना ही करवीर शंकराचार्यांचे प्रकरण म्हणून इतिहासात नमूद आहे. ती घटना अशी. जिजाबाईला संभाजीचे स्मारक म्हणून त्याच्या दहनाच्या जागी एक वृंदावन बांधायचे होते. त्यासाठी तिने जागा ठरवून घेतली, त्या जागेचा काही भाग शंकराचार्यांच्या मठाच्या जागेत येत होता. त्याबद्दल शंकराचार्यांनी तिला सांगून पाहिले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे शंकराचार्यांनी मिरजेला सरदार पटवर्धन यांच्याकडे आपला माणूस पाठवला, आणि पटवर्धनांनी पेशव्यांजवळ आपले वजन खर्च करून पेशव्यांकरवी जिजाबाईच्या बेताला प्रतिबंध घालावा अशी विनंती केली. त्याप्रमाणे गोविंद हरि पटवर्धन यांनी माधवराव पेशव्यांचा उजवा हात असलेला आपला मुलगा गोपाळराव याला पत्र पाठवले व माधवरावांकडून शंकराचार्यांचे काम तातडीने करवून घेण्यास सांगितले, (ऐ. ले. सं. ५०७). पण पेशव्यांचे जिजाबाईला त्या अर्थाचे पत्र गेल्यावर जिजाबाई उलट नाराजच झाली, (ऐ. ले. सं. २.५३८). या प्रकरणात शंकराचार्य, पटवर्धन आणि पेशवे या तिघांचीही प्रतिष्ठा इरेला पडली होती. बाब तशी फार मोठी नव्हती. पण जिजाबाईने कोणाच्याही विनंतीला, दडपणाला धूप न घालता, स्वतः निवडलेल्या जागेतच ते वृंदावन बांधले. गोष्ट तशी पाहिली तर साधी, पण आपल्या राज्यातल्या जमिनीवर आपला अधिकार आहे, हे

दर्शवण्यासाठी ती Test Case म्हणूनही समजली जाऊ शकते.

राज्याच्या सीमेवरच्या हालचालींवरही जिजाबाईचे पूर्ण लक्ष असे. सीमेवरच्या कोणत्याही घडामोडीचे दूरगामी परिणाम राज्यकर्ती म्हणून ती बारकाईने विचारात घेत असे. याचे एक उदाहरण या पत्रात दिसते, आपल्या एका कारभाऱ्यांना तिने हे पत्र लिहिले आहे –

"राजश्री जिवाजी विश्राम यासी श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब याणी आज्ञा केली सध्या इंग्रज आरमार सुद्धा जंजिरे यशवंतगडी जाऊन बैसोन तोफांची मारगीरी अतिशयानिशी करोन जंजिरा हसगत शनिवारी केला म्हणोन परभारे निवेदनात आले तुम्ही काहीच लिहिले नाही हे उचित की काय एक जंजिरे सिंधुदुर्ग गेल्याची चिंता वाटत असता हे निवेदन जाहले वरून बहुतच आयासास कारण जाहले गोष्टी परम अनुचित जाहली पुढे राहिले जागे जतन होणे आणि गेलेले घेणे याचा साधन प्रकार कोणे रीतीचा योजिला तो प्रकार साभिप्राय लेहून पाठवावा कोवळा मोड आहे तो मोडिल्याने उत्तम भारी जाहलेने सर्वांचे वाईट हे पुर्ते चित्तात आणून समर्पक ते करावे."

जिजाबाईचा मृत्यू १७७३ मधे झाला. संभाजीच्या मृत्यूनंतर तिने खंबीरपणे कोल्हापूरच्या सत्तेचा जम बसवला. पेशव्यांसारखे बलाढ्य शेजारी सातारच्या, आणि प्रसंगी कोल्हापूरच्याही सरदारांना हाताशी धरून अधूनमधून कोल्हापूर गादीची कुरापत काढीत असताना हे काम सोपे नव्हते. पण ते तिने करून दाखवले.

जिजाबाईच्या कर्तबगारीसंबंधी इतिहास संशोधक कै. वासुदेवशास्त्री खरे म्हणतात – "आपले व प्रतिस्पर्ध्याचे बलबल किती आहे देश कालाप्रमाणे कसे वागले असता आपले कार्य साधेल आपल्या प्रभुत्वाची मर्यादा कोठपर्यंत चालेल हे सर्व त्या जाणत होत्या. सातारच्या राजमंडळात प्रधानांचे प्रस्थ माजून छत्रपति निर्माल्य झाले ही गोष्ट त्यांच्या नजरेसमोर होती. त्यामुळे आपल्या राज्यातला कारभार आपल्या तंत्राने चालावा हा त्यांचा आग्रह गैरवाजवी म्हणता येणार नाही."

सातारची गादी स्वतःच्या तंत्राने चालवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारी ताराबाई; आणि कोल्हापूरची गादी आपण चालवत आलो तशीच चालवत ठेवण्याची इच्छा बाळगणारी जिजाबाई या दोघींनीही नानासाहेब पेशव्यांना आपल्या हिंमतीचा आणि हिकमतीचा चांगला हिसका दाखवला. [संदर्भ - १) करवीर रियासत - स. मा. गर्गे, २) ऐ. ले. सं. भाग २ व ३ वासुदेवशास्त्री खरे].

## ४ – दर्याबाई भोसले

सातारकर भोसले व नागपूरकर भोसले हे एकाच वंशातले होते. मोगलांच्या कैदेतून सुटलेला शाहू दक्षिणेत परत आला, तेव्हा तो खरा आहे की तोतया याची शहानिशा करण्यासाठी ताराबाईने पाठवलेल्या जुन्या मंडळींत नागपूरकर भोसल्यांपैकी परसोजी आणि साबाजी यांचा समावेश होता. ते दोघे शाहूबरोबर एका ताटात जेवले तेव्हा इतर मराठा सरदारांची शाहूच्या अस्सलपणाबद्दल खात्री पटली, असे नमूद आहे. या नागपूरकर भोसले घराण्यापैकी पहिला कर्तबगार राजा पहिला रघूजी हा होय. याने नागपूरकर भोसल्यांचे वर्चस्व मध्य हिंदुस्थानात व बंगाल-ओरिसा सीमेपर्यंत स्थापित केले. नागपूरकर भोसले पेशव्यांना जुमानीत नसत.

इतकेच नव्हे तर शाहू आणि नानासाहेब यांचा काही दिवस बेबनाव झाला होता तेव्हा नागपूरकर भोसल्यांनी बाबूजी नाईक बारामतीकर यांना पेशवेपद मिळावे, अशी खटपट केली होती. शाहूच्या अखेरच्या आजारपणाच्या वेळी सातारच्या गादीचा वारस म्हणून दुसऱ्या रघूजीला दत्तक घेण्यात यावे अशीही एक सूचना पुढे आली होती. ती शाहूची थोरली राणी सकवारबाई हिला मान्य झाली नाही, कारण दुसरा रघूजी हा शाहूची धाकटी राणी सगुणाबाई हिचा मेव्हणा होता, व तिच्या खास मर्जीतला होता.

दर्याबाई भोसले ही पहिल्या रघूजीची बायको. हिने आपल्या पुतण्याला दत्तक घेतले होते. तो पुढे हा दुसरा रघूजी म्हणून ओळखला जाऊ लागला.

पेशव्यांच्या राजकारणात दर्याबाई भोसलेचे नाव बारभाईच्या संदर्भात वाचायला मिळाले. मात्र तिच्याबद्दल सलग अशी माहिती मिळाली नाही. सगळे संदर्भही जुळू शकले नाही.

नारायणरावाच्या वधानंतर त्याची पत्नी गंगाबाई गरोदर असल्याचे लक्षात आले. तेव्हा रघुनाथरावास पेशवेपद मिळू नये व नारायणरावाचा वारस अल्पवयीन असला तरी त्याला पेशवाईची वस्त्रे देऊन त्याच्या नावाने राज्याचा कारभार पाहिला जावा, असे पेशव्यांच्या प्रमुख कारभाऱ्यांनी ठरवले. या कारभाऱ्यांमध्ये नाना फडणीस, सखारामबापू बोकील, त्रिंबकरावमामा पेठे, हरिपंततात्या फडके इत्यादींचा समावेश होता. या सर्व मंडळींना मिळून बारभाई ही संज्ञा इतिहासात वापरली जाते. आपली मसलत सिद्धीस नेण्यासाठी मराठेशाहीशी संबंधित असे जास्तीत जास्त सरदार आपल्या बाजूला वळवून घ्यावे, असे त्यांनी ठरवले. या कामात त्यानी नागपूरकर भोसल्यांचीही मदत मागितली होती.

बारभाईंनी नागपूरकरांना मदतीसाठी पत्र पाठवले, तेव्हा भोसल्यांचे सरदार व त्यांची फौज फारशी समाधानी नव्हती. या संबंधीचा काही तपशील म. इ. सा. या राजवाडे संपादित ग्रंथामालेच्या (शके १६८३-१७६९) या खंडात पत्रांक १६५ मध्ये वाचायला मिळतो. भोसल्यांची फौज नागपुराबाहेर जायला तयार नव्हती, उपासमारी होती, फितुरीचा संभव होता वगैरे तपशील त्यात पत्रलेखकाने दिला आहे. या संदर्भात पे. द. २०.३०२ ची नोंद अशी आहे – "रघूजी भोसले याने फौजेसह मोहिमेवर जावे असे ठरले असताना, काही लोकांनी पोटाकरिता दंगा केला. तेव्हा घोरपडे, घाटगे, पाटणकर, सिंदे, होळकर वगैरे सरदारांना बाईंनी आपल्या डेऱ्यास बोलावून आणले, सबूर करायला सांगितले खर्चाची व्यवस्था करू म्हणून सांगितले लोकांची समजूत घालून विडे देऊन वाटेला लावले एक पत्र सकाळीच सांडणीस्वाराने आणले ते मल्हारपंत व महिपतराव विश्वास यांनी एकांतात बाईला वाचून दाखवले व लगेच मातुश्रीबाई कूच करून किल्ल्यावर निघाली ही प्रातःकाळची गोष्ट त्याच दिवशी छ ७ रविलाखर तृतीय प्रहरी मातुश्रीबाईंनी दरबार करून मातबर सरदार बोलाऊन रघोजी बावास त्यांचे हाती दिले जे हे सरदार तुमचे यांचे संरक्षण करावे सर्वांस सांगितले आत त्रितीये प्रहरानंतर कूचा करून बाई किल्ल्यावर जाणार अंबारी कसावयासी हुकूम केला आहे."

या सर्व मजकुरावरून दर्याबाईची हिंमत व तिच्या शब्दाला दरबारात असलेला मान यांच्या जोडीनेच सरदारांना वळवून घेण्यात तिने दाखवलेली हिकमत व चतुराई यांचाही प्रत्यय येतो. तिचे हे गुण नंतर तिने बारभाईंशी केलेल्या बोलण्यातही दिसून येतात.

नागपूरकर भोसल्यांपैकी दर्याबाई व दुसरा रघूजी यांच्या जोडीनेच साबाजी भोसले यालाही आपल्याकडे वळवून घेणे बारभाईंना आवश्यक वाटत होते, व त्यासाठीही त्यांनी दर्याबाईमार्फत्तच प्रयत्न केले. या संबंधात त्रिंबकराव पेठे यांनी सखारामबापू, मोरोबा फडणीस, हरिपंततात्या फडके यांना पत्रे लिहिली आहेत. त्यावरून दर्याबाईंचे भोसल्यांकडचे महत्त्व व त्या महत्त्वाचा बारभाईंनी आपली बाजू बळकट करण्यासाठी करून घेतलेला उपयोग यांची कल्पना येते.

"मातुश्री दर्याबाईला युक्तीप्रयुक्तीने लिहून ती रघूजीबरोबर वराडात जात असताना आपल्याकडे बोलावून घेतले. हेतू ह्या की – 'तिजला मायेत शिरून मायेत घ्यावीं', म्हणजे साबाजी भोसल्याची चिंता जाऊन उपयोगी पडतील," (पे. द. ५.१२).

"राजश्री सोनासाहेब सुभे श्रीमंती केले त्यास मातुश्री दर्याबाईसुद्धा आपले लगामी क्रिया शपथपूर्वक लाऊन घेऊन फौजसुद्धा काल घेतले – मातुश्री दर्याबाईने सर्व दौलतेचा याख्तियार आम्हावरच ठेविला", (२४).

"राजश्री रघूजी भोसले सोनासाहेब सुभे व मातुश्री दर्याबाईही युक्तीने आणून साबाजी भोसले नाना त्याची याची भेट परस्परे रहस्ये करून जाहिरान्यात गोड केला", (२५).

पण इतक्या सर्व खटपटी करून दर्याबाईला आपल्या बाजूने वळवून घेतल्यानंतर, तिच्या फौजेचा वापर करण्याच्या वेळेस तिने बारभाईंना बऱ्याच अटी घातल्या. त्या त्यांना मानवण्यासारख्या नव्हत्या. या संबंधीचे एक पत्र म. इ. सा. या राजवाडे संपादित ग्रंथाच्यां (शके १६८३-१७३९) या खंडात वाचायला मिळाले. त्यातला मजकूर असा –

"येथे राजश्री हरिपंत तात्यानी दर्याबाईचे प्रकार तीन चार शकला काहाडल्या होत्या की एक प्रकार की कोणेही प्रकारे राजश्री नानास व बाईस एक करून द्यावे दुसरे बाईंनी फौज आपली आम्ही सांगू तिकडे तैनात करून द्यावी आणि आपण तीन चारसे राऊतानिशी आपले गोटात येऊन रहावे तिसरा प्रकार बाईंनी तीनसे स्वारानिसी आपण पुरंदरास जावे फौज येथे ठेवावी अगर फोडूनफाडून आपण सांगू त्याप्रमाणे तैनातीस द्यावी त्यास या तिही गोस्टीतून एकही प्रकार त्याजकडून घडत नाही एक होणे तेव्हा टिक्का चिरंजीवाच्या नावाचा असावा म्हणतात लोक तैनातीस देऊन आम्ही तीनसे स्वारानिसी कैसे रहावे लोक तैनातीस कैसे जातील ऐसे म्हणतात पुरंदरास जाणे उचित परंतु तीनसे स्वारानिसी जाणे कैसे घडेल घाटगे, निंबाळकर, घोरपडे, मान्ये, जाधव वगैरे हे आमचे मानपुरुष हे तर समागमे घेतले पाहिजेत दोन आडीच तीन हजार निदाने समागमे येतील ते घेऊन जा म्हणाल तरी जातो वऱ्हाडची पथके आहेत ती येथे ठेवतो ऐसे उत्तर जाले त्यान तीनी उत्तरे कठीणच पुरंदरास तीन हजारानिसी रवाना करणे सग नाही व जातील हा भरवसा नाही मार्गातून गच्छ केल्यास काय करावे समागमे आपली फौज द्यावी तरी निवडक फौज तीन हजारास यांची सहा हजार असेल तेव्हा उपयोगी नाहीतर ठीक नाही ऐसे आहे त्यास अद्यापि निश्चय बाईचा होत नाही त्यामुळे आपले फौजेतील लोकांची खातरजमा पुरवत नाही फितुरी फौज समागमे घेऊन बाहेर जाणे उत्तम नाही ऐसे सर्वां सर्वत्र म्हणतात..."

या सर्व मजकुरावरून दुसरा रघूजी हा नामधारी होता व फौजेचे खरे अधिकार दर्याबाईचे हाती होते असे दिसते.

दर्याबाई भोसलेसंबंधी अधिक माहिती मिळू शकली नाही. या प्रकरणी अखेरीस दर्याबाई व बारभाई यांच्यात काय ठराव झाला, तेही कळू शकले नाही. पण दर्याबाईच्या धाडसीवृत्तीची, दराऱ्याची आणि मुत्सद्देगिरीची ओळख पटवायला, हे एक उदाहरण पुरेसे आहे.

## ५ – उमाबाई दाभाडे

मराठेशाहीच्या इतिहासामध्ये ज्या काही लढवय्या मराठा स्त्रियांची नावे आढळतात, त्यात उमाबाई दाभाडे यांचे नाव महत्त्वाचे आहे.

उमाबाईसंबंधी पूर्ण चरित्रात्मक व तपशीलवार माहिती मिळू शकली नाही. पण त्यांचे कर्तृत्व ज्याप्रसंगी दिसून आले, तेवढी माहितीही त्यांचे महत्त्व कळायला पुरेशी होऊ शकते.

उमाबाई ही खंडेराव दाभाडे यांची बायको, दाभाडे घराणे हे शिवाजी महाराजांच्या काळापासून मराठ्यांच्या सैन्यात होते. खंडेराव दाभाडे यांना राजाराम महाराजांनी सेना खासखेल ही पदवी दिली होती. खंडेराव दाभाड्यांनी नंतर थोरल्या शाहू महाराजांच्या काळातही मराठ्यांच्या गादीची सेवा केली. मराठ्यांच्या राज्याच्या सीमा महाराष्ट्राच्या बाहेर पसरवण्याचे कार्य पहिल्या बाजीरावाने माळव्याच्या दिशेने सुरू केले, तर त्याचवेळी हे कार्य खंडेराव दाभाडे गुजराथच्या दिशेने करीत होते.

खंडेराव दाभाडे यांना डभोईच्या लढाईत १७३१ साली मृत्यू आला. त्यावेळी त्यांचे मुलगे यशवंतराव व बाळूराव हे अल्पवयीन होते. तेव्हा खंडेरावाची पत्नी उमाबाई पुढे झाली, व तिने दाभाड्यांच्या सेनेचे अधिपत्य केले. अमदाबादच्या स्वारीमध्ये ती स्वतः हत्यारबंद होऊन व हत्तीवर स्वार होऊन लढाईत सामील झाली होती. तिची कामगिरी पाहून शाहू महाराजांनी सेनापति व सेना खासखेल या दोन्ही पदांचे अधिकार तिला दिले. या संबंधात शाहूने लिहिलेले एक पत्र वाचण्यात आले. या पत्राची पार्श्वभूमी अशी की दाभाड्यांनी जिंकलेल्या गुजराथच्या मुलखात उमाबाईची सून अंबिकाबाई रहात असे, व स्वतः उमाबाई दाभाड्यांचे वतनाचे गाव पुण्याजवळचे तळेगाव दाभाडे इथे रहात असे. अंबिकाबाईच्या मनात काही राजकीय महत्त्वाकांक्षा निर्माण झाली, व तिने गुजराथमधे स्वतःची स्वतंत्र फौज ठेवायचे ठरवले. दाभाड्यांचे गुजराथमधले कारभारी गायकवाड हे होते, आणि या गायकवाडांकरवी खुद्द पेशव्यांनीच अंबिकाबाईला चिथावले होते. उमाबाईला या कारवायांचा सुगावा लागला, तेव्हा तिने तडक शाहू महाराजांकडे दाद मागितली व अंबिकाबाईच्या कारवायांना आळा घालण्याची विनंति केली. यावर शाहूने हे पत्र लिहिले आहे – "सौभाग्यवती अंबिकाबाई दाभाडे यांस आज्ञा केली ऐसीजे. सेनापती व सेना खासखेल या दोन्ही मामल्यांचा आख्तियार स्वामीनी गंगाजल निर्मल उमाबाई दाभाडे याजवर दिला आहे आजतागाईत त्यांच्या वतनदारीवर कित्येक प्रकारे स्वामीनी बरदास्त करून आजपर्यंत चालविले पुढे चालविल्यास त्यांचीच तुम्ही सर्वांनी त्यांच्या आज्ञेत चालावे."

त्यानुसार दाभाड्यांची सरदारी उमाबाईच चालवित होती. दरम्यान तिचा मुलगा यशवंतराव वारला, व नातू त्रिंबकराव मोठा झाला, परंतु सर्व अधिकार उमाबाईकडेच होते.

शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या गादीचा अधिपति झालेला रामराजा केवळ नामधारी राजा ठरला. सत्तेचे राजकारण नानासाहेब खेळू लागले. कारभारावर आपली पकड

बसवण्यासाठी राज्यातल्या महत्त्वाच्या सरदार मंडळींची आपल्या बेताप्रमाणे व्यवस्था लावण्याचा त्यांचा विचार होता. उमाबाई दाभाडे ही या महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक होती. शाहू हयात असतानाच नानासाहेबाने एकदा उमाबाईला डिवचून पाहिले होते. त्यावेळेस त्याचे फारसे चालले नाही. आता त्याने स्वतःच्या अधिकारात दाभाड्यांच्या ताब्यातला गुजराथचा काही भाग काढून घेऊन तो गायकवाडाला देण्याचे ठरवले. उमाबाईचे महत्त्व कमी करण्यासाठी हा बेत त्याने आखला होता. आपल्या अमलाखालचा मुलुख उमाबाई सहजासहजी जाऊ देईल, हे शक्य नव्हते. पण राज्य अखेर महाराजांचे होते, व महाराजांचा कारभार नानासाहेब पहात होते. त्यामुळे उमाबाईंनी नानासाहेबाशी सामोपचाराची बोलणी सुरू केली.

नानासाहेबांनी आपला मुलुख घेण्याऐवजी दरवर्षी आपल्याकडून पैसा घ्यावा, असे उमाबाईचे म्हणणे होते. ते अर्थात् नानासाहेब मान्य करीत नव्हते. हा प्रश्न वाटाघाटीने सुटेल यासंबंधी दोन्ही पक्षांना शंका होती. उमाबाई एकीकडे बोलणी चालू ठेवीत, पण आपला विचार पक्का ठेवून लढाईची तयारी करीत होती. नानासाहेबही त्या तयारीत होता. उमाबाईशी बोलणी करायला साताऱ्याहून नाना पुरंदरे व गोविंदराव चिटणीस या मुरब्बी मंडळींना बोलावण्याचे नानासाहेबाच्या मनात होते, यावरून उमाबाईचे त्याला वाटणारे महत्त्व कळून येते. उमाबाई स्वतःच्या बाजूने एकटीच बोलणी करीत होती असे दिसते.

उमाबाईबरोबरच्या वाटाघाटींच्या संबंधात नानासाहेबांनी नाना पुरंदरे यांना लिहिलेली दोन-तीन पत्रे वाचण्यात आली (पु. द. १.२३९,२५६,२६५). त्यात ते लिहितात – "इकडील वर्तमान तर मातुश्री उमाबाई बुधवारी भेटीस आली भेटी झाली ते वृत्त तुम्हास लिहिलेच आहे बोलीचालीचा खुलासा तरी त्याच्या चित्तास दाहा पाचा लक्षावरि आमची समजावीस होईल तर करावी नव्हे तरी गैर कबजी मुलुख आम्हास दाखवावा सुरत गुजरात अमली मुलखात काही देऊं नये इकडे बोलीचा प्रसंग पाडावा फौजेचीही तरतूद करितात यैसी दो विचारावर आहेत याचा आमचा तह बनतो असा अर्थ नाही व बुधीचेही वाटेने तह होईल हा विचार दिसत नाही या प्रसंगी तुम्हास येथे बोलवावे उमाईसी तुम्हास बोलावयास लावावे असे चितात होते परंतु तेथील कारभार नवा राजश्री तेथे आले आहेत आंईसाहेब गडावर आहेत... कसकसा विचार तेथील होईल यास्तव तुम्हास बोलाविले नाही जरी तुमच्या विचारे इकडे आलेतर फिकीर नाही असे असेल तर... तुम्हास व राजश्री गोविंदराव यास उमाबाईसी बोलवायास बोलविले जाईल..."

या नंतरच्या पत्रात नानासाहेब कळवतात – "उमाबाईकडील कारभार तर अगोदर पैक्याच्याच गोष्टी सांगत होते त्या आम्ही मान्य न केल्या यंदाचा मात्र पैका घ्यावा पुढे मुलूख वाटून घ्यावा ते गोष्ट त्यास मान्य जाली नाही... चऱ्होलीस कूच करून चिखलीस आले येथून पाच कोस तळेगाव आहे तेहि युद्धाच्या तरतुदेत आहेत गावाचा आश्रा करून आसेत उमाबाईची बोली आद्याप तुटली नाही... येथून उमाबाई गेली ती मात्र तळेगावी आहेत फौज पाच हजार आह ते इंदूरीचे व इंद्राणीचा डोह आहे त्याचे आश्रियाने अडचणीत राहिली आहे उद्या सेनापति उमाबाई आली तर तह होईल नाहीतर श्रीकृपेने पारपत्य करीत आहो..."

उमाबाई दाभाडे प्रतिपक्षातली असली तरी ती स्त्री आहे, वगैरे विचार नानासाहेबांनी

बाळगलेला दिसत नाही. उमाबाई जबरदस्त ताकदीची बाई होती, व नानासाहेबही तिला शत्रु म्हणून का होईना पण बरोबरीच्या नात्याने वागवत होते असे दिसते.

अखेरीस उमाबाईने सर्व सारासार विचार करून नानासाहेबाशी तह करण्याचे ठरवले. तहात काय ठरले याबद्दल नानासाहेब नाना पुरंदऱ्यांना लिहितात – "दाभाडियाकडील तह मुलकावरच ठहरला निमे मुलुख व निमे ठाणी चांगली वाईट त्याणी आम्ही वाटून घ्यावी मुलकात आमचा आमलदार कमाविसदार बैसोन सुरळित आमल चालतो राजश्री त्रिंबकराव दाभाडे, दमाजी गाईकवाड याचा पुत्र व उमाबाई व अंबिकाबाई यांनी आमच्या लस्करात असावे असा करार जाला आहे..."

१७३१ साली खंडेराव दाभाडे डभोईच्या लढाईत वारले, ती त्यांची लढाई बाजीराव पेशव्यांशी झाली होती. गुजरातच्या वसूलीवरून त्या दोघांचे वैमनस्य आले होते. नंतर शाहू महाराज असेपर्यंत दाभाडे व पेशवे यांचा प्रत्यक्ष कलह झाला नाही. शाहू महाराज वारल्यानंतर नानासाहेबाने पुन्हा या प्रकरणाला हात घातला. १७५० साली, म्हणजे खंडेराव वारल्यानंतर सुमारे वीस वर्षांनी उमाबाईने पेशव्यांशी तह करून गुजरातेतला मुलुख पेशव्यांना दिला. नानासाहेबाशी मुकाबला करणे कठीण आहे, असे उमाबाईला जाणवले आसावे. हा तह बरोबरीच्या नात्यातून झाला आहे, असे दिसते, तरी त्यानंतर दाभाड्यांचे मराठेशाहीतले महत्त्व ओहोटीला लागले. नानासाहेबाचा हेतू साध्य झाला.

उमाबाईची अखेरची वर्षे कशी गेली ते समजू शकले नाही.

आपण शर्थीने सांभाळलेले आपले वैभव आपल्या डोळ्यादेखत लयाला गेलेले पाहणारी सरदार खंडेराव दाभाड्यांची शूर पत्नी उमाबाई ही शाहूच्या मृत्यूनंतरच्या, नानासाहेबाच्या राजनीतीचा सुरुवातीचा बळी ठरली.

## ६ – दर्याबाई निंबाळकर

दर्याबाई निंबाळकरबद्दल फारशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, पण अठराव्या शतकाच्या इतिहासात एका महत्त्वाच्या घटनाक्रमाच्या संदर्भात तिचे नाव वाचायला मिळाले. त्यात तिच्याबद्दल जो मजकूर आहे त्यावरून त्या विशिष्ट परिस्थितीत नानासाहेब पेशव्यांना ती एक Formidable व्यक्ती वाटत होती, असे दिसते.

थोरले शाहू महाराज निपुत्रिक असल्यामुळे गादीला वारस म्हणून कोणाला दत्तक घ्यावे, याचा विचार चालू झाला. त्यावेळी ताराबाईने जाहीर केले की तिचा नातू रामराजा हा शिवाजी महाराजांच्या वंशातला व त्यांचा पणतूच असल्याने त्याला दत्तक घेणे योग्य होईल. या नातवाला आपण तो तान्हा असल्यापासून पानगावला त्याच्या बहिणीकडे त्याचे रक्षण व्हावे व सांभाळ व्हावा म्हणून ठेवले होते, असेही ताराबाईने सांगितले. शाहूने त्याला संमती दर्शवली. मात्र शाहूच्या राण्यांचा ह्या दत्तकाला विरोध होता, कारण त्यामुळे ताराबाईचा वरचष्मा झाला असता. त्यामुळे शाहूने दत्तक घेतलाच नाही. पुढे शाहूच्या मृत्यूनंतर नानासाहेबांनी समारंभपूर्वक पानगावला माणसे पाठवून रामराजाला आणले. त्याच्या बरोबर त्याचा जिने इतकी वर्षे प्रतिपाळ केला ती त्याची बहीण दर्याबाई निंबाळकर हीदेखील होती. हा दर्याबाई निंबाळकरचा मराठे शाहीच्या रंगमंचावरचा प्रवेश होय.

रामराजाला गादीवर बसवावे असे सुचवताना ताराबाईचा अंतस्थ हेतू असा होता, की तो आपला नातू, व आपण पुढे आणले म्हणून तो राजा झाला, तेव्हा तो आपल्या कह्यात राहील, व आपल्या म्हणण्याप्रमाणे वागेल. प्रत्यक्षात रामराजा स्वतंत्रपणे कारभार करण्याची इच्छा धरू लागला. इतकेच नव्हे तर दर्याबाईच्या सल्याने त्या दोघांनी मिळून इतरांकडून शपथप्रमाण देणेघेणे करून घेतले (पे. द. ६.४४).

इकडे पेशव्यांनाही ताराबाईचा वरचष्मा नको होता. म्हणून त्यांनी रामराजाला स्वतंत्रपणे हाताशी धरले व त्याला कारभाराच्या गोष्टी समजावल्या. त्यावरून ताराबाई नाराज होऊन सिंहगडावर जाऊन राहिली, वगैरे कथाभाग आपण यापूर्वी ताराबाईच्या प्रकरणात पाहिलाच. ताराबाई व रामराजा यांच्याशी एकत्रितपणे बोलणी करण्याचा प्रस्ताव पेशव्यांनी मांडला, तेव्हा राजाने यां भेटीसाठी पुण्याला गेलेले बरे, असा सल्ला दर्याबाईने त्याला दिला.

रामराजाला दर्याबाईने तो तान्हा असल्यापासून जपले होते. आता तो अचानक पानगावासारख्या अज्ञातवासातून एकदम मराठेशाहीच्या रंगमंचावर मध्यभागी आणून ठेवला गेला होता. या सर्व नव्या लोकांत, नव्या परिस्थितीत व Hostile वातावरणात त्याला दर्याबाई हीच एक माहितीची, जवळची, आपली म्हणण्यासारखी व्यक्ती होती. तेव्हा त्याला तिचाच आधार वाटणे, व तिला त्याच्या हितरक्षणाची जबाबदारी व कळकळ वाटणे साहजिकच होते.

आपण राजे झाल्यावर आपली बहीण दर्याबाई हिला वतन व सरंजाम मिळावा, अशा रामराजाची इच्छा होती. तशी त्या काळची पद्धतही होती. सरदार-वतनदारांच्या घरी मुली दिल्यानंतर मुलींच्या माहेरच्या मंडळींना वतने-सरंजाम मिळत असत – जसे पेठे, रास्ते इत्यादींना मिळाले. त्याप्रमाणे, सरदार-वतनदारांच्या बहिणी-मुलींनाही चोळी-बांगडी म्हणून वतने देण्यात येत असत – जसे पेशव्यांनी अनुबाईला दिले. त्यामुळे रामराजाची बहीण म्हणून दर्याबाईला काही नेमणूक मिळावी, या अपेक्षेत गैर काहीच नव्हते. परंतु नानासाहेब पेशव्यांचा या गोष्टीला विरोध होता. 'दर्याबाई फार न वाढवावी' हे त्याचे धोरण होते. या संबंधात नानासाहेब पेशव्यांनी नाना पुरंदरे यांना लिहिलेली दोन पत्रे वाचण्यात आली. ही पत्रे पुरंदरे दप्तरांतली आहेत. पहिल्या पत्रात ते लिहितात – "राजे येंक दर्याबाईचे हातास सरंजाम आला पाहिजे यास्तव मात्र नरम गोष्टी सांगतात आम्ही फतेसिंगासी बोलत आले (त्याच सरंजामाबद्दल) त्याची गत काये करावी चारी अर्थ मनात मनन करून तोटा नफा समजून पायासुद केले पाहिजे वरवर नरमगरम कामाचे नाही नवा सरंजाम दर्याबाईस न द्यावा असे पुर्ते मनात आहे साहेब तो दर्याबाईपुढे गोसावी येथेच होऊन कासीस जाणार ऐसे पेच फार आहेत."

दर्याबाईला सरंजाम न दिल्यास रामराजा संतापाने डोक्यात राख घालून घेईल, असे नानासाहेब म्हणतात, व दर्याबाईला सरंजाम द्यायचा नाही हे तर त्यांनी पक्के ठरवलेले. सरंजाम देऊन राज्यात तिचे स्थान पक्के झाल्यास व महत्त्व वाढल्यास ती कारभारात आणखी ढवळाढवळ करील, ताराबाईशी गुंतागुंत वाढेल, आपलीही डोकेदुखी वाढेल, तेव्हा युक्ती-प्रयुक्तीने, व 'नाही' म्हणतो आहे असे न भासवता, सरंजाम देऊ नये असा नानासाहेबाचा विचार दिसतो. या विषयीच्या दुसऱ्या पत्रात नानासाहेब लिहितात – "नवा सरंजाम सहसा देणार

नाही असा विचार ठहराऊन बीड वगैरे तमाम सरंजाम जुना जप्त करविला जुना आडकल म्हणजे नवा मागावयाचा राहून जुना मात्र करार तुम्हापासी रदबदली करून करार करून घ्यावा या डौलाने बंद केला आहे हे वर्तमान त्यास कळलेच असेल याचा विचार काये त्यानी आपले जागा केला आहे तो लिहिणे दुसरा येक प्रकार तुमचे मुदसदगिरीचे प्रकाराचा राजे वरकड सर्व आईकतच आसले येक दर्याबाईचे सरंजामाची अड त्यास हा दसरा जाऊन पुढील दसरा येईतो-पावेतो सरंजाम मागू नये तूर्त त्यासी तुम्हासी बिघडले आहे हे ती उत्तम प्रकारे चालू लागली म्हणजे आमचे संतोषास येऊन पुढले वर्षी सरंजाम देऊ... ऐसा प्रकार मध्यस्तीने तुमचे मते बोलल्यास निकाल पडतो वरकड चालता गाडा होतो ऐसे दिसेल तर लटके बोलून एके वर्षावर नेणे पुढे जसा प्रसंग पाहून तसे करू हा प्रकार आमचे बोलाविल्याने बोलला ऐसे नसावे हे आशीर्वाद."

इतकी मुत्सद्देगिरी ऊर्फ खोटेनाटेपणा करून व नाना शकला लढवून नानासाहेबाला दर्याबाईचा सरंजाम थोपवून धरणे आवश्यक वाटते त्या अर्थी ती तत्कालीन राजकारणात काहीशी Heavy Weight असावी.

वरची दोन्ही पत्रे १७५० च्या ऑगस्ट महिन्यातली आहेत. सरंजामाचा निर्णय वर्षभर पुढे ढकलून मग वेळ येईल त्याप्रमाणे नानासाहेब पुढची पावले उचलणार होते. पण पुढच्या सहा महिन्यांतच या दर्याबाई प्रकरणाचा शेवट झाला, असे कागदपत्रांवरून दिसते.

नानासाहेबांची नाना पुरंदऱ्यांना दर्याबाईच्या सरंजामाबद्दल पत्रे गेली, तशीच पुरंदरेही नानासाहेबांना साताऱ्याहून पत्रे पाठवीत होते की दर्याबाईला सातारच्या कारभारातून काढून लावल्याखेरीज परिस्थिती सुधारणार नाही (पे. द. ६.८९ व ९०).

सातारच्या दरबारातील एकूण पेशवे, ताराबाई या मंडळींचा रागरंग बघून शेवटी दर्याबाईने स्वतःच तिथून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या संबंधी (पु. द. १.२९२ जाने. १७५१) नोंद सापडते ती अशी – "मातुश्री आईसाहेब दगा रातबिरात करितील हा वसवास दर्याबाईनी खाऊन आपले लस्करात गेली पानगावास जातात त्यास वस्त्रे हती घोडे खर्चास देऊन रवाना करण म्हणोन राजश्रींनी सांगोन पाठवले त्याजवरून सर्व कारभारीसुधा गेले वस्त्रे दर्याबाईंनी घेतली नाही..."

वस्त्रे देऊन पाठवणी करणे ही पूर्वीची बहुमान करण्याची रीत होती. आपण जातो आहोत ते बहुमानाने नसून अपमानित, अवांछित झाल्यामुळे अशी दर्याबाईची भावना होती, असे तिने वस्त्रे स्वीकारायला नकार दिला त्यावरून वाटते.

दर्याबाई जाणार म्हटल्यानंतर रामराजा तिला म्हणाला – "बया तू जाऊ नको तुला कोण काय करतो ते मी पाहीन." पण त्याच्या या बोलण्यात कितपत दम आहे, याची दर्याबाईला कल्पना आली होती. तिने त्याला म्हटले आहे – "आपण दौलत नव्हतीसी नाही राज्या तुझे बरे व्हावे, तुजला सिकवावे म्हणून मी आलो सेवट माझी तुझी तूट पडली याउपरी मजला रहाणे व तुजला ठेवणे उचित नाही जर ठेविसील तर तूही जिवानिसी जाशील, व मजलाही गाढवावर बसोन फिरवशील."

इथे दर्याबाईचा मराठ्यांच्या राजकारणाशी असलेला संबंध संपलेला दिसतो. या नंतर ९-

१० वर्षांनंतरचे १७६० च्या जानेवारीतले तिचे एक पत्र पहायला मिळाले. ते तिने विश्वासरावाला (हा नानासाहेबांचा मोठा मुलगा तर नव्हे?) लिहिले आहे. आपल्या जहागिरीला होणाऱ्या उपसर्गाचे निवारण करण्यासाठी, व आपल्या मुलाच्या सरदारीचा बंदोबस्त करण्यासाठी त्या मुलाच्याच हाती हे पत्र पाठवले आहे.

ही जी काही थोडीशी माहिती दर्याबाईबद्दल वाचायला मिळाली, त्यातून दर्याबाई ही एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती, व राजकारणाच्या पटावरून बरेच डावपेच लढवून तिला बाहेर काढून टाकण्याइतके तिचे राजकारणातले महत्त्व नानासाहेबांना जाणवले होते असे दिसते.

ताराबाईने दर्याबाईकडे सांभाळायला पाठवलेला राजारामाचा नातू व शिवाजी महाराजांचा पणतू आज ना उद्या कोल्हापूर किंवा सातारा, कुठल्यातरी गादीवर बसण्याची शक्यता अगदीच नव्हती असे नाही. किंबहुना तशी शक्यता गृहीत धरूनच ताराबाईने त्याला संभाव्य शत्रूंपासून लपवले होते. त्यामुळे रामराजाला पेशव्यांनी समारंभाने साताऱ्याला आणले, व त्याच्याबरोबर आपल्यालाही आणले तेव्हापासूनच दर्याबाईच्या मनात काहीतरी विचार खेळत असले पाहिजेत. रामराजा गादीवर आल्यावर त्याने व दर्याबाईने मिळून स्वतंत्रपणे काही सरदारांचे शपथप्रमाण घेतले, व देणेघेणे केले, यावरून तिच्या मनातल्या विचारांचा रोख समजायला मदत होते. तो रोख नानासाहेबांना व ताराबाईलाही समजला, असे दिसते. पण दर्याबाईला नानासाहेबाच्या खमकेपणाची कल्पना नसावी, तसेच ताराबाई रामराजावर अंकुश ठेवायचा प्रयत्न करील व इतक्या म्हातारपणात देखील तिचा सत्तापिपासूपणा टिकून राहिलेला असेल, असेही तिला वाटले नसावे. त्यामुळे पानगावाहून रामराजाबरोबर साताऱ्याला येताना, त्याला हाताशी धरून त्याच्याकडून आपण कारभार करवावा, असा हेतू जो तिने मनाशी योजला होता, तो सफल होऊ शकला नाही. रामराजा तिला बळकटी पुरवू शकत नव्हता, व ताराबाई आणि नानासाहेब या दोघांच्या एकीकडून आक्रमक व दुसरीकडून मुत्सद्दी डावपेचांना तोंड देऊन पाय रोवून उभे रहाणे आपल्या शक्तीबाहेरचे आहे, हे तिला अखेरीस समजले.

## ७ – लक्ष्मीबाई आंग्रे

लक्ष्मीबाई आंग्रे या इतिहासप्रसिद्ध मराठा आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे यांच्या पत्नी होत. राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईने ज्या जुन्या सरदारांकडून इमानप्रमाणाच्या शपथा घेववल्या होत्या, त्यांत कान्होजी आंग्रे यांचाही समावेश होता. कान्होजीला ताराबाईने सेनाखासखेल ही पदवीही दिली होती. शाहू दक्षिणेकडे परत आल्यावर आपले राज्य स्थापण्याच्या दृष्टीने त्याने मराठेशाहीच्या जुन्या सरदारांशी संपर्कसाधले त्यांत त्याने कान्होजीकडे आपले पेशवे बहिरोपंत पिंगळे यांना पाठवले. कान्होजीचे इमान ताराबाईकडे असल्याने त्याने पिंगळयांना कैदेत टाकले. पिंगळयांची सुटका बाळाजी विश्वनाथाने मुत्सद्देगिरीने करवून आणली, व कान्होजीलाही शाहूच्या बाजूला वळवले.

पुढे बाळाजी विश्वनाथ पेशवे झाले. त्यांना, व त्यांच्यानंतर बाजीराव बाळाजी ऊर्फपहिले बाजीराव यांनाही कान्होजीच्या आरमाराचा आधार होता. कान्होजी आंग्रे १७२९ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर कान्होजींची पत्नी लक्ष्मीबाई हिचा आरमारी हालचालींबाबत बाजीरावाशी

पत्रव्यवहार होत असे. बाजीरावाचीही तिला त्याबाबत पत्रे जात असत. १७३३ साली लिहिलेल्या चार-पाच पत्रांमध्ये (पे. द. ३) लक्ष्मीबाईने बाजीरावाला जंजिराच्या मोहिमेबद्दल, व त्यासाठी आंग्र्यांनी केलेल्या तयारीबद्दल तपशीलवार माहिती दिली आहे. तसेच एक पत्र (क्र. ३३) बाजीरावाच्या पत्राचे उत्तर म्हणून पाठवले असून, मोहिमेसंबंधी "जे गोष्ट आपले चित्ती तेच आमची चित्ती" अशी त्याची खातरजमाही करून दिली आहे. या मोहिमेसंबंधी आणखी एका पत्रात (क्र. २२) तर प्रतिपक्षाचे डावपेच उलगडून सांगणारे स्वतःचे मतही लक्ष्मीबाईने नोंदवले आहे – "ऐसे लौकिक अर्थे म्हणतो परंतु बारकाईने खबर घेता त्याचे मनातील अर्थ ऐसा असे की" असे म्हणून फक्त लढाईच्या नव्हे तर मुत्सद्देगिरीच्या क्षेत्रातला तिचा विचारही तिने सांगितला आहे. या सर्व पत्रांचा एकूण आविर्भाव हा बरोबरीच्या नात्यातून झालेला पत्रव्यवहार आहे, असे दर्शवतो. त्यात सेव्य-सेवक भाव नाही, तर मित्रत्त्वाची भागीदारी आहे.

या नंतरची ६/७ पत्रे लक्ष्मीबाईच्या व्यक्तिमत्त्वावर आणखी प्रकाश टाकतात. ही सर्व पत्रे (क्र. ८०, ८१, ८६, ९१, ९७, ९९) लक्ष्मीबाईचा मोठा मुलगा सेखोजी यांच्या मृत्यूशी संबंधित आहेत. सेखोजी मृत्यू पावल्याची वार्ता बाजीरावाला कळवून, मग सेखोजीच्या क्रियेसाठी धाकटा मुलगा मानाजी याला बोलावून घेतले व मानाजीची जागा घ्यायला दोन माणसे पाठवली आहेत, अशी व्यवस्था केल्याचे तिने बाजीरावाला कळवले आहे. त्यानंतरच्या पत्रात, मानाजी भावाच्या क्रियेसाठी आल्यामुळे त्याच्या जागी पाठवलेला रघुनाथजी "लोकांची समाधाने करून गनिमासही नतीजा देतील आपण कोणे गोष्टीची चिंता न करावी" असे लिहिले आहे. बाजीरावाने तिला लिहिलेल्या सांत्वनपर पत्राचे उत्तर मुळातूनच वाचण्यासारखे आहे –

"येशास होणारे प्रसंग ते समई होतच आहे ते गोष्टीचा खेद अवलंबियाने सिधि काय? दुखाचे परिमार्जन करून पूर्वीपासून लौकिक संपादिला आहे त्याचे रक्षण करावे हाच स्वधर्म आहे यास्तव पुत्रशोकाचे दुःख अपहारून तमाम किलेकिल व मुलकामधे जागजागा जमाव आहेत त्यास समाधानपत्रे पाठवून आवधियाचे मनोधारण केले असे आपण चिंता न करावी."

वीरमातेच्या भूमिकेला अनुसरून लक्ष्मीबाईने स्वतःचा पुत्रशोक बाजूला सारला, आरमारातले लोक सैरावैरा होऊ नयेत म्हणून त्यांच्या समाधानाची व्यवस्था केली, आणि पेशव्यांनाही आता आरमाराचे काय होणार, या चिंतेतून सोडवले. आपल्या हाताखालच्या लोकांचे आपण पालक आहो, त्याचप्रमाणे पेशव्यांना साथ देणे हे आपले कर्तव्य आहे अशी जबाबदारीची भावना बाळगून लक्ष्मीबाईंनी आपले वैयक्तिक पेलले आहे.

बाजीरावाच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशवे झाले. त्यानंतर काही वर्षांनी शाहू महाराजांचा मृत्यू झाला, व कारभाराची सूत्रे नानासाहेबाच्या हाती पूर्णपणे आली. मराठ्यांचे काही जुने सरदार आणि नानासाहेब यांच्यामध्ये कुरबुरी सुरू झाल्या. त्यात सरदारांना पेशव्यांच्या हाती सत्ता जाणे पसंत नव्हते, की नानासाहेबांना आपले आसन बळकट करण्याच्या दृष्टीने सरदारांचे महत्त्व कमी करायचे होते, हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. कदाचित् दोन्ही घटक एकाच वेळी काम करत असण्याची शक्यता आहे. त्यानुसार दाभाड्यांचे महत्त्व नानासाहेबाने कमी केले. हे

आपण पाहिले. त्याचप्रमाणे तुळोजी आंग्रेचाही बीमोड नानासाहेबाने केला. त्यासाठी इंग्रजांची मदत घेतली ही १७५६ सालची घटना होती. तुळोजी आंग्रे हा लक्ष्मीबाईचा नातू होता.

लक्ष्मीबाई १७५८ साली वारली. तिने मृत्यूपूर्वी लिहिलेले एक पत्र वाचण्यात आले (पे. द. २४.१९८). हे पत्र तिने रामाजीपंत सुभेदार या व्यक्तीला लिहिले आहे. आपल्या नातवाला आपण श्रीमंतांच्या पदरी घातले आहे व त्याला रामाजीपंतांचा सर्व प्रकारे आश्रय करून दिला आहे अशा अर्थाचा मजकूर त्यात आहे.

लक्ष्मीबाईने आपल्या दीर्घ आयुष्यात आपला नवरा आणि तिन्ही मुलगे यांचे मृत्यू पाहिले. पतीच्या कारकीर्दीत तिने आंग्र्यांच्या आरमाराचा दिमाख पाहिला, तर नातवाच्या कारकीर्दीत त्याच आरमाराचा संपूर्ण बीमोड झालेलाही पाहिला. पण तिच्या मनाचा तोल परिस्थितीमुळे ढळलेला दिसत नाही. या अभ्यासात पाहिलेल्या बहुतेक मराठा स्त्रिया लढाऊ बाण्याच्या आहेत. त्यात लक्ष्मीबाईचे विधायक व्यक्तिमत्त्व वेगळे उठून दिसते.

## ८ - लक्ष्मीबाई शिंदे

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातली मराठेशाहीतली एक घटना शिंदेबायांचे बंड या नावाने प्रसिद्ध आहे. या बंडाची म्होरकी बाई लक्ष्मीबाई शिंदे ही पेशवाईतले प्रसिद्ध मराठा सरदार महादजी शिंदे यांची थोरली पत्नी होती. लक्ष्मीबाई व महादजीच्या इतर बायका लष्करातच रहात असत.

महादजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा दौलतराव शिंदे हा सेनापति झाला. हा दौलतराव लक्ष्मीबाईचा सावत्र मुलगा होता. त्याचे व तिचे पटेना. लक्ष्मीबाईला स्वतःचे अधिकार हवे होते. तेव्हा लक्ष्मीबाईने शिंद्यांच्या फौजेतली काही फौज व मुजफ्फरखान या नावाचा सरदार यांना आपल्या बाजूने करून घेतले व ती वेगळी झाली. त्यावर दौलतराव शिंदे याने आपला सासरा सर्जेराव घाटगे, व आणखी एक सरदार फकीरजी गाढवे यांना लक्ष्मीबाईवर चाल करून पाठवले. या लढाईत दौलतरावाच्या पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे त्यानंतर शिंद्यांकडचे आणखी दहा सरदार आपल्या फौजेसह लक्ष्मीबाईला येऊन मिळाले. थोडक्यात पेशव्यांचे जुने सरदार शिंदे यांची एक पर्यायी फौज तिच्या अधिपत्याखाली तयार झाली. ही फौज सुमारे वीस हजार होती. लक्ष्मीबाईने या फौजेनिशी मुलखात हिंडून खंडण्या गोळा करायला सुरुवात केली. लुटालूटही सुरू केली. जैतापुरी रामराव चिटणीसांचा वाडा सर्व लुटला. बऱ्याच मुलखात नासधूस केली. दरम्यान तिच्यावर मारेकरीही घातले गेले. त्यात तिला जखमा झाल्या, पण जीव बचावला. जिवबादादा बक्षी या मुत्सद्यांचा मुलगा नारायणराव बक्षी हादेखील लक्ष्मीबाईच्या बाजूचा होता. लक्ष्मीबाईच्या फौजेने हिंडून अशेरी, बऱ्हाणपूर वगैरे भागात धूम केली. नंतर ती आपल्या फौजेसह मिरज भागात आली, आणि दौलतरावाविरुद्ध आपल्याला मदत मिळावी म्हणून पेशवे, फडणीस, पटवर्धन, कोल्हापूरचे महाराज, आदि मंडळींना निरोप पाठवले. दौलतरावाचा नक्षा उतरला तर ते पेशवे-फडणिसांना हवेच होते, पण उघडपणे बाईची बाजू घेऊन दौलतरावाला दुखवणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. शिवाय उद्या लक्ष्मीबाईही डोईजड होऊन बसण्याची शक्यता होती. तिचे ह्या वेळेपर्यंतचे वागणे त्याच प्रकारचे होते. तिच्याबद्दल त्या काळातल्या एका नोंदीत म्हटले आहे – "परंतु उरफाट्या गोष्टी

सांगतील सोईस येत नाही लक्षुबाईची प्रकृति परम अवघड आपणास परस्परे ऐकून माहीतगारच आहे... बाई कोणाचेच ऐकत नाही", (म. इ. सा. शके १६८३-१७३९ क्र. ५३९).

पेशवे-फडणीसांचे काम कोल्हापूरकरांनी करावे व त्याचे श्रेय घ्यावे असा सल्ला घोरपड्यांनी त्यांना दिला, पण कोल्हापूरकरांनी त्या भानगडीत पडण्याचे नाकारले.

त्यामुळे धड लक्ष्मीबाईच्या बाजूनेही नाही व धड तिच्या विरुद्धही नाही अशी ही सर्व मंडळी स्वस्थ बसून गंमत पहात राहिली.

अखेरीस दौलतरावाची व लक्ष्मीबाईची प्रत्यक्ष लढाई झाली. त्यात बाईने तलवार बांधून हत्तीवर बसून लढाई दिली. यानंतर दौलतरावाने तिच्याशी तह केला. बखेजा मोडावा, व बाईने अशेरीत रहावे, असे ठरले. (संदर्भ : १) नाना फडणीसांचे चरित्र – खरे शास्त्री, २) मल्हार रामराव चिटणीस विरचित धाकटे रामराजा व धाकटे शाहू महाराज यांचे चरित्र).

लक्ष्मीबाई शिंद्याबद्दलची ही हकीकत एकूण मराठा राजघराण्यातल्या व सरदार घराण्यातल्या स्त्रियांच्या महत्त्वाकांक्षी व आक्रमक परंपरेशी सुसंगत आहे.

ही परंपरा शिवाजीची आई जिजाबाई हिच्यापर्यंतही पोचवता येते. दुसऱ्याची ताबेदारी न पत्करता स्वराज्य स्थापनेसाठी लढण्याची प्रेरणा शिवाजीला तिने दिली. त्यानंतर शिवाजीची बायको व राजारामाची आई सोयराबाई हिने संभाजीचा गादीवरचा हक्क डावलून अल्पवयीन राजारामाला गादीवर बसवण्याचा कट केला. पुढे राजारामाची दुसरी बायको राजसबाई हिने गादीवर बसलेल्या शिवाजीला व त्याची आई ताराबाई हिला कैदेत टाकून आपला मुलगा संभाजी याला गादीवर बसवले.

ही राजघराण्यातली उदाहरणे झाली. पण सरदारघराण्यातही महत्त्वाकांक्षी स्त्रियांच्या पहिल्या फळीमागे सवतींची किंवा सुनांची दुसरी फळी तयार असे असे दाभाडे, आंग्रे या घराण्यांच्या माहितीवरून दिसते. उमाबाई दाभाडेंची सून अंबिकाबाई तिच्याविरुद्ध बंड करायला सरसावली होती. कान्होजी आंग्रेची पहिली बायको मथुराबाई ही देखील धडाडीची व मुत्सद्दी बाई होती. तिचा पेशव्यांचे राजकारणी गुरू ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकरांशी पत्रव्यवहार होता. तसाच चौथ्या बायकोचाही होता. पुढच्या पिढीतल्या सुना तर लढाईतच उतरल्या होत्या. अशी उदाहरणे शोधली तर आणखीही सापडण्याची शक्यता आहे, कारण ही परंपराच असल्यासारखी दिसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
विषय
ग्रा. क्र. 3400
२६६३८
२३/०१/१२
शाखा

## प्रास्ताविक : 'ब' गट

'ब' गटातल्या स्त्रिया या सर्व पेशवे घराण्यातल्या आहेत. तत्कालीन इतर ब्राह्मणं सरदार, कारभारी, शास्त्री-पंडित इत्यादी घराण्यांतल्या स्त्रियांची फारशी माहिती मिळू शकली नाही. क्वचित कुठे तुरळक उल्लेख आढळले, त्याचा निर्देश आधीच्या प्रकरणांत केला आहे.

ज्यांचा तपशीलवार विचार या अभ्यासात झाला नाही, पण ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाची चमक एखाद दुसऱ्या प्रसंगातून दिसून आली, अशा काही स्त्रियांचा उल्लेख सुरुवातीला करणे योग्य ठरेल.

पेशवे घराण्याशी संबंधित अशी या काळातली प्रसिद्ध स्त्री म्हणजे बाजीरावाची प्रेयसी मस्तानी ही होय. मस्तानी ही बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याची अनौरस मुलगी होती. बाजीरावाने केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता म्हणून त्याने ती बाजीरावाला नजर केली होती. पण तिची प्रसिद्धी तिच्या कर्तबगारीसाठी नाही, तर बाजीरावाच्या तिच्यावर असलेल्या प्रेमासाठी, त्या प्रेमापायी त्याने अनेक सामाजिक निर्बंध तोडले व आपल्या कुटुंबियांचीही नाराजी पत्करली, त्यासाठी आहे. या प्रकरणात तिचा सहभाग किती होता, हा प्रश्न विचाराधीन राहू शकतो.

पेशवे घराण्यातल्या दोन प्रसिद्ध स्त्रिया पार्वतीबाई आणि रमाबाई. या दोघींच्या व्यक्तिमत्त्वाचे एक समान वैशिष्ट्य होते, ते म्हणजे त्यांची वेगवेगळ्या प्रकारे दृष्टिस पडलेली आत्यंतिक पतिनिष्ठा. पार्वतीबाई सदाशिवरावांबरोबर पानिपतच्या लढाईत हजर होत्या. परंतु सदाशिवरावांचा मृतदेह न सापडल्यामुळे त्यांनी त्यांच्या मृत्यूच्या वार्तेवर विश्वास ठेवला नाही व त्या अखेरपर्यंत सौभाग्यवती लेणे लेवून राहिल्या. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याबरोबर सदाशिवरावांची उत्तरक्रिया पार पाडण्यात आली (पे. घ. इ.)

माधवराव पेशवे क्षयाच्या विकाराने आजारी होते. आपल्या दुखण्याला उतार पडत नही असे पाहिल्यानंतर त्यांनी आपली पत्नी रमाबाई हिला आपल्याबरोबर सती जाण्यास सुचविले. यात त्यांचा काय हेतू असावा ते कळायला मार्ग नाही, पेशवे घराण्यात विधवा, बालविधवा स्त्रिया होत्या. त्यांना मानाने वागवले जात असे. त्यांची काळजी घेतली जात असे. पानिपतावर वीर मरण आलेल्या २० वर्षांच्या विश्वासरावांची पत्नी लक्ष्मीबाई, अल्पायुषी जनार्दनपंताची बालविधवा पत्नी सगुणाबाई ही उदाहरणे माधवरावांच्या डोळ्यासमोरच होती. तरी आपल्यामागे रमाबाईने राहू नये असे माधवरावांना वाटले, व रमाबाईंनी त्यांचा आदेश शिरसावंद्य मानला.

या दोन्ही स्त्रियांनी वैयक्तिक पातळीवर फार मोठे मनोधैर्य दाखवले, व सामाजिक पातळीवर पतिनिष्ठा या मूल्याचे उदाहरण दिले. बाजीराव-मस्तानी, माधवराव-रमाबाई ही जोडपी साहित्यातून त्यांच्या प्रेमासाठी गौरवली, यामागे या स्त्रियांची समर्पण भावना लेखकांना आकर्षून घेते असे दिसते. बाजीराव-मस्तानी हे कलंदर वादळी प्रेमाचे प्रतीक, तर माधवराव-रमाबाई हे सौम्य-सात्विक प्रेमाचे, पण दोन्हीही 'रोमँटिक'च.

पेशव्यांच्या व्यतिरिक्त पटवर्धन, पुरंदरे, फडणीस, रास्ते, पेठे, फडके, बोकील अशी आणखीही ब्राह्मण, सरदार, संस्थानिक घराणी त्या काळातल्या राजकारणात कार्यरत होती.

चिटणीसांचे कायस्थ घराणेही प्रसिद्ध होते. शोध घेतला तर आणखीही सापडू शकतील. पण यांपैकी कोणत्याच घराण्यातल्या स्त्रियांची नावे कौटुंबिक वा सामाजिक क्षेत्रातल्या घडामोडीत आढळली नाहीत.

पुंरदरे घराण्यातील 'आबई'चे नाव ५/६ पत्रांतून प्रेमाने व आदराने घेतल्याचे आढळले. ही आबई नानासाहेब पेशवे व सखारामबापू यांनाही आदरस्थानी होती असे दिसते. पण तिच्याविषयी अधिक माहिती मिळू शकली नाही. गोपाळराव पटवर्धनांची आई सत्यभामाबाई हिचे नाव बऱ्याच घरगुती पत्रांतून आढळते. ती त्या घराण्यातली कर्ती-सवरती स्त्री होती असे तिने लिहिलेल्या पत्रांवरून कळते, पण तिच्याबद्दलही विशेष माहिती मिळू शकली नाही. त्रिंबकराव पेठ्यांची पत्नी वेणूबाई ही अनुबाई घोरपड्यांची मुलगी, व नानासाहेब पेतशव्यांची आतेबहीण होती. पण तिला राजकारणात फारसा रस नसावा. तिच्याबद्दलही माहिती मिळू शकली नाही. रघुनाथराव पेशव्यांची मुलगी दुर्गाबाई ही सोलापूरकर जोशांकडे दिली होती. तिला आपल्या वडिलांचे वागणे पसंत नव्हते त्यामुळे तिची आई आनंदीबाई तिच्यावर नाराज होती, व बाजीरावाने पेशवे झाल्यावर तिला चांगली अद्दल घडवावी असे आनंदीबाईने त्याला सांगितले होते. पुढे काय झाले ते वाचण्यात आले नाही. पण आनंदीबाई आणि दुर्गाबाई या दोघीही नाते आड न येऊ देणाऱ्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रिया होत्या असे दिसते. अनुबाईची बहीण जिऊबाई ही पेशव्यांचे प्रतिस्पर्धी बाबूजी नाईक यांची भावजय होती पण तीदेखील राजकारणापासून अलिप्त होती. पण यांपैकी कोणाही संबंधी अधिक माहिती मिळू शकली नाही.

नाना फडणीसांच्या बायकोसंबंधी एका प्रसंगातली माहिती वाचायला मिळाली. पानिपतच्या स्वारीवर नानांबरोबर त्यांची आई व बायको यादेखील त्या निमित्ताने तीर्थयात्रा घडेल म्हणून गेल्या होत्या. लढाईला तोंड लागता लागताच विश्वासराव मारले गेले, सदाशिवराव दिसेनासे झाले व मराठ्यांचे सैन्य सैरावैरा होऊ लागले. हे पाहिल्यावर नानांच्या बायकोने हत्तीवरून खाली उडी मारली, अंगावरचे दागिने काढले, लुगडे ठिकठिकाणी फाडले, अंगाला माती फासून घेतली व ती शेता-झुडपातून लपतछपत सुरक्षित ठिकाणी जाऊ लागली. या वेळेस तिचे वय चौदा वर्षांचे होते. एवढ्या कोवळ्या वयात परभाषिक, परमुलखात आणीबाणीच्या प्रसंगात तिने दाखवलेले धैर्य व प्रसंगावधान तिच्याबद्दल कौतुकाबरोबरच कुतूहलही निर्माण करतात.

सामाजिक अस्थिरतेच्या काळात अनेक कठीण प्रसंग आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या बळावर सावरून नेणाऱ्या अनेक स्त्रिया तेव्हाही समाजात असतीलच, पण त्यांच्याबद्दलच्या नोंदी पाहायला मिळाल्या नाहीत.

पेशवे पंतप्रधान झाल्यानंतर अनेक ब्राह्मण कारभारात आले, तसेच ते फौजेतही भरती झाले, मोहिमांवर जाऊ लागले, युद्धात कामीही आले. कारणपरत्वे पेशव्यांची इतराजी झाल्यास उच्चपदस्थ ब्राह्मण मंडळी लागलीच तलवार खाली ठेवून पळी पंचपात्री उचलून घेत असत. रघुनाथराव, सखारामबापू ही त्यातलीच उदाहरणे होत. जातीने ब्राह्मण असल्यामुळे धर्मकृत्य हा ताबडतोबीचा पर्याय त्यांना उपलब्ध होता, शिवाय क्षात्रधर्म त्यांच्या रक्तात मुरलेला नसावा.

अशा परिस्थितीत या वर्गातल्या स्त्रियांमध्ये देखील लढाऊ नेतृत्वाचे गुण अपवादानेच आढळावे, यात नवल नाही. राजकारणात आपले काही चालत नाही, असे पाहिल्यावर गोपिकाबाई विरक्त झाल्या. अपवाद आनंदीबाईचा. पण तिच्यात विरक्ती न आल्यामुळे तिलाच फार मनस्ताप सोसावा लागला. तिच्या अपयशाने त्यामुळे शोकांतिकेचे स्वरूप घेतले.

गोपिकाबाई व आनंदीबाई यांच्याबद्दल अधिक माहिती पुढे येणारच आहे.

## १ – राधाबाई

राधाबाई या बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या पत्नी होत. यांच्या माहेरचे घराणे बर्वे यांचे होते. राधाबाईंचा जन्म कोणत्या साली झाला ते कळू शकले नाही. यांचे बाळाजी विश्वनाथांशी लग्न शके १६०४ (सन १६८३) च्या सुमारास झाले असावे असे इतिहासकार मानतात. बाळाजी विश्वनाथांचा जन्म शके १६६० चा समजला जातो. त्यांचे हे लग्न ते श्रीवर्धनहून चिपळूण दाभोळकडे येत असताना झाले असावे, व हे त्यांचे लग्न दुसरे असावे, असाही इतिहासकारांचा अंदाज आहे (पे. घ. इ. पृ. ५७).

त्या काळच्या प्रथेप्रमाणे पाहता दुसरेपणावर दिलेली मुलगी बहुधा ८ वर्षांची असे. त्या हिशेबाने राधाबाईंचा जन्म १६७५ साली झाला असावा. म्हणजे त्या ताराबाईच्या समकालीन ठरतात.

बाळाजी विश्वनाथ यांना पेशवाईची वस्त्रे १७१३ साली मिळाली. ते मराठा सरदारांच्या पदरी राहून लहान मोठी कामे करीत स्वतःच्या कर्तबगारीने हळूहळू वर चढत गेले. आधीचे पेशवे बहिरोपंत पिंगळे यांच्या अकार्यक्षमतेमुळे त्यांना दूर करून शाहूने बाळाजी विश्वनाथांना पेशवाईची वस्त्रे, व राज्यकारभाराचे अधिकार दिले, हे बाळाजीच्या कर्तृत्वावर आणि मुत्सद्देगिरीवर शिक्कामोर्तब होते. राधाबाईंच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची त्यांच्या उत्तरायुष्यातली चुणूक पाहता, आपला पति यशाच्या पायऱ्या चढत असताना त्यांची त्याला सक्रीय साथ असणार, असा अंदाज बांधणे चुकीचे ठरणार नाही. परंतु तो अंदाजच ठरेल. कारण त्याबद्दलचा काही अस्सल पुरावा पहायला मिळाला नाही.

राधाबाईंना लिहिता वाचता येत होते व त्यांच्या हस्ताक्षरातली १६८९ सालची कागदपत्रे पेशव्यांच्या नाशिक येथील क्षेत्रोपाध्यांच्या दप्तरात सापडली. परंतु इतिहासात राधाबाईंचा प्रथम उल्लेख पहायला मिळाला, तो तिचे पती बाळाजी विश्वनाथांच्या कारकीर्दीत नव्हे तर तिचा मुलगा थोरले बाजीराव पेशवे, आणि तिचा नातू थोरले नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीत.

बाजीराव पेशव्यांची आई या नात्याने राधाबाईला पेशव्यांच्या कुटुंबातच नव्हे, तर कारभारी मंडळीतही मान होता, असे दिसते. प्रसिद्ध मराठा आरमारी सरदार कान्होजी आंग्रे यांचे राधाबाईला आलेले हे कुशल पत्र त्यांच्या जिव्हाळ्याच्या घरगुती संबंधाचे द्योतक आहे – **"गंगा भागीरथी समान राधाबाई यासी प्रीतिपूर्वक कान्होजी आंग्रे सरखेल दंडवत उपरी. येथील कुशल वैशाख बहुल पंचमीपर्यंत जाणून आपले क्षेत्रवर्तमान लिहीत जाणे सांप्रत तुमचे पत्र येत नाही ऐसे तर नसावे आपले सर्वदा कुशल वर्तमान लिहित जाणे बहुत काय लिहिणे हे**

विनंति", (पे. द. ९.५२).

बाजीरावाच्या कारकीर्दीत राधाबाईने १७३५-३६ साली काशी यात्रा केली होती. त्या संबंधातले ही एक सन्मानदर्शक नोंद – "जेस्ट सुध ३ त्रितीया सोमवारी मातुश्री राधाबाई राजश्री पंतप्रधान यांची माता महायात्रेहून पुणियास आली देशमुख देशपांडिये कळसावर सामोरे गेले येक मोहर नजर बाईस केली असे", (पे. द. २१.३३०). सुमारे सव्वा वर्षांच्या या यात्रेच्या प्रवासात पावसाळ्याचे तीन महिने राधाबाईचा मुक्काम जयपूर येथे महाराज सवाई जयसिंगाकडे होता. पेशवे घराण्यातल्या तीन स्त्रियांनी काशी यात्रा केल्या. उत्तरेतल्या त्यांच्या प्रवासात पेशव्यांचे कुटुंबीय म्हणून तिकडे सर्व सरदार, संस्थानिक, नबाब, सुभेदार इत्यादि मंडळी त्यांची यथोचित बडदास्त राखीत असत. पेशव्यांचे त्या भागातले प्रतिनिधीही त्यांच्या दिमतीला असत.

बाजीराव पेशवे मोहिमेवर गेला असताना आपल्या लष्करी हालचालींबद्दल राधाबाईला पत्राने कळवीत असे व राधाबाई त्याला घरगुती घडामोडी सांगणारी पत्रे लिहित असे. या प्रकारच्या एका पत्राची सुरुवात अशी आहे –

"।। श्री ज्ञानेश्वर ।।

श्रिंया सहस्रायु चिरंजीव विजईभव राजश्री बाजीराऊ यास प्रति माऊली राधाबाई आसीर्वाद उपरि तुमची आज्ञा घेऊन स्वार जाले ते सुखरूप पुणियास पावले विशेष ..." या पत्रात मग पुढे आपण कुठेकुठे गेलो, कोण मंडळी भेटली, कोण भेटली नाहीत वगैरे मजकूर आहे.

अशा घरगुती मजकुराची पत्रे पेशव्यांचे सरदार गोपाळराव पटवर्धन यांनीही त्यांची आई सत्यभामाबाई यांना लिहिलेली ऐतिहासिक लेख संग्रहात वाचायला मिळतात. यात कधी कधी घरगुती मजकुरांच्या जोडीनेच राजकीय किंवा लष्कराबाबतीत आईच्या मायेने मुलाला सावधगिरीचा इशारा देणारी पत्रेही वाचायला मिळतात. हा 'मुलगा' म्हणजे तिशी उलटलेले, आणि लष्करी कर्तबगारीच्या शिखरावर असलेले थोरले बाजीराव किंवा गोपाळराव पटवर्धन असतात, ही त्यातली गंमत! (ऐ. ले. सं. ४९३).

असे एक राधाबाईने बाजीरावाला लिहिलेले पत्र वाचायला मिळाले. हे बाजीरावाच्या पत्राचे उत्तर आहे. बाजीरावाच्या पत्रात त्याने आपल्या जंजिऱ्याच्या मोहिमेत काही ठाणी हस्तगत झाली, सेखोजी आंग्रे येऊन भेटला वगैरे वृत्त कळवले होते. त्याच्या उत्तरात राधाबाई लिहितात – "त्याचे बहुत रीतीने समाधान रक्षून पुढे आपले कार्य सिद्धीस यावे ते गोष्ट करणे परस्थळी जाणे जाहले आहे कोन्हांचा विश्वास न धरावा बहुत सावधतेने असणे शरीर संरक्षण करून सावधतेने असत जावे."

परंतु बाजीराव आणि राधाबाई यांचे मातापुत्र संबंध प्रेमाचे असूनही मस्तानी प्रकरणात राधाबाई बाजीरावाच्या वागण्याला प्रतिबंध करू शकली नाही. आई राधाबाई, पत्नी काशीबाई, नानासाहेबादि मुले व सुना यांचे शनिवार वाड्यात वास्तव्य होते, तेथेच बाजीरावाने मस्तानीलाही रहायला आणले. अखेरीस राधाबाईसकट सर्व पेशवे कुटुंबियांनी तिचा स्वीकार केला.

पेशवे घराण्यात रखेल्या ठेवण्याचे नावीन्य नव्हते. बाळाजी विश्वनाथाला अनौरस संतति होती (पे. घ. इ. पृ. २३१). परंतु मस्तानी ही मुसलमान होती, व तिच्यापासून झालेल्या आपल्या मुलाला – समशेर बहादुरला – औरसपणाचे अधिकार मिळावेत, असा बाजीरावाचा आग्रह होता. तो अखेर पूर्ण झाला. त्याला बांद्याची जहागिरी देण्यात आली. हा राधाबाईचा कौटुंबिक क्षेत्रातला पराजयच म्हणायला हवा.

बाजीरावाप्रमाणे रखेलीच्या बाबतीत नव्हे पण दुसऱ्या एका लहानशा घरगुती बाबतीत राधाबाईचा धाकटा मुलगा, व मराठ्यांचा शूर सेनानी, बाजीरावाचा उजवा हात असलेला चिमाजी अप्पा यानेही राधाबाईशी असलेला आपला मतभेद नोंदवलेला आहे.

राधाबाई काशीयात्रेला निघाली तेव्हा चिमाजी अप्पांचा मुलगा सदाशिवरावभाऊ यालाही बरोबर न्यावे, अशी तिची इच्छा होती. त्यावेळेस सदाशिवरावाचे वय ५/६ वर्षाचे होते. वाटेत जयपूरला सवाई जयसिंगाकडे मुक्काम होणार होता, तिथे पेशव्यांचा पुतण्या म्हणून सदाशिवरावाचे बरेच कौतुक होईल, हा विचार तिच्या मनात असावा, असे चिमाजीच्या पत्रावरून वाटते. राधाबाई यात्रेला निघाल्यानंतर त्याने हे पत्र लिहिले आहे – "त्यास विचार पहाता चिरंजीवास सवाई जयसिंगाचे घरी बहुमान होईल हा येक अर्थ; वरकड चिरंजीवाचे हे यात्रेचे दिवस आहेत, यैसे नाही बहुमानाची गोष्ट म्हणावे तर तुमचे आसीर्वाद आम्हास काये न्यून केले आहे? दोन पर्याय तो या प्रकारचे आहेत"

सदाशिवरावाला राधाबाईबरोबर न पाठवण्याची ही दोन कारणे दिल्यानंतर पुढे मात्र चिमाजी अप्पाने रीतसर लिहिले आहे की "परंतु तिसरा पर्याय तुमची आज्ञा क्षेपनिक्षेप पाठवावे यैसीच असली तर लक्ष प्रकारे पाठऊन देऊ तुमच्या समाधानापेक्षा आम्हास दैवत दुसरे नाही." यानंतर अखेरीस सदाशिवरावाला पाठवले की नाही, ते कळले नाही.

याच पत्रात चिमाजी अप्पा पुढे लिहितात – "आपण तुमचा निरोप घेतला ते समयी आपण पाय उतारा तुमचे पालखी समागमे घटकाभर येऊन मग निरोप घेऊन यावे ऐसे होते परंतु ते समयी चित्तात आले नाही. त्यामुळे चित्तात अलिकडे आळीयावर हळहळ वाटली आपले समाधानपूर्वक आशीर्वाद आले म्हणजे चित्तातील हळहळ दूर होईल", (पे. द. ९.२२).

मुलाला पाठवायची इच्छा नाही, परंतु त्यामुळे आईच्या इच्छेविरुद्ध गेल्यासारखे होते, तेही बरे वाटत नाही, अशी चिमाजी अप्पाची तेव्हा द्विधा मनःस्थिती झालेली असावी. मात्र या कौटुंबिक बाबतीत देखील आईच्या शब्दाला त्याने सर्वस्वी शिरसावंद्य मानलेले नाही, त्या संबंधातला आपला विचार त्याने तिच्यासमोर मांडला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. पुढे गोपिकाबाई आणि माधवराव यांच्या संबंधातही असेच दिसते.

बाजीरावाच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशवे झाले. हे राधाबाईंचे नातू. नानासाहेबांच्या कारकीर्दीमधली राधाबाईंनी लिहिलेली बरीच घरगुती बाबतीतली, आणि काही कारभारविषयक बाबतीतली पत्रे वाचायला मिळाली. ही पत्रे एकत्रितपणे वाचली असता, त्यांचे स्वरूप संमिश्र असल्याचे दिसते. संमिश्र अशासाठी की कारभारविषयक पत्रांत आणि एखाद दोन घरगुती पत्रांत राधाबाईने स्वतःच्या अधिकारात काही महत्त्वाचे निर्णय घेतलेले दिसतात, तर इतर काही घरगुती पत्रांमधून नानासाहेबांचे घरातल्या सर्व घडामोडींवर पूर्ण

नियंत्रण होते, असे दिसते.

कारभारविषयक अशी तीन पत्रे वाचायला मिळाली. त्यात राधाबाईने घेतलेल्या निर्णयांमधून तिची अधिकारवाणी तर प्रत्ययाला येतेच, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तिने या नाजुक किंवा गुंतागुंतीच्या प्रकरणात घेतलेले काही निर्णय हे तत्कालीन सामाजिक रूढींना धक्का देणारे, आजकालची भाषा वापरून सांगायचे तर 'सुधारणावादी' होतो असे दिसते. ही उदाहरणे अशी – "गोविंदभट बरवे बापूभटाचे पुत्र याणी मागे फटकालकर्म केले होते. त्याजवर ब्राह्मणानी शब्द आणत समत केले. त्याजवर मातुश्री राधाबाई पेसवियांचे आज्ञेवरून ग्रामस्तानी समत घातले नाही", (पे. द. १०.३३०).

"।। श्री ।।

चिरंजीव राजमान राजश्री नाना यास प्रति राधाबाई आशीर्वाद उपरि येथील कुशल ता. आषाढ वद्य अमावास्या इंदुवार जाणोन स्वकीय लिहित गेले पाहिजे विशेष. राजश्री गोविंद हरि यांचे घरी बटकीण महारीण निघाली त्याचे वृत काल राजश्री अंतोबानी तुम्हास लेहून पाठवले आहे त्यावरून सविस्तर कळलेच असेल. त्यांचे घरी मुला माणसांचा उपोषणाने आट जाला त्यांनी ब्राह्मणास व पंडितास बोलवू पाठवल्यास जमा न होत या करिता आम्ही व राजश्री अंताजीपंत राजश्री जिवाजी पंतांचे घरी जाऊन जितके ब्राह्मण थोर पंडित व वैदिक जमा करून बाळंभट यास प्रायश्चित द्यावयाचा निश्चय केला त्यामध्ये कित्येक ब्राह्मणानी अट केली की प्रायश्चित द्यावयाची आज्ञा प्रभूची पाहिजे त्यास आम्ही सर्व पंडितास व ब्राह्मणास आज्ञा केली की तुम्ही प्रायश्चित देणे आम्ही आज्ञा केली तेच आज्ञा प्रभूची आहे दुसरा अर्थ चित्तात न आणणे त्यावरून आजच प्रायश्चित दिले तेथील विचार पंडितराव यास कळलियाउपरि उपद्व्याप करून राजश्रीचे कानावर घालून फंद फैलाव होईल याकरिता अगोदर जो बंदोबस्त करणे तो केला पाहिजे यासाठी ताबडतोब हे पत्र लिहिले आहे बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद", (काव्येतिहास संग्रह पु. २ अं. ४.१२१).

तिसरे पत्र पुण्यातल्या पाण्याच्या व्यवस्थेसंबंधीचे आहे. पुणे शहरात पाण्याची टंचाई झाल्यामुळे, आधी ज्या पद्धतीने पाणी वापरले जात होते, त्यात राधाबाईने काही बदल केले. जिथे गरज कमी तिथले पाणी बंद करून माणसांना वापरायला पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी तिची व्यवस्था होती. तिने केलेल्या बदलांविरुद्ध काही लोकांनी साताऱ्याला नानासाहेबाकडे तक्रार केली. हे राधाबाईला कळल्यावर तिने हे पत्र नानासाहेबाला लिहिले आहे – "बाग वाचवून शहर पाणियावाचोन हैराण करावे हे तो कार्याचे नाही नदीत पाणी नाही याजकरिता हा बंदोबस्त आम्ही केला आहे ... हे खरे अप्रमाण ऐसे चित्तात आले असिले तरी कोणी शहाणा माणूस पहावयासी पाठवावा पाणियाचे पुढे क़जिये होतील मारामार होईल ते काही आमच्याने आईकवणार नाही याजकरिता लिहिले आहे हे चित्तास न ये तरी आम्हीच सातारियास येतो."

पण वरच्या पैकी दोन उदाहरणांवरून हेही दिसून येते की राधाबाईच्या निर्णयाविरुद्ध तक्रार करणारी मंडळी होती. कारभारात हस्तक्षेप करण्याचा तिला अधिकार आहे, असे त्यांना मान्य नव्हते. तिचा अधिकार तर ते मानतच नव्हते, पण पेशव्यांची आजी म्हणूनही तिच्या शब्दाला

ते किंमत देत नव्हते व याची राधाबाईलाही कल्पना होती. आपल्या निर्णयाच्या योग्यतेबद्दल नानासाहेबाची खात्री पटवणे तिलाही आवश्यक वाटत होते, असे दिसते.

या प्रकरणांमध्ये नानासाहेबाने राधाबाईची बाजू सांभाळली की नाही, ते कळू शकले नाही. मात्र नानासाहेबाची आई काशीबाई काशीयात्रेला गेली असताना पेशव्यांचे उत्तरे कडले कारभारी हिंगणे यांनी तिच्याविरुद्ध नानासाहेबाकडे काही तक्रार केली होती तेव्हा नानासाहेबांनी आपल्या आईची बाजू घेऊन हिंगण्यांना जरब दाखवली होती, असे वाचायला मिळाले. एकूण पेशवे घराण्यातल्या स्त्रियांचा कारभारातला हस्तक्षेप दरबारी मंडळींना मान्य नसे असे दिसते. याउलट मराठा राज घराण्यातल्या वा सरदार घराण्यातल्या स्त्रियांनी दिलेले आदेश साऱ्यांना मान्य असत.

राधाबाईचे सातारच्या दरबारात शाहूच्या राणीजवळ वजन असावे, असे काही पत्रांवरून दिसते.

गोपिकाबाईच्या उपचारासाठी नानासाहेबाने सातारच्या दरबारातून दत्ताजी पंत वैद्याला बोलावले होते. वैद्याला पाठवायचे की नाही ते थोरल्या राणीला विचारून सांगतो, असे उत्तर शाहूने दिले होते. त्या संबंधात साताऱ्याहून मल्हार तुकदेव याने पुण्याला रघुनाथरावाला लिहिले आहे की – "स्वामींनी तीर्थरूप मातुश्रीबाई यांचे पत्र सौ. मातुश्री बाईसाहेब वाडा पहिला यास दत्ताजी पंतास पाठऊन द्यावयाविषी सत्वर पाठऊन द्यावे ...वाडियातील गुता पडलाच तर साहित्यास मातुश्रीचेही पत्र असावे", (पे. द. १८.१५४).

आणखी एका पत्रात राधाबाईने स्वतःच या प्रकारचा उल्लेख केलेला वाचायला मिळाला. काही घरगुती समारंभासाठी सदाशिवरावाला साताऱ्याहून पुण्याला पाठवून द्यावे, असे नानासाहेबाला लिहिताना ती म्हणते – "तरी तुम्ही राजेश्री पासी आज्ञा मागून निरोप ठेवणे कदाचित तुम्हास महाराजास हटकावयास भीड वाटत असेल तरी आमचे नावे सौभाग्यवती थोरले राणीस पत्र लिहून द्यावे येथून आम्ही पाठवले आहे म्हणून सांगावे पत्रात तारीख च्यार दिवस मागील घालावी आणि पत्र द्यावे", (पे. द. १८.५४).

राधाबाईला थोरल्या राणीशी असलेल्या तिच्या स्नेहसंबंधावद्दल पूर्ण आत्मविश्वास होता हे तर या पत्रातून दिसतेच. पण वेळप्रसंगी लबाडीने वागून आपला हेतु साध्य करून घेण्याची राजकारणी वृत्तीही दिसते. पण या सगळ्याची धाव कुंपणापर्यंत राहिली. याशिवाय एक मजेदार गोष्टही इथे लक्षात येते. सदाशिवरावाची सातारच्या दरबारात काही विशिष्ट हुद्यावर वगैरे नेमणूक नव्हती. पण काही दिवसांकरता बाहेरगावी जाण्यासाठी त्यालाही शाहूकडून Casual Leave Sanction करून घेणे आवश्यक होते, शाहू सहजासहजी रजा मान्य करण्याची शक्यता नव्हती व त्यासाठी राणीचा वशिला लावण्याची गरज होती, असे दिसते. म्हणजे घरातल्या माणसांवर नानासाहेबाचा अधिकार, नानासाहेबावर शाहूचा अधिकार व शाहूवर त्याच्या राणीचा अधिकार – आणि राणीपाशी नानासाहेबाच्या आजीचे वजन – असे हे वर्तुळ होते. आणि हे सर्व काही फक्त २/३ दिवसांच्या रजेसाठी!

इकडे शाहूवर राणीचे वजन होते, तर स्वतः नानासाहेब पेशवे हे घरगुती बाबतीतदेखील घरातल्या बायकांना व्यवस्थेचे फारसे स्वातंत्र्य देत नसत, असे काही पत्रांवरून दिसते. आपण

घेतलेल्या निर्णयांची कारणे राधाबाईंनी त्यांना पत्रातून दिलेली वाचायला मिळतात. वर उद्‌धृत केलेल्या पत्राचा आधीचा भाग असा आहे – "श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरि येथील कुशल तागाईत भाद्रपद वद्य त्रितीया पावेतो जाणून स्वकीये लेखन करणे विशेष पत्र पाठवले ते पावले. चिरंजीव सौभाग्यवती उमाबाईस अष्टमांगल्याकरता घेऊन येणे सवेच घेऊन जावे ऐसे कितेक प्रकारे लिहिले ऐशास अष्टम मास लागला आता घेऊन यावे तो मार्गी नद्या प्रजन्य तिकडे फार पडतो याजकरिता येथे येवोन मागती फिरोन यावे ऐसे अनुकूल पडत नाही याजकरिता चिरंजीव सदोबास पाठऊन देणे सहंस्कार फिरोन तुम्हाजवळ येतील तुम्ही तेथे असता राजकारभार चिरंजीवावर आहे ऐसे नाही काय कारभार तो तुम्ही करीतच आहा तरी तुम्ही राजश्री यासी आज्ञा मागोन... निरोप घेऊन पाठवणे फिरोन मागती विजयादसमीस सातारियास येतील अष्टमांगल्य करून तुम्ही सदोबास वडील असता काये चिंता आहे त्याचे सर्व गोष्टीनी कौतुक तुम्ही करावे तरी चिरंजीवास अगत्य पाठऊन देणे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद", (पे. द. १८.५४).

नानासाहेब घरगुती बाबतीत इतक्या बारकाईने लक्ष घालतात हे राधाबाईला फारसे पसंत नसावे. तिच्या नाराजीचा सूर पत्रात उमटला आहे. थोडा उपरोधही आहे.

वरच्या पत्रातली उमाबाई प्रसूत झाल्यानंतर नानासाहेबाचे तिच्या तब्येतीसंबंधात पत्र गेले त्याचे उत्तर राधाबाईने पाठवले, ते असे – "पत्र पाठविले ते पावले तेथे लिहिले की सौभाग्यवती चिरंजीव उमाबाई जात्या शरीरे अशक्त आहेत याजकरिता लेकुरवाळी बाइको (दाई) मिळवून ठेवावी म्हणोन कितेक तपसिले लिहिले ते कळले. कोणे गोष्टीविशी प्रतिकूल आहे ऐसे नाही सर्व अनुकूलच आहे."

सौ. उमाबाईची काळजी राधाबाईकडून कदाचित नीट घेतली जाणार नाही असा ध्वनि राधाबाईला नानासाहेबाच्या पत्रातून बहुधा ऐकू आला असावा. म्हणून तिने उत्तरात हा ठसका दाखवला आहे!

आणखी एका घरगुती पत्रामधे नवरात्राची घटस्थापना सातारला करायची की पुण्याला हे तिने नानासाहेबाला विचारले आहे.

राधाबाईची जी पत्रे पहायला मिळाली ती १७२९ ते १७४५ या दरम्यानची आहेत. या काळात आधी त्यांचा मुलगा बाजीराव व नंतर त्यांचा नातू नानासाहेब हे पेशवे पदावर होते. बाजीरावाचा बहुतेक काळ लष्करी मोहिमांवरच गेला. त्याची पत्नी काशीबाई ही जास्तकरून आजारी असे. तिला संधिवाताचे दुखणे होते, व नंतर क्षयही झाला होता. नानासाहेबाची पत्नी गोपिकाबाई ही राधाबाईची नातसून, शिवाय वयानेही लहान, त्यामुळे या काळात पेशव्यांच्या घरातले व्यवहार राधाबाईच पहात असाव्या. त्यांनी त्यांच्या एका नातेवाईक स्त्रीला लिहिलेल्या पत्रात अमक्यांकडे जाऊन त्यांची विचारपूस करत जावी, अशा प्रकारचे आदेश दिलेले आढळतात.

खुद्द नानासाहेब पेशवे कौटुंबिक संबंधाबद्दल अतिशय जागरूक होते, हा कदाचित राधाबाईंचाच गुण त्यांच्यात उतरला असावा. रघुनाथरावाला लिहिलेल्या एका उपदेशपर पत्रात, अभ्यास कसा व कोणता करावा, प्रकृती कशी सांभाळावी, सदाशिवरावाशी कसे वागावे

हे सांगितल्यावर पुढे ते लिहितात – "मातुश्रीबाई (राधाबाई - आजी), ताई (काशीबाई - आई), अनुबाई (घोरपडे - आत्या) यांसी एक दो दिवशी अर्ध घटकाभर जाऊन बसत जाणे", (पे. द. १.२६)

राधाबाईंचा मृत्यू १७५३ साली झाला. त्या वेळेस त्यांचे वय पाऊणशे वर्षांच्या दरम्यान असावे. त्यांची शेवटची वृद्धावस्थेतली वर्षे कोणत्या प्रकारे गेली, ते कळू शकले नाही.

## २ – अनुबाई घोरपडे

अनुबाई घोरपडे ही बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची मुलगी. अनुबाईचा जन्म १७१३ च्या सुमारास झाला. तिचे लग्न १७१९ साली कोल्हापूर गादीचे सचिव नारो महादेव जोशी यांचा मुलगा व्यंकटराव याच्याशी झाले. नारो महादेव हे लहानपणी संताजी घोरपडे यांच्या पागेत कामाला होते. संताजीने त्यांचा चुणचुणीतपणा पाहून त्यांना लष्करी शिक्षण दिले, व त्यांना आपला कारभारी नेमले. संताजीच्या या औदार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नारो महादेवानी घोरपडे हे आडनाव घेतले.

नारो महादेवांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरकरांनी आपले सचिवपद त्यांचा मुलगा, अनुबाईचा नवरा व्यंकटराव याला दिले नाही. त्याचप्रमाणे संताजी घोरपड्यांच्या मुलानेही आपले कारभारीपद व्यंकटरावाला दिले नाही. त्यांच्याजवळ इचलकरंजीचे इनाम गाव तेवढे राहिले. परंतु अनुबाईचे बंधु बाजीराव पेशवे यांनी अनुबाईसाठी पुण्याला वाडा बांधून दिला आणि काही गावे आणि बागा तिच्या नावे इनाम करून दिल्या. पेशवे कुटुंबाशी त्यांचे सतत संबंध होते, त्या पेशव्यांबरोबर स्वारीवर जात असत. त्याचप्रमाणे शाहूला भेटायलाही जात असत. पेशवे त्यांना शाहूकडून काही सरंजाम मिळवून देत असत. माहेरच्या कुटुंबाशी असलेल्या अनुबाईच्या घरोब्याची कल्पना तिची भाचेसून गोपिकाबाई हिने तिला लिहिलेल्या या पत्रातून येते – "वरकड आपण यंदा स्वारीस न आला गुदस्तापासून आपली भेट न झाली असो हल्ली आपण पत्र पावताच जरूर लौकर मध्येच वाटेस यावे जर वाटेस यावयासी न फावे तरी लौकर पुण्यास यावे याउपरि दुसऱ्या पत्राची वाट न पहावी जरूर यावे."

तिच्या दुसऱ्या भाचेसुना पार्वतीबाई आणि सगुणाबाई आणि नातसून लक्ष्मीबाई यांनी तिला "मकर संक्रमणाची तिलशर्करा" पाठवल्याचे पत्रही पहायला मिळाले. ही मकर संक्रमणाची तिलशर्करा पाठवण्याची पद्धत (सध्याच्या ग्रीटिंग कार्डप्रमाणे) त्या काळी सर्रास रूढ होती असे दिसते. वय अथवा हुद्दा असा काही लहान मोठा भेद न बाळगता ती एकमेकांना पाठवली जात असे, असे उल्लेखांवरून दिसते.

अनुबाईची बहीण भिऊबाई ही बारामतीकर नाईकांच्या घरी दिली होती. तिच्या आपल्या माहेरच्या कुटुंबाशी अनुबाईइतका घनिष्ठ संबंध असलेला आढळत नाही. त्याचे कारण बारामतीकर हे पेशव्यांचे प्रतिस्पर्धी होते हे असेल, किंवा भिऊबाईला पेशव्यांच्या आधाराची व पाठिंब्याची अनुबाईसारखी गरज नसावी, हेही असू शकेल. भिऊबाई एका आजारपणात माहेरी येऊन राहिली होती व तिच्यावर उपचार चालू होते याबद्दल तिची आई राधाबाई आणि भाचा नानासाहेब यांच्या पत्रव्यवहारातून उल्लेख वाचायला मिळाले. नंतर तिचे दागिने बळकावून बसल्याचा आरोप तिच्या दिराने नानासाहेबावर केला. एवढीच तिच्याबद्दलची

माहिती मिळाली.

भाचेसुनांशी असलेल्या पत्रव्यवहारामधून अनुबाईला पेशव्यांच्या हालचाली, पानिपतानंतरची नानासाहेबांची स्थिती, त्यांच्या मृत्यूनंतरची रघुनाथरावाची भाऊबंदकी, थोरल्या माधवरावाचे प्रकृतिमान वगैरे वृत्त कळवलेले आढळते: माधवरावाच्या तब्येतीला उतार पडायला हवा असेल, तर रघुनाथरावाला कैदेतून सोडणे, व तोतया भाऊसाहेबाची शहानिशा करणे या गोष्टी कराव्या लागतील, असे एक मत या पत्रात नोंदलेले आढळते. पत्रव्यवहारामुळे जगाशी भरपूर संबंध असलेला दिसतो.

अनुबाईला तिच्या एका चुलत भावजयीने पाठवलेले पत्र नमुनेदार आहे. बऱ्याच घरगुती बातम्या आणि माहिती कळवण्याच्या या पत्राच्या शेवटी ती लिहिते – "एकूण कलमे चार, पत्राचे उत्तर तपशीलवार लिहून पाठवले असे."

अनुबाईची मुलगी वेणूबाई ही पेशव्यांचे एक सरदार त्रिंबकराव मामा पेठे यांना दिली होती. त्रिंबकराव हे अनुबाईचे भाऊ चिमाजीअप्पा यांचे मेव्हणे, सदाशिवरावभाऊचे मामा. वेणूबाईची अनुबाईला पुण्याहून दरबारच्या बातम्या कळवणारी पत्रे येत असत, त्यात राजकीय आणि घरगुती अशा मजकुराचे मजेदार मिश्रण आढळते. असे हे एक पत्र – "तीर्थरूप मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशी अपत्ये सौभाग्यवती वेणूबाई नमस्कार वडिली आशीर्वाद पत्र पाठवले ते पावले लिहिले वर्तमान कळले. राजकी वर्तमान तरी ताराबाईस अटक करून राजास बाहेर काढावयाचे या मनसकियाचे विचारे मल्हार नाईक रास्ते यांचे दिमतीचे धोंडोपंत वगैरे आणखी ब्राह्मण व काही मराठे ऐसे राजाचे राजवाडियाचे चौकीस भेदोन चौकीदारास पाच हजार रुपये व कडी ऐसे दिले ते ताराबाईस चौकीवर सापडले त्याजवरून त्यास अटक केले त्याणी नाव श्रीमंतांचे घेतले त्याजवरून श्रीमंतांकडे पुणे यास पाठवले ते येथे आले आहेत. पुढे काय होईल ते लेहून पाठवू काजूच्या ब्यांविशी वडिलांस मागे एक दोन तीन वेळा लिहिले आहे त्यास जरूर ब्या आणून पाठवणे तीर्थरूप मातुश्रीजी नित्य पुसत असतात एकादेवेळी मजवरि रागे भरतील त्याज करता जरूर पाठवावे," (इ. स. इ. व. नि. प. खरे शास्त्री). मुख्य मजकूर काजूचा दिसतो.

आपल्या वतनांचा सर्व कारभार अनुबाई स्वतःच बघत असे. आपला मुलगा नारायणराव तात्या याला आर्थिक व्यवहाराबाबत, कौटुंबिक वागणुकीबाबत सदा देणारी पत्रे तिने लिहिली आहेत, (इ. स. इ. व नि. प. २४.२५ खरे शास्त्री). पुढे नारायणराव तात्यांशी तिचे पटेना त्यामुळे तिने सर्व सनदा आपला नातू व्यंकटराव यांच्या नावे केल्या. कारभार तीच पहात होती.

इथे गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे की पेशवे कुटुंबातल्या कोणत्याही स्त्रीने मुलगा किंवा नातू अल्पवयीन म्हणून त्याच्या वतीने स्वतः कारभार पाहिलेला नाही. राज्याचा कारभार हा छत्रपतींकडून ज्याला तो अधिकार मिळे तोच करीत असे. पेशव्यांना स्वतःचे असे वतन किंवा फौज नव्हती. त्यामुळे त्यांना, पर्यायाने त्यांच्या स्त्रियांना वंशपरंपरा अधिकार नव्हते. अनुबाईला घोरपड्यांचे वतन होते, म्हणून मुलाच्या किंवा नातवाच्या नावाने ती कारभार करू शकत होती. मराठा राजघराण्यातल्या किंवा वतनदारांच्या घराण्यातल्या स्त्रियांनाही असाच

वंशपरंपरेचा अधिकार होता. तो न वापरणारी स्त्री एक महाराणी येसूबाई तेवढी दिसते.

संभाजीचा वध झाला त्यावेळी शाहू वयाने लहान होता. पण तेव्हा त्याच्यावतीने स्वतः कारभार पहाण्याऐवजी तिने कारभार संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम याच्याकडे सोपवला होता.

पण अनुबाईचा स्वतःच्या वतनाच्या कारभारात अधिकार चालत असला, तिचे पेशव्यांशी कौटुंबिक प्रेमाचे संबंध असले, पेशवे तिला आपल्या बरोबर लष्करी मोहिमांवर आणि सातारच्या दरबारात नेत असले, तरी बाहेरच्या व्यवहारात हस्तक्षेप करण्याचे तिचे प्रयत्न पेशवे चालू देत नसत असे दिसते. वेणूबाईने लिहिलेल्या एका पत्रामध्ये अशा प्रकारचा उल्लेख आहे. या पत्रामध्ये अनुबाईने केलेल्या एका सूचनेवरची नानासाहेबाची प्रतिक्रिया कळवली आहे. मजकूर असा – "श्रीमंतांची ताकीदपत्रे धोंडोपंत यांनी घेऊन पाठवली आहेत. प्रविष्ट होतील तुम्ही लिहिले की 'शिंदे व नरगुंदे यास चाकरीस गोपाळराऊ बोलवतात तर त्यास (तिकडे न जाण्याविषयी) ताकीदपत्रे ज्या प्रकारे येतील तिकडून आणून पाठवणे' म्हणोन आज्ञा. त्यास श्रीमंत साफ बोलिले की तुम्ही आपले घरी बसता आणि त्यासही बसवू म्हणता तर ही गोष्ट कामाची नाही त्यास चाकरीस जाऊ देणे आपण यात मन न घालणे. ऐसा त्यांनी साफ जबाब दिला तर यापरत आपण असल्या......" (पत्र अपूर्ण आहे).

आपल्या अधिकाराचे अतिक्रमण आपण करू नये याचा पोच अनुबाईला राहिला नसावा. तिला आलेले आणखी एक पत्र पहायला मिळाले. त्याचा संदर्भ कळला नाही, पण मजकूर असा आहे – "तुम्हाकडून अमर्यादेचा बंदोबस्त होणे आहे किंवा हल्ली चालते त्याप्रमाणे वर्तणूक करावयाची आहे हे समजोन विनंति लिहिणे ती लिहावी तुमचे प्रत्योत्तराची विनंति आलेप्रमाणे येथूनही होणे ते होईल."

अनुबाईची राजकीय दृष्टी, किंवा व्यवहारचातुर्य म्हणा, फारसे लांबच्या पल्ल्याचे नसावे. पुण्याला सदाशिवरावभाऊच्या तोतयाची शहानिशा चालली होती, तेव्हा तो तोतया नसून खराच भाऊसाहेब आहे, अशी भूमिका तिने घेतली. पुढे इतर पुराव्यांवरून तो तोतया असल्याचे सिद्ध झाले. या प्रकरणामुळे पेशवे अनुबाईवर संतप्त झाले, व इचलकरंजी संस्थान खालसा व्हायची वेळ आली. यावेळेस पेशव्यांचा कारभार नाना फडणीस आणि सखारामबापू बोकील पहात होते. या संबंधात अनुबाईने काकुळतीला येऊन एक पत्र नाना फडणीसांना लिहिले आहे. त्यात त्या म्हणतात – "आमची अब्रूरक्षण करणारे एक आपणाशिवाय दैवत जाणत नाही."

अनुबाईचे वृद्धत्व आणि पटवर्धनांनी तिच्या वतीने केलेली रदबदली यामुळे संस्थान खालसा होण्याचे टळले.

अनुबाई ही बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची मुलगी, कोल्हापूर गादीचे सचिव नारोमहादेव घोरपडे यांची सून, थोरल्या बाजीराव पेशव्यांची बहीण, थोरल्या नानासाहेब पेशव्यांची आत्या, बाजीरावाच्या काळापासून तिचे शाहू महाराजांशी वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध, त्यांनी तिला वतने सरंजाम दिलेले, आपल्या इचलकरंजी संस्थानचा कारभार तिच्या अधिकाराने चाललेला अशा या अनुबाईला आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात आपले वतन

वाचवण्यासाठी गादीचे दुय्यम दर्जाचे कारभारी नाना फडणीस यांच्या विनवण्या कराव्या लागल्या, हा दैवदुर्विलास नसून तिची स्वतःची Ineptitude यात दिसते.

तोतया प्रकरणात नामुष्की आल्यानंतर पेशव्यांचे सरदार मिरजेचे पांडुरंग गोविंद पटवर्धन यांनी अनुबाईंना पत्र पाठवले – "प्रथम बहुत प्रकारे विनंति केली मनास आली नाही अखेर दौलतीस धक्का येऊन योग्यतेस हानि जाहली आपण सर्वत्रांस वडील त्यात आम्हास तो अतिवंद्य याजमुळे मनास खेद जाहला तो किती लिहू?...... असो. आता आपले दिवस थोडे राहिले इतःपर श्री महायात्रेस जावे हेच योग्य या देशी राहणेत अर्थ नाही आज्ञा जाहलेस जाणेची तरतूद करून देईन", (इ. स. इ. व नि. प. १५३).

हे पत्र १७७६ सालचे आहे. अनुबाई यानंतर आठ वर्षांनी म्हणजे १७८४ साली मृत्यू पावल्या. त्यांच्या आयुष्याची ही शेवटची वर्षे कशी गेली, ते कळू शकले नाही. आपल्या सुमारे ७० वर्षांच्या आयुष्यात अनुबाईंने जाणत्या वयात बाजीराव, नानासाहेब, माधवराव आणि सवाई माधवराव या महत्त्वाच्या पेशव्यांची कारकीर्द पाहिली.

सासरचे घराणे कोल्हापूर गादीच्या सेवेत असूनही माहेर पेशव्यांकडे असल्यामुळे व पति फारसा कर्तबगार न निघाल्यामुळे पेशव्यांच्या आधारानेच अनुबाईचे आयुष्य व्यतीत झाले असे दिसते. परंतु माहेरच्या घराण्यातही आपले बंधु बाजीराव यांच्या कारकीर्दीत असलेली स्वतःची पत आपले पणतू सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीपर्यंत त्या टिकवू शकल्या नाहीत असे दिसते. माहेरचा आधार हा स्त्रीचा खरा आधार नव्हे, असाही अर्थ यातून काढला जाऊ शकतो. पण अनुबाईच्या बाबतीत तरी माहेरचे नाते दर पिढीप्रमाणे लांबचे होत गेले एवढेच याचे कारण दिसत नाही. काही गोष्टी त्या गृहीत धरीत गेल्या, काही वेळा त्यांनी आपल्या अधिकाराचे अतिक्रमण केले, आणि काही वेळा तर त्यांचे निर्णयच चुकीचे ठरले, असे दिसते. परिणामी त्यांच्या वतनावर त्यांच्या माहेरच्या मंडळीकडूनच जप्ती येण्याची वेळ येऊन ठेपली.

एकूण वतने सांभाळण्यासाठी लागणारा कर्तृत्वाचा आवाका वेगळाच असतो, असे दिसते. त्या वंशाला गेल्याखेरीज तो अंगी येत नाही, असेही म्हणावे का?

## ३ – गोपिकाबाई

गोपिकाबाई ही नानासाहेब पेशवे यांची पत्नी. नानासाहेब पेशव्यांबद्दल आधीच्या प्रकरणांमधून बरेच उल्लेख आलेले आहेत. त्या पार्श्वभूमीवर नानासाहेबांचे आपल्या पत्नींशी कशा प्रकारचे वर्तन असे, ते समजून घेण्याची उत्सुकता निर्माण होते.

या अभ्यासासाठी नजरेखालून घातलेल्या संदर्भसाधनांमध्ये गोपिकाबाईसंबंधीची बरीच पत्रे, नोंदी वगैरे वाचायला मिळाल्या. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि आयुष्याबद्दल रेखीव आणि तपशीलवार चित्र उभे केले जाऊ शकते. पण अशा तपशीलांचा फारसा वापर न करता, या अभ्यासासाठी निवडलेल्या इतर स्त्रियांच्या तुलनेतच गोपिकाबाईचे चित्रही बसवायचे ठरवले आहे. त्याचे मुख्य कारण हे की गोपिकाबाईच्या आयुष्यासंबंधी तपशील बरेच उपलब्ध झालेले असले, तरी या आयुष्याची अखेर पेशवे घराण्यातल्या इतर स्त्रियांप्रमाणेच विफलतेतच झालेली दिसून येते.

गोपिकाबाईंच्या आयुष्याचे दोन ठळक भाग पडलेले दिसतात. पहिला भाग सौभाग्यावस्थेचा तर दुसरा भाग वैधव्यावस्थेचा.

गोपिकाबाईंचा जन्म १७२५ साली झाला. गोपिकाबाईंचे माहेर रास्ते घराण्यांतले होते. हे रास्ते मूळचे कोकणातल्या गुहागर भागातले. गोपिकाबाईंचे वडील तिथे सावकारी करीत असत. शिवाय त्या भागातला वसूल गोळा करून विजापूरच्या आदिलशहाच्या खजिन्यात भरण्याचे कामही रास्ते घराण्याकडे होते. शाहूने साताऱ्याला स्वतःला अभिषेक करून घेतल्यानंतर मराठ्यांचे राज्य पुन्हा एकदा सुरळीत सुरू झाले. तेव्हा राजधानीत जाऊन आपले नशीब काढावे, म्हणून गोपिकाबाईंचे वडील साताऱ्याला आले. तिथे त्यांचा चांगला जम बसला. एका दिवाळीत शाहू महाराज त्यांच्याकडे फराळाला आले असताना गोपिकाबाई त्यांच्या दृष्टीस पडल्या. बाजीराव पेशव्यांचा मोठा मुलगा नानासाहेब तेव्हा सातारला दरबारात असे. ही चुणचुणीत मुलगी नानासाहेबाला बायको म्हणून शोभेल असे शाहूला वाटले. शाहूच्या पुढाकाराने बाजीरावाची परवानगी घेऊन गोपिकाबाई आणि नानासाहेब यांचे लग्न १७३० साली झाले. त्यांची जोडी चांगली जमेल हा शाहूचा होरा पुढे खरा ठरला, असे तत्कालीन कागदपत्रांतल्या नोंदीवरून दिसते. गोपिकाबाईचा चुणचुणीतपणा पुढे त्यांच्या वयाबरोबर परिपक्व होत गेला आणि पेशवे कुटुंबातल्या कर्त्या-पुरवत्या स्त्रीच्या सुघड व्यक्तिमत्त्वात त्याचे रूपांतर झाले. नानासाहेबासारख्या चौफेर व्यक्तिमत्त्वाच्या कर्तबगार पतीला त्यांनी योग्य साथ दिली असे दिसते.

गोपिकाबाई लग्न होऊन पेशव्यांच्या घरात आल्या, तेव्हा त्यांचे वय ५ वर्षांचे होते. त्यांच्या आजेसासूबाई राधाबाई कुटुंबातले सर्व व्यवहार पहात होत्या. गोपिकाबाईंच्या हातची पत्रे पहायला मिळाली, त्यातली अगदी सुरुवातीची पत्रे १७५४/५५ सालची, म्हणजे राधाबाईच्या मृत्यूनंतरची आहेत. गोपिकाबाईंच्या सासूबाई काशीबाई बहुधा आजारीच असत. त्यामुळे राधाबाईच्या मृत्यूनंतर घरातली जबाबदारी गोपिकाबाईकडे आली असे दिसते.

गोपिकाबाईला लिहिता वाचता येत होतेच व पत्रे लिहायची हौसही असावी असे दिसते. त्यांनी निरनिराळ्या निमित्तांनी आपले दीर, जावा, आतेसासू इत्यादींना पत्रे लिहिली आहेत. त्यात व्यक्तीनुसार आणि प्रसंगानुसार माया, कृतककोप, नाराजी, खोचकपणा, काळजी, आर्जव असे वेगवेगळे भाव प्रकट झाले आहेत. त्या सगळयामागची जाणीव मात्र एकच आहे. घरातल्या वडीलधाऱ्या व्यक्तीने कुटुंबातल्या इतर माणसांची काळजी वहावी, त्यांना सांभाळून घ्यावे, अशा पद्धतीची ही पत्रे आहेत, (पे. द. १८ – १०४ ते १०९). स्वतः नानासाहेब पेशवे आपल्या कुटुंबियांची खुशाली सांभाळण्यात जातीने लक्ष घालीत असत, हे आपण आधीच्या प्रकरणात पाहिलेच. या कामात गोपिकाबाईंची त्यांना पूर्ण साथ होती, असे दिसते.

या काळातल्या इतर स्त्रियांची दांपत्यजीवनासंबंधी फारशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. पण गोपिकाबाईच्या बाबतीत १/२ पत्रे वाचायला मिळाली, त्यातून नानासाहेबांच्या आणि त्यांच्या परस्पर रहस्याची थोडीशी झलक पाहायला मिळते.

नानासाहेबांचा निरोप गोपिकाबाईंना पोचवायला सांगणारे हे एक पत्र – "श्री राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी विनंति उपरि तांब्याचा पेला १ येक पाठविला आहे हा श्रीमंत

सौ. बाईसाहेबास पाणी प्यावयास द्यावा येविसी श्रीमंतांनी ल्याहावयास आज्ञा केली त्याजवरून लिहिले असे मुगदळाचा लाडू पाठविला असे हा भक्षून पहावा याजप्रमाणे करीत जावा येविसी विनंति करावी श्रीमंतानी दाखल्यास पाठविला आहे म्हणून बाईसाहेबास सांगणे."

आपल्याला आवडलेल्या लहान लहान गोष्टींचा देखील आनंद गोपिकाबाईंपर्यंत पोचवायचा, त्या आनंदात उभयतांनी सहभागी व्हायचे आणि दैनंदिन जीवन रमणीय करायचे, हे दांपत्यजीवनाचे सूत्र म्हणून नानासाहेबांनी सांभाळलेले दिसते. नानासाहेब प्रत्येक गोष्ट विचाराने करणारे होते. कौटुंबिक संबंधाप्रमाणेच पतिपत्नीसंबंधाबाबत त्यांनी असे काही धोरण आखले असले, तर त्यात काही अशक्य नव्हते. त्यात गोपिकाबाईंचा त्यांना पूर्ण प्रतिसाद होता हे सदाशिवरावभाऊच्या एका पत्रातून पाहायला मिळाले. हे पत्र सदाशिवरावाने धोंडिबा आप्पा पुरंदरे याला लिहिलेले आहे. या धोंडिबांना लिहिलेली सदाशिवरावांची बरीच पत्रे पुरंदरे दप्तरात वाचायला मिळाली. त्यात त्याने बऱ्याच कौटुंबिक गोष्टींबाबत आपले मन मोकळे केले आहे. हे पत्र असे – "वहिनीची प्रस्तुत माझी मर्जी बरी आसे वहिनीकडून तीर्थरूपास सांगितले आसे वहिनीसी राखून ठेवले त्याचे मनात आणून दिल्हे सविस्तर कळावे म्हणून लिहिले आसे", (पु. द. १.२४६).

नानासाहेबाजवळ असलेले आपले काम गोपिकाबाईंकरवी करवून घेण्यात सदाशिवरावाचे दोन उद्देश साध्य झाले. वहिनीच्या वशिल्याने काम तर होणारच, शिवाय वहिनीला आपण मान दिला हे नानासाहेबांच्या मनावर ठसून त्यांचे मत चांगले होईल, व मग तर काम नक्कीच होईल – असा हा दुहेरी जोर लावला होता.

पण या दांपत्यप्रेमाला ग्रहण लागले. नानासाहेब पेशव्यांनी दुसरे लग्न केले. हे लग्न त्यांनी पानिपताकडे कुमक घेऊन जात असताना वाटेत पैठण येथे केले. नव्या नवरीला घेऊन सर्व मंडळी – यात गोपिकाबाई, माधवराव, नारायणराव हे सर्वही होते – पुढे चालली. वाटेत नाना फडणीस भेटले. ते पानिपताहून परत येत होते. या भेटीबद्दल नाना फडणीस आपल्या आत्मचरित्रात लिहितात – "परस्परे उभयतांचे चित्तही ठीक नाही, हे कळले." हे परस्पर म्हणजे नानासाहेब व गोपिकाबाई. यांचे आपापसात बिनसले होते. तिसऱ्या माणसाच्याही लक्षात येईल असा हा बेबनाव होता, असे दिसते. नानासाहेबांनी दुसरे लग्न केल्यामुळे गोपिकाबाई नाराज झाल्या असाव्या, असा अंदाज नाना फडणीसांनी लावला.

नानासाहेबांचा दुसऱ्या लग्नाच्या पाठोपाठच पानिपतच्या पराभवाचे वृत्त आले. त्या धक्क्याने नानासाहेब खचले. गोपिकाबाईही खचल्या. त्यांचा वीस वर्षांचा उमदा देखणा मुलगा विश्वासराव या युद्धात मारला गेला. मुलाएवढा दीर सदाशिवराव बेपत्ता झाला. या दुःखाने नानासाहेब व गोपिकाबाई पुन्हा जवळ आलेले दिसतात. परतीच्या प्रवासात लिहिलेल्या पत्रात – "बायको अति उदास रोड मौनी होऊन गेली पहावत नाही", असे त्यांनी लिहिले आहे. पराभवाचा धक्का नानासाहेबांना जबरदस्त बसला होता, पण गोपिकाबाईंच्या स्थितीमुळे ते अधिक व्याकुळ झालेले दिसतात. काही महिन्यांतच त्यांचा मृत्यू झाला. गोपिकाबाई विधवा झाल्या. त्यांच्या अयुष्यातल्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली.

गोपिकाबाईबद्दल पेशवे कुटुंबातल्या इतर मंडळींचे काय मत होते तेही दोन-तीन नोंदीत

पहायला मिळाले. सदाशिवराव आणि गोपिकाबाई यांचे दीर-भावजय संबंध तसे काहीसे Fragile होते, हे आधीच्या उल्लेखावरून दिसते. त्यांची जाऊ आनंदीबाई यांनी त्यांच्याबद्दल काही मते नोंदवलेली पे. द. ४ मध्ये आढळतात. त्या म्हणतात – "थोरली बाई अंतर्यामी फार कठीण आहे", "थोरली बाई माधवराव यास बुद्धिवाद बहुत सांगत त्यातही घर फोडावयाच्या गोष्टी सांगत असत. सराफी बुद्धि होती" गोपिकाबाई सदाशिवरावांशी अंतर ठेवून वागत, त्यात भाऊबंदकीचा भाव होता, असे म्हणतात.

कुटुंब एकत्र ठेवण्याच्या गोपिकाबाईंच्या पत्रातून दिसणाऱ्या वृत्तीवर हा काही वेगळाच प्रकाश पडतो. रघुनाथरावांनी त्यांच्याबद्दल एकेठिकाणी म्हटले आहे – "वडिलांस मनसुबाही कळतो. केवळ वरकडी बायकांप्रमाणे नव्हेत." गोपिकाबाई आंतल्या गाठीच्या होत्या, काही विशिष्ट उद्देश ठेवून वागत होत्या, असे यातून ध्वनित होते. कुटुंबातला आपला मोठेपणा मान्य न करणाऱ्या मंडळींशी त्यांचे वागणे वेगळे असावे असे दिसते – "श्रीमंत मातुश्रीबाई मोठी मनसबेबाज आहे", असे गोविंद हरि पटवर्धनांच्या पत्रात आहे.

परंतु त्यांचा उद्देश सफल झाल्याचे त्यांच्या उत्तरायुष्यात दिसत नाही.

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवरावांना पेशवे पद मिळाले, पण त्याचवेळी रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षेने उचल खाल्ली. चुलत्या-पुतण्यांत बेबनाव झाला. माधवरावांना रघुनाथरावांच्या आधीन व्हावे लागले. त्यानंतरच्या खेळीत माधवरावांनी बाजी जिंकली आणि पेशवे पदावरचे त्यांचे आसन काहीसे स्थिर झाले. या सर्व घडामोडींच्या काळात माधवरावांनी रोजचे वृत्त गोपिकाबाईंना कळवल्याची बरीच पत्रे वाचायला मिळाली. त्यांतली काही पत्रे ही गोपिकाबाईंच्या पत्राची उत्तरे होती. त्यातून गोपिकाबाईंनी माधवरावाला काय सल्ला दिला, व त्यांनी तो कितपत मानला त्याची कल्पना येते.

पुढे माधवराव पेशवे म्हणून स्थिर झाल्यावर त्यांचा व गोपिकाबाईचा कारभारविषयक काही प्रश्नांवरून खटका उडाला, गोपिकाबाईंची सूचना माधवरावांनी अमान्य केली व गोपिकाबाई नाराज होऊन पुणे सोडून गंगापूरला जाऊन राहिल्या. या सर्व कथाभागाची पूर्व सूचना आधीच्या काही पत्रांतून मिळते. गोपिकाबाई आणि माधवराव यांची धोरण विषयक दृष्टीच वेगळी होती, असे दर्शवणारी ही पत्रे आहेत. माधरावांनी गोपिकाबाईंबद्दल "रूबरू मर्यादा" फार होती असे आनंदीबाईंनी म्हटले आहे (पे. द. ४). समोरासमोर असताना बाळगलेल्या या मर्यादेचा तोंडदेखलेपणाही या पत्रातून दृष्टीस पडते. पत्र असे – "वडिलीं आशीर्वाद पत्र पाठवले ते पावले लिहिला मजकूर कळोन आला. तेथे आज्ञा की 'ज्वर अद्याप सोडीत नाही आमच्या वैद्याचे औषध घ्यावे म्हणजे ज्वर जाईल' ऐसियासी सांप्रत ज्वराच्या पाळया चुकल्या. प्रस्तुत ज्वर येत नाही वडिलांस कळावे. द्राक्षे व साखरेचे कंद पाठवले ते पावले वडिलीं बालकाचा निरंतर पत्री सांभाळ करावा या नंतरि इकडील प्रसंग एक प्रकार जाहला (रघुनाथरावाने माधवरावाला कैदेत टाकले) म्हणोन वडिलीं चित्ती उदास वृत्ति धरिली म्हणौन ऐकिले त्यास सदैव काळ सारखा असतो असा अर्थ नाही. ज्या समयी जे होणार ते होते यास इलाज काय? प्रस्तुत वडिली समय प्राप्त झाला आहे त्यासच बरे म्हणून गोड दिसे ते करावे वाईट न दाखवावे उदास न व्हावे आम्हीही काळावर दृष्टि ठेवून उत्तम दिसे सारिखा

डौल धरला आहे वडिली कोणे गोष्टीविशी उदास वृत्ति धरून लौकिकात वाईट न दिसे ते करावे आम्ही ऐकितो की आपण एकादे स्थळी चार दिवस जाऊन राहणार त्यास ही गोष्ट वडिली एकंदर न करावी अरो जालियासी येथील प्रसंगास ठीक पडणार नाही."

गोपिकाबाईला समजुतदारपणाचे, मुत्सद्दीपणाचे धडे तिचा मुलगा माधवराव याने दिले आहेत. प्रसंगाला तोंड माधवराव देत होता, व गोपिकाबाई लांबून प्रतिक्रिया व्यक्त करीत होती, हे या फरकाचे कारण दिसत नाही. या दोघांच्या वृत्तीतली आणि समजुतीतली भिन्नता त्यातून व्यक्त होते.

आता दुसरे एक पत्र – "वडिली पत्र. ११ सफरचे पाठवले ते पावले. लिहिले वर्तमान कळले शत्रुशेष न ठेवावे, बाबा वैद्याचा समाचार घेत जावा, सखारामपंत पहिल्याप्रमाणे निखालस पत्र पाठवित नाहीत त्यास ताकीद करावी म्हणून आज्ञा... आम्ही मतलब न घालावे, व शत्रु अशा पेचात आहे तो बुडवावा, परंतु आमच्या फौजेस पैका नाही... वरकड मसलती बुडतात यास्तव मतलब घालावे लागतात व मल्हारबाचे ही मते हेच करावे असे आहे. बाबा वैद्याचा समाचार आज्ञेप्रमाणे घेत असतो त्याचे मते घरास जावयास निरोप मागावा असे आहे तर वडिली त्यास लिहावे की निरोप न मागणे", (ऐ. ले. सं. २.३५३२). लष्करी डावपेचांच्या बाबतीत गोपिकाबाई माधवरावाला सूचना देत होती. परंतु यासंबंधात माधवरावाचे मत वेगळे होते, व त्याच्या मताला मल्हारराव होळकरांनी दिलेला पाठिंबा त्याला गोपिकाबाईंच्या सल्ल्यापेक्षा अधिक महत्त्वाचा वाटत होता, हे यातून स्पष्ट दिसते. बाबा वैद्याशी कसे वागावे यासंबंधी गोपिकाबाईंनी केलेली सूचनाही माधवरावांनी त्यांच्यावरच उलटवली आहे.

राज्यकारभार व लष्करी धोरण हा गोपिकाबाईंचा प्रांत नव्हे व त्यांचा त्यातला हस्तक्षेप मान्य केला जाणार नाही, अशी स्पष्ट जाणीव माधवरावांनी गोपिकाबाईंना या पत्रात करून दिली आहे. परंतु गोपिकाबाईंच्या ती लक्षात आली नसावी, किंवा त्यांनी ती लक्षात घेतली नाही, असे पुढे काही काळानंतर त्यांचा माधवरावांशी कारभाराविषयक प्रश्नावरून खटका उडाला, त्यावरून दिसून येते.

आपल्या अधिकारक्षेत्राचे अतिक्रमण करण्याची चूक अनुबाईंनी केली, तशी ती गोपिकाबाईंनीही केली, असे दिसते.

गोपिकाबाईला नाना फडणीस व सखारामबापू यांनी लिहिलेली काही पत्रे वाचण्यात आली. पण ती सर्व माधवरावाच्या सांगण्यावरून, किंवा गोपिकाबाईंनी तसा निरोप पाठवल्यावरून लिहिले आहेत. स्वतंत्रपणे तिला महत्त्व देऊन लिहिलेली नाहीत. पेशव्यांची आई म्हणून नाही, तसेच व्यक्तिशः देखील नाही.

अशी पत्रे तिला पटवर्धन सरदारांनी लिहिलेली वाचायला मिळाली. पटवर्धन हे पेशव्यांचे महत्त्वाचे सरदार होते. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर आपण माधवरावांशी इमान राखू अशी शपथ गोपिकाबाईंनी गोपाळरावांकडून घेववली होती.

पुढे घोडनदीच्या लढाईत माधवराव रघुनाथरावांच्या स्वाधीन झाले, तेव्हा रघुनाथरावांच्या बाजूला जाण्याचे नाकारून गोपाळराव मिरजेला परत गेले. त्यामुळे रघुनाथराव रागावले व मिरज लुटण्याचा बेत करू लागले. हे कळल्यावर गोपाळराव निजामाला जाऊन मिळाले.

त्यामुळे गोपिकाबाईंचा त्यांच्यावर राग झाला.

निजाम पुण्यावर चालून येण्याची शक्यता आहे, असे गोपाळरावाने सावधगिरी म्हणून गोपिकाबाईंला कळवले तेव्हा गोपाळरावच पुण्यावर चाल करण्याची धमकी देताहेत असा अर्थ घेऊन तिने त्यांना रागाने उत्तर लिहिले. त्याबद्दल गोपाळरावांनी लिहिलेल्या उत्तरातून त्यांची गोपिकाबाईबद्दलची स्वामीनिष्ठेची व आदराची भावना व्यक्त झाली आहे. तिची कदर गोपिकाबाईंनी केली असल्याचे वाचण्यात आले नाही.

"आपण आमचे इमान प्रमाण घेतले की दुसरे चित्तात आणू नये त्यावरून आम्ही सर्वस्वास बुडून राज्यभ्रष्ट झालो... ते चित्तात काही न येता बरे लिहिले ते वाईट मानून दोषारोप आम्हावर ठेवून लिहिले त्यावरून बहुत अपूर्व वाटले... काल महिमा तशीच त्याला आपला काय इलाज एकूण आपले कडील माया सुटेना त्यामुळे अतोभ्रष्ट आपले चित्तात ते करिती ते आम्हीच म्हणून ततोभ्रष्ट एकूण दोघीकडे धरावयास जागा नाही धनी कारभारी यांचा रागरंग कळलाच होता. आपली कूर्मदृष्टी आमचे ठायी असेल, म्हणून आपले चरणारविंदी जीव ठेवून होतो त्याचाही भाव कळला. या उपर आम्ही दुसरे पत्र सूचनेचे अगर कोणा एका मजकुराचे लिहित नाही. हे विज्ञापना", (ऐ. ले. सं. २४९).

अखेर पुणे लुटले गेलेच. पटवर्धनाच्या कारकुनांनी पुण्याहून त्यांना या बाबत एक पत्र पाठवले ते असे – "यवनाचे पत्र पुण्याचे कारभारी यास व बाईस व देशमुख देशपांडे यास आले होते की खंडणी दिल्हीत तर पुणे राहील नाहीतर लुटून जाळू." त्यावर बाईंनी उत्तर पाठवले ते – "तुमचे वैरी तिकडेच गेले त्याजकडे काय असेल ते पाहून घेणे आम्हास खंडणी द्यावयास गाठ पडत नाही पुण्याचे काय करणार ते सुखरूप करणे", (ऐ. ले. सं. २५१).

नंतर पुढे पटवर्धनांची पेशव्यांशी दिलजमाई झाली. त्याला गोपिकाबाईंचा काही हातभार नव्हता. पटवर्धन पिता पुत्र गोपिकाबाईंना बराच मान देऊन वागत असत. पण व्यवहारात त्याचा त्यांना फायदा झालेला दिसत नाही. पटवर्धनांच्या घरातल्या बायका मंडळींचा गोपिकाबाईशी काही संपर्क असल्याचे वाचण्यात आले नाही. मात्र पुरंदऱ्यांच्या घरातल्या बायका मंडळींचे पेशव्यांच्या बायका मंडळींशी संबंध होते असे काही पत्रांवरून दिसते.

गोपिकाबाईंचा स्वभाव हट्टी, आणि आपले ते खरे करण्याचा होता, असे इतिहासकार सांगतात. त्याला वरील उदाहरणांवरून पुष्टि मिळते. याचा पाठपुरावा करणारे रघुनाथरावांचे हे पत्र या दृष्टीने वाचण्यासारखे आहे. पुण्यावर निजाम स्वारी करणार होता, या काळातले हे पत्र आहे. यासबंधी पत्रातून सुरुवातीला गोपिकाबाईंना दिलेला मान आणि नंतर तिचा हट्टी स्वाभाव जाणून तिला दिलेल्या सूचना यावरून पेशव्यांचे त्यांच्या घरातल्या वडील स्त्रियांशी वागण्यात असलेले धोरण लक्षात येते. हे धोरण माधवरावांनीही सांभाळलेले आहे.

"।। श्री शंकर ।।

पै ।। छ २५ रमजान

तीर्थरूप मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशी आपले रघुनाथाचे साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत.छ १९ रमजान चैत्र वद्य ७ सोमवार मुक्काम नजीक परांडे येथे वडिलांचे

कृपेकरून सुखरूप असो विशेष. बहुत दिवस वडिलांकडून पत्र येत नाही येणेकरून अपूर्व वाटते चिरंजीव माधवराव व नारायणराव यांच्यावर वडिलांची कृपा आहे तशी आम्हावर नाही असे दिसते पूर्वी तर वडील हमेशा कृपा करीत आले अलीकडे पत्र येत नाही त्यावरून विलक्षण वाटते आम्हीही बहुत दिवस वाट पाहिली परंतु सविस्तर पत्र न आले यास्तव कृपा करून सर्वदा तोषवीत गेले पाहिजे जेणे करून सर्व शत्रु पादाक्रांत होतील सांप्रत मोगलांची काही फौज पुणे, जुन्नर, सातारा, नाशिक या प्रांते येऊन जप्त्या करणार यास्तव वडिलीं सावध असावे आजकाल किल्ल्यावर असावे हवेल्यांचे सुखासाठी खाली न रहावे चार दिवस तसदी पडली तरी कबूल करावी आयत्यावेळेस फौज अचानक आली तरी पुण्यापासून सिंहगडास पोचणेचे संकट पडेल मग आम्ही लिहितो ते आठवेल परंतु आठवूनही फळ नाही यास्तव बहुत सावध असावे निदान पार्वतीबाई व रमाबाई व सगुणाबाई वगैरे बायका व चिरंजीव नारायणराव असे तरी सिंहगडास पाठवावे आपण आयत्यावेळी गेला तरी कामास येईल मी लिहितो यास्तव वडिली रागास न यावे मी लेकरू आहे हा काल संकटाचा यामध्ये बहुत सावध असावे ग्रहण व षड्ग्रही आले आहे आणिकही या वर्षात दोन चार योग क्रूरच आहेत यास्तव पुण्याचे भरवशावर राहू नये दगा झाला तरी फजितीस जोडी नाही गोपाळ गोविंद कोणी मोगलांचे लष्करातून लिहितील त्याजवर जाऊ नये. ते लबाड आहेत... आम्हास सुचते ते लिहितो आपण वडील आहेत विचारास येईल ते करावे बहुत काय लिहिणे हे विनंती", (ऐ. ले. सं. २२४२).

या संबंधात माधवरावानेही गोपिकाबाईला पत्रातून कळवले आहे, पण त्याचे कारण वेगळे आहे – "याज करता आपण सावध राहून किल्ल्यावर जावयाचे करावे म्हणजे शंभर संशय लोकांचे जातील यास्तव लिहिले आहे तेथे लोक शंभर संशय वडिलांस कळवितात त्यात तो प्रकार किमपि नाही", (ऐ. ले. सं. २२०८).

पण निजामाची धास्ती गोपिकाबाईला फारशी वाटली नव्हती, हे आधी पाहिलेच. या धामधुमीत तिने सिंहगडावर नारायणरावाचे लग्नही उरकून घेतले! पूर्वी नानासाहेबांवर मोहिमांवर गेलेली असल्याने ती लढाईला घाबरत नसावी, पण मुख्य कारण स्वभावाचेच दिसते.

निजामाने पुणे लुटले त्यात लुटीच्या काही जागा गोपिकाबाईंच्या बंधूंनी निजामाला दाखवल्या अशी तक्रार माधवरावांकडे आली. गोपिकाबाईंनी आपल्या भावाच्या वतीने माधवरावांकडे रदबदली केली, पण ती माधवरावाने मान्य केली नाही. यामुळे अपमानित होऊन गोपिकाबाईंनी पुणे कायमचे सोडले व त्या गोदावरीच्या तीरावर नाशिकजवळ गंगापूर येथे जाऊन राहिल्या. या प्रकरणात गोपिकाबाईंचा अहंभाव दिसतो. पण त्यांचे राजकारण कोत्या बुद्धीचे होते हेही दिसते. तेथे माधवरावांनी त्यांची खर्चासकट सर्व व्यवस्था चांगली ठेवली होती. मात्र यानंतर माधवरावांचा त्यांच्याशी प्रत्यक्ष पत्रव्यवहार वाचण्यात आला नाही. गोपिकाबाईंचे कारकून रामचंद्र नारायण मोरे यांना पत्रे लिहून माधवरावांनी गोपिकाबाईंची चौकशी केली आहे. त्यातून त्यांना गोपिकाबाईंबद्दल आई म्हणून वाटणारे प्रेम, आणि त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने मनाला आलेली व्याकुळता फार चांगली प्रतिबिंबित झाली आहे. एक नमुना मुळातूनच वाचण्यासारखा आहे – "अलीकडे वडिलांचे पत्र विस्तारे

येत नाही तेणेकरून चित्त उद्विग्न आहे पूर्वी वडिलांचे पत्र येत होते त्यात हमेशा वडीलपणाची आज्ञा होत असे अलीकडे काहीच विस्तारयुक्त येत नाही तेणेकरून असेही वाटते की मजपासून काही आज्ञेशिवाय वर्तणूक झाली असेल म्हणून वडिलांचे पत्र येत नाही, असाही संदेह वाटतो तर तुम्ही वडिलांची मर्जी पाहून या गोष्टीचा शोध घेऊन लिहून पाठवणे हे पत्र दुसऱ्यास न कळावे वडिलांची मर्जी पाहून तुमचे विचारे जाल्यास दाखवणे जाणिजे". (ऐ. ले. सं. ४९२). पण तरी आई-मुलगा हा वैयक्तिक संबंध माधवरावांनी कारभारापासून कटाक्षाने दूर ठेवला आहे.

गोपिकाबाई आपल्या गंगापूर इथल्या मुक्कामात रोजकीर्द ठेवीत असत (पे. द. २१.१७४). त्यात कशासाठी काय खर्च झाला, कोणी कसे वर्तन केले, कोणास काय दंड केला वगैरे नोंदी सापडतात.

नारायणरावांच्या वधानंतर गोपिकाबाई मनाने सैरभैर होऊन गेल्या व वाडा सोडून पंचवटीला जाऊन जोगवा मागून राहिल्या, असे इतिहास सांगतो. सवाई माधवरावाच्या जन्मानंतर त्या परत गंगापूरला आल्या.

सवाई माधवरावांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था नाना फडणीसांनी केली होती. तरी पण सवाई माधवरावांनी गोपिकाबाईंना एक पत्र लिहून "कोणे रीतीने चालावे हे सर्व ल्याहावयास आज्ञा व्हावी" अशी विनंती केली, यावर गोपिकाबाईंनी त्यांना एक १३ कलमी उपदेश लिहून पाठवला. सवाई माधवरावांचे वय या वेळेस ९ वर्षांचे होते. त्यांनी कुणाच्या तरी सांगण्यावरून ही विनंती केली असण्याची शक्यता आहे. या १३ कलमांमध्ये सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत धर्मकृत्ये, अभ्यास, व्यायाम, आहार, विहार कोणत्या वेळेस कैसे व किती असावे त्याचा बारीक सारीक तपशील गोपिकाबाईंनी लिहिला आहे. पत्रातून नानासाहेब पेशव्यांनी रघुनाथरावाला लिहिलेल्या उपदेशाशी याचे बरेच साम्य आहे. तो उपदेश १७४८ साली केला होता, हा १७८३ सालचा आहे. या ३५ वर्षांच्या कालखंडात पेशव्यांच्या कुटुंबात, आणि राज्यकारभारात बरेच फेरफार झाले होते. बाहेरची राजकीय परिस्थितीही बदलत होती. इंग्रज मराठ्यांचे दार ठोठवू लागला होता. त्याचे पडसाद या grooming मध्ये उमटलेले नाहीत.

या १३ कलमातला मुख्य उपदेश सवाई माधवरावांनी कोणाशी केव्हा कसे वागावे यासंबंधी आहे, आणि तो मुळातूनच वाचण्यासारखा आहे. परंतु एका नमुन्यावरून त्याची काहीशी कल्पना येईल – "कचेरीत यावे ते समयी सर्वाक्ष देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावे कचेरीत लघुशब्द बोलू नये व गैरही बोलू नये मनुष्य परीक्षा असावी गैरवाखा एकाद्याने समजाविलेस पक्केपणी विचार करून अपराध ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध करवावे आपण नेत्रकटाक्ष करून पहावे अपराधानुरूप पारपत्य करावे परंतु संभावित गृहस्थ बहुत दिवस पदरीचा प्रामाणिक अशाने रदबदली केली असता क्षमा करावी दुसऱ्याचे क्षुद्र काढू नये येणेकरून त्याचा अपमान होतो व तो त्याचे मनात दंश रहातो साधल्यानुरूप नाश करील आणि आपल्यास लघुपणा येईल संन्निधानी लोकात वधु मनुष्य राखल्यास जे केले त्यास ते रुकार देतात परंतु जनलोक वाईट म्हणतात थोरपणास हानि होते येणेप्रमाणे घटी तीन मिळून घटी अकरा कलम–४." एकूण सर्व कलमांचा सारांश असा आहे की, आपले अवगुण लपवून हाताखालच्या लोकांना आपल्या काबूत कसे ठेवावे. हा उपदेश करण्याच्या वेळेस

गोपिकाबाईंना कारभाराच्या केंद्रापासून दूर होऊन जवळ जवळ वीस वर्षे झाली होती. पण त्या जीवनाचे त्यांना किती आकर्षण होते, आणि त्या वातावरणाशी आणि त्यातल्या आव्हानांशी त्या किती समरस झाल्या होत्या, हे यातून दिसून येते. पण हे सर्व त्यांना आपल्या मनातच ठेवावे लागले. माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवे झालेले नारायणराव वयाने लहान होते म्हणून त्यांना सल्ला देण्यासाठी गोपिकाबाई पुण्याला आल्या होत्या. पण आपले काही चालत नाही असे दिसल्याने त्या परत गेल्या होत्या (पे. द. ).

कौटुंबिक संबंधात कसे वागावे हे सांगताना – "गंगा भागीरथी ताईसाठी (आईची आई) यांची भेटी चार रोजी एक वेळ घेत असावी, त्यासच वाड्यात यावयाचा बेत व्हावा नंतर त्यास बहुत संतोषें करून बोलावे व मूलपणाने बोलण्याचा डौल दाखवावा, वाड्यातच आज रहावे असा आग्रह करून ठेवून घेत जावी", असे त्यांन्नी लिहिले आहे. असे प्रेम आणि अगत्य हेदेखील एक धोरण म्हणून सांभाळण्याची ही वृत्ती गोपिकाबाईच्या तरुणपणातल्या कौटुंबिक पत्रव्यवहाराच्या काळापासूनच चालत आलेली होती.

गंगापूर येथे १७८८ साली गोपिकाबाईंचा मृत्यू झाला. त्यावेळेस त्यांचे वय ६३ वर्षांचे होते. आपल्या आयुष्यात त्यांनी आपला पति, दीर, आपले पाचही मुलगे, सुना या साऱ्यांचे मृत्यू पाहिले. एकूण त्यांच्या आयुष्याचा आढावा घेतला, तर आयुष्याची सुरुवात अतिशय वैभवात आणि दिमाखात होऊन उतर वयात अनेक मानसिक आघात सहन करीत त्यांना दिवस कंठावे लागले, असे दिसते.

गोपिकाबाईच्या ठिकाणी बुद्धिमत्ता, महत्त्वाकांक्षा, धैर्य, स्वतःच्या श्रेष्ठतेची जाणीव असे प्रशासनाला लागणारे गुण होते. परंतु स्वतःकडून प्रयत्न करूनही त्यांना राजकारणात आपला शिरकाव करून घेता आला नाही. त्यांच्या स्वभावातले काही अवगुण त्याला कारणीभूत होते, परंतु तत्कालीन परिस्थितीतदेखील त्यांना अनुकूल नव्हती, हेदेखील खरे आहे.

## ४ – आनंदीबाई

पेशवे घराण्यामध्ये राजकारणामध्ये रस घेणाऱ्या आणि काही राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या दोनच स्त्रिया होत्या. त्यातली एक आधी पाहिलेली गोपिकाबाई आणि दुसरी आनंदीबाई.

आनंदीबाईचा जन्म १७४७ साली झाला. तिचे माहेर कोकणातल्या गुहागर गावच्या ओक घराण्यातले होते. आनंदीबाई ही रघुनाथरावांची दुसरी बायको. तिचे रघुनाथरावांशी लग्न ती आठ वर्षांची असताना, १७५५ साली झाले.

आनंदीबाईसंबंधी मिळालेली माहिती ही अधिक प्रमाणात तिच्या उत्तरायुष्यातल्या काळाची आहे. विशेषतः १७८४ ते १७९४ या तिच्या शेवटच्या दहा वर्षांतली. या काळात ती कोपरगाव येथे आपल्या परिवारासह नाना फडणीसाच्या कैदेत रहात होती. या तिच्या वास्तव्यातल्या प्रत्येक बारीक सारीक घटनेची नोंद करून ती नाना फडणीसांकडे पाठवली जात असे. या सगळया नोंदी एकत्र करून रियासतकार सरदेसाईंनी पेशवे दप्तराचा एक स्वतंत्र खंडच 'आनंदीबाईची दिनचर्या' या नावाने प्रसिद्ध केला आहे. या नोंदीचे महत्त्व केवळ आनंदीबाईसाठीच नव्हे; तर त्यातून त्या काळातल्या दृष्टीस पडणाऱ्या सामाजिक, धार्मिक

रीतिरिवाजांसंबंधी, कौटुंबिक संबंधासंबंधी आणि आनंदीबाईच्या परिवारातल्या मंडळींच्या स्वभाववैशिष्ट्यांसंबंधी जी माहिती मिळते, त्या माहितीसाठी आहे.

या अभ्यासाचा उद्देश आनंदीबाईची चरित्ररेखा समजून घेण्यापुरता मर्यादित असल्याने, इतर माहितीचा उपयोग त्यात फारसा केलेला नाही.

पेशवे घराण्यातल्या इतर स्त्रियांप्रमाणे आनंदीबाईलाही लिहिता वाचता येत होते. ती लग्न होऊन पेशव्यांच्या घरात आली, तेव्हा कुटुंबातले कर्तेपण गोपिकाबाईकडे आलेले होते. सुरुवातीच्या काळातल्या आनंदीबाईच्या आयुष्याबद्दल फारसे वाचायला मिळाले नाही. पेशवे घराण्यातल्या इतर स्त्रियांबरोबर ती रहात होती, व घराण्याच्या प्रथेप्रमाणे पति रघुनाथराव मोहिमेवर गेले की त्यांच्या बरोबर जात होती. १७६१ साली नानासाहेबांचा मृत्यू झाला. नानासाहेबांचा दुसरा मुलगा माधवराव याला पेशवाईची वस्त्रे मिळाली. माधवराव त्यावेळी वयाने तसा लहान – १६ वर्षांचा होता. त्यामुळे रघुनाथरावाच्या मनात आपण पेशवे बनावे, अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली, त्यातून भाऊबंदकीचा कली पेशव्यांच्या कुटुंबात शिरला. रघुनाथराव, व त्यांची पत्नी म्हणून आनंदीबाई दोघेही पेशवे कुटुंबापासून वेगळे पडले. पण याही काळातल्या कागदपत्रांत आनंदीबाईचे उल्लेख पहायला मिळाले नाहीत.

पेशवाईच्या राजकारणाच्या पटावर आनंदीबाईचे पाऊल पडल्याचा पहिला प्रसंग नारायणरावाच्या वधाशी निगडीत आहे. परंतु त्याबद्दलही कागदोपत्री काही आधार सापडलेला नाही. रघुनाथरावाने "नारायणास धरावे" अशी चिठ्ठी लिहिलेली असताना, आनंदीबाईने आपल्या डोळ्यातल्या काजळाचा वापर करून 'ध' चा 'मा' केला, त्यामुळे नारायणरावाचा वध झाला, अशी सुरस आख्यायिका याबाबतीत प्रस्तुत आहे. ही आख्यायिका प्रथम कोणी प्रस्तुत केली, व का ते कळायला मार्ग नाही. आनंदीबाईच्या उत्तरायुष्यात दिसून आलेल्या तिच्या महत्त्वाकांक्षीपणाच्या व प्रयत्नशीलतेच्या काही उद्रेकांवरून या वधाचे पाप तिच्या माथ्यावर फोडणे खपून जाईल, असेही वाटले असावे. पण या घटनेला इतिहासात आधार सापडलेला नाही.

नारायणरावाच्या वधानंतर रघुनाथराव पेशवे झाले खरे, पण आपले अशा रीतीने पेशवे होणे पुण्यातल्या मंडळींना पसंत पडलेले नाही, हे ते जाणून होते. त्यामुळे ते पुणे सोडून मोहिमेवर गेले. बरोबर आनंदीबाई देखील होत्या.

नारायणरावाचा वध झाला त्यावेळी त्याची पत्नी गंगाबाई गरोदर होती. तिच्या गर्भाला रघुनाथरावाच्या पक्षाकडून पर्यायाने आनंदीबाईकडून धोका होण्याची शक्यता आहे, असे कारभाऱ्यांना वाटले म्हणून त्यांनी गुपचूप बंदोबस्ताने गंगाबाईला शनिवारवाड्यातून पुरंदर किल्ल्यावर नेले. ही शक्यता कारभाऱ्यांच्या मनातली होती, प्रत्यक्षात तसा काही प्रयत्न झाला किंवा काय ते पक्के नमूद नाही.

रघुनाथराव पुण्याबाहेर होते, तेव्हा पेशवाईचा कारभार नाना फडणीस, सखारामबापू, इत्यादी जुन्या कारभारी मंडळींनी गंगाबाईच्या नावे ग्वाही फिरवून व तिला मुलगा झाल्यावर त्याला पेशवाईची वस्त्रे देववून स्वतः पाहिला. रघुनाथरावांना पुण्यात येणे अधिकच अवघड होऊन बसले. त्या वेळेस आनंदीबाईही गर्भवती होती. तिला त्यांनी धारच्या किल्ल्यात सरदार

पवारांकडे ठेवले. तेथेच १७७५ साली दुसऱ्या बाजीरावाचा जन्म झाला.

दुसऱ्या बाजीरावाच्या जन्मानंतर आनंदीबाईच्या हालचालींची नोंद इतिहासात सापडते.

बाजीरावाच्या जन्माच्या आधी रघुनाथारावाने आपला वारस म्हणून अमृतरावाला दत्तक घेतले होते. पण आता पोटचाच वारस जन्माला आल्यानंतर आनंदीबाईने धारच्या आजूबाजूच्या लोकांना फितवून पेशव्यांविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. त्या भागात तिने फौज उभारून गडबड सुरू केली.

याची बातमी पेशव्यांना लागल्यावर त्यांनी तिला पकडून मंडलेश्वर येथे कैदेत ठेवले. १७७७ ते १७७९ या दोन वर्षांच्या काळात आनंदीबाई मंडलेश्वर येथे पेशव्यांच्या कैदेत होती. या काळामध्ये रघुनाथराव इंग्रजाची मदत घेऊन पेशव्यांच्या गादीवर येण्याची खटपट करीत होता. या संबंधात आनंदीबाईने स्वतः पुढाकार घेऊन मंडलेश्वरहून नाना फडणीस व सखारामबापू यांना पत्रे लिहिली आहेत. रघुनाथराव घरच्या मंडळींशी लढायला इंग्रजांची मदत घेतो आहे, हे तिला योग्य वाटत नव्हते. परंतु पत्नी या नात्याने तिने रघुनाथरावाची बाजू घेतली आहे, व त्याच्या कारवायांचा ठपका कारभाऱ्यांवर ठेवला आहे. कारभाऱ्यांनी रघुनाथरावाचे मत समजून घ्यावे, त्याच्या इच्छेप्रमाणे वागावे, व दौलत राखण्याचे श्रेय घ्यावे, असे आवाहन तिने केले आहे. रघुनाथरावाच्या कारवाया आत्मघातकी ठरणार आहेत, हे तिला दिसत होते, पण त्याचा दोष तिने कौशल्याने नाना फडणीस व सखारामबापू यांच्यावर टाकला आहे. या पत्रातून आनंदीबाईच्या स्वभावातला धाडसीपणा, प्रयत्नशीलता, मुत्सद्देगिरी हे गुण दिसतात; तिच्या स्वभावातला तिखटपणा आणि खोचकपणाही दिसतो, त्याचबरोबर पेशवे घराण्याचा अभिमान, आणि परिस्थितीबद्दलची पोटतिडीकही दिसते. रघुनाथरावाच्या कारवायांचा राजकीय परिस्थितीवर होऊ शकणारा दूरगामी व गंभीर परिणाम, तिला जाणवत होता, तिची राजकीय दृष्टी प्रगल्भ होती, असेही यातून दिसून येते. ही पत्रे मुळातूनच वाचण्यासारखी आहेत – "राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन यासी प्रति सौ.आनंदीबाई आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष वर्ष दीड वर्ष परियंत जाहाले तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाही आम्ही घेऊन पाठवावे तर कारणाखेरीज आम्हास पत्रे पाठवितात म्हणोन तुम्हीच हसाल हा काळ समजोन पत्रे न पाठविली हल्ली पत्राचे कारण की तुम्ही तीन पिढ्यांचे दौलतीतील फडणीसं असोन दौलतेची तो गति झाली ती झाली हल्ली यवनाक्रांत ब्राह्मणी दौलत फितुरीनी होऊ पहाते तुमच्या चित्तातील उगीच आटी जात नाही आणि ब्राह्मणी तो बुडत चालली या दौलतेत पूर्वी कारभारी झाले त्यांणी ब्राह्मणी स्थापली व दौलतेची वृद्धी केली हा काळ प्रस्तुत श्रीसत्तेने असा आला इंग्रेज बुंदेलखंडापर्यंत दोन कंपू आले आणि आणि कहो मागून येणार याचा बारीक मोठा विचार जो करणे तो तुम्हीच करणे आम्हास म्हणाल तर आपला जीव कोणास नकोसा नाही त्यापक्षी दोन्ही गोष्टींचा आंदेशा करून ब्राह्मण पण राहे ते करणे आम्ही येथे तुमच्या स्वाधीन पावणे दोन वर्षे जाहाली कार्यसिद्धि तुमची काहीच न जाहाली नुकसान पाच हजार फौजेचे सरंजामी गुतले ही झाली विशेष काहीच न झाले तुमची फौज गुतून आमचा धन्याचे पायासी वियोग हे उभयपक्षी नुकसान आहे तर आम्हास मुंबईस जाण्याविषयी वोढेकरास पत्र लिहिणे, छ १० माहे साबान बहुत काय लिहिणे हे

आशीर्वाद", (ऐ. प. को. ५१).

वोढेकर हा धारचा दिवाण असून आनंदीबाई त्याच्या अटकेत होती. रघुनाथराव मुंबईला इंग्रजांशी बोलणी करीत होता.

दुसरे पत्र अधिक महत्त्वाचे आहे. हे सखारामबापू बोकील यांना लिहिले आहे – "राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत यासी प्रति सौ. आनंदीबाई नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे बुंदेल खंडात इंग्रज दोन कंपू आले आहेत हुजूरची पत्रे इंग्रजास जाऊन इंग्रज आले जबरदस्त आहेत दौलत आपणास घेऊन देतो आम्हास कोठीस आपल्याजवळ जागा द्यावा व आमची फौज नेहमी दहा हजारपर्यंत ठेवीत जावी ही गोष्ट हुजूर कठीण असे समजले परंतु ज्यापक्षी रानोमाळ हिंडणे त्यापक्षी कबूल करावे हे समजोन श्रमेंकरून कबूल केले हल्ली इंग्रेज घरात येऊ पहातात तमाम अंमल उठवून आपले अंमल बसवितात आमचे निमित्य करून सर्व दौलतेस गिराईक होतील सुजदौले व महमद आही यांच्या घरातून प्रथम चाकरीस येतो म्हणून नम्रतेने पायरव करून घेतली आणि आता उभयतास पोटापुर्ते देऊन सर्व दौलतीचे धनी जाले आहेत या सर्व गोष्टी तुम्हास ठाऊक आहेत तसेच आमच्या घरात होईल ते जातीने खबरदार व मनुष्ये जवळ चांगली असे असोन उभयतांच्या गति याप्रमाणे जाल्या आमचे येथे तो कारभारी मातबर जवळ कोण आहे व पायरव कोणाची आहे व मर्जीही कोणत्या तऱ्हेची आहे ह्या सर्व गोष्टी तुम्हास ठाऊक असोन तुम्ही तिही पिढ्यांचे कारभारी ही ब्राह्मणी दौलत बुडायाजोगी करिता हे तुम्हास करणे ठीक दिसत नाही तुम्हास हुजूरची मर्जी कोण्या तऱ्हेने समजाविल्याने नीट रहाते हे सर्व, कोण्या तऱ्हेने विनंति केल्यास बिघडते यास तुम्ही माहीत आहा आणि हल्ली या तऱ्हा दिसतात हे काळचक्र विपरीत आले परंतु आम्हास हाच भरवसा आहे की तुम्ही काळचक्रासही फिरवाल, हे जाणून तुम्हास पत्र लिहिले आहे तरी ब्राह्मणी दौलत नीट राहून हुजूरचाही संतोष राहून सर्व गोष्टी बऱ्या होतील त्या कराव्या न केल्यास जन्मभर चांगले केले आणि शेवटी म्हातारपणी इंग्रेजांच्या घशात ब्राह्मणी दौलत घातली हे अपेश येई तो अर्थ न करावा हुजूर ऐकत नाही असे म्हणाल तर ज्यापक्षी तुम्ही प्राण घेता किंवा पेचात आणिता त्यापक्षी काय होईल ते ही परंतु तुमचे हाती नच लागावे हा निश्चय आहे तो वाजवी आहे कोणाचाही पेच कोणासही सोसत नाही ही गोष्ट सत्यमिथ्या तुम्हीच विचार करून आपल्या चित्तात समजणे सारांश हाच की इंग्रेजांच्या हाती ब्राह्मण न चालता दौलतीचा बंदोबस्त होऊन याचा विशेष लिहावे तरी तुमचे दशांशही आम्हास समजत नाही परंतु यश अपेश याचे धनी तुम्ही ही गोष्ट लहान माधवराव पाळण्यात आहेत त्यासही समजते मग दहा वर्षांवर जे मनुष्य असेल त्यास न समजे ऐसा पर्याय नाही आम्ही लिहून विशेष तो नाही तुम्ही मोजीतही नाही परतुं आकार दिसत चालला यास्तव सूचना लिहिली आहे तरी जे कर्तव्य असेल ते विचारे करावे पूर्वी तुम्हास दोन पत्रे पाठवली होती, व नवी भावजय लाडकी केली तिचे नाव काय ठेविले, व दुसरी करावयाची कधी हा मजकूर लिहिला होता त्याचे उत्तर काहीच आले नाही पत्रे पोहोचली की नाही हे नकळे तर उत्तर पाठवविणे रवाना चंद्र १० माहे साबान बहुत काय लिहिणे हे विनंति." यातला नव्या भावजयीचा उल्लेख हा सखारामबापूंनी पहिली पत्नी हयात असताना दुसरे लग्न केले, त्याला टोमणा आहे. अशी लग्ने तेव्हा सर्रास

होत नसावीत, असे यातून दिसते. सखारामबापूंचे असे खाजगी वर्म काढण्यात आनंदीबाईंच्या स्वभावातल्या खोचकपणाबरोबरच तिचा सखारामबापूंच्या राजकारणावरचा रागही दिसून येतो.

या कथाभागानंतर अनेक घडामोडी होऊन सखारामबापू व नाना फडणीस यांनी इंग्रजांशी तह केला त्याप्रमाणे इंग्रजांना रघुनाथरावांना १७८३ साली कारभाऱ्यांच्या स्वाधीन केले. ते बायको मुलांसह नाशिकजवळ कोपरगाव येथे पेशव्यांच्या कैदेत ठेवले गेले. त्यानंतर वर्षभरात ते मृत्यू पावले. त्यांची बायको आनंदीबाई व मुले, सुना कैदेतच होते.

नाना फडणीसाची आनंदीबाईवर डोळ्यात तेल घालून पाळत होती. ती केव्हाही उठाव करू शकेल याची त्याला भीती म्हणा किंवा खात्री म्हणा, होती. आताच वाचलेले तिचे पत्र, आणि पूर्वी धारच्या किल्ल्यात तिने केलेला उठाव तिच्या प्रयत्नशीलतेची आणि धाडसाची चुणूक दाखवायला पुरेसे होते. त्यामुळे आनंदीबाई कैदेत असताना तिच्या बारीक सारीक हालचालींची बातमी नाना फडणीसाला त्याच्या कारभाऱ्यांकरवी पोचवली जात असे. या बातमीपत्रांमधला तपशील वाचताना नजर कैद म्हणजे काय, त्याची पूर्ण कल्पना येते. तिला भेटायला येणारी माणसे, त्यांनी आणलेल्या भेटी, तिने मागवलेल्या वस्तू यांचा तर त्यात उल्लेख असणारच. पण तिने धरलेली व्रते, तिने वाचायला घेतलेल्या पोथ्या, तिच्या तोंडून बाहेर पडलेला शब्दनशब्द यांची नोंद होत असे. ती बागेत हिंडत होती, तिला मासिक ऋतु प्राप्ति झाली हे कळवले जात असे. "प्रथम प्रहर रात्रीला तिच्या ओट्यावर बांधलेली गाय भयभीत होऊन ओरडली" ही घटनाही कळवली जात असे.

आनंदीबाईच्या खर्चासाठी सालाना ४०,००० ची नेमणूक केली होती. यात ती, तिची दोन मुले, दोन सुना यांच्या व्यतिरिक्त रघुनाथरावाच्या नाटकशाळा, रखेल्या यांचाही खर्च ती चालवीत असे.

रघुनाथराव वारले तेव्हा दुसरा बाजीराव नऊ वर्षांचा होता. तो पूर्णपणे आनंदीबाईच्या नजरेखालीच वाढला. पण त्याचे चारित्र्यसंवर्धन ती करू शकली नाही, असे दिसते. त्याचा दोष तिने कारभाऱ्यांवर टाकला आहे – "बाजीराव फार खेळतात यास कोणी जपत नाही येथे कारभारी आहेत त्यातून कोणी जवळ असावे ते नाही मूल शहाणे होऊ नये असे साऱ्यांस वाटते", असे तिचे याबद्दलचे म्हणणे होते. मुलाला वळण लावण्याची जबाबदारी घरातल्या कर्त्या पुरुषावर किंवा नेमून दिलेल्या शिक्षकावर सोपवण्याची पद्धत तेव्हा असावी. म्हणून बहुधा आनंदीबाईने याबाबतीत स्वतःचे दायित्व मानलेले नसावे. कदाचित याबाबतीत त्या परिस्थितीत ती हतबल झाली असावी. बाजीरावाच्या संबंधातली एक घटना या कागदपत्रात वाचायला मिळाली, त्यातून यांच्या कारणांचा अंदाज करता येतो.

बाजीराव फार लहान वयात लंपट झाला होता व तो आपल्या अल्पवयीन बायकोशी बळजबरीने संबंध ठेवीत असे. आनंदीबाईने केलेला विरोध तो जुमानीत नसे. अशाच एका प्रसंगी आनंदीबाईने त्याला मनाई केल्यावरून तो तिला वेडेवाकडे बोलला. त्यावर आनंदीबाई चवताळली, आणि तिने त्याला लाथांनी तुडवले, असे वृत्त कारभाऱ्यांनी नाना फडणीसाला कळवले आहे.

आणखी एका नोंदीत असे वाचण्यात आले की आनंदीबाईने सप्तशतीची पोथी चार दिवस ब्राह्मणाकडून वाचून घेतली, नंतर स्वतः वाचू लागली. त्याकाळात काम्य व्रते करण्याची बरीच प्रथा होती, त्यामुळे कारभाऱ्यांनी त्यांना स्वतः का वाचता असे विचारले. या प्रश्नाचा उद्देश तिला समजला. कदाचित तिच्याही मनात तोच उद्देश असावा, कारण या प्रश्नावर त्यांनी "अतिशय संतापून मनमाने तसे अपरिमित भाषण केले", मग "गोविंदपंत गोडबोले यांनी काही बोध व काही जरब दाखवून मर्जी ठिकाणी आणली."

नजर कैदेच्या या सबंध काळात आनंदीबाई अतिशय अस्वस्थ मनःस्थितीत होती, असे तिच्या तोंडच्या उद्‌गारांवरून कळत रहाते. तिचा मुलगा तिच्या डोळ्यासमोर बिघडत चालला होता. कुठूनही आशेचा किरण दिसत नव्हता. ती चारी बाजूंनी बांधल्यासारखी झाली होती. या परिस्थितीत तिच्यासारख्या कर्तबगार, हुषार, आणि महत्त्वाकांक्षी व्यक्तीच्या जिवाचा संताप होणे साहजिकच होते.

पण या संतापाच्या आणि मनःस्तापाच्या धगीमुळे तिच्या अंतःकरणातला ओलावा सुकून गेलेला नव्हता. बाजीरावाच्या बायकोबद्दल तिला माया होती. रघुनाथरावाच्या रखेल्यांचा सांभाळ ती करीत होती. त्या कैदेतल्या कुटुंबात ती कर्ती होती, आणि त्याप्रमाणे ती वागत असे. याशिवाय पेशव्यांच्या कुटुंबाबद्दलही तिच्या मनात प्रेम होते, ते एका नोंदीवरून कळते. गोपिकाबाईचा मृत्यू झाल्याचे तिला कळल्यानंतर सवाई माधवरावाला सांत्वनाचे पत्र तिने लिहवून घेतले ते वाचण्यासारखे आहे. गोपिकाबाई हयात असताना त्या दोघींचे फारसे सूत नव्हते हे पूर्वी पाहिलेच. पुढे नारायणरावाच्या वधानंतर तर तेढच निर्माण झाली. शिवाय सवाई माधवरावाला पेशवा केल्यामुळे रघुनाथरावाचा व त्याच्या वंशाचा पेशवाईवरचा हक्क डावलला गेला, हा सल मनात असणार. पण या दुःखाच्या वेळी इतर सर्व भावना मागे टाकून तिने सवाई माधवरावाचे सांत्वन केले – "श्रीमंत महाराज राजश्री रावसाहेब यांचे समाधान बहुत प्रकारे करावे म्हणौन ल्याहावयास आज्ञा केली. चिरंजीवास आईबापभाऊ कोणी नाही. आम्ही दूरच आहो. येक आजी तेहि दूरच होती परंतु ममतेचे तेवढेच मनुश्य होते त्या अर्थी चिरंजीवास श्रम बहुत होतील परंतु बहुत प्रकारे समजोन सांगावे."

सवाई माधवराव त्यावेळी १४ वर्षांचा, म्हणजे लहानच होता; व तसे तांत्रिक दृष्टीने पाहिले असता, ती त्याच्या कैदेत होती. पण ही गोष्ट तिने नात्याच्या मायेच्या आड येऊ दिलेली नाही.

आनंदीबाई १७९४ साली विफल आणि निराश मनःस्थितीत मृत्यू पावली.

आपला नवरा रघुनाथराव याला पेशवेपद मिळावे, म्हणून आनंदीबाईने आपल्याकडून प्रयत्न केले असले, तरी रघुनाथरावावर तिचे काही वजन होते, किंवा तिच्या सल्ल्याप्रमाणे तो वागत असे, असे उल्लेख सापडले नाहीत. तिच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी तिचा मुलगा बाजीराव पेशवा झाला. पण त्याची कहाणी आणखी वेगळीच झाली. तिच्या हयातीतही तिचा बाजीरावाच्या वागण्यावर काहीच अंकुश नव्हता. याला कारण बाजीरावाच्या स्वभावातला बेछूटपणा, की तिची त्या काळातली विमनस्क, काहीशी Desparate मनःस्थिती, की या दोन्ही गोष्टींचा एकत्रित परिणाम ते ठरवण्यात तसे काही स्वारस्य नाही. पण पत्नी किंवा आई कोणत्याच नात्यात तिला यश आले नाही हे खरे. रघुनाथराव शूर खरा पण काहीसा अविचारी

आणि चंचल स्वभावाचा होता. त्याच्यामध्ये महत्त्वाकांक्षा असली, तरी मुत्सद्देगिरी आणि स्थिरबुद्धि नव्हती. त्यामुळे नानासाहेब पेशव्यानंतरच्या राजकारणात त्याची फरफट झाली. त्याच्यामागे आनंदीबाईही ओढली गेली.

रियासतकार सरदेसायांनी आनंदीबाईला बरेच महत्त्व देऊन तिचा सहानुभूतीने विचार केला आहे. आनंदीबाईची बुद्धिमत्ता, धाडसीपणा, तिची राजकीय बाबतीमधली जाण, आणि परिस्थितीकडे पहाण्याचा दूरदर्शीपणा हे सारे गुण तिच्या नवऱ्याची योग्य साथ न मिळाल्यामुळे वाया गेले. तिला तिच्या आयुष्यात त्यांचा उपयोग होऊ शकला नाही, असे मत त्यांनी नोंदवले आहे.

ज्या समाजात स्त्रीच्या जीवनाला फक्त पतीच्या संदर्भातच अर्थ मिळतो, त्या समाजात अशा अनेक स्त्रियांचे गुण वाया जात असणार. आनंदीबाई ही अशा स्त्रियांची प्रतिनिधी समजली जाऊ शकते.

## ५ – सगुणाबाई

सगुणाबाई आणि गंगाबाई या पेशवे घराण्यातल्या सुना होत्या. सगुणाबाई ही नानासाहेब पेशव्यांचे अल्पायुषी बंधु जनार्दनपंत यांची बायको होती; तर गंगाबाई ही नारायणराव पेशव्याची बायको होती.

स्वतंत्रपणे प्रत्येकीचे चरित्र रेखाटन करावे इतकी माहिती या दोघी स्त्रियांबद्दल मिळू शकली नाही. खरे म्हणजे तितक्या महत्त्वाचे आयुष्य यांच्या वाट्याला आलेही नाही. परंतु तत्कालीन परिस्थितीत आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या काही वैशिष्ट्यांनी त्या उठून दिसल्या. त्या वैशिष्ट्यांची थोडीशी कल्पना या माहितीवरून मिळते.

सगुणाबाईंचे माहेरचे आडनाव भिडे. त्यांची जन्मतारीख कळू शकली नाही. त्यांचा जनार्दनपंतांशी विवाह १७४४ साली झाला. त्या काळच्या रिवाजानुसार त्यावेळी त्यांचे वय सुमारे पाच वर्षांचे असावे (जनार्दनपंताचे वय ९ वर्षांचे होते). जनार्दनपंत १७४९ साली मृत्यू पावले. सगुणाबाई वयाच्या दहाव्या वर्षी विधवा झाल्या. त्यांचा मृत्यू १७८३ साली झाला. म्हणजे एकूण ४४ वर्षांच्या आपल्या आयुष्यातली ३४ वर्षे त्यांनी वैधव्यदशेत काढली.

पेशव्यांच्या समृद्ध आणि आबाद घराण्यात सर्व सांसारिक सुखांपासून दूर राहून त्यांनी आपले आयुष्य घालवले. व्यावहारिक दृष्ट्या त्यांना कुटुंबात कोणतेच विशिष्ट स्थान नव्हते. पण तरी देखील तत्कालीन पत्रव्यवहारात सगुणाबाईंची दखल घेणाऱ्या नोंदी पहायला मिळाल्या. पेशवे घराण्यात लग्न करून आलेल्या सर्व स्त्रियांना त्यांच्या वैधव्यावस्थेतही कुटुंबात सामावून घेऊन आपुलकीने व मानाने वागवण्यात येत असे, याचे सगुणाबाई हे उदाहरण होते, शिवाय त्यांचे व्यक्तिगत गुणही त्याला कारणीभूत होते, असे म्हणता येईल.

सगुणाबाईंनी १७५६-५७ साली काशीयात्रा केली. यापूर्वी राधाबाई आणि काशीबाई यांच्या काशीयात्रेची व्यवस्था त्यांचे मुलगे अनुक्रमे बाजीराव आणि नानासाहेब यांनी केली होती. सगुणाबाई बालविधवा होत्या. त्यांच्या काशीयात्रेची व्यवस्था त्यांचे दीर नानासाहेब व चुलत दीर सदाशिवरावभाऊ यांनी केली होती. यात्रेवरून त्यांनी आपल्या दिरांना आपल्या खुशालीविषयी, उत्तरेतल्या परिस्थितीविषयी कळवणारी पत्रे लिहिली आहेत (पे. द.

१८.१४४,१४५). तिची थोरली जाऊ गोपिकाबाई हिने तिला लिहिलेल्या पत्रात यात्रा आटपून लौकर यावे, वरचेवर पत्रे पाठवावी वगैरे प्रेमाचा मजकूर लिहून शिवाय तिच्या माहेरची माणसे खुशाल आहेत, असेही कळवले आहे (१०७). बालविधवा जावेला आवर्जून तिच्या माहेरची खुशाली कळवण्यात गोपिकाबाईने स्वतःकडे घेतलेली कर्तव्यदक्ष व प्रेमळ अशा कर्त्या स्त्रीची भूमिका निभावली आहे, हे मान्य करून सुद्धा त्यातली हृद्य भावना मनावर परिणाम केल्याशिवाय रहात नाही. पेशवे कुटुंबातल्या स्त्रियांना पेशव्यांच्या लष्करी हालचालींची वार्तापत्रे पाठवली जात असत. माधवरावाने गोपिकाबाईंना अशी पत्रे नियमित पाठवली, त्यांत एका पत्रात हाच मजकूर सौ. पार्वतीबाईंनाही वाचून दाखवावा असे लिहिले. इथे सगुणाबाईंना पेशव्यांचे उत्तरेतले कारभारी अंताजी माणकेश्वर याने अशा मजकुराचे पत्र पाठवले आहे (पे. द. १.६६). या पत्राच्या शेवटी ते लिहितात – "जे आज्ञा सेवकास करणे ते करीत असावी मी हुकमी चाकर घरचे खानाजाद आहो साहेब खावंद आहेत आज्ञा करावी", ही एक लिहिण्याची औपचारिक पद्धत समजली, तरी सगुणाबाई पेशव्यांच्या आई, आजी अशा Direct नात्यातल्या कुणी नव्हत्या हे लक्षात घ्यायला हवे.

पेशव्यांच्या घरात भाऊबंदकी सुरू झाली तेव्हा त्या अलिप्त राहिल्या, पण कारणपरत्वे त्यांच्या मदतीची कुटुंबात गरज भासली तेव्हा मदत करीत गेल्या (उदा. गर्भवती गंगाबाईबरोबर सोबतीला रहाणे, इ.) असे नमूद आहे (पे. घ. इ.).

सगुणाबाई धार्मिक वृत्तीची स्त्री होती व तिच्याजवळ स्वतःचा धार्मिक ग्रंथांचा संग्रह होता. त्याकाळी गोपिकाबाई व आनंदीबाई यांच्याकडे सुद्धा स्वतःचा धार्मिक पोथ्यांचा संग्रह होता, व आणखी ज्या लागतील त्या पोथ्या त्या मागवून किंवा नकलून घेत असत. वैधव्यदशेत धार्मिक वाचन हा स्त्रियांचा विरंगुळा असे. पण सगुणाबाईच्या ग्रंथसंग्रहाची काही वैशिष्ट्ये होती त्यातून त्यांच्या स्वभावातला हौशीपणा दिसून येतो. त्यांच्याकडची एक पोथी चित्रांनी सजवलेली होती. तसेच, अगदी बारीक अक्षरात लिहिलेली, ताईतात मावू शकेल इतक्या लहान आकाराची भगवद्‌गीतेची प्रत होती, आणि तशाच आकाराचे भागवतही होते. या त्यांच्या ग्रंथ संग्रहाची स्वतंत्र दखल इतिहासकारांनी घेतली आहे, त्य अर्थी तो तसाच मोठा व वैशिष्ट्यपूर्ण असावा, इतकेच नव्हे तर असा स्वतःचा मोठा ग्रंथसंग्रह असणे त्याकाळी, निदान स्त्रियांच्या बाबतीत तरी विरळा असावे.

## ६ – गंगाबाई

गंगाबाईचे माहेर पुण्यातच साठ्यांकडे होते. त्यांच्याही जन्माची तारीख मिळू शकली नाही. त्यांचे लग्न १७६३ साली झाले तेव्हा नारायणराव ८ वर्षांचे होते, म्हणजे गंगाबाई तत्कालीन रिवाजाप्रमाणे पाचेक वर्षांच्या असाव्यात. नारायणरावांचा वध १७७३ साली झाला तेव्हा गंगाबाईंना दिवस गेलेले होते. त्यामुळे त्यांचे केशवपन केले गेले नाही, असे इतिहासकार म्हणतात. १७७७ साली त्या वारल्या तेव्हाही त्या सकेशाच होत्या. वैधव्यावस्थेत त्यांचे रीतसर डोहाळेजेवणही केले होते. याबद्दल सुरुवातीला दुसऱ्या प्रकरणात माहिती दिली आहे. गंगाबाईंच्या बाबतीतही आणखी एक लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण घटना, बऱ्याच दृष्टीने महत्त्वाचीही मानता येईल अशी आहे.

नारायणरावांचा वध झाल्यानंतर रघुनाथरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली होती, पण दरबारी मंडळींचा आपल्याला विरोध आहे हे ओळखून ते मोहिमेच्या निमित्ताने पुण्याबाहेर गेले. गंगाबाईंना धोका होऊ नये म्हणून घरातल्या वडीलधाऱ्या स्त्रियांच्या संमतीने व मदतीने त्यांना पुरंदर किल्ल्यावर नेण्यात आले. नंतर सवाई माधवरावाचा जन्म होईपर्यंत पुण्याचा कारभार गंगाबाईच्या नावे चालत होता. या संबंधीची नोंद पुरंदरे दप्तरातल्या शिवापूर–देशपांडे शब्दावतील वाचायला मिळाली (क्र. १४८ पृ. १२६-१४७).

"पौष अखेरीस श्रीमंत नारायेणराव साहेब यांची स्त्री गंगाबाई गरोदर होती ती निघोन पुरंदरास गेली सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन बरोबर गेले नारो आपाजी मुतालकीस होते याणी बाईचे हुकमावर केशवराव कोतवाल होता त्यास धरिले पुणियात मातुश्रीचा हुकूम चालला... अधिक वैशाख शुध सप्तमी शके १६९६ मातुश्री गंगाबाईस पुत्र माधवराव नारायण जाहाले."

"पुरेश्वराहून मातुश्रीचा गंगाबाईचा हुकूम पुणियात माघ शु ५ ना अधिक वैशाख शके १६९६ वद्य च्यतुर्थीपर्यंत चालला." म्हणजे सवाई माधवराव बारा दिवसांचे होईपर्यंत गंगाबाईच्या नावाने पुण्याचा कारभार चालला.

राज्य कारभाराची गुप्त खलबते चालत तेव्हा गंगाबाई हजर रहात असे आणि प्रत्येक महत्त्वाच्या कामी कारभारी तिची अनुमति घेत असत, असे कै. वासुदेवशास्त्री खरे यांनी लिहिलेल्या नाना फडणीसांच्या चरित्रात नमूद आहे.

गंगाबाईच्या नावे पुण्याचा कारभार चालेल अशी द्वाही फिरवण्यात सामाजिक पूर्वग्रह, कौटुंबिक हेवे-दावे, धर्म-रूढी इत्यादि आड आले नाहीत असे दिसते. तसेच नारायणराव पेशव्यांची आई गोपिकाबाई हयात असतानादेखील कारभाराची ग्वाही नारायणरावाची पत्नी गंगाबाई हिच्या नावाने फिरवण्यात आली, हेदेखील इथे लक्षात घेण्यासारखे आहे. मराठा घराण्यांमध्ये आईचा अधिकार पत्नीच्या अधिकाराहून वरच्या दर्जाचा मानला गेला आहे, हे आपण 'अ' गटातल्या काही उदाहरणांवरून पाहिले आहे.

गंगाबाई वारली तेव्हा तिचे वय जेमतेम १९ वर्षांचे होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता सांगणारे पत्र हरिपंततात्या फडके यांनी नाना फडणीसांना लिहिले. त्यात ते लिहितात (ए. पत्रबोध क्र. ५०) की मृत्यूसमयी तिने सवाई माधवरावाचा हात सखाराम बापूंच्या हाती दिला व ते व नाना यांनी माधवरावाचे व दौलतीचे लक्षण करावे असे सांगितले. एवढेच नव्हे तर "रामचंद्र नाईक व शिवाजीपंत सोडावे, आजीने जवळ असावे", असेही तिने सांगितले. यावरून तिने या बाबत काही एक विचार केलेला होता असे दिसते. "मातुश्रीबाई कैलासवासी जाली ही गोष्ट स्वामींचे जातीस फार उणी पडली... मोठे ठासण होते" असे जेव्हा हरिपंततात्या फडके लिहितात, तेव्हा ते केवळ औपचारिक असेल, असे यामुळेच वाटत नाही.

पेशवे घराण्यातल्या आधीच्या पिढीच्या गोपिकाबाई आणि आनंदीबाई यांच्याप्रमाणेच गंगाबाईच्या मनातही राजकीय महत्त्वाकांक्षा जागृत होण्याची शक्यता होती का? आणि तशी शक्यता होती असे गृहीत धरले, तर ती महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता कितपत होती?

तत्कालीन परिस्थिती व इतर उदाहरणे पाहिली असता, तशी शक्यता अजिबात नव्हती, असेच याचे उत्तर येईल.

# उपसंहार

अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रातल्या स्त्रियांचे जीवन सर्वसाधारणपणे कशा प्रकारचे होते, आणि त्या सर्वसाधारण जीवनातून थोड्याशा वर उठून दिसणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची वैशिष्ट्ये काय होती यासंबंधी थोडीफार माहिती आपण प्रस्तुत अभ्यासामध्ये करून घेतली. या माहितीची साधने परिमित होती, आणि मिळालेली माहिती परिपूर्ण नाही, हे लक्षात ठेवून देखील, या माहितीतून समोर येणारे निष्कर्ष तत्कालीन समाजजीवनाच्या प्रवाहाचा रोख सूचित करतात, असे म्हणायला हरकत नाही.

अठरावे शतक हा राजकीय दृष्टीने पेशव्यांच्या प्रभावाचा असा सलग कालखंड असला, तरी त्यातही वेगवेगळे टप्पे होते. ढोबळ मानाने या टप्प्यांचे वर्गीकरण करायचे झाले तर सुरुवातीचा बाळाजी विश्वनाथांचा काळ हा राज्य कारभाराची घडी बसवण्याचा काळ होता. बाळाजी विश्वनाथांनी राज्याची आर्थिक घडी बसवली, राजकीय विरोधकांना शाहूच्या बाजूने वळवले, गुणी व्यक्तींना संधी आणि अधिकार देऊन त्यांच्यावर जबाबदाऱ्या सोपवायला सुरुवात केली. शाहूने पेशवाईची वस्त्रे वंश परंपरेने दिल्यानंतर सरळ चार पिढ्या सगळे पेशवे कर्तबगार निघाले, हा या कालखंडाला स्थैर्य देणारा एक सुदैवी योगायोग होता. पहिल्या बाजीरावाच्या काळात लष्करी मोहिमांना सुरुवात होऊन मराठेशाहीच्या सीमा दक्षिण, उत्तर आणि वायव्य या तीन्ही दिशांनी विस्तारत गेल्या. इतर प्रांतांमधल्या संस्कृतीशी महाराष्ट्राचा परिचय होऊ लागला. नंतर नानासाहेबांच्या कारकीर्दीमध्ये या सर्व विस्तारित प्रदेशावर पेशव्यांचा प्रभाव स्थिर झाला, आणि कारभारावरची पेशव्यांची पकड पक्की झाली. 'पेशवाई' या नावाने ओळखण्यात येणाऱ्या या कालखंडाची वैशिष्ट्येही याच टप्प्यापासून ठळकपणे दिसून येऊ लागली. राज्य कारभार आणि लष्करी पेशा यांमध्ये ब्राह्मणांची संख्या वाढली, महत्त्वही वाढले; धर्मकृत्यांचे प्रमाण वाढले, ब्राह्मणी संस्कृति आणि विचार यांचा समाजावर पगडा वाढला.

याच सुमारास पानिपत घडले, आणि त्यामुळे पेशव्यांच्या लष्करी सामर्थ्याला हादरा बसला, त्यांचे मनोधैर्यही खचले. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत पेशव्यांनी आपली इभ्रत परत मिळवली, पण याच सुमारास पेशव्यांच्या कुटुंबात भाऊबंदकीचा कली शिरला. माधवरावांच्या अकाली मृत्यूने पेशवाईच्या अखेरच्या अंकाची घंटा वाजवली. माधवराव पेशव्यांनंतरच्या पेशव्यांनी स्वतः कारभार पाहिला नाही, किंवा ते मोहिमेवरही गेले नाहीत. सवाई माधवराव पेशवे होते तेव्हा कारभार नाना फडणीसांनी पाहिला आणि मोहिमा शिंदे-होळकरांनी पार पाडल्या. शेवटचे पेशवे दुसरे बाजीराव यांच्या कारकीर्दीत तर स्वतः

पेशव्यांच्या अनैतिक वर्तनामुळे पेशव्यांचा धाक नाहीसा झाला, कारभाराचे धोरण व दिशा नाहीशी झाली, सरदार मंडळी आपापला सवतासुभा स्थापन करू लागली. त्यामुळे मराठ्यांच्या राज्याचे विघटन व्हायची वेळ आली. समाजात बळावलेल्या धार्मिक रूढींच्या जाचकपणामुळे दांभिकता वाढली, सामाजिक अन्याय वाढला. राज्यकर्त्यांना ध्येय न राहिल्यामुळे ते स्वार्थ पाहू लागले. त्यातून फुटीरपणा वाढला.

पेशवाईच्या काळात समाजाचे चारित्र्य खालावले, विलासप्रियता वाढली, स्वार्थ बळावला, रूढी, कर्मकांड, अंधश्रद्धा यांचे प्राबल्य झाले. सत्तेचा दुरुपयोग होऊ लागला, सामाजिक जीवनात आदर्श स्थाने राहिली नाहीत, असे इतिहासकार म्हणतात, ते सर्व वर्णन मुखत्वे या अखेरच्या कालखंडाला लागू पडते.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला पेशवाई खालसा झाली तेव्हा समाजातले वातावरण असे होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य सुरू झाले, असे नंतरचा इतिहास सांगतो. मात्र या प्रबोधनाच्या चळवळीतल्या स्त्रीजीवनविषयक प्रश्नांविषयीच्या कार्याला कारणे पुरवील अशा प्रकारची, सर्वसामान्य स्त्रियांच्या जाचक जीवनपद्धतीबद्दलची माहिती या अभ्यासासाठी नजरेखालून घातलेल्या संदर्भ साधनांमध्ये फारशी हाती लागली नाही, हे इथे नमूद करणे आवश्यक वाटते. अशा माहिती दुय्यम दर्जाच्या संदर्भसाधनांमध्ये अप्रत्यक्ष पद्धतीने नोंदली गेली असणे शक्य आहे. कदाचित पेशवाईची अखेर व प्रबोधनाची सुरुवात यांच्या मधल्या पन्नासेक वर्षांच्या काळात इंग्रजींचा परकी अंमल स्थिर होत असताना स्त्रियांबद्दलच्या सामाजिक रूढी अधिक जाचक होत गेल्या असतील, हेही शक्य आहे.

या अभ्यासात ज्या स्त्रियांचा विचार केला आहे. त्या १६ स्त्रियांपैकी ५ स्त्रिया वगळता, बाकी सगळ्यांचा नानासाहेब पेशव्यांशी संबंध आलेला आहे. हा केवळ योगायोग म्हणावा का? नानासाहेबांच्या आधीचा, राजकारणाची घडी बसत असल्याचा काळ; आणि माधवराव आणि त्यांच्या नंतरचा राजकारणाची घडी बिघडत असल्याचा काळ, यांच्या मधला हा स्थैर्याचा कालखंड आहे. आधीच्या किंवा नंतरच्या कालखंडातल्या कागदपत्रात महत्त्वाच्या घटनांच्या संदर्भात स्त्रियांची नावे फारशी आढळली नाहीत, याची जबाबदारी त्या काळावर टाकायची; की त्या कागदपत्रांमध्ये नोंदी करणाऱ्यांनी अशा स्त्रियांची दखल घेतली नाही, असे मानायचे; की इतिहाससंशोधकांनी तत्कालीन कागदपत्रात स्त्रियांचे उल्लेख सापडूनही आपल्या संकलनात ते समाविष्ट केले नाहीत, असे समजायचे?

नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द हा मराठेशाहीतल्या राजकीय सत्ता स्थिर होण्याचा, आणि समाजाची घडी व्यवस्थित बसण्याचा कालखंड होता, असे आपण पाहिले. कदाचित या घडी बसण्याच्या काळात या स्त्रियांनी आपापल्या मागण्या धसास लावल्या, आणि आपली जागा शोधण्याचा प्रयत्न केला, असे म्हणता येईल.

आपण हेदेखील पाहिले की एक साताराची ताराबाई आणि कोल्हापूरची जिजाबाई वगळता, इतर उमाबाई, दर्याबाई निंबाळकर या स्त्रियांना नानासाहेबाने आपल्या मार्गातून दूर केले आहे. ताराबाईशी सुद्धा पहिल्यांदा त्याचा विरोध असला, तरी नंतर तिच्याशी सामोपचाराचे धोरण

स्वीकारून त्याने राज्याचा कारभार स्वतःच्या मर्जीप्रमाणे केला. पानिपतचा धक्का बसला नसता, तर जिजाबाईलाही त्याने या ना त्या प्रकारे आपल्या मनाप्रमाणे वागायला लावले असते, याची शक्यता एकूण इतर घटनांवरून नाकारता येत नाही.

स्त्रियांना आवश्यक तो मान, धाक, त्यांची सर्वतोपरी काळजी घ्यावी, त्यांना सुखसोयी उपलब्ध करून द्याव्या, परंतु निर्णयाचा अधिकार आपल्या हाती असावा, व त्यांनी आपल्या आज्ञेत चालावे असे नानासाहेबाचे स्वतःच्या कुटुंबातल्या स्त्रियांबाबतचे धोरण होते, हे आपण पाहिले. (त्या धोरणांची Corollary म्हणून कुटुंबातल्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था व त्यांना वागण्याचे वळण लावणे हेही पुरुषांचे काम होते.) हेच धोरण त्याने राजकारणात त्यांच्या समोर उभ्या ठाकलेल्या स्त्रियांच्या बाबतीतही वापरले. मराठ्यांच्या गादीला कोणी कर्तबगार पुरुष वारस म्हणून न मिळाल्याने, त्याला हे धोरण चालवता आले, असे दिसते. मराठा घराण्यातल्या स्त्रियांची लढाऊ परंपरा राजकारणातल्या या स्थित्यंतरामुळे खंडित झालेली दिसते. ब्राह्मणी मानसिकतेचा पगडा ब्राह्मण राज्यकर्त्यांमुळे समाजावरही बसलेला दिसतो.

मराठा घराण्यांमध्ये महत्त्वाकांक्षी व लढाऊ स्त्रियांची परंपरा होती हे आपण पूर्वी काही उदाहरणांवरून पाहिले. सत्ता गाजवू इच्छिणाऱ्या जवळ प्रत्येक स्त्रीमागे तिला ढकलून तिची जागा घेऊ पहाणारी स्त्री तयार असे. त्यांच्या जवळ वंशपरंपरा वतने व फौज होती हे याचे कारण असावे, असे आपण पूर्वी म्हटले. परंतु ब्राह्मण सरदारांकडेही वतने व फौजा असत. त्यांच्या बायका त्यांच्या बरोबर मोहिमेवरही जात असत. त्यांच्या घराण्यातल्या स्त्रियांमध्ये ही क्षात्रवृत्ती जागृत झालेली दिसत नाही. पटवर्धन घराण्यातल्या स्त्रिया, किंवा घोरपडे घराण्यातल्या स्त्रिया यांनी कधी स्वतःची फौज उभारली आहे, व आपल्याला हवे ते कारभाऱ्यांकडून मिळवण्यासाठी बंड उभारले आहे, अशी उदाहरणे आढळत नाहीत.

ब्राह्मण स्त्रियांना त्यांच्या घरातल्या पुरुषांनी राजकारणाच्या क्षेत्रात प्रवेश करू दिला नाही, असे दिसते. त्यांचा वावर कुटुंबातच असे. सामाजिक जीवनातल्या एकाद्या प्रश्नाबाबत काही न्यायनिवाडा राधाबाई (पेशवे) यांनी केला, पण त्याबद्दल त्यांना स्पष्टीकरणे द्यावी लागली. तसे एक काम आबई (पुरंदरे) यांच्याकडे आले असल्याचे वाचायला मिळाले. पण त्यांनी (पाण्याच्या वाट्याबरोबरच) अखेरचा निर्णय गावच्या देशमुख देशपांड्यांवरच सोपवला. पेशवे, पुरंदरे, पटवर्धन या कुटुंबांतल्या स्त्रियांचे मुलगे; नातू इ. आपली आई, आजी यांच्या मताच्या व मर्जीच्या विरुद्ध जाऊनही स्वतःचे विचार मांडताना आपण पाहिले. घरातल्या वडीलधाऱ्या स्त्रियांना त्यांनी दिलेला मान मुख्यत्वे शाब्दिक, व औपचारिक असे, विरोधाचा प्रसंग आल्यास वडिलधारेपणाचा मुलाहिजा बाळगला जात नसे, हेही आपण पाहिले.

याउलट मराठा घराण्यातल्या घटनांमध्ये मुलाने आईचा प्रतिवाद केल्याचे उदाहरण सापडले नाही. सत्तेच्या आणि कारभाराच्या क्षेत्रात आईला अधिकार आहे, आणि तो मुलाच्या अधिकाराहून वरच्या दर्जाचा आहे, अशी या समाजाची धारणा दिसते. केवळ आईचेच नव्हे तर सत्ताधाऱ्यांशी आपले जे काही नाते असेल, आजी, दत्तक आई, पत्नी, रखेली, बहीण त्या नात्याचा उपयोग करून या स्त्रियांनी राजकारणात शिरकाव करून घेण्याचा प्रयत्न केलेला

दिसतो, व तो बऱ्याच वेळा यशस्वीही झालेला दिसतो. याउलट ब्राह्मण घरातल्या कर्तबगार स्त्रियांवर त्यांच्या घरातल्या, किंवा कारभारातल्या पुरुषांचा सदैव अंकुश राहिलेला दिसतो. राज्यकारभार हा दुसऱ्या गटातल्या स्त्रियांचा हक्क तर नव्हेच, पण Privilege : ही नव्हता असे दिसते. य च्या घरातली पुरुष मंडळी ही स्वतः छत्रपतींच्या आज्ञेने व कृपेने कारभार करणारी होती; हक्काने नव्हे. छत्रपतींची गैरमर्जी झाल्यास कारभार त्यांच्या हातातून काढून घेतला जाणार. तेव्हा त्यांच्या कुटुंबातल्या स्त्रियांना तो अधिकार नसणे, तशी संधी न मिळणे साहजिकच म्हटले पाहिजे. उच्चपदस्थ घराण्यातल्या ब्राह्मण स्त्रियांचे जसे कौटुंबिक जीवन होते, त्याच धर्तीवर ब्राह्मण समाजातल्या इतर स्त्रियांचे जीवनही असावे म्हणजे त्याच निर्बंधात त्या वावरत असाव्या, असा अंदाज करणे चुकीचे ठरू नये.

बहुजन समाजातल्या सर्वसामान्य स्तरातल्या स्त्रियांनी स्वतःच्या उदरनिर्वाहाबाबत, मालमत्तेबाबत किंवा इतर काही अन्यायाबाबत सरकार दरबारी दाद मागितल्याची उदाहरणे आपण पाहिली, तशी ब्राह्मण स्त्रियांची उदाहरणे वाचायला मिळाली नाहीत. अशी दाद मागण्याची वेळच त्यांच्यावर येत नसे, की त्यांच्यात तेवढे धाडस नसे, की त्यांच्यावर समाजाचे दडपण असे हे कळू शकले नाही. ब्राह्मण स्त्रीने नवऱ्याकडून उदरनिर्वाहाचा खर्च मागितल्याचा एक अर्ज वाचण्यात आला तो अर्ज तिच्या बापाच्या वतीने आणखी एका तिसऱ्याच गृहस्थांनी केलेला आहे.

आधीच्या प्रकरणात ज्या काही कर्तृत्वसंपन्न स्त्रियांची माहिती आपण पाहिली, त्यांचा क्रम लावताना त्यांच्या कार्यक्षेत्रांमधला फरक लक्षात यावा, या हेतूने तो क्रम लावला होता. या फरकामुळे या स्त्रियांचे दोन गट पडतात हेही आपण पाहिले. स्त्रियांचे हे दोन गट एकूण तत्कालीन समाजातल्या दोन महत्त्वाच्या प्रवृत्तींचे प्रतिनिधित्व करतात असे म्हणता येईल. मराठा समाजाची लढाऊ परंपरा, त्यांना वाटणारे सत्तेचे महत्त्व, आणि त्यांना असणारी वतने, सरंजाम यांची ओढ यांचे प्रतिनिधित्व या समाजातून आलेल्या स्त्रियांचा पहिला गट करतो. ब्राह्मणांची विद्येवर अवलंबून असलेली, आणि कुणाच्यातरी आश्रयाने राहून उदरनिर्वाह करण्याची वृत्ति व परंपरा यांचे प्रतिनिधित्व त्या समाजातून आलेल्या स्त्रियांचा दुसरा गट करतो.

त्याकाळच्या समाजात मोठमोठे सावकार होते, ते प्रामुख्याने ब्राह्मण होते. शास्त्री, पंडितही अर्थात ब्राह्मणच होते, किरकोळ भिक्षुकी, उपाध्येगिरी करणारे होते आणि पेशव्यांमुळे कारभारात, कचेरीत, फडावर ब्राह्मण होते. किरकोळ व्यापार–उदीम करणारे, बलुतेदारी करणारे, चाकरीला रहाणारे, शेती-धनगरी व्यवसाय करणारे असे बहुजन समाजातले लोक होते. काही कायस्थ घराणी शिवाजी महाराजांच्या वेळेपासून महत्त्वाच्या जागी काम करीत होती. शेणवी-सारस्वतही होते. पण समाजाच्या या फार मोठ्या हिश्श्यातून स्त्रियांची नावे पुढे आलेली वाचायला मिळाली नाहीत.

राजे मराठा व कारभारी ब्राह्मण यामुळे तत्कालीन कर्तृत्ववान स्त्रियाही मराठा आणि ब्राह्मण समाजांतून प्रामुख्याने आलेल्या दिसतात, व त्याच्या जातीनिष्ठ वैशिष्ट्यांचा त्या नात्यात उपयोग झालेला दिसतो.

पुढे कारभारी वरचढ झाले तेव्हा त्यांच्या वैचारिक Conditioning ला अनुसरून मराठा आणि ब्राह्मण दोन्ही गटांतल्या स्त्रियांच्या कर्तृत्वाला आळा घातला गेला.

या पार्श्वभूमीवर एकोणिसाव्या शतकातल्या प्रबोधन काळाकडे पहाणे उद्‌बोधक ठरेल. या काळात शिक्षण सार्वत्रिक होऊ लागले, नव्या नोकऱ्या उपलब्ध होऊ लागल्या. ब्राह्मण नोकरीपेशा होते, आणि चारितार्थासाठी शिक्षण घेण्याची त्यांची परंपरा होती. ब्राह्मण पुरुषांनी इंग्रजी शिक्षण घेतले, त्यांचा आधुनिक विचारांशी परिचय झाला, त्यांनी आपल्या कुटुंबातल्या स्त्रियांनाही शिकवले, पुढे आणले, आपल्या कामात सहभागी व्हायला प्रोत्साहन दिले. या स्त्रियांनी समाजकार्यात रस घेतला, नंतरची स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ हीदेखील त्यांच्या देशकार्याचा, समाजकार्याचा भाग होती.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेच्या राजकारणाला पुन्हा महत्त्व आले. विशेषतः लोकशाही शासन पद्धतीमुळे मातीशी संबंध असणे, स्वतःचा हुकमी मते मिळवून देणारा मतदार संघ असणे आवश्यक झाले. त्यामुळे सत्तेचे आकर्षण असणाऱ्या, आणि प्रामुख्याने ग्रामीण भागात लहानमोठी वतने वंशपरंपरेने उपभोगीत असणाऱ्या मराठा समाजातल्या स्त्रिया सत्तेच्या, विशेषतः काँग्रेसच्या राजकारणात पुढे आलेल्या आपल्याला दिसतात. राजकारणातल्या मराठा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून या स्त्रिया कामे करताना दिसतात. तर ब्राह्मण पुरुषांप्रमाणे ब्राह्मण स्त्रियाही मुख्यत्वे शिक्षण, शिक्षणाधिष्ठित नोकऱ्या व्यवसाय, यांच्याशी निगडित आहेत. त्यांचे राजकारण शहरातले व विरोधी पक्षातले आहे.

मात्र आजच्या सार्वत्रिक संधीच्या काळात, मराठा आणि ब्राह्मण या पारंपारिक गटांबाहेरच्या प्रचंड बहुजन समाजही वेगवेगळ्या क्षेत्रांत विकासाची वाटचाल करीत आहे. त्यात या समाजातल्या स्त्रियाही सामील आहेत.

असे चित्र नजरेसमोर आले की 'स्त्रियांचा अभ्यास' हे केवळ स्त्रीमुक्ती चळवळीचे साधन नसून एकूणच समाजाची जडणघडण समजून घेण्याचे एक साधन आहे, हे लक्षात येते.

एकाद्या विशिष्ट भौगोलिक प्रदेशातल्या विशिष्ट कालखंडात, समाजजीवनात ठळकपणे उठून दिसणाऱ्या स्त्रियांविषयी विचार करताना, काही मुद्दे विचारात घ्यावे लागतात. पुरुषप्रधान समाजात पुरुषांच्या कार्यक्षेत्रात पाय रोवू पहाणाऱ्या स्त्रियांची काही परंपरा या समाजात होती का? नसल्यास या स्त्रियांच्या उदाहरणांतून ती निर्माण झाली का? या स्त्रियांना त्यांच्या अंगीकृत कार्यात यश आले असले, तर ते कसे आले आणि अपयश आले असले, तर त्याची कारणे कोणती? त्यांच्या यशापशाचा त्यांच्या व्यक्तिगत गुणावगुणांशी संबंध किती, आणि तत्कालीन परिस्थितीशी संबंध किती? असे अनेक प्रश्न स्त्रीजीवनाचा ऐतिहासिक आढावा घेताना समोर उभे रहातात.

प्रस्तुत अभ्यास हे अशा ऐतिहासिक आढाव्याचे अगदी प्राथमिक आणि चाचपडत वाटचाल करणारे स्वरूप आहे. प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे कोणत्याही विशिष्ट समाजाचा सर्वांगीण अभ्यास हे एकट्या दुकट्याने करण्याचे काम नसते. तसेच ते काम पूर्ण करण्याचा कालावधी आगाऊ निश्चित करणेही कठीण असते. अभ्यासाची जितकी जास्त साधने

उपलब्ध होत जातील तितकी त्या अभ्यासाची व त्यातून निघणाऱ्या निष्कर्षांची व्याप्ती, खोली व विश्वसनीयताही वाढत जाते. या गोष्टीचे पूर्ण भान बाळगून हा, परिमित साधनांच्या आधाराने व पूर्वनिश्चित कालावधीत पूर्ण केलेला अभ्यास सादर केला आहे. सामाजिक इतिहासाच्या अभ्यासाचा सुरुवातीचा, लहान प्रमाणातला प्रयत्न म्हणून त्याकडे पाहणे योग्य ठरेल.

समाजजीवनविषयक प्रश्नांना निर्णायक उत्तरे असू शकत नाहीत, हेच एक उत्तर याबाबत ठामपणे देता येते. परंतु तरीदेखील अशा अभ्यासात सापडणारी निरनिराळी उदाहरणे एकमेकांना जोडल्यानंतर जी काही आकृति तयार होते, ती समाजजीवनाविषयी काही एक धारणा बनवायला मदत करते. एकाद्या समाजाचा कालनुक्रमे अभ्यास केल्यास त्यातून त्या समाजजीवनाच्या प्रवासाची दिशा आणि स्वरूप स्पष्ट होत जातात. कोणत्याही विशिष्ट कालखंडामध्ये आणि भौगोलिक प्रदेशामध्ये अस्तित्वात असलेल्या समाजातले बहुसंख्य स्त्रिया आणि बहुसंख्य पुरुष हे सारख्याच प्रकारे बंदिस्त किंवा मुक्त असतात आणि कर्तृत्ववान स्त्रिया आणि कर्तृत्ववान पुरुष सामाजिक व्यवहारांच्या समान क्षेत्रात कार्यरत असलेले दिसतात. अर्थात त्यात प्रमाणाचा मोठा फरक आहे. त्याची कारणे वेगळी शोधावी लागतील.

मात्र अशा प्रकारच्या तपशीलवार अभ्यासाची प्रेरणा स्त्री-मुक्तीच्या चळवळीतून मिळाली, हे या चळवळीचे समाजशास्त्रावर ऋण आहे, असे म्हटले पाहिजे.

REFBK-0026738

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# संदर्भग्रंथ सूची

वाचलेल्या सर्व ग्रंथांची यादी न देता, ज्या ग्रंथांमधले संदर्भ वापरले त्यांचीच फक्त नोंद इथे केली आहे.

ज्यांचा संदर्भ वरचेवर घेतला गेला आहे अशा ग्रंथांची फक्त आद्याक्षरे मजकुरात त्या त्या ठिकाणी दिली आहेत. उदा – पेशवे दप्तर (पे. द.), पेशवे घराण्याचा इतिहास (पे. घ. इ.), ऐतिहासिक लेख संग्रह (ऐ. ले. सं.). पुरंदरे दप्तर (पु. द.), करवीर रियासत (क. रि.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने (म. इ. सा.) इत्यादि.

पहिल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत अभ्यासासाठी तत्कालीन पत्रव्यवहार हे प्रमुख साधन म्हणून वापरले. त्या व्यतिरिक्त पूरक माहितीसाठी इतरही काही ग्रंथांचा उपयोग झाला. त्या सर्वांची सूची खाली दिली आहे. महत्त्वाच्या नोंदींचे संदर्भ प्रकरणांमध्ये त्या त्या जागी दिलेले आहेत. सामाजिक वातावरणाची माहिती करून घेण्यासाठी 'पेशवेकालीन महाराष्ट्र' व 'पेशवे घराण्याचा इतिहास' या दोन ग्रंथांचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. त्या व्यतिरिक्त 'नानासाहेब पेशवे यांचे चरित्र' या रियासतकार सरदेसाई यांनी लिहिलेल्या ग्रंथाला असलेली शेजवलकरांची प्रस्तावना, या कालखंडाबद्दलच्या समजुतीला एक वेगळे परिमाण देणारी, म्हणून उपयोगी पडली.


पेशवे दप्तर १ ते ७, १८ ते २४ – संपा. सरदेसाई.

ऐतिहासिक लेख संग्रह १ ते ३ – संपा. वासुदेवशास्त्री खरे.

पुरंदरे दप्तर १ व २, ३ – संपा. कृ. वा. पुरंदरे.

ऐतिहासिक पत्रबोध – सरदेसाई.

थोरले शाहू महाराज यांचे चरित्र – मल्हार रामराव चिटणीस.

थोरले शाहू महाराज यांचे चरित्र – चिं. ग. गोगटे.

श्रीमंत छत्रपती धाकटे रामराजे व धाकटे शाहू महाराज यांची चरित्रे, करवीर रियासत – संपा. स. मा. गर्गे.

नाना फडणीसांचे आत्मचरित्र – मल्हार रामराव चिटणीस.

नाना फडणीसांचे आत्मचरित्र – वासुदेवशास्त्री खरे.

इचलकरंजी संस्थानचा इतिहास व निवडक पत्रे – वासुदेवशास्त्री खरे.

नानासाहेब पेशव्यांचे चरित्र – गो. स. सरदेसाई.

कुलाबकर आंग्रे सरखेल – दा. गो. ढब्बू.

दाभाड्यांच्या घराण्याचा इतिहास – मा. रा. परांडेकर.

नागपूरकर भोसल्यांचा इतिहास – या. मा. काळे.

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

## राज्यसत्तेच्या फटींमधून :

# पेशवेकालीन स्त्रिया

नीलिमा भावे

'स्व'च्या शोधासाठी चाललेला स्त्रीचा आजचा झगडा समजून घेण्यासाठी इतिहासात शक्यतो पाठी जाऊन शोध घ्यावा लागेल. त्या काळी हे झगडे स्त्रीमुक्तीच्या नावाने ओळखले गेले नसले तरी आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीची बीजे त्यातच सापडतात. या संशोधन प्रकल्पात अशा प्रकारच्या झगड्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

हा शोध घेताना कालक्रमानुसार मालिकेचे पाच अभ्यासखंडांमध्ये विभाजन केले आहे. संतकाळ म्हणजेच साधारणपणे तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचा काळ, नंतर पेशवे काळ, एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध व उत्तरार्ध आणि विसाव्या शतकातील सुरुवातीचा काळ असे या अभ्यासखंडाचे टप्पे मानता येतील. त्याचप्रमाणे विषयाची मांडणी करताना आवश्यकतेनुसार, वाङ्मयविचार, व्यक्तिचित्रण, ऐतहासिक पुराव्यांच्या आधारे केलेली चर्चा, प्रत्यक्ष मुलाखती अशा विविध माध्यमांचा केलेला वापर हे या मालिकेचे वैशिष्ट्य ठरावे.

इंदुमति शेवडे यांचे 'संत कवयित्री' हे या मालिकेतले पहिले पुस्तक. हा अभ्यासखंड सतराव्या शतकातील वेणाबाईशी थांबतो. त्यानंतरचा हा दुसरा अभ्यासखंड. यात कालदृष्ट्या एक मोठी झेप घेऊन पेशवाईतील स्त्रियांची चरित्रे तपासण्याचा प्रयत्न दिसून येईल. पेशव्यांच्या ब्राह्मण स्त्रिया आणि त्याच काळातील सत्ताधारी राजे, सरदार यांच्या मराठा स्त्रिया यांची दखल आजपर्यंत इतिहासात घेतली गेली नव्हती. त्यांच्या कर्तृत्वाची योग्य मीमांसा या अभ्यासखंडात केलेली दिसून येईल.

**किंमत : रु. ५०.००**

(म-५८८)

पॉप्युलर प्रकाशन

मुखपृष्ठ : कमल शेडगे